# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

सभा क्र.०२/ २०१६ दिनांक १६.०२.२०१६

स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर वेळ- दुपारी ०४.०० वाजता

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक १६.०२.२०१६ रोजी दुपारी ०४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ६२७८/ २०१६, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१६ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू मंगळवार दिनांक १६.०२.२०१६ रोजी दुपारी ०४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक ०२.०२.२०१६ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.७६** दिनांक ०२.०२.२०१६ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

---

**विषय नं.०२** **दिनांक ०४.०२.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.७७** दिनांक ०४.०२.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील दंत विभागाकरीता योग्य ते साहित्य बनविणेकामी दर निश्चित करणेकामी प्राप्त कमर्शिअल निविदा उघडणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दंत विभाग स्वतंत्र भाग असून त्यात रुग्णांची तपासणी केल्यानंतर त्यांना आवश्यक असलेले दाताची कवळी व इतर दंत विषयक अथवा दंत सौंदर्य वर्धक साहित्याची योग्य ती मोजमापे घेवून त्यानुसार प्रचलित दराने योग्य ती फी रुग्णामार्फत हॉस्पिटलमध्ये भरणा केल्यानंतर सदर साधने लॅब मधून बनवून घेवून, ती संबंधित रुग्णास देण्यात येतात.

श्री साईबाबा रुग्णालयामधील दंत विभागातील रुग्णांचे कृत्रीम साचा तयार करणे व सामुग्री पुरविणेकामी दि.०१.१२.२०१५ चे मंजूर टिपणीन्वये विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार विहीत पध्दतीने कोटेशन मागवून निम्नतम दराने मे.सह्याद्री डेन्टल सिरॅमिक्स, लोणी यांना इकडील पत्र क्र.२८३५ दि.०३.०९.२०१३ रोजीचे पत्रान्वये पुरवठा आदेश देणेत आला होता.

सन २०१३-१४ साली (दि.०३.०९.२०१३ ते ०२.०९.२०१४ पर्यंत) दंत व दंत साहित्य बनवण्याचे काम मे. सह्याद्री डेन्टल सिरॅमिक्स, लोणी खुर्द यांनी देण्यात आले होते. पुर्ण वर्षभर मे.सह्याद्री डेन्टल सिरॅमिक्स, लोणी यांनी चांगल्या प्रकारची सेवा व दर्जाचे साहित्य मागणी प्रमाणे दिलेले आहे. त्याचा विचार करुन पुढील एक वर्षासाठी देखील त्याच मंजूर दराने मे.सह्याद्री डेन्टल सिरॅमीक, लोणी खु. हे काम करण्यास तयार आहे किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात आली होती. त्यांनी दि. ०१/०८/२०१४ चे पत्रान्वये मागील मंजूर दराप्रमाणे दंत व दंत साहित्य पुरविणेचे काम करुन देणेस मान्य केले होते.

त्यानुसार, दि.२७/०८/२१४ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये पुढील ०३ महिन्यांकरिता मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यानुसार पुढील ०३ महिने मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या रक्कम रु. २५,०००/- चे खर्चास मान्यता मिळाली होती.

परंतु, दंत विभागाने दि.०९/०९/२०१४ चे पत्रान्वये दंत विभागात अजून काही नवीन उपचार पध्दती कार्यान्वीत करावयाची आहे व त्याकरिता देखील दर करार करण्यात यावा असे कळविलेले आहे . तेंव्हा सध्या करत असलेल्या व त्यांनी नवीन मागणी केलेल्या साहित्याची पुन्हा निविदा मागविण्यात येईल.

तरी सोबतच्या तक्त्याप्रमाणे साहित्य बनविणेकामी अंदाजे रु.३,०२,८००/- (अक्षरी रु. तीन लाख दोन हजार आठशे) पर्यंत खर्च अपेक्षीत आहे.

तरी सोबतच्या तक्त्याप्रमाणे दंत साहित्य बनविणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवण्यास, तसेच याकामी येणा-या अंदाजे रु.३,०२,८००/- (अक्षरी रु. तीन लाख दोन हजार आठशे) चा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समिती सभा दि.०८/१२/२०१४ निर्णय क्र.१०२१ अन्वये मान्यता मिळाली होती.

त्यानुसार, दि.०३/०३/२०१५ अखेर सिलबंद निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर जाहिरातीस अनुसरुन मे.सह्याद्री डेन्टल लॅब, लोणी यांची ०१ निविदा प्राप्त झाली होती. सदर खरेदीकामी ०३ निविदांची आवश्यकता असते.

तेंव्हा दि.२३/०३/२०१५ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये दि.०२/०७/२०१५ अखेर ई– निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु, जाहिरातीस अनुसरुन एकही निविदा प्राप्त झाली नाही.

त्याकामी पुन्हा दि.०३/०८/२०१५ रोजीचे टिप्पणीन्वये दि.०३/१२/२०१५ अखेर तिस-यांदा फेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार ०१ निविदा प्राप्त झाली आहे.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे–

| Sr. No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Healthcare, Pune | 03/12/2015 |

तरी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०१ तांत्रिक सिलबंद निविदा दि.३०.१२.२०१५ रोजी प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आलेली आहे. सदर तांत्रिक बाबींच्या निविदेचा तक्ता तयार करण्यात आलेला असून, सदर निविदा ही तांत्रिकदृष्टया पात्र आहे.

उपरोक्तप्रमाणे तिस-यांदा प्राप्त झालेली ०१ कमर्शियल ई निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत आली. त्यामधील मुळ दर खालीलप्रमाणे-

| S. no. | Description of Instruments | Qty. | Unit | Rate Per | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| | **CERAMIC WORK** | | | | |
| 1 | FULL CERAMIC FUSE TO METAL PER UNIT WITH DIE CUTTING & DITCHING | 305 | Nos. | 1365.78 | 416562.90 |
| 2 | HALF CERAMIC (FACING) FUSE TO METAL/ UNIT | 10 | Nos. | 1208.19 | 12081.90 |
| 3 | CERAMIC FREE METAL PER UNIT | 15 | Nos. | 3300.64 | 49509.60 |
| | **METAL WORK** | | | | |
| 4 | WHITE METAL WITH ACRYLIC FACING PER UNIT (Nickel Chrome) | 5 | Nos. | 1570.65 | 7853.25 |
| 5 | WHITE METAL WITHOUT FACING/ UNIT (Nickel Chrome) | 100 | Nos. | 427.14 | 42714 |
| | **ACRYLIC WORK** | | | | |
| 6 | ACRYLIC J.C. PER UNIT (Temporary Crown) | 10 | Nos. | | 0 |
| 7 | C.D.IN FIBER GLASS WITH NORMAL TEETH SET UPTO POLISH WITH FORMATRAY | 8 | Nos. | 2416.38 | 19331.04 |
| 8 | C.D. IN LUCITONE WITH KULZER TEETH SET UPTO POLISH WITH FORMATRAY | 5 | Nos. | 5279.27 | 26396.35 |
| 9 | R.P.D. UPTO 3 TEETH WITH CLASS | 11 | Nos. | 0 | 0 |
| 10 | ADDITIONAL PER TEETH | 10 | Nos. | 0 | 0 |
| 11 | SINGLE DENTURE (UPPER / LOWER) | 5 | Nos. | 0 | 0 |
| 12 | SPL.TRAY IN FORMATRY MATERIAL U/L | 15 | Nos. | 181.94 | 2729.10 |
| 13 | RECORD BASE IN SHELAC WITH WAX RIM U/L | 5 | Nos. | 0 | 0 |
| 14 | OBATURATOR | 5 | Nos. | 0 | 0 |
| 15 | Ceramic Crown by CAD/CAM | | Nos. | | 0 |
| 15.1 | 5 years Warranty | 10 | Nos. | 1584.47 | 15844.70 |
| 15.2 | 7 years Warranty | 5 | Nos. | 0 | 0 |
| 16 | Metal Free Ceramic | | Nos. | | 0 |
| 16.1 | 5 years Warranty | 10 | Nos. | 3755.90 | 37559 |
| 16.2 | 7 years Warranty | 5 | Nos. | 0 | 0 |
| 16.3 | 15 years Warranty | 5 | Nos. | 0 | 0 |
| 17 | Implant Prosthesis Per Unit | | Nos. | | 0 |
| 17.1 | PFM | 10 | Nos. | 2048.67 | 20486.7 |
| 17.2 | Metal free | 5 | Nos. | 4552.60 | 22763 |
| 18 | Flexible RPD | 5 | Nos. | 4552.60 | 22763 |
| 19 | Flexible CD | 5 | Nos. | 0 | 0 |
| 20 | Night Guard | 5 | Nos. | 568.56 | 2842.80 |
| | | | **Total Amt. in Rs.-** | | **699437.30** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील दंत विभागाकरीता प्रस्तावित साहित्य बनविणेकामी तिस-यांदा निविदांची मागणी करणेत येऊनही, M/s. Austin Healthcare, Pune यांची एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे त्यांचे उपरोक्त तक्यामधील दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०२ **सन २०१५-१६ या वर्षासाठी बेडशीट, उशी कव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे व भक्तांचे कपडे शुल्क आकारुन धुणे/ इस्त्री करुन देणे या कामासंबधी ई-निविदेव्दारे आलेले चारही निविदाधारकांचे बीडस् ऑफ कोटेशन (प्राइज बीड) उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

सन २०१५-१६ या वर्षासाठी बेडशीट, उशी कव्हर, चादर, टॉवेल धुणे/इस्त्री करणेकामी रु.५६,००,०००/- चे खर्चास व त्याकामी दैनिक वर्तमान पत्रात ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविण्यास मा.व्यवस्थापन समिती व मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता असून ई-निविदा प्रक्रियेला जादा कालावधी लागणार असल्याने नविन कॉन्ट्रॅक्टरला कार्यादेश देई पावेतो आहे त्याच मागिल वर्षाच्या दरात सद्याचे लॉण्ड्री कॉन्ट्रॅक्टरला दरमहा रु.४,६७,०००/- च्या खर्चासह दरमहा कार्यादेश देणेस मान्यता मिळालेली आहे.

तसेच संस्थानमध्ये पाण्याचा स्त्रोत कमी असल्याने पाण्याचा वापर जादा होऊ नये व ISO मानांकनाच्या दृष्टीने भक्तांनी खोल्यामधील स्नानगृहामध्ये कपडे धुऊ नये. यासाठी भक्तांकडून कपडे धुणे व इस्त्री करण्याचे पैसे आकारुन कपडे इस्त्री करुन देणेसाठी ठेकेदाराची नेमणूक करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेली आहे.

यासाठी दुस-यांदा दि.२८/११/२०१५ रोजी दैनिक वर्तमान पत्रे, संस्थानचे संकेतस्थळ व महाराष्ट्र राज्य शासनाच्या संकेतस्थळावर फेर ई-निविदा सूचना जाहिरात देऊन खालील तक्त्यात दर्शविलेले चार निविदाधारकांचे टेक्नीकल व प्राइज बीड ऑनलाईनव्दारे कार्यालयीन वेळेपूर्वी जमा झालेले आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | आवक नंबर व दिनांक | लिफाफा संख्या |
|---|---|---|---|
| १ | अथर्व ड्रायक्लिनर्स, कोपरगांव | १८३७९ दि.१६.१२.२०१६ | १ |
| २ | साई श्रध्दा लॉण्ड्री अॅण्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर | १८३७६ दि.१६.१२.२०१६ | १ |
| ३ | साईराज लॉण्ड्री सर्व्हिसेस, सावळीविहीर | १८५६२ दि.१७.१२.२०१६ | १ |
| ४ | स्पार्कलेस लॉण्ड्री, पोहेगांव | १८५६३ दि.१७.१२.२०१६ | १ |

प्रस्तावः- तांत्रीक निविदा छाननी समिती समोर उपरोक्त निविदाधारकाचे दि.२५/१२/२०१५ रोजी ऑनलाईनव्दारे जमा झालेले टेक्नीकल बीड महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळामधील काही तांत्रिक अडचणीमुळे ओपन झाले नाही त्यामुळे त्या दिवशी फक्त लिफाफा क्र.१ उघडण्यात येऊन दि.२७/१२/२०१५ रोजी ई.डी.पी.मॅनेजर श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे कडून ऑनलाईन व्दारे आलेले टेक्नीकल बीड उघडण्यात येऊन, तांत्रिक कागदपत्रे छाननी तक्ता तयार करण्यात आला असता, सोबत जोडलेल्या छाननी तक्त्यातील अ.नं.३ साईराज लॉण्ड्री सर्व्हिसेस, सावळीविहीर यांनी नोंदणी दाखला, सर्व्हिस टॅक्स दाखला व लॉण्ड्री मशिनरी यादी ही कागदपत्रे ऑनलाईन जमा केलेली नाहीत. तथापी त्यांनी डी.डी. समवेत सदरचे कागद पत्राच्या प्रती बंद पाकिटात सादर केलेल्या आहेत. सोबत छाननी तक्ता अवलोकनार्थ सादर करीत आहे.

त्यामुळे निकोपपणे स्पर्धा व्हावी यासाठी चारही निविदाधारकांचे प्राइज बीड उघण्यात यावे असे मत तांत्रीक निविदा छाननी समितीने व्यक्त केलेले आहे.

तांत्रीक निविदा छाननी समितीचे अभिप्रायानुसार उपरोक्त ०४ ई-निविदांचे प्राइज बीड आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

**अ) संस्थानचे कपडयांसाठी आलेले दरः-**

| अनं. | कपडयांचा तपशील | अथर्व ड्रायक्लिनर्स प्रती नग दर रु. | विजय अशोक चव्हाण प्रती नग दर रु. | स्पार्कलेस लॉण्ड्री प्रती नग दर रु. | साईराज लॉण्ड्री सर्व्हिसेस प्रती नग दर रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | बेडशीट धुवून इस्त्री करणे | १५.०० | ३.४२ | ४.३५ | ४.३ |
| २ | उशी कव्हर धुवून इस्त्री करणे | ३.०० | २.२८ | २.७८ | २.०१ |
| ३ | टॉवेल धुवून ड्रायर करणे | १०.०० | २.८५ | ३.४८ | २.५८ |
| ४ | चादर धुणे | १०.०० | ७.९८ | ८.७ | ८.०० |

ब) भक्तांचे कपडे शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करणे कामासाठी आलेले दर:-

| अ.नं | कपडयांचा तपशील | अथर्व ड्रायक्लिनर्स प्रती नग दर रु. | विजय अशोक चव्हाण प्रती नग दर रु. | स्पार्कलेस लॉण्ड्री प्रती नग दर रु. | साईराज लॉण्ड्री सर्व्हिसेस प्रती नग दर रु. |
|---|---|---|---|---|---|
| | **पुरुषांचे कपडे धुणे/इस्त्री करणे** | | | | |
| १ | सफारी सुट | ३०.०० | १६.०० | ३०.०० | २०.०० |
| २ | शर्ट/टी शर्ट | १२.०० | ८.०० | २५.०० | १५.०० |
| ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | १५.०० | ८.०० | २५.०० | १५.०० |
| ४ | जाकेट/स्वेटर | २०.०० | ८.०० | ३०.०० | १५.०० |
| | **पुरुषांचे कपडे फक्त इस्त्री करणे** | | | | |
| १ | सफारी सुट | १५.०० | ८.०० | २०.०० | १०.०० |
| २ | शर्ट/टी शर्ट | ६.०० | ४.०० | १५.०० | १०.०० |
| ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ६.०० | ४.०० | १५.०० | १०.०० |
| ४ | जाकेट/स्वेटर | १०.०० | ४.०० | २०.०० | १०.०० |
| | **महिलांचे कपडे धुणे/इस्त्री करणे** | | | | |
| १ | साडी | ५०.०० | २०.०० | ३०.०० | २५.०० |
| २ | ब्लाऊज | १०.०० | ६.०० | १५.०० | १०.०० |
| ३ | टी-शर्ट | १०.०० | ८.०० | २५.०० | १५.०० |
| ४ | स्लॅक्स/शॉर्ट पॅन्ट | १५.०० | ८.०० | २०.०० | १५.०० |
| ५ | पॅन्ट/जीन्स | १५.०० | ८.०० | २५.०० | १५.०० |
| ६ | नाईट सुट | १५.०० | १३.०० | २५.०० | १५.०० |
| ७ | जाकेट/स्वेटर | १५.०० | ८.०० | ३०.०० | १५.०० |
| ८ | पेटीकोट/गाऊन | १५.०० | १०.०० | २५.०० | १५.०० |
| | **महिलांचे कपडे फक्त इस्त्री करणे** | | | | |
| १ | साडी | २५.०० | १२.०० | २०.०० | १५.०० |
| २ | ब्लाऊज | ५.०० | ३.०० | १०.०० | ५.०० |
| ३ | टी-शर्ट | ५.०० | ५.०० | १५.०० | १०.०० |
| ४ | स्लॅक्स/शॉर्ट पॅन्ट | ५.०० | ५.०० | १५.०० | १०.०० |
| ५ | पॅन्ट/जीन्स | ८.०० | ५.०० | २०.०० | १०.०० |
| ६ | नाईट सुट | १५.०० | ६.०० | १५.०० | १०.०० |
| ७ | जाकेट/स्वेटर | १५.०० | ५.०० | २०.०० | १०.०० |
| ८ | पेटीकोट/गाऊन | १०.०० | ६.०० | १५.०० | १०.०० |
| | **मुलांचे कपडे धुणे/इस्त्री करणे** | | | | |
| १ | सफारी सुट | ३०.०० | १५.०० | ३०.०० | २०.०० |
| २ | शर्ट/टी शर्ट | १०.०० | ८.०० | २५.०० | १५.०० |
| ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | १०.०० | ८.०० | २५.०० | १५.०० |
| ४ | जाकेट/स्वेटर | १५.०० | ८.०० | ३०.०० | १५.०० |
| ५ | शॉर्ट पॅन्ट | १०.०० | ८.०० | २५.०० | १०.०० |
| | **मुलांचे कपडे फक्त इस्त्री करणे** | | | | |
| १ | सफारी सुट | १५.०० | ८.०० | २०.०० | १०.०० |
| २ | शर्ट/टी शर्ट | ५.०० | ४.०० | १५.०० | १५.०० |
| ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ५.०० | ४.०० | १५.०० | १५.०० |
| ४ | जाकेट/स्वेटर | १०.०० | ४.०० | २०.०० | १५.०० |
| ५ | शॉर्ट पॅन्ट | ५.०० | ४.०० | १५.०० | ५.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५-१६ या वर्षासाठी बेडशीट, उशी कव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे तसेच साईभक्तांचे कपडे शुल्क आकारुन धुणे/ इस्त्री करुन देणे या कामांसाठी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

०३ **साई धर्मशाळा विभागाकडील बेडशिट, उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करण्याचे कामाबाबत दुस-यांदा मागविण्यात आलेले पात्र निविदाधारकांचे प्राईज बीड उघडणेबाबत.**

साई धर्मशाळा हा विभाग दि.१८/०७/२०१३ पासुन पालखी पदयात्रीतील साईभक्तांचे निवासव्यवस्थेसाठी सुरु करण्यात आलेला आहे. सदर ठिकाणी एकुण सहा इमारती असून पैकी एक इमारत श्री साईबाबा संस्थान संचलित कनिष्ठ महाविद्यालय यांना वापरण्यासाठी दिलेली आहे. उर्वरीत पाच इमारतीमध्ये प्रत्येकी ३२ हॉल नुसार एकुण १६० हॉल साईभक्तांचे निवासासाठी वापरण्यात येत आहे.

दिनांक २३/०७/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.२०४ नुसार श्री साईबाबा संस्थानचे साई धर्मशाळा मधील साई धर्मशाळा विभागाकडील बेडशिट, उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करण्याचे कामाबाबत अनुभवी व पात्र ठेकेदार यांचेकडुन सिलबंद निविदा दुस-यांदा मागविणे बाबत दिनांक १३/११/२०१५ रोजीचे वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार बेडशिट, उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करण्याचे कामी वार्षिक खर्च रुपये ३,००,०००/- पर्यंत मान्यता घेण्यात आली आहे.

भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणुन नविन ठेकेदाराची नेमणुक होईस्तोपर्यंत पुर्वीच्याच ठेकेदारास मागील दरानुसार बेडशिट, उशिकव्हर व चादर धुणे/इस्त्री करणेकामी मान्यता घेण्यात आली आहे.

साई धर्मशाळा मधील साई धर्मशाळा विभागाकडील बेडशिट, उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करण्याचे कामी निविदा विक्री मुदत १६/११/२०१५ ते २३/११/२०१५ अखेर दुपारी ०५.०० वाजेपर्यंत होती. निविदा बंद पाकीटातुन स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२६/११/२०१५ वार गुरुवार सायं. ०५.०० वाजेपर्यंत होती. दिनांक २६/११/२०१५ रोजी पर्यंतचे मुदतीत शिर्डी कार्यालयात ०४ निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या असुन दि. ३१/१२/२०१५ रोजी प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष टेक्नीकल बीडचे कागदपत्रे उघडण्यात आले. त्यानुसार बेडशिट, उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करण्याचे कामा करीता निविदाधारकांनी निविदासोबत दिलेला टेक्नीकल बीड कागदपत्राचा तुलनात्मक तक्ता तयार करुन मा. लेखाधिकारी यांचे कडुन तपासणी करण्यात आली आहे. आलेल्या ०४ निविदाधारका पैकी ०३ निविदाधारक पात्र झाले आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव व पत्ता | पात्रअपात्र/ |
|---|---|---|
| १ | साई श्रध्दा लॉण्ड्री ॲण्ड सर्व्हिसेस, श्री विजय अशोकराव चव्हाण, मु.पो. सावळीविहीर, ता. राहाता, जि. अ.नगर. | **पात्र** |
| २ | श्री साई प्रसाद पॉवर लॉण्ड्री, नांदुर्खी९८८१८६७४३३-.नं.मो .सगर .पा.प्रो . | **पात्र** |
| ३ | साई सोहम लॉण्ड्री, श्री कुलदिप रघुनाथ जाधव, चारी नं११.,निमगांव को.हाळे- | **पात्र** |
| ४ | फॅन्सीबल लॉण्ड्री, कोपरगांव, मो०९०२११७१४६९-नं. | **अपात्र** |

साई धर्मशाळा विभागाकडील बेडशिट, उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करण्याचे कामाबाबत सन २०१६ - २०१७ सालासाठीचे वार्षिक कामासाठी आलेल्या निविदाधारकापैकी अ.क्र. १ ते ३ निविदाधारक पात्र झालेले आहे.

उपरोक्तप्रमाणे पात्र झालेल्या निविदाधारकांचे प्राईज बीड आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव व पत्ता | बेडशीट धुवून इस्त्री करणे | उशी कव्हर धुवून इस्त्री करणे | चादर धुणे |
|---|---|---|---|---|
| | | दर प्रति नगास रुपये | दर प्रति नगास रुपये | दर प्रति नगास रुपये |
| १ | साई श्रध्दा लॉण्ड्री ॲण्ड सर्व्हिसेस, श्री विजय अशोकराव चव्हाण, मु.पो. सावळीविहीर, | **३/- + सर्व्हीस टॅक्स** | **२/- + सर्व्हीस टॅक्स** | **६/- + सर्व्हीस टॅक्स** |
| २ | श्री साई प्रसाद पॉवर लॉण्ड्री, नांदूर्खी, प्रो.प्रा. सगर | ४.५० + सर्व्हीस टॅक्स | २/- + सर्व्हीस टॅक्स | ८/- + सर्व्हीस टॅक्स |
| ३ | साई सोहम लॉण्ड्री, श्री कुलदिप रघुनाथ जाधव, चारी नं.११, निमगाव को-हाळे | ४/- + सर्व्हीस टॅक्स | २- + सर्व्हीस टॅक्स | ७/- + सर्व्हीस टॅक्स |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साई धर्मशाळा विभागाकडील बेडशिट, उशीकव्हर व चादर धुणे/ इस्त्री करणे या कामांसाठी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले साई श्रध्दा लॉण्ड्री ॲण्ड सर्व्हिसेस, श्री.विजय अशोकराव चव्हाण, मु.पो. सावळीविहीर, यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

---

०४ **शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पुर्वीचे स्वागत कक्ष) जागेत शौचालय बांधकाम करणेकामी प्राप्त ई-निविदा (Commercial Bid) उघडणेबाबत.**

सन २०१५ चे कुंभमेळा कालावधीत शिर्डीत भाविकांची जादा गर्दी होती. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरिक्त सोयीसुविधा विशेषतः सार्वजनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, (विशेषतः महिलासाठी) पाणी पुरवठा, सुरक्षा, अतिरिक्त प्रसाद भोजन व्यवस्था, अल्पोहार इत्यादी, सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणेत

आलेल्या आहेत. तसेच सन २०१७-१८ मध्ये होणा-या श्री साईबाबा महासमाधि शताब्दी महोत्सवाचे कालावधीत होणारे संभाव्य गर्दीचे अनुषंगाने करावयाचे सोयी-सुविधांचे नियोजन करणेत येत आहे.

शिर्डी येथे भक्तांच्या सोईसुविधेसाठी स्वच्छता गृहे व स्नानगृहे उभारणेकामी मा.त्रिसदस्य समितीचे दि.३०/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ०५ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"... ..उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिहंस्थ कुंभमेळा सन २०१५-१६ मध्ये शिर्डी येथे होणा-या संभाव्य गर्दीचे अनुषंगाने शौचालय बांधकाम करणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन आणि मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरगाबांद खंडपिठाची परवानगी घेण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली.त्यासाठी समिती सदस्यांनी संयुक्तिक पहाणी करुन संबधीत परीसराच्या उपलब्धतेनुसार तीन ठिकाणी जागा निश्चित कराव्यात, असे ठरले."*

उपरोक्त निर्णयानुसार दि.२६/०४/२०१५ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे मा. अध्यक्ष-तथा-प्रधान जिल्हा सत्र न्यायाधीश, अहमदनगर. मा.सदस्य-तथा-जिल्हाधिकारी, अहमदनगर तसेच मा.सदस्य-तथा-कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालील तीन जागाची पहाणी करुन त्या ठिकाणी शौचालय उभारणेस मान्यता दिलेली आहे.

१. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५००खोल्यां) समोरील नगर-मनमाड रस्त्यालगत पुर्व बाजूचे मोकळया जागेत.
२. शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पूर्वीचे स्वागत कक्ष) जागेत.
३. जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळया जागेत (साईप्रसाद निवासस्थाने परीसरात)

उपरोक्तपैकी शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पूर्वीचे स्वागत कक्ष) जागेत शौचालयाचे बांधकाम करणेकरीता येणारे रक्कम रु.९,७०,१९२/- मात्रचे खर्चास व वर्तमान पत्रातील जाहिराती द्वारे ई – निविदा मागविणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०८/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २४४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

१. त्यानुसार सदर कामासाठी विभागीय कार्यालय नाशिक यांचेमार्फत दि.१९/०८/२०१५ रोजीचे दैनिक नाशिक दौरा, नाशिक व दैनिक गांवकरी, अ.नगर या वर्तमानपत्रात व साप्ताहिक गोदाजल, कोपरगाव येथे निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.०१/०९/२०१५ पर्यंतच्या ऑनलाईन निविदा जमा करण्याच्या अंतिम मुदतीत एकही निविदा जमा झाली नाही.
२. त्यामुळे इकडील विभागाचे दि.०७/०९/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये याकामी फेर ई – निविदा प्रसिध्द करणेस मान्यता देणेत आली असुन दि.२०/०९/२०१५ रोजीच्या दैनिक गांवकरी या वर्तमानपत्रात व साप्ताहिक नगर संकेत, अहमदनगर येथे निविदा सुचना प्रसिध्द करणेत आल्या होत्या. दि.१३/१०/२०१५ पर्यंतच्या ऑनलाईन निविदा जमा करण्याच्या अंतीम मुदतीत एकाच ठेकेदाराची ऑनलाईन निविदा जमा झालेली होती.

याकामी दि.३०/१०/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर तिस-यांना निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या ई– निविदांमधील टेक्नीकल बीड दि.०९/१२/२०१५ रोजी उघण्यात आले आहेत. त्यावेळी खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.नं | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.ए.आर.औटी | प्रशासकीय अधिकारी |
| २ | श्री. डी. झिरपे, | मुख्यलेखाधिकारी |
| ३ | श्री. डी.एम. देसाई | उप अभियंता |
| ४ | श्री. एस. एम. जोरी | उप अभियंता |
| ५ | श्री. जी. आर. कोराटे | कनिष्ठ अभियंता |
| ६ | श्री. आर.एस. साबळे | ज्यु. ई डी पी विभाग, प्रतिनिधी |

उघडण्यात आलेल्या ई – निविदांचे टेक्नीकल बीडमधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | ठेकेदाराचे नांव | कागदपत्रांचा तपशिल | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बयाना रक्कमेचा डी.डी व को-या निविदेची किंमत | सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंद केल्याचे प्रमाणपत्र. | मागील तीन वर्षात बांधकाम क्षेत्रात केलेल्या कामाचे दाखला | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी विभागाकडे नोंद आहे. / नाही. | – |
| ०१ | संजय जी. गायकवाड, राहाता | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | आहे. | पात्र |
| ०२ | पराग डी. देशपांडे, पुणे | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | नाही. | अपात्र |

वरील प्रमाणे अ.नं. १ व २ चे ठेकेदार यांनी सादर केलेले तांत्रिक लिफाफ्यामधील कागदपत्रांची छाननी केली असता, क्र. १ चे ठेकेदार तांत्रिक दृष्टया पात्र असल्याचे आढळून आले आहे. तसेच क्र. २ चे ठेकेदार यांची कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे नोंदणी नसल्याने ते अपात्र आहेत.

तरी सदरहूकामी तिस-यांदा ई – निविदा मागवून प्राप्त झालेल्या ई – निविदा मधील पात्र ठेकेदार यांचा कमर्शिअल बिड उघडण्यात आली असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अनं. | निविदा सादरकर्त्याचे नांव | देऊ केलेले दर रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | संजय जी. गायकवाड, राहाता | ९,७०,१९२.३१ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संजय जी. गायकवाड, राहाता यांचे दर स्वीकारण्यात येऊन त्यांना शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पुर्वीचे स्वागत कक्ष) जागेत शौचालय बांधकाम करणेकामी कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०५ **साईभक्तांच्या सुविधेकरीता संस्थानचे जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळया जागेत शौचालयाचे बांधकाम करणेकामी प्राप्त ई-निविदा (Commercial Bid) उघडणेबाबत.**

सन २०१५ चे कुंभमेळा कालावधीत शिर्डीत भाविकांची जादा गर्दी होती. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरीक्त सोयीसुविधा विशेषतः सार्वजनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, (विशेषतः महिलासाठी) पाणी पुरवठा, सुरक्षा, अतिरीक्त प्रसाद भोजन व्यवस्था, अल्पोहार इत्यादी, सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणेत आलेल्या आहेत. तसेच सन २०१७-१८ मध्ये होणा-या श्री साईबाबा महासमाधि शताब्दी महोत्सवाचे कालावधीत होणारे संभाव्य गर्दीचे अनुषंगाने करावयाचे सोयी-सुविधांचे नियोजन करणेत येत आहे.

शिर्डी येथे भक्तांच्या सोईसुविधेसाठी स्वच्छता गृहे व स्नानगृहे उभारणेकामी मा.त्रिसदस्य समितीचे दि.३०/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ०५ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"..उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिहंस्थ कुंभमेळा सन २०१५-१६ मध्ये शिर्डी येथे होणा-या संभाव्य गर्दीचे अनुषंगाने शौचालय बांधकाम करणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन आणि मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरगाबांद खंडपिठाची परवानगी घेण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली.त्यासाठी समिती सदस्यांनी संयुक्तिक पहाणी करुन संबधीत परीसराच्या उपलब्धतेनुसार तीन ठिकाणी जागा निश्चित कराव्यात, असे ठरले."*

उपरोक्त निर्णयानुसार दि.२६/०४/२०१५ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे मा. अध्यक्ष-तथा-प्रधान जिल्हा सत्र न्यायाधीश, अहमदनगर. मा.सदस्य-तथा-जिल्हाधिकारी, अहमदनगर तसेच मा.सदस्य-तथा-कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालील तीन जागाची पहाणी करुन त्या ठिकाणी शौचालय उभारणेस मान्यता दिलेली आहे.

१. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान(५००खोल्यां) समोरील नगर-मनमाड रस्त्यालगत पुर्व बाजूचे मोकळया जागेत.
२. शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पूर्वीचे स्वागत कक्ष) जागेत.
३. जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळया जागेत (साईप्रसाद निवासस्थाने परीसरात)

उपरोक्तपैकी जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळया जागेत (साईप्रसाद निवासस्थाने परीसरात) जागेत शौचालयाचे बांधकाम करणेकरीता येणारे रक्कम रु.९,७०,१९२/- मात्रचे खर्चास व वर्तमान पत्रातील जाहिराती द्वारे ई–निविदा मागविणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०८/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २४३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

१ त्यानुसार सदर कामासाठी विभागीय कार्यालय नाशिक यांचेमार्फत दि.१९/०८/२०१५ रोजीचे दैनिक महाराष्ट्र निरोप्या, नाशिक व दैनिक नवामराठा, अहमदनगर या वर्तमानपत्रात व साप्ताहिक फौजदार टाईम्स, अहमदनगर येथे निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.०१/०९/२०१५ पर्यंतच्या ऑनलाईन निविदा जमा करण्याच्या अंतिम मुदतीत एकही निविदा जमा झाली नाही.

२. त्यामुळे इकडील विभागाचे दि.०४/०९/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये याकामी फेर ई – निविदा प्रसिध्द करणेस मान्यता मिळाली असुन दि.२०/०९/२०१५ रोजीच्या दैनिक केसरी, अहमदनगर या वर्तमानपत्रात व साप्ताहिक गोदाजल, कोपरगाव येथे निविदा सुचना प्रसिध्द करणेत आल्या होत्या. दि.१३/१०/२०१५ पर्यंतच्या ऑनलाईन निविदा जमा करण्याच्या अंतीम मुदतीत एकही निविदा जमा झालेली नाही.

याकामी दि.३०/१०/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या ई– निविदांमधील टेक्नीकल बीड दि.०९/१२/२०१५ रोजी उघण्यात आले आहेत. त्यावेळी खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.नं | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.ए.आर.औटी | प्रशासकीय अधिकारी |
| २ | श्री. डी. झिरपे, | मुख्यलेखाधिकारी |
| ३ | श्री. डी.एम. देसाई | उप अभियंता |
| ४ | श्री. एस. एम. जोरी | उप अभियंता |
| ५ | श्री. जी. आर. कोराटे | कनिष्ठ अभियंता |
| ६ | श्री. आर.एस. साबळे | ज्यु. ई डी पी विभाग, प्रतिनिधी |

उघडण्यात आलेल्या ई– निविदांचे टेक्नीकल बीडमधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | ठेकेदाराचे नांव | कागदपत्रांचा तपशिल | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बयाना रक्कमेचा डी डी.व कोया - निविदेची किंमत | सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंद केल्याचे प्रमाणपत्र. | मागील तीन वर्षात बांधकाम क्षेत्रात केलेल्या कामाचे दाखला | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी विभागाकडे नोंद आहे/ नाही. | |
| ०१ | संजय जी. गायकवाड, राहाता | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | आहे. | पात्र |

वरील प्रमाणे ठेकेदार यांनी तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता, ठेकेदार तांत्रिक दृष्टया पात्र असल्याचे आढळून आले आहे.

तरी सदरहूकामी तिस-यांदा ई– निविदा मागवून प्राप्त झालेल्या ई– निविदा मधील पात्र ठेकेदार यांचा कमर्शिअल बिड उघडण्यात आली असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अनं. | निविदा सादरकर्त्याचे नांव | देऊ केलेले दर रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | संजय जी. गायकवाड, राहाता | ९,७०,१९२.३१ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संजय जी. गायकवाड, राहाता यांचे दर स्वीकारण्यात येऊन त्यांना साईभक्तांच्या सुविधेकरीता संस्थानचे जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळया जागेत शौचालयाचे बांधकाम करणेकामी कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०६ **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) समोरील नगर-मनमाड रस्त्यालगत पुर्व बाजूचे मोकळया जागेत शौचालयाचे बांधकाम करणेकामी प्राप्त ई-निविदा (Commercial Bid) उघडणेबाबत.**

सन २०१५ चे कुंभमेळा कालावधीत शिर्डीत भाविकांची जादा गर्दी होती. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरिक्त सोयीसुविधा विशेषतः सार्वजनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, (विशेषतः महिलासाठी) पाणी पुरवठा, सुरक्षा, अतिरिक्त प्रसाद भोजन व्यवस्था, अल्पोहार इत्यादी, सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणेत आलेल्या आहेत. तसेच सन २०१७-१८ मध्ये होणा-या श्री साईबाबा महासमाधि शताब्दी महोत्सवाचे कालावधीत होणारे संभाव्य गर्दीचे अनुषंगाने करावयाचे सोयी-सुविधांचे नियोजन करणेत येत आहे.

शिर्डी येथे भक्तांच्या सोईसुविधेसाठी स्वच्छता गृहे व स्नानगृहे उभारणेकामी मा.त्रिसदस्य समितीचे दि.३०/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ०५ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"... ..उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५-१६ मध्ये शिर्डी येथे होणा-या संभाव्य गर्दीचे अनुषंगाने शौचालय बांधकाम करणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन आणि मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरगाबांद खंडपिठाची परवानगी घेण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली.त्यासाठी समिती सदस्यांनी संयुक्तिक पहाणी करुन संबधीत परीसराच्या उपलब्धतेनुसार तीन ठिकाणी जागा निश्चित कराव्यात, असे ठरले."*

उपरोक्त निर्णयानुसार दि.२६/०४/२०१५ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे मा. अध्यक्ष-तथा-प्रधान जिल्हा सत्र न्यायाधीश, अहमदनगर. मा. सदस्य-तथा-जिल्हाधिकारी, अहमदनगर तसेच मा. सदस्य-तथा-कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालील तीन जागाची पहाणी करुन त्या ठिकाणी शौचालय उभारणेस मान्यता दिलेली आहे.

१. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान(५००खोल्यां) समोरील नगर-मनमाड रस्त्यालगत पुर्व बाजूचे मोकळया जागेत.
२. शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पूर्वीचे स्वागत कक्ष) जागेत.
३. जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळया जागेत (साईप्रसाद निवासस्थाने परीसरात)

उपरोक्त पैकी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान(५००खोल्यां) समोरील नगर-मनमाड रस्त्यालगत पुर्व बाजूचे मोकळया जागेत शौचालयाचे बांधकाम करणेकरीता येणारे रु.९,७०,१९२/- मात्रचे खर्चास व वर्तमान प्रत्रातील जाहिराती द्वारे ई– निविदा मागविणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०८/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २४५ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

१) त्यानुसार सदर कामासाठी विभागीय कार्यालय नाशिक यांचेमार्फत दि.१९/०८/२०१५ रोजीचे दैनिक मोक्षिणी वार्ता, मालेगाव व दैनिक समाचार, अहमदनगर या वर्तमानपत्रात व साप्ताहिक जगदीश, अहमदनगर येथे निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.०१/०९/२०१५ पर्यंतच्या ऑनलाईन निविदा जमा करण्याच्या अंतिम मुदतीत एकही निविदा जमा झाली नाही.

२) त्यामुळे इकडील विभागाचे दि.०४/०९/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये याकामी फेर ई – निविदा प्रसिध्द करणेस मान्यता मिळाली असुन दि.२०/०९/२०१५ रोजीच्या सायं.दैनिक जयबाबा, श्रीरामपुर या वर्तमानपत्रात व साप्ताहिक पोलीस पेपर,अहमदनगर येथे निविदा सुचना प्रसिध्द करणेत आल्या होत्या. दि.१३/१०/२०१५ पर्यंतच्या ऑनलाईन निविदा जमा करण्याच्या अंतीम मुदतीत एकाच ठेकेदाराची ऑनलाईन निविदा जमा झाली होती.

दि.३०/१०/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर तिस-यांदा निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या ई– निविदांमधील टेक्नीकल बीड दि.०९/१२/२०१५ रोजी उघण्यात आले आहेत. त्यावेळी खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.नं | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.ए.आर.औटी | प्रशासकीय अधिकारी |
| २ | श्री. डी. झिरपे, | मुख्यलेखाधिकारी |
| ३ | श्री. डी.एम. देसाई | उप अभियंता |
| ४ | श्री. एस. एम. जोरी | उप अभियंता |
| ५ | श्री. जी. आर. कोराटे | कनिष्ठ अभियंता |
| ६ | श्री. आर.एस. साबळे | ज्यु. ई डी पी विभाग, प्रतिनिधी |

उघडण्यात आलेल्या ई– निविदांचे टेक्नीकल बीडमधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अनं. | ठेकेदाराचे नांव | कागदपत्रांचा तपशिल | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बयाना रक्कमेचा डी डी.व कोया - निविदेची किंमत | सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंद केल्याचे प्रमाणपत्र. | मागील तीन वर्षात बांधकाम क्षेत्रात केलेल्या कामाचे दाखला | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी विभागाकडे नोंद | |
| ०१ | संजय जी. गायकवाड, राहाता | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | आहे. | पात्र |
| ०२ | पराग डी.देशपांडे, पुणे | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | नाही. | अपात्र |

वरील प्रमाणे अ.नं. १ व २ चे ठेकेदार यांनी सादर केलेले तांत्रिक लिफाफ्यामधील कागदपत्रांची छाननी केली असता, क्र. १ चे ठेकेदार तांत्रिक दृष्टया पात्र असल्याचे आढळून आले आहे. तसेच क्र. २ चे ठेकेदार यांची कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे नोंदणी नसल्याने ते अपात्र आहेत.

तरी सदरहूकामी तिस-यांदा ई– निविदा मागवून प्राप्त झालेल्या निविदाधारकांपैकी पात्र निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडण्यात आहे. त्यामधील मुळ दर खालीलप्रमाणे-

| अनं. | निविदा सादरकर्त्याचे नांव | देऊ केलेले दर रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | संजय जी. गायकवाड, राहाता | ९,७०,१९२.३१ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संजय जी. गायकवाड, राहाता यांचे दर स्वीकारणयात येऊन त्यांना श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) समोरील नगर-मनमाड रस्त्यालगत पुर्व बाजूचे मोकळया जागेत शौचालयाचे बांधकाम करणेकामी कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०७ **श्री साईनाथ रुग्णालय इमारतीचे आतिल भागास रंगकाम करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदांबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम 2004 मधील तरतुद :** अधिनियम कलम 21 (1) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा.त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय:** मा.त्रिसदस्य समितीचे दिनांक 15/03/2014 रोजीचे सभेत निर्णय क्र. 197 खालील प्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुणालय आतील भागास लस्टर पेन्टचे रंगकाम करणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.30,32,419/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच, याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले."

**मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश. :** C.A. No. 8698 of 2014 In P.I.L. NO. 18 of 2011 दि.14/01/2015 अन्वये परवानगी देणेत आलेली आहे.

**प्रस्तावना:** मा.त्रिसदस्य् समितीचे उपरोक्त् निर्णयानुसार व मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार सदरहू कामासाठी प्रथम ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन दि. 27/03/2015 अखेर तिन प्राप्त झाल्या होत्या. त्यामध्ये दोनच ठेकेदार पात्र होत असल्याने, सदरहू कामी फेर ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन दि.29/07/2015 अखेर ई-निविदा मागवित आल्या होत्या. सदरचे मुदतीत खालील ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केलेल्या होत्या.

| | |
|---|---|
| ०१. | अनुराग पेंटींग सर्व्हिसेस, |
| ०२. | वैभवी कन्स्ट्रक्शन, मनमाड |
| ०३. | सौरव डेकोरेटर्स, पुणे. |
| ०४. | श्री. डी.बी. फोपसे, वैजापूर |
| ०५. | जय डेव्हलपर्स, विरार/शिर्डी |
| ०६. | योगेश भाऊसाहेब पवार, शिरापूर |

विषयांकीत कामासाठी वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदांचा लिफाफा क्र.01 (Technical bid) दि.01/08/2015 रोजी प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आला. लिफाफा क्र.01 मध्ये प्राप्त कागदपत्रांची छाननी करुन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार केला असता, त्यामध्ये पात्रतेचे निकष पूर्ण करणा-या खालील तीन पात्र ठेकेदारांचे कागदपत्रांमध्ये खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

01. ठेकेदार अनुराग पेंटींग सर्व्हिसेस, पुणे यांनी सादर केलेला काम पूर्ण केल्याचा दाखला आर्कीटेक्ट/ सल्लागार यांचे लेटरहेडवर नव्हता.
02. श्री. डी.बी. फोपसे, वैजापूर यांनी शासकीय विभागांकडे barred/ blacklisted नसल्याबाबतचे अद्यावत अंडरटेकींग सादर केलेले नव्हते.
03. ठेकेदार जय डेव्हलपर्स, विराट/ शिर्डी यांनी शासकीय विभागांकडे barred/ blacklisted नसल्याबाबतचे अंडरटेकींगवर स्वाक्षरी व दिनांक या बाबींची पुर्तता केली नव्हती.

सदर तुलनात्मक तक्ता मान्यतेसाठी सादर केला असता त्यावर मुख्यलेखाधिकारी यांनी *"..अपूर्ण कागदपत्रांची मागणी करुन घ्यावी. जेणेकरुन जास्तीत जास्त स्पर्धा होईल"* असे निर्देश दिले होते. सदर निर्देशानुसार अनुराग पेन्टींग सर्व्हिसेस्, पुणे वगळता इतर दोन ठेकेदारांनी कागदपत्रांची पुर्तता केली. सदरच्या ई-निविदांबाबत निर्णय घेवून लिफाफा क्र.02 (Commercial bid) उघडणेबाबत दि.23/09/2015 रोजी मा. प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष बैठक आयोजित करणेत आली होती.

या बैठकीचे वेळी की (Opener DSC) उपलब्ध नसल्याने इ. डी. पी. मॅनेजर, श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे समवेत चर्चा केली असता, त्यांनी निविदा अपलोडींगचे काम सुरु असल्याने सदरच्या निविदा उघडणे शक्य होणार नसल्याचे सांगीतले. त्यांनतर सदरचे ई-निविदेचा लिफाफा क्र. 02 (Commercial bid) उघडणेचे अनुषंगाने ई.डी.पी. मॅनेजर यांनी दि.03/10/2015 रोजी पाठविलेल्या ईमेलद्वारे खालीलप्रमाणे कळविले आहे.

".. As we have informed from starting itself all bids are encrypted by the openers encryption certificate before opening if the certificate expires the bids cannot be decrypted. If certificates are renewed then new certificates will have different encryption and decryption certificate. Therefore in the cases mentioned tenders cannot be decrypted by new DSC. –

You are therefore requested to cancel these tenders giving reason as expiry of encryption certificate."

तसेच सदरहू कामासाठी मागविलेले ई-निविदेमध्ये निविदेची Validity Period 90 दिवस असे नमूद असल्याने, या बाबी विचारात घेता, विषयांकीत कामासाठी दि.15/10/2015 रोजीचे प्रशासकिय मान्यतेने (3rd Call) फेर ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन दि.30/11/2015 पर्यंत ई-निविदा मागविणेत आल्या आहेत. सदरहू प्राप्त ई-निविदांचा लिफाफा क्र.01 (Technical bid) दि.07/02/2015 रोजी प्रशासकिय अधिकारी, मुख्यलेखाधिकारी यांचे उपस्थितीत उघडणेत आले असून, त्यावेळी खालील ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केल्याचे आढळून आले.

1. जय डेव्हलपर्स, शिर्डी
2. श्री. डी. बी. फोपसे, वैजापूर
3. मे. डायमंड कन्स्ट्रक्शन कंपनी, लोणी खुर्द
4. श्रीको प्रोजेक्टस् प्रा. लि., हैद्राबाद
5. मे. आर. एल. भुतडा, कोपरगांव
6. शुभकिर्ती कन्स्ट्रक्शन, राहूरी

उपरोक्त प्रमाणे ई-निविदा अपलोड केलेल्या ठेकेदारांनी लिफाफा क्र. 01 (Technical bid) सोबत सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी करणेत आली असून, त्यामध्ये अ. नं. 06 (शुभकिर्ती कन्स्ट्रक्शन, राहूरी) यांनी ईपीएफ रजि., काम केल्याचे प्रमाणपत्र व शासनाचे काळ्या यादीत समावेश नसलेबाबतचे पत्र ही कागदपत्रे सादर केलेली नसल्याने अपात्र होत असून, उर्वरीत अ. नं. 01 ते 05 चे ठेकेदार पात्र होत आहे. त्याचे परिशिष्ट सोबत जोडले आहे.

वरीलप्रमाणे अ.नं.01 ते 05 या पात्र ठेकेदारांचे लिफाफा क्र. 02 (Commercial bid) आजचे सभेत समक्ष उघडण्यात आला असता ठेकेदारांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देऊ केलेले दर |
|---|---|---|
| ०१. | जय डेव्हलपर्स, शिर्डी | २९,४१,४४६.०० |
| ०२. | श्री. डी.बी. फोपसे, वैजापूर | २८,१३,७८१.०० |
| ०३. | मे. डायमंड कन्स्ट्रक्शन कंपनी, लोणी खुर्द | ३०,२४,२३१.०० |
| ०४. | श्रीको प्रोजेक्टस् प्रा. लि., हैद्राबाद | ३३,४७,७९०.०० |
| ०५. | मे. आर. एल. भुतडा, कोपरगांव | ४४,८७,९८०.०० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालय इमारतीचे आतिल भागास रंगकाम करणेकामी श्री. डी.बी. फोपसे, वैजापूर यांची निम्नतम दराची निविदा स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०८ **संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व को-हाळे येथील जमिनीचे भोवती कुंपन करणेकामी प्राप्त ई-निविदेचा लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) उघडणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** कलम २१ (१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल. त्यामधील पोट कलम (क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन. व पोट कलम (झ) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २३/०५/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ३०५ खालील प्रमाणे झालेला आहे.

*".. संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व को-हाळे येथील जमिनीचे भोवती आर.सी.सी. प्रिकास्ट कुंपन करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२६,९५,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली.*

*तत्पुर्वी, उपरोक्त कामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले."*

**मा.उच्च न्यायालय परवानगी:-** मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने– CIVIL APPLICATION NO.5062 OF 2015 IN PUBLIC INTEREST LITIGATION NO.18 OF 2011 अन्वये खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

1. The permission is sought to spend an amount of Rs.26,95,000/- for construction of compound wall in respect of three properties as indicated by resolution No.305 passed by the applicant.
2. Considering the resolution and the need shown, the applicant is allowed to construct the compound wall as prayed vide prayer clause "B". However the same be done at a competitive rate by E – tender process. The civil application is disposed of.

**प्रस्तावना:-** मा.व्यवस्थापन समितीचे व मा. उच्च न्यायालयाचे उपरोक्त मान्यतेनुसार मौजे को-हाळे येथील गट नं.९७ पैकी व मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १२४/११ व १२४/१२ आणि सर्व्हे नं. २०७/२ मध्ये संरक्षणाचे दृष्टीने कुंपन करणेसाठी प्रथम दि.३०/०६/२०१५ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन दि.०५/०८/२०१५ अखेर ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. विहीत मुदतीत दोन ठेकेदारांनी ई-निविदा सादर केल्या होत्या. फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्या असल्याने, प्राप्त निविदांचे तांत्रीक लिफाफे संबंधित ठेकेदार यांना परत करणेत येऊन, याकामी फेर निविदा (व्दितीय) मागविणेस इकडील दि.२४/०९/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार याकामी ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन दि.१३/१०/२०१५ पर्यंत निविदा अपलोड करणेची मुदत देणेत आली होती. सदरचे विहीत मुदतीत एकही निविदा अपलोड झालेली नसल्याने, सदरकामी तिस-यांदा ई-निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविणेस दि.३०/१०/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देणेत आली आहे. याकामी दैनिक सार्वमत या वृत्तपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन सदर ई-निविदा अपलोड करणेची मुदत दि.०५/१२/२०१५ अखेर देणेत आली होती.

त्यानुसार प्राप्त झालेल्या ई– निविदांमधील टेक्नीकल बीड दि.०९/१२/२०१५ रोजी उघण्यात आले आहेत. त्यावेळी खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.नं | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.ए.आर.औटी | प्रशासकीय अधिकारी |
| २ | श्री. डी. झिरपे, | मुख्यलेखाधिकारी |
| ३ | श्री. डी.एम. देसाई | उप अभियंता |
| ४ | श्री. एस. एम. जोरी | उप अभियंता |
| ५ | श्री. जी. आर. कोराटे | कनिष्ठ अभियंता |
| ६ | श्री. आर.एस. साबळे | ज्यु. ई डी पी विभाग, प्रतिनिधी |

उघडण्यात आलेल्या ई–निविदांचे लिफाफा क्र. ०१ (Technical Bid) मधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अनं. | ठेकेदाराचे नांव | कागदपत्रांचा तपशिल | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बयाना रक्कमेचा डी डी.व को-या निविदेची किंमत | सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंद केल्याचे प्रमाणपत्र. | मागील तीन वर्षात बांधकाम क्षेत्रात केलेल्या कामाचे दाखला | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी विभागाकडे नोंद आहे.नाही/. | |
| ०१ | मे.बी.एम.शेख, अहमदनगर | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | जोडले आहे. | पात्र |
| ०२ | मे.आर.एल.भुतडा, कोपरगांव | जोडले आहे. | जोडले आहे . | जोडला आहे. | जोडले आहे. | पात्र |
| ०३. | श्री नागवनाथ ढोकणे, राहूरी | ठेकेदार यांनी निविदा फी व बयाना रकमेचे डी.डी. व इतर अनुषंगीक कामगदपत्र (Hard Copy) संस्थानकडे जमा केलेली नाहीत. | | | | अपात्र |

तरी विषयांकीत कामासाठी तिस-यांदा ई – निविदा मागवून प्राप्त झालेल्या ई – निविदा मधील उपरोक्त अ.नं.०१ व ०२ चे पात्र ठेकेदार यांचे लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) आजचे सभेसमोर उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडण्यात येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अनं. | ठेकेदाराचे नांव | ठेकेदराने देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | मे.बी.एम.शेख, अहमदनगर | ३६,३९,७६५.८९ |
| ०२ | मे.आर.एल.भुतडा, कोपरगांव | ३६,०९,३७३.९९ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व को-हाळे येथील जमिनीचे भोवती कुंपन करणेकामी तिस-यांदा ई-निविदांची मागणी करुनही दोनच निविदा प्राप्त झालेल्या आहेत व त्यामध्ये मे.आर.एल.भुतडा, कोपरगांव यांचे रु.३६,०९,३७३.९९ मात्र निम्नतम दर आहेत. परंतु मा.उच्च न्यायालयाने सदरहू कामासाठी रु.२६,९५,०००/- मात्रचे खर्चास मंजुरी दिलेली असून प्राप्त झालेले दर रु.९,१४,३७३.९९ मात्र जादा आहेत. त्यामुळे प्रस्तावितकामी जादा येणा-या खर्चास मा.उच्च न्यायालयाची परवानगी घ्यावी अथवा पुन्हा ई-निविदांची मागणी करावी याबाबत मार्गदर्शन घेणेकामी त्रीसदस्य समितीसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

०९ **साईआश्रम भक्तनिवास येथील मेन्टेनन्सकामी आवश्यक रंगमटेरीअल खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदांवर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतुद आहे.
**व्यवस्थापन समिती निर्णय –**

याकामी दि.२८.०५.२०१५ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.१५१ (१७) संमत झालेला आहे.

*" साई आश्रम भक्तनिवास येथील मेटेनंससाठी प्रस्तावात नमूद केलेले आवश्यक साहित्य विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या एकूण रु.२,८६,८१६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी. तसेच यापुढे आवश्यक साहीत्यासाठी वार्षिक दर मागविणेत यावेत, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली".*

**प्रस्तावना:** मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार याकामी अहमदनगर व नाशिक येथील वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. त्यानुसार निविदा विक्रीचा कालावधी दि.३१/१२/२०१५ ते ११/०१/२०१६ अखेर ठेवण्यात आलेला होता. सदर कालावधीत खालील पुरवठादार यांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१. रंगोली पेंटस्, लोणी
२. अलंकार कार्पोरेशन, राहाता
३. गौतम प्लायवूड, कोपरगांव
४. रुपम जनरल स्टोअर्स, राहाता.

सिलबंद निविदा सादर करणेसाठी पुरवठादार यांना दिसायं २०१६/०१/१५..५त वाजेपर्यंत मुदत देण्या ००. आली होती. विहीत मुदतीत खालील तीन पुरवठादार यांनी सिलबंध निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.नं. | पुरवठादाराचे नांव | आवक क्र. व दिनांक |
|---|---|---|
| १ | रंगोली पेंटस्, लोणी | २०५२९/ १४.०१.२०१६ |
| २ | अलंकार कार्पोरेशन, राहाता | २०५९९/ १५.०१.२०१६ |
| ३ | रुपम जनरल स्टोअर्स, राहाता. | २०३०४/ १२.०१.२०१६ |

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या तीन सिलबंद निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या असता पुरवठादारानी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पुरवठादाराचे नांव | निविदेत देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|
| १ | रुपम जनरल स्टोअर्स, राहाता. | १,३२,५३५/- |
| २ | रंगोली पेंटस्, लोणी | १,२४,०९५/- |
| ३ | अलंकार कार्पोरेशन, राहाता . | १,३२,९२५/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास येथील मेन्टेनन्सकामी आवश्यक रंगमटेरीअल खरेदीकामी रंगोली पेंटस्, लोणी यांचे रु.१,२४,०९५/- मात्र निम्नतम दर स्वीकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

१० सन २०१५-१६ करीता कार्यालयीन व जनरल व संगणक प्रि-प्रिंटेड स्टेशनरी छपाईकामी ऑनलाईन प्राप्त ई-निविदेतील **Commercial Bid** उघडणेबाबत.

मा.त्रिसदस्य समितीचे दिनांक १८.०२.२०१५ चे सभेतील निर्णय क्रमांक ५८ तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद यांचे दि.३१.०७.२०१५ रोजीचे मान्यतेनुसार रक्कम रु.१,०९,२०,०००/- (अक्षरी रु. एक कोटी नऊ लाख विस हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. खरेदी विभागाकडील उपरोक्त संदर्भ क्रं.४ ला अनुसरुन सन २०१५-१६ करीता कार्यालयीन व जनरल व संगणक प्रि-प्रिंटेड स्टेशनरी छपाईकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. याकामी खालील निविदाधारकांनी ई-निविदा सादर केलेल्या होत्या.

१. फेअर ऑफसेट प्रिंटर्स, अहमदनगर
२. क्लासिक स्टेशनर्स कंपनी, मुंबई
३. अविराज पॅकवेल, कोपरगाव
४. प्रिंटवेल प्रिंटर्स, मालेगाव
५. नॅशनल पेपर इंडस्ट्रीज, कोल्हापूर
६. राका प्रिंटर्स, नाशिक
७. साईराकेश पेपरटेक, नाशिक
८. रोहन प्रिंटर्स अ‍ॅन्ड स्टेशनर्स, औरंगाबाद
९. संप्रती ऑफसेट प्रिंटर्स, सोलापूर
१०. प्रवरा ऑफसेट, लोणी

निविदा जाहिरातीमध्ये नमुद केल्याप्रमाणे दि.३०.११.२०१५ रोजी मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी (खरेदी) यांचे समक्ष वरील निविदाधारकांच्या तांत्रिक निविदा उघडण्यात आलेल्या आहेत. प्राप्त दहा निविदेतील कागदपत्रांची छाननी केली असता, वरील अ.न. १ ते ९ निविदाधारकांच्या निविदा तांत्रिक दृष्टया पात्र ठरलेल्या आहेत. अ.नं. १० प्रवरा ऑफसेट, लोणी यांनी ऑनलाईन कागदपत्रात दुकान नोंदणी दाखला सादर केलेला नाही, परंतु ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, लोणी बु., यांचा "प्रवरा ऑफसेट या नांवाने ८ ते ९ वर्षापासून व्यवसाय चालू आहे" असा दाखला तांत्रिक निविदा पाकीटात त्यांनी सादर केलेला आहे.

सदर निविदा पात्र/अपात्रबाबत तांत्रिक कागदपत्रे छाननी करणा-या समितीने त्यावेळी सदर निविदेबाबत निर्णय घेण्यासाठी मा.उपसमितीचे सभेपुढे सादर करणेबाबत सुचित केले होते. तथापि मा.उपसमितीचे दि.२४.१२.२०१५ रोजीचे सभेत याबाबत तांत्रिक समितीनेच निर्णय घ्यावा, असे ठरले होते. त्यास अनुसरुन दि.२९.१२.२०१५ रोजी तांत्रीक समितीने मे.प्रवरा ऑफसेट, लोणी यांची निविदा अपात्र ठरविलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे प्रमाणे प्राप्त झालेल्या अ.नं.१ ते ९ पात्र निविदाधारकांच्या व्यापारी निविदा (Commercial Bid) आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sl. No | Description of Work / Item(s) | ROHAN PRINTERS AND STATIONERS | CLASSIC STATIONERS, CO. | FAIR OFFSET PRINTERS | SAIRAKESH PAPERTECH | AVIRAJ PACKWELL | Printwel Printrs | NATIONAL PAPER INDUSTRIES | SAMPRATI OFFSET PRINTERS | RACCA PRINTERS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1.0 | सामान्य प्रशासन विभाग वशी - ८ | | | | | | | | | |
| 2.0 | प्रसाद विंडो पाकिटे (प्रिंटेड) सुटेसफेद, मॅपलिथो ७५ GSM १०x१६.५ से.मी.- 700000 नग | 0.57 | 0.53 | 1.2 | NQ | NQ | 0.5 | NQ | 0.59 | 0.588 |
| 3.0 | सामान्य प्रशासन जावक विभाग | | | | | | | | | |
| 4.0 | सफेद विंडो पाकिटे सुटेसफेद, मॅपलिथो२२.८६X१०.१६ से.मी- 30000 नग | 0.75 | 0.62 | 1.25 | NQ | NQ | NQ | NQ | 0.96 | 0.89 |
| 5.0 | सफेद प्लेन पाकिटेसुटेसफेद, मॅपलिथो२२.८६X१०.१६ से.मी- 30000 नग | 0.70 | 0.53 | 0.75 | NQ | NQ | NQ | NQ | 0.88 | 0.73 |
| 6.0 | सफेद प्लेन पाकिटेसुटेसफेद, मॅपलिथो२७.९४X१२.७० से.मी- 5000 नग | 0.95 | 0.7 | 1.5 | NQ | NQ | NQ | NQ | 1.1 | 1.45 |
| 7.0 | फायर अ‍ॅण्ड सेफटी विभाग | | | | | | | | | |
| 8.0 | आवक रजिस्टर १ ते ५०/१००लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 5 नग | 97 | 350 | 190 | NQ | 150 | NQ | NQ | 465 | 500 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9.0 | जावक रजिस्टर१ ते ५०/१००लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 5 नग | 97 | 350 | 190 | NQ | 150 | NQ | NQ | 465 | 500 |
| 10.0 | तक्रार नोंद रजिस्टर१ ते ५०/१००लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 15 नग | 92 | 225 | 130 | NQ | 88 | 80 | NQ | 178 | 400 |
| 11.0 | चार्ज देवाण घेवाण रजिस्टर१ ते ५०/१००लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 30 नग | 90 | 225 | 120 | NQ | 83 | 80 | NQ | 158 | 325 |
| 12.0 | वॉटर हायड्रंट यंत्रणा तिमाही प्रात्यक्षिक नोंद रजिस्टर१ ते ५०/१००लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मी. नंबरींगसह 5 नग | 97 | 350 | 190 | NQ | 150 | NQ | NQ | 465 | 500 |
| 13.0 | फायर सिलेंडर मासिक सफाई नोंद रजिस्टर१ ते ५०/१००लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 5 नग | 97 | 350 | 190 | NQ | 150 | NQ | NQ | 465 | 500 |
| 14.0 | साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग | | | | | | | | | |
| 15.0 | भक्त नाव नोंदणी फॉर्म१०० = १ पॅडसफेद१८X२३ से.मी. नंबरींगसह 4000 पॅड | 18.7 | 29.5 | 29 | NQ | 19 | 18.1 | NQ | 36.8 | 28.97 |
| 16.0 | खोली नोंद रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मी. नंबरींगसह 500 नग | 76.5 | 185 | 89 | NQ | 72 | 65 | NQ | 138 | 102.9 |
| 17.0 | अधिक्षक/पर्यवेक्षक दैनंदिनी रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मी. नंबरींगसह 50 नग | 98 | 250 | 98 | NQ | 65 | 65 | NQ | 138 | 290 |
| 18.0 | मोफत क्लोकरुम व्यवस्था बुके, ट्रिप्लिकेट१ ते १००/२०० सफेद१९X१४ से.मीनंबरींगसह 1500 बुके | 35.75 | 46 | 58 | NQ | 42.5 | NQ | NQ | 58.5 | 56.62 |
| 19.0 | खोल्याबाबत माहिती फॉर्म क्र.१100सफेद३३X२१ से.मीनंबरींगसह 5000 पॅड | 35 | 50 | 42 | NQ | 34 | 37 | NQ | 58.5 | 45.9 |
| 20.0 | खोल्याबाबत माहिती फॉर्म क्र.२100सफेद३३X२१ से.मीनंबरींगसह 5000 पॅड | 35 | 55 | 42 | NQ | 34 | 37 | NQ | 58.5 | 46.96 |
| 21.0 | काउंटर, कॅश देवाण घेवाण रजिस्टर क्र.११ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मी. नंबरींगसह 15 नग | 98 | 333 | 119 | NQ | 100 | 100 | NQ | 298 | 400 |
| 22.0 | काउंटर, कॅश देवान घेवान रजिस्टर क्र.२१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मी. नंबरींगसह 50 नग | 98 | 288 | 98 | NQ | 83 | 80 | NQ | 148 | 290 |
| 23.0 | आरोग्य विभाग | | | | | | | | | |
| 24.0 | स्टॉक रजिस्टर १ ते ४००/४०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीपाठपोठ नंबरींगसह 1 नग | 460 | 999 | 700 | NQ | 450 | NQ | NQ | 2100 | 1500 |
| 25.0 | साहित्य वाटप रजिस्टर१ ते २००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीपाठपोठ नंबरींगसह 1 नग | 460 | 999 | 700 | NQ | 450 | NQ | NQ | 2100 | 1200 |
| 26.0 | डयुटी वाटप रजिस्टर १ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३६X२४ से.मीनंबरींगसह 15 नग | 98 | 333 | 176 | NQ | 300 | 90 | NQ | 188 | 400 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 27.0 | स्टेशनरी रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 1 नग | 460 | 999 | 700 | NQ | 500 | NQ | NQ | 1950 | 1200 |
| 28.0 | साईप्रसाद निवासस्थान विभाग | | | | | | | | | |
| 29.0 | रुम नोंद रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 100 नग | 94 | 277 | 89 | NQ | 73 | 75 | NQ | 128 | 245 |
| 30.0 | साई धर्मशाळा विभाग | | | | | | | | | |
| 31.0 | साई धर्मशाळा रुग्णांचे नातेवाईक व रुग्ण/ साईभक्त यांचे नाव नोंद रजिस्टर१ ते ४००/४०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीपाठपोठ नंबरींगसह 24 नग | 139 | 444 | 249 | NQ | 150 | 135 | NQ | 178 | 625 |
| 32.0 | चावी देवाण घेवाण रजिस्टर१ ते ४००/४०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीपाठपोठ नंबरींगसह 6 नग | 154 | 555 | 379 | NQ | 350 | NQ | NQ | 465 | 850 |
| 33.0 | पर्यवेक्षीय दैनंदिन कामकाज रजिस्टर १ ते २००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीपाठपोठ नंबरींगसह 12 नग | 140 | 333 | 157 | NQ | 120 | 90 | NQ | 278 | 600 |
| 34.0 | कंत्राटी सुरक्षा रक्षक दैनंदिन कामाचे ठिकाण रजिस्टर १ ते २००/४०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 12 नग | 139 | 333 | 157 | NQ | 150 | 135 | NQ | 278 | 600 |
| 35.0 | नुकसान भरपाई रजिस्टर १ ते २००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीपाठपोठ नंबरींगसह 6 नग | 155 | 555 | 239 | NQ | 120 | NQ | NQ | 385 | 700 |
| 36.0 | सी.सी.टी.व्ही विभाग | | | | | | | | | |
| 37.0 | वर्कशीट रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 2 नग | 275 | 888 | 375 | NQ | 350 | NQ | NQ | 465 | 900 |
| 38.0 | डयुटी पाईंट रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 6 नग | 110 | 444 | 199 | NQ | 250 | NQ | NQ | 385 | 500 |
| 39.0 | अर्जीत,आजारी रजा अर्ज देवाण घेवाण रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 1 नग | 450 | 999 | 600 | NQ | 350 | NQ | NQ | 1250 | 900 |
| 40.0 | चार्ज देवाण घेवाण रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह- 8 नग | 103 | 444 | 199 | NQ | 120 | NQ | NQ | 385 | 500 |
| 41.0 | व्दारावती भक्तनिवासस्थान विभाग | | | | | | | | | |
| 42.0 | रुम नोंदणी रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 150 नग | 94 | 199 | 79 | NQ | 70 | 75 | NQ | 128 | 205 |
| 43.0 | रुम मागणी फॉर्म - पाठपोठ१०० - १ पॅडसफेद१९.५X१५.५ से.मीनंबरींगसह 1000 नग | 21.75 | 29 | 24.9 | NQ | 23 | 15 | NQ | 26.5 | 31.35 |
| 44.0 | दैनंदिन डयुटी रजिस्टर१ ते १५०/३०० लेजर पेपर, ७० GSM ३३.५X२०.५ से.मीनंबरींगसह 5 नग | 158 | 555 | 380 | NQ | 250 | NQ | NQ | 385 | 700 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 45.0 | कॅश देवान घेवान रजिस्टर१ ते २००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३.५X२०.५ से.मीपाठपोठ नंबरींगसह 6 नग | 158 | 555 | 390 | NQ | 140 | NQ | NQ | 385 | 750 |
| 46.0 | चावी नोंद रजिस्टर१ ते २००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३.५X२०.५ से.मीपाठपोठ नंबरींगसह 7 नग | 158 | 444 | 390 | NQ | 130 | NQ | NQ | 385 | 750 |
| 47.0 | कंत्राटी सुरक्षा गार्ड/सोसा.पा.कर्मचारी१ ते २००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३.५X२०.५ से.मीपाठपोठ नंबरींगसह 6 नग | 158 | 444 | 390 | NQ | 140 | NQ | NQ | 385 | 750 |
| 48.0 | जनसंपर्क विभाग | | | | | | | | | |
| 49.0 | शासकीय दरात दिल्या जाणा-या जाहिरात तपशील नोंद रजिस्टर१ ते २००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीपाठपोठ नंबरींगसह 3 नग | 190 | 800 | 330 | NQ | 150 | NQ | NQ | 880 | 900 |
| 50.0 | व्हीआयपी नाव नोंदणी रजिस्टर१ ते २००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X४१ से.मीपाठपोठ नंबरींगसह 30 नग | 135 | 333 | 59 | NQ | 145 | 80 | NQ | 158 | 425 |
| 51.0 | व्हीआयपी दर्शन/आरती नाव नोंदणी रजिस्टर१ ते २००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीपाठपोठ नंबरींगसह 13 नग | 135 | 444 | 149 | NQ | 375 | 90 | NQ | 168 | 495 |
| 52.0 | बांधकाम विभाग | | | | | | | | | |
| 53.0 | खात्यामार्फत चालू असलेल्या दैनंदिन कामाचे रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 10 नग | 103 | 444 | 149 | NQ | 110 | 90 | NQ | 168 | 400 |
| 54.0 | सिमेंट खर्च तपशील रजिस्टर १ ते २००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीपाठपोठ नंबरींगसह 3 नग | 370 | 800 | 329 | NQ | 150 | NQ | NQ | 465 | 900 |
| 55.0 | मटेरीयल स्टॉक रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 10 नग | 103 | 444 | 149 | NQ | 125 | 90 | NQ | 168 | 400 |
| 56.0 | बजेट रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 2 नग | 300 | 999 | 375 | NQ | 250 | NQ | NQ | 1250 | 900 |
| 57.0 | माल आवक रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 2 नग | 300 | 999 | 375 | NQ | 250 | NQ | NQ | 1250 | 900 |
| 58.0 | मासिक सिमेंट रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 3 नग | 275 | 999 | 280 | NQ | 200 | NQ | NQ | 1250 | 900 |
| 59.0 | पेटीकॅश रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 3 नग | 275 | 888 | 280 | NQ | 250 | NQ | NQ | 1250 | 900 |
| 60.0 | बगीचा विभाग | | | | | | | | | |
| 61.0 | नारळ जमा रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 6 नग | 103 | 777 | 199 | NQ | 130 | NQ | NQ | 465 | 500 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 62.0 | नारळ विक्री रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 3 नग | 180 | 888 | 279 | NQ | 175 | NQ | NQ | 890 | 500 |
| 63.0 | श्री साई प्रसादालय विभाग | | | | | | | | | |
| 64.0 | चहा मागणी पत्रक१०० x २सफेद, मॅपलिथो पेपर२१x१५ से.मी.नंबरींगसह 30 नग | 47 | 195 | 63 | NQ | 56 | 49 | NQ | 65 | 200 |
| 65.0 | दुध मागणी पत्रक१०० x २सफेद, मॅपलिथो पेपर२१x१५ से.मी.नंबरींगसह 30 नग | 47 | 195 | 63 | NQ | 56 | 49 | NQ | 65 | 200 |
| 66.0 | प्रसादालय डे बुक दैनंदिन भरणा (रोजकिर्द)१०० x २वरचा लेजर पेपर, खालचा सफेद पेपर२१X३३ से.मीनंबरींगसह 12 नग | 112 | 222 | 154 | NQ | 93 | 90 | NQ | 385 | 340 |
| 67.0 | अन्नपाकिटे माल मागणी पत्रक१०० x २सफेद, मॅपलिथो१७x१९ से.मी.नंबरींगसह 5 नग | 75 | 199 | 118 | NQ | 75 | NQ | NQ | 165 | 290 |
| 68.0 | रसोडा माल मागणी पत्रक१०० x २सफेद, मॅपलिथो२१x३१ से.मी.नंबरींगसह 6 नग | 120 | 199 | 198 | NQ | 120 | NQ | NQ | 190 | 290 |
| 69.0 | रसोडा भाजीपाला माल मागणी पत्रक१०० x २सफेद, मॅपलिथो२१x३१ से.मी.नंबरींगसह 6 नग | 120 | 199 | 198 | NQ | 100 | NQ | NQ | 190 | 290 |
| 70.0 | मध्यवर्ती भांडार माल मागणी पत्रक१०० x ३सफेद, मॅपलिथो२१x३१ से.मी.नंबरींगसह 10 नग | 120 | 222 | 239 | NQ | 140 | NQ | NQ | 190 | 285 |
| 71.0 | मध्यवर्ती भांडार भाजीपाला मागणी पत्रक१०० x २सफेद, मॅपलिथो२१x३१ से.मी.नंबरींगसह 6 नग | 120 | 222 | 198 | NQ | 100 | NQ | NQ | 190 | 290 |
| 72.0 | एल.पी.माउंडेड गॅस प्लॅन्ट नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ४२x३३ से.मी.नंबरींगसह 10 नग | 280 | 444 | 290 | NQ | 120 | 90 | NQ | 385 | 650 |
| 73.0 | प्रोजेक्ट स्टिम नोंद रजिष्टर/लॉग बुक रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ४२x३३ से.मी.नंबरींगसह 10 नग | 280 | 444 | 290 | NQ | 120 | 90 | NQ | 385 | 800 |
| 74.0 | उपभांडार माल आदा रजिष्टर१ ते २००/४०० लेजर पेपर, ७० GSM ४२x३३ से.मी.नंबरींगसह 4 नग | 380 | 777 | 550 | NQ | 250 | NQ | NQ | 890 | 900 |
| 75.0 | प्रसादालय भाजीपाला आदा रजिष्टर १ ते ४००/४०० लेजर पेपर, ७० GSM २१x३३ से.मी.पाठपोठ नंबरींगसह 2 नग | 325 | 999 | 490 | NQ | 300 | NQ | NQ | 890 | 1500 |
| 76.0 | माल आवक-जावक रजिष्टर (स्टॉक रजिष्टर)१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ४२x३३ से.मी.नंबरींगसह 12 नग | 197 | 444 | 249 | NQ | 100 | 150 | NQ | 385 | 800 |
| 77.0 | भाजीपाला आवक-जावक रजिष्टर (स्टॉक रजिष्टर)१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ४२x३३ से.मी.नंबरींगसह 4 नग | 245 | 777 | 450 | NQ | 150 | NQ | NQ | 465 | 1400 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 78.0 | बिल बजेट नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ४२x३३ से.मी.नंबरींगसह 4 नग | 245 | 777 | 450 | NQ | 150 | NQ | NQ | 890 | 1400 |
| 79.0 | अभिप्राय रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ४२x३३ से.मी.नंबरींगसह 100 नग | 195 | 222 | 159 | NQ | 68 | 135 | NQ | 190 | 490 |
| 80.0 | व्ही आय पी भोजन कक्ष पास नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM २१x३३ से.मी.नंबरींगसह 40 नग | 98 | 255 | 109 | NQ | 73 | 75 | NQ | 190 | 315 |
| 81.0 | प्रसादालय चावी देवाण-घेवाण रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM २१x३३ से.मी.नंबरींगसह 5 नग | 116 | 555 | 198 | NQ | 125 | NQ | NQ | 385 | 500 |
| 82.0 | वस्तू देणगी देवाण-घेवाण रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ४२x३३ से.मी.नंबरींगसह 2 नग | 260 | 999 | 649 | NQ | 250 | NQ | NQ | 465 | 900 |
| 83.0 | प्रसाद भोजन ताटातील शिल्लक राहिलेले अन्नपदार्थ नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ४२x३३ से.मी.नंबरींगसह 18 नग | 102 | 555 | 216 | NQ | 110 | 150 | NQ | 260 | 750 |
| 84.0 | कर्मचारी डयुटी पॉईंट रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ४२x३३ से.मी.नंबरींगसह 40 नग | 99 | 333 | 190 | NQ | 95 | 145 | NQ | 260 | 700 |
| 85.0 | अन्नपाकिटे अभिप्राय रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM २१x३३ से.मी.नंबरींगसह 5 नग | 109 | 555 | 189 | NQ | 150 | NQ | NQ | 465 | 500 |
| 86.0 | प्रसादभोजन वाढणेबाबत अभिप्राय रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM २१x३३ से.मी.नंबरींगसह 10 नग | 102 | 333 | 149 | NQ | 120 | 90 | NQ | 260 | 400 |
| 87.0 | प्रसादभोजन हॉल साफ-सफाई रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM २१x३३ से.मी.नंबरींगसह 10 नग | 102 | 333 | 149 | NQ | 120 | 90 | NQ | 260 | 400 |
| 88.0 | प्रसादभोजनाबाबत आचारी व मुकादम अभिप्राय रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM २१x३३ से.मी.नंबरींगसह 10 नग | 102 | 333 | 149 | NQ | 120 | 90 | NQ | 260 | 400 |
| 89.0 | सुचना पेटी अभिप्राय रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ४२x३३ से.मी.नंबरींगसह 5 नग | 145 | 777 | 448 | NQ | 200 | NQ | NQ | 465 | 500 |
| 90.0 | शरीराची निगा व स्वच्छता रजिस्टर१ ते २००/४०० लेजर पेपर, ७० GSM ४२x३३ से.मी.नंबरींगसह 12 नग | 145 | 333 | 399 | NQ | 175 | 170 | NQ | 320 | 750 |
| 91.0 | अभिलेख कक्ष | | | | | | | | | |
| 92.0 | भंगार साहित्य विक्री नोंद रजिष्टर१ ते २००/४००लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 2 नग | 390 | 999 | 375 | NQ | 300 | NQ | NQ | 890 | 900 |
| 93.0 | फाईल देवाण-घेवाण नोंद रजिष्टर१ ते २००/४०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 2 नग | 390 | 999 | 475 | NQ | 300 | NQ | NQ | 890 | 900 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 94.0 | पाणी पुरवठा विभाग | | | | | | | | | |
| 95.0 | डेड स्टॉक रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 4 नग | 165 | 999 | 237 | NQ | 250 | NQ | NQ | 465 | 600 |
| 96.0 | आवक रजिस्टर १ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 2 नग | 215 | 999 | 375 | NQ | 250 | NQ | NQ | 890 | 900 |
| 97.0 | बजेट रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 2 नग | 235 | 999 | 375 | NQ | 250 | NQ | NQ | 890 | 900 |
| 98.0 | वर्कशिट कन्ट्रोल रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 2 नग | 235 | 999 | 348 | NQ | 250 | NQ | NQ | 890 | 900 |
| 99.0 | तक्रार निवारण रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 20 नग | 99 | 555 | 137 | NQ | 100 | 80 | NQ | 385 | 325 |
| 100.0 | टॅंकर नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 10 नग | 103 | 666 | 149 | NQ | 110 | 90 | NQ | 385 | 400 |
| 101.0 | कॅन्टीन विभाग | | | | | | | | | |
| 102.0 | अन्नप्रसाद तिकीट बुके 250पिवळा२१x१४ से.मी.नंबरींगसह 10000 बुके | 55 | 55 | 85 | NQ | 48 | 50 | NQ | 56 | 48.95 |
| 103.0 | चहा तिकीट बुके250 पांढरा २१x१४ से.मी.नंबरींगसह 12000 बुके | 54 | 52 | 85 | NQ | 50 | 50 | NQ | 56 | 48.95 |
| 104.0 | कॉफी तिकीट बुके250गुलाबी२१x१४ से.मी.नंबरींगसह 1000 बुके | 60 | 53 | 65 | NQ | 58 | 53 | NQ | 62 | 58.22 |
| 105.0 | दुध तिकीट बुके250पिवळा२१x१४ से.मी.नंबरींगसह 5000 बुके | 59 | 54 | 65 | NQ | 50 | 51 | NQ | 52 | 51 |
| 106.0 | भरणा डिपी बुके (डुप्लिकेट)100पांढरा लाल२१x१८ से.मी.नंबरींगसह 100 बुके | 49 | 65 | 71 | NQ | 54 | 47 | NQ | 96 | 150 |
| 107.0 | चहा, कॉफी, दुध भरणा तक्ते100पांढरा३३X२१ से.मीनंबरींगसह 50 नग | 64 | 120 | 680 | NQ | 55 | 42 | NQ | 96 | 95 |
| 108.0 | अन्नपाकिटे विक्री नोंद रजिष्टर १ ते २००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीपाठपोठ नंबरींगसह 15 नग | 145 | 280 | 139 | NQ | 110 | 90 | NQ | 328 | 700 |
| 109.0 | बिस्किट जमाखर्च काऊंटर नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह २० नग | 99 | 280 | 137 | NQ | 110 | 90 | NQ | 305 | 325 |
| 110.0 | दुध पोहोच डिपी बुके (ट्रिप्लीकेट)100पांढरा गुलाबी पांढरा२५x१७ से.मी.नंबरींगसह 5 नग | 160 | 120 | 298 | NQ | 160 | NQ | NQ | 465 | 300 |
| 111.0 | सरासरी रजिष्टर१ ते १५०/३०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 12 नग | 124 | 444 | 137 | NQ | 150 | 130 | NQ | 348 | 450 |
| 112.0 | मोफत लाडू वाटप रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 15 नग | 103 | 444 | 133 | NQ | 110 | 90 | NQ | 348 | 400 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 113.0 | मोफत लाडू मागणी पत्रक (डुप्लिकेट)100पांढरा१८x१२ से.मी.नंबरींगसह | 39 | 120 | 89 | NQ | 45 | NQ | NQ | 84 | 95 |
| 114.0 | दुध खर्च नोंद रजिष्टर१ ते ४००/४०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीपाठपोठ नंबरींगसह 5 नग | 310 | 555 | 390 | NQ | 200 | NQ | NQ | 465 | 1200 |
| 115.0 | कायम व कंत्राटी पॉईंट रजिष्टर१ ते ३००/३०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीपाठपोठ नंबरींगसह 5 नग | 250 | 555 | 329 | NQ | 200 | NQ | NQ | 465 | 1180 |
| 116.0 | मेन स्टॉक रजिस्टर१ ते ३००/३०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीपाठपोठ नंबरींगसह 5 नग | 250 | 555 | 329 | NQ | 200 | NQ | NQ | 465 | 1180 |
| 117.0 | गॅस बीले आवक जावक नोंद रजिष्टर (सिलेंडर), १ ते २००/२००लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीपाठपोठ नंबरींगसह 3 नग | 220 | 777 | 390 | NQ | 250 | NQ | NQ | 890 | 900 |
| 118.0 | कॅन्टीन विभागास अन्नप्रसाद विक्रीकरीता मिळालेबाबत ((डुप्लिकेट)100पांढरा३३X२१ से.मीनंबरींगसह 30 नग | 82 | 199 | 129 | NQ | 95 | 65 | NQ | 108 | 180 |
| 119.0 | पावती पुस्तक जमा-खर्च नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 5 नग | 113 | 777 | 195 | NQ | 120 | NQ | NQ | 385 | 500 |
| 120.0 | मोफत लाडू अभिप्राय नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 8 नग | 110 | 666 | 175 | NQ | 115 | NQ | NQ | 385 | 470 |
| 121.0 | लाडू विक्री पोहोच मागणी पत्रक (डुप्लिकेट)100पांढरा१८x१२ से.मी.नंबरींगसह 50 नग | 78 | 111 | 58 | NQ | 38 | 50 | NQ | 87 | 150 |
| 122.0 | बिस्किट विक्री पावती पुस्तक (डुप्लिकेट)100गुलाबी पांढरा१४x११ से.मी.नंबरींगसह 50 नग | 54 | 111 | 71 | NQ | 33 | 50 | NQ | 74 | 150 |
| 123.0 | कंत्राटी कर्मचारी पॉईंट रजिस्टर१ ते २००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीपाठपोठ नंबरींगसह 10 नग | 143 | 666 | 190 | NQ | 110 | 90 | NQ | 148 | 600 |
| 124.0 | दैनंदिन विभागीय चहा, कॉफी, दुध, पेपरकप नोंद रजिस्टर१ ते २००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीपाठपोठ नंबरींगसह 15 नग | 143 | 555 | 175 | NQ | 110 | 90 | NQ | 385 | 600 |
| 125.0 | विद्युत विभाग | | | | | | | | | |
| 126.0 | तारतंत्री दैनंदिन कामकाज रिपोर्ट रजिष्टर१ ते ५०/१००लेजर पेपर, १२० जीएसएम१३x८.५ से.मी.नंबरींगसह 100 नग | 97.5 | 222 | 69 | NQ | 72 | 80 | NQ | 138 | 345 |
| 127.0 | वर्कशीट रजिस्टर१ ते ५०/१००लेजर पेपर, १२० जीएसएम१३x८.५ से.मी.नंबरींगसह 6 नग | 122 | 666 | 248 | NQ | 80 | NQ | NQ | 380 | 500 |
| 128.0 | शिफ्ट रिपोर्ट रजिस्टर१ ते ५०/१००लेजर पेपर, १२० जीएसएम१३x८.५ से.मी.नंबरींगसह 120 नग | 85 | 222 | 125 | NQ | 72 | 80 | NQ | 128 | 345 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 129.0 | इंधन जमा खर्च रजिष्टर१ ते ५०/१००लेजर पेपर, १२० जीएसएम१३x८.५ से.मी.नंबरींगसह 20 नग | 120 | 444 | 175 | NQ | 100 | 110 | NQ | 385 | 490 |
| 130.0 | स्टॉक रजिस्टर/साठा नोंद रजिस्टर१ ते ५०/१००लेजर पेपर, १२० जीएसएम१३x८.५ से.मी.नंबरींगसह 50 नग | 84 | 333 | 149 | NQ | 75 | 95 | NQ | 138 | 450 |
| 131.0 | डिझेल वापराबाबत शिफ्ट रिपोर्ट रजिस्टर१ ते ५०/१००लेजर पेपर, १२० जीएसएम१३x८.५ से.मी.नंबरींगसह 100 नग | 81 | 222 | 124 | NQ | 73 | 80 | NQ | 128 | 345 |
| 132.0 | तारतंत्री रजा/सुट्टया नोंद रजिस्टर१ ते ५०/१००लेजर पेपर, १२० जीएसएम१३x८.५ से.मी.नंबरींगसह 10 नग | 113 | 333 | 189 | NQ | 120 | 110 | NQ | 128 | 450 |
| 133.0 | विदयुत पर्यवेक्षक रजा/सुट्टया नोंद रजिस्टर१ ते ५०/१००लेजर पेपर, १२० जीएसएम१३x८.५ से.मी.नंबरींगसह 6 नग | 117 | 444 | 149 | NQ | 90 | NQ | NQ | 128 | 500 |
| 134.0 | लेखाशाखा बील नोंद रजिष्टर१ ते ५०/१००लेजर पेपर, १२० जीएसएम१३x८.५ से.मी.नंबरींगसह 5 नग | 121 | 555 | 169 | NQ | 90 | NQ | NQ | 465 | 500 |
| 135.0 | कर्मचारी वीज वापर बील आकारणी रजिष्टर१ ते १००/२००लेजर पेपर, १२० जीएसएम१३x८.५ से.मी.नंबरींगसह 10 नग | 134 | 444 | 149 | NQ | 100 | 190 | NQ | 148 | 550 |
| 136.0 | इतर लाईट बील रजिष्टर१ ते १००/२००लेजर पेपर, १२० जीएसएम१३x८.५ से.मी.नंबरींगसह 10 नग | 134 | 444 | 149 | NQ | 100 | 190 | NQ | 168 | 590 |
| 137.0 | बजेट रजिस्टर१ ते १००/२००लेजर पेपर, १२० जीएसएम१३x८.५ से.मी.नंबरींगसह 3 नग | 155 | 999 | 279 | NQ | 200 | NQ | NQ | 465 | 750 |
| 138.0 | विदयुत कर रजिष्टर (लहान)१ ते १००/२००लेजर पेपर, १२० जीएसएम१३x८.५ से.मी.नंबरींगसह 10 नग | 134 | 444 | 149 | NQ | 100 | 190 | NQ | 324 | 590 |
| 139.0 | तक्रार निवारण रजिष्टर१ ते ५०/१००लेजर पेपर, १२० जीएसएम१३x८.५ से.मी.नंबरींगसह 50 नग | 87 | 288 | 89 | NQ | 75 | 95 | NQ | 122 | 350 |
| 140.0 | एच.टी.बील नोंद रजिष्टर१ ते ५०/१००लेजर पेपर, १२० जीएसएम१३x८.५ से.मी.नंबरींगसह 20 नग | 109 | 444 | 105 | NQ | 75 | 110 | NQ | 122 | 390 |
| 141.0 | विदयुत पर्यवेक्षक कामकाज कार्यवाही रजिष्टर१.ते ५०/१००लेजर पेपर, १२० जीएसएम१३x८.५ से.मी.नंबरींगसह 20 नग | 108 | 444 | 105 | NQ | 80 | 110 | NQ | 138 | 390 |
| 142.0 | एल.टी.बील नोंद रजिष्टर१ ते १००/२००लेजर पेपर, १२० जीएसएम१३x८.५ से.मी.नंबरींगसह 10 नग | 107 | 444 | 159 | NQ | 150 | 190 | NQ | 310 | 590 |
| 143.0 | शिफ्ट तारतंत्री शिफ्ट कामकाज रजिष्टर१ ते ५०/१००लेजर पेपर, १२० जीएसएम१३x८.५ से.मी.नंबरींगसह 80 नग | 103 | 288 | 85 | NQ | 75 | 80 | NQ | 128 | 325 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 144.0 | ग्रुप मोबाईल बीले रजिष्टर१ ते १००/२००लेजर पेपर, १२० जीएसएम१३x८.५ से.मी.नंबरींगसह 10 नग | 107 | 444 | 159 | NQ | 150 | 190 | NQ | 385 | 590 |
| 145.0 | प्रकाशने विभाग | | | | | | | | | |
| 146.0 | पेटीकॅश रजिस्टर१ ते २००/२०० लेजर पेपर, ७० GSM २२X३५ से.मीपाठपोठ नंबरींगसह 5 नग | 247 | 999 | 490 | NQ | 170 | NQ | NQ | 148 | 720 |
| 147.0 | पुस्तके फोटो आवक जावक रजिष्टर१ ते ५००/५००लेजर पेपर, ७० GSM २२X३५ से.मीपाठपोठ नंबरींगसह 24 नग | 358 | 666 | 900 | NQ | 165 | 140 | NQ | 138 | 1200 |
| 148.0 | कर्मचारी डयुटी रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM २२X३५ से.मीनंबरींगसह 2 नग | 215 | 999 | 750 | NQ | 250 | NQ | NQ | 850 | 900 |
| 149.0 | सॅटीन कापड नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM २२X३५ से.मीनंबरींगसह 2 नग | 215 | 999 | 750 | NQ | 250 | NQ | NQ | 850 | 900 |
| 150.0 | मंदिर विभाग | | | | | | | | | |
| 151.0 | उदी पॅकिंग नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 5 नग | 127 | 888 | 189 | NQ | 140 | NQ | NQ | 465 | 500 |
| 152.0 | उदी वितरण नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 5 नग | 125 | 888 | 189 | NQ | 140 | NQ | NQ | 465 | 500 |
| 153.0 | व्ही.आय.पी. नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 5 नग | 127 | 888 | 189 | NQ | 140 | NQ | NQ | 465 | 500 |
| 154.0 | लक्ष्मी पुजन पाकिटे नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह 4 नग | 137 | 888 | 224 | NQ | 120 | NQ | NQ | 465 | 600 |
| 155.0 | श्रींना वस्त्र नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीनंबरींगसह- 4 नग | 137 | 888 | 224 | NQ | 130 | NQ | NQ | 465 | 600 |
| 156.0 | अखंड साईसच्चरित पारायण नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मी. नंबरींगसह 3 नग | 145 | 999 | 295 | NQ | 150 | NQ | NQ | 465 | 650 |
| 157.0 | भिक्षाझोळी नांव नोंदणी रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मी नंबरींगसह 4 नग | 137 | 999 | 224 | NQ | 150 | NQ | NQ | 465 | 600 |
| 158.0 | कलाकार नोंद रजिष्टर१ ते २००/४०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मी नंबरींगसह 3 नग | 248 | 999 | 349 | NQ | 180 | NQ | NQ | 465 | 650 |
| 159.0 | बजेट रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मी नंबरींगसह 1 नग | 400 | 1500 | 750 | NQ | 350 | NQ | NQ | 1900 | 1200 |
| 160.0 | दैनंदिन कार्यक्रम नोंद रजिष्टर१ ते ४००/४००लेजर पेपर, ७० GSM ३३X२१ से.मीपाठपोठ नंबरींगसह 2 नग | 460 | 999 | 1100 | NQ | 350 | NQ | NQ | 950 | 1200 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 161.0 | लेखाशाखा | | | | | | | | | |
| 162.0 | साईलीला मासिक वर्गणी पॅड100७० जीएसएम१८x२२ से.मी.- 150 पॅड | 42 | 38 | 39 | NQ | 24 | 23 | NQ | 38.5 | 80 |
| 163.0 | निश्चित स्वरुपाची देणगीसाठी फॉर्म100७० जीएसएम, सफेद१८x२२ से.मी.- 250 पॅड | 38.5 | 38 | 39 | NQ | 31 | 20 | NQ | 38.5 | 90 |
| 164.0 | देणगी माहितीपत्रकSingal४ कलरमध्ये, ८० जीएसएम १८x२२ से.मी.- 20000 नग | 0.72 | 5.55 | 0.9 | NQ | 2 | 0.5 | NQ | 0.52 | 2.5 |
| 165.0 | कापड विक्री पावती पुस्तके, डुप्लिकेट100पहिले पान पोपटी१८x२३.५ से.मी.नंबरींगसह 400 पॅड | 30.5 | 55 | 79 | NQ | 28 | 49 | NQ | 35.5 | 160 |
| 166.0 | 35 AC. देणगी पॅड100फिक्कट हिरवा१८x२२ से.मी.- 50 पॅड | 52 | 70 | 36 | NQ | 45 | 23 | NQ | 64 | 95 |
| 167.0 | कॅश मेमो100पहिली प्रत पिवळसर१०.५x१८ से.मी.नंबरींगसह 250 पॅड | 31.75 | 42 | 19 | NQ | 30 | 22 | NQ | 29 | 112 |
| 168.0 | काऊंटर डे बुक१ ते २००/४०० बल्लारपुर पेपर२१x३३ से.मी.नंबरींगसह 10 नग | 145 | 444 | 239 | NQ | NQ | NQ | NQ | 112 | 450 |
| 169.0 | अंदाजपत्रक रजिष्टर१ ते २००/४०० लेजर पेपर, ७० GSM २१x३३ से.मी.नंबरींगसह 3 नग | 195 | 888 | 390 | NQ | 250 | NQ | NQ | 850 | 750 |
| 170.0 | रिकन्सीलेशन रजिष्टर१ ते २००/४०० लेजर पेपर, ७० GSM २१x३३ से.मी.नंबरींगसह 5 नग | 164 | 888 | 339 | NQ | 140 | NQ | NQ | 520 | 700 |
| 171.0 | स्टेशनरी नोंद रजिष्टर१ ते २००/४०० लेजर पेपर, ७० GSM २१x३३ से.मी.नंबरींगसह 1 नग | 470 | 1500 | 850 | NQ | 350 | NQ | NQ | 1900 | 1200 |
| 172.0 | वाहन विभाग | | | | | | | | | |
| 173.0 | वाहन लॉग बुक रजिष्टर - मोठे१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 80 नग | 97 | 222 | 99 | NQ | 80 | 80 | NQ | 138 | 278 |
| 174.0 | वाहन लॉग बुक रजिष्टर - लहान१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM १७x२१ से.मी.नंबरींगसह 80 नग | 75 | 222 | 69 | NQ | 80 | 60 | NQ | 138 | 220 |
| 175.0 | वाहन इंधन रजिष्टर१ ते ५०/१००लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 40 नग | 92 | 333 | 74 | NQ | 70 | 70 | NQ | 158 | 260 |
| 176.0 | नगरसुल भरणा रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 15 नग | 107 | 444 | 129 | NQ | 110 | 90 | NQ | 168 | 400 |
| 177.0 | डयुटी रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 10 नग | 109 | 444 | 149 | NQ | 110 | 90 | NQ | 168 | 400 |
| 178.0 | वाहन मागणी रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 20 नग | 106 | 333 | 135 | NQ | 95 | 80 | NQ | 168 | 325 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 179.0 | अंदाजपत्रक रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह<br>2 नग | 350 | 999 | 750 | NQ | 250 | NQ | NQ | 820 | 700 |
| 180.0 | फिरतीवर जाण्याचे फॉर्म नोंद रजिष्टर १ ते २००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.पाठपोठ नंबरींगसह<br>10 नग | 145 | 555 | 265 | NQ | 125 | 90 | NQ | 195 | 600 |
| 181.0 | वाहन इन-आऊट नोंद रजिष्टर१ ते २००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.पाठपोठ नंबरींगसह<br>15 नग | 145 | 555 | 249 | NQ | 125 | 90 | NQ | 168 | 700 |
| 182.0 | प्रवास भत्ता फॉर्म100लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.-<br>20 पॅड | 68 | 77 | 89 | NQ | 60 | 65 | NQ | 105 | 115 |
| 183.0 | अतिकालिक भत्ता फॉर्म100लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.-<br>15 पॅड | 68 | 77 | 89 | NQ | 60 | 65 | NQ | 105 | 125 |
| 184.0 | फिरतीवर जाण्याचे फॉर्म100लेजर पेपर, ७० GSM १८x२१ से.मी.-<br>25 पॅड | 68 | 66 | 79 | NQ | 70 | 40 | NQ | 78 | 95 |
| 185.0 | भक्तनिवास बस फॉर्म100लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.-<br>60 पॅड | 68 | 66 | 79 | NQ | 50 | 60 | NQ | 78 | 95 |
| 186.0 | पेटीकॅश व्हाऊचर फॉर्म100लेजर पेपर, ७० GSM ११x१८ से.मी.-<br>5 पॅड | 70 | 75 | 98 | NQ | 60 | NQ | NQ | 350 | 150 |
| 187.0 | माहिती तंत्रज्ञान विभाग | | | | | | | | | |
| 188.0 | बजेट रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह<br>2 नग | 295 | 999 | 375 | NQ | 300 | NQ | NQ | 850 | 900 |
| 189.0 | अर्जित व आजारी रजा खतावणी रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह<br>2 नग | 295 | 999 | 375 | NQ | 300 | NQ | NQ | 850 | 900 |
| 190.0 | मुव्हमेंट रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह<br>2 नग | 295 | 999 | 375 | NQ | 300 | NQ | NQ | 850 | 900 |
| 191.0 | लेटकमर्स रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह- 2 नग | 295 | 999 | 375 | NQ | 300 | NQ | NQ | 850 | 900 |
| 192.0 | आवक टपाल नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह<br>2 नग | 295 | 999 | 375 | NQ | 300 | NQ | NQ | 850 | 900 |
| 193.0 | पॅड नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह<br>2 नग | 295 | 999 | 375 | NQ | 300 | NQ | NQ | 850 | 900 |
| 194.0 | आय.टी. विभाग आगमन-निर्गमन रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह<br>4 नग | 180 | 777 | 224 | NQ | 250 | NQ | NQ | 465 | 750 |
| 195.0 | वेबसाईट अपलोड रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह<br>3 नग | 220 | 888 | 279 | NQ | 275 | NQ | NQ | 465 | 800 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 196.0 | संरक्षण विभाग | | | | | | | | | |
| 197.0 | बिनधनी जमा वस्तू नोंद रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 6 नग | 137 | 555 | 189 | NQ | 110 | NQ | NQ | 240 | 500 |
| 198.0 | तक्रार नोंद रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 7 नग | 137 | 555 | 189 | NQ | 110 | NQ | NQ | 188 | 500 |
| 199.0 | कर्मचारी दैनंदिन ड्युटी नोंद रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 24 नग | 103 | 333 | 124 | NQ | 95 | 80 | NQ | 158 | 325 |
| 200.0 | वायरलेस देवान/घेवान नोंद रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 24 नग | 103 | 333 | 124 | NQ | 95 | 80 | NQ | 158 | 325 |
| 201.0 | HHMD नोंद रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 24 नग | 103 | 333 | 124 | NQ | 95 | 80 | NQ | 158 | 325 |
| 202.0 | साईभक्त काऊंटिंग नोंद रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 24 नग | 103 | 333 | 124 | NQ | 95 | 80 | NQ | 158 | 325 |
| 203.0 | कंट्रोलरुम चार्ज देवान/घेवान नोंद रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 6 नग | 137 | 444 | 195 | NQ | 125 | NQ | NQ | 345 | 500 |
| 204.0 | वर्कशीट रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 12 नग | 120 | 444 | 149 | NQ | 125 | 90 | NQ | 168 | 400 |
| 205.0 | जावक नोंद रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 4 नग | 185 | 666 | 224 | NQ | 150 | NQ | NQ | 345 | 600 |
| 206.0 | व्यायामशाळा भरणा रजिस्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 12 नग | 117 | 444 | 149 | NQ | 45 | 90 | NQ | 189 | 400 |
| 207.0 | व्यायामशाळा पावती पुस्तक - डुप्लीकेट100सफेद२७x४५ से.मी.नंबरींगसह 60 नग | 300 | 122 | 190 | NQ | 79 | 130 | NQ | 105 | 150 |
| 208.0 | ऑनलाईन पास चेकींग गेट चार्ज-देवाण घेवाण रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 12 नग | 111 | 444 | 149 | NQ | 120 | 90 | NQ | 158 | 400 |
| 209.0 | रजा अर्ज अर्जित मेडीकल नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 6 नग | 127 | 555 | 189 | NQ | 120 | NQ | NQ | 280 | 500 |
| 210.0 | आरती पास चेकींग करण्यासाठी येणा-या अधिकारी कर्मचारी नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 12 नग | 110 | 444 | 149 | NQ | 110 | 90 | NQ | 158 | 400 |
| 211.0 | उत्तरगेट अपंग/वयोवृध्द नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 24 नग | 107 | 333 | 124 | NQ | 110 | 80 | NQ | 138 | 325 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 212.0 | गावकरी ओळखपत्र चेकींग गेट रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 24 नग | 103 | 333 | 124 | NQ | 110 | 80 | NQ | 138 | 325 |
| 213.0 | कंट्रोल रुम नुकसान भरपाई नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 1 नग | 490 | 999 | 750 | NQ | 400 | NQ | NQ | 1900 | 1200 |
| 214.0 | शनिगेट येणारे भक्तांचे नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 24 नग | 106 | 333 | 124 | NQ | 95 | 80 | NQ | 138 | 325 |
| 215.0 | डयुटी वरील चार्ज देवाण-घेवाण रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 1500 नग | 88 | 277 | 66 | NQ | 69.5 | 65 | NQ | 119 | 94.5 |
| 216.0 | कायम/कंत्राटी कर्मचारी हजर गैरहजर रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 6 नग | 127 | 555 | 189 | NQ | 150 | NQ | NQ | 385 | 500 |
| 217.0 | कंट्रोलरुम मेसेज देवाण-घेवाण रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 6 नग | 127 | 555 | 189 | NQ | 150 | NQ | NQ | 385 | 500 |
| 218.0 | कंट्रोलरुम साहित्य देवाण-घेवाण रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 6 नग | 127 | 555 | 189 | NQ | 150 | NQ | NQ | 385 | 500 |
| 219.0 | कंट्रोलरुम वस्तु देवाण-घेवाण रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 6 नग | 127 | 555 | 189 | NQ | 150 | NQ | NQ | 385 | 500 |
| 220.0 | सेवेकरी ओळखपत्र देवाण-घेवाण रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 6 नग | 127 | 555 | 189 | NQ | 150 | NQ | NQ | 385 | 500 |
| 221.0 | सुपरवायझर राऊंड रजिस्टर सेक्शनवाईज१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 150 नग | 94 | 266 | 89 | NQ | 72 | 70 | NQ | 128 | 205 |
| 222.0 | समाधी मंदिर उत्तर गेट जनसंपर्क विभाग दर्शन/आरती पास नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 12 नग | 109 | 333 | 149 | NQ | 110 | 90 | NQ | 258 | 400 |
| 223.0 | सुरक्षा यंत्रणेत होणा-या चुकांची नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 12 नग | 109 | 333 | 149 | NQ | 110 | 90 | NQ | 258 | 400 |
| 224.0 | समाधी मंदिर उत्तर गेट गावकरी/भक्त तक्रार रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 150 नग | 94 | 266 | 89 | NQ | 72 | 70 | NQ | 128 | 205 |
| 225.0 | ऑनलाईन पास चेकींग रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 12 नग | 109 | 333 | 149 | NQ | 110 | 90 | NQ | 258 | 400 |
| 226.0 | समाधी मंदिर उत्तर गेट गावकरी दर्शन नोंद रजिष्टर१ ते १००/२०० लेजर पेपर, ७० GSM ३३x२१ से.मी.नंबरींगसह 12 नग | 109 | 333 | 189 | NQ | 110 | 90 | NQ | 258 | 400 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 227.0 | जनरल छपाई | | | | | | | | | |
| 228.0 | डि.पी.बुक - डुप्लीकेट - दोन रंगात१०० X २सफेद, गुलाबी, ७० जीएसएम७.५" X ८.५"नंबरींगसह 70 बुके | 79 | 122 | 69 | NQ | 55 | 59 | NQ | 158 | 150 |
| 229.0 | रजेचे अर्ज100पोपटी कलर, मॅपलीथो पेपर, १ X ४७.५" X १०" 1000 पॅड | 49 | 55 | 49 | NQ | 43 | 38 | NQ | 69.8 | 49.65 |
| 230.0 | रजेचे अर्ज100सफेद कलर, मॅपलीथो पेपर, १ X ४७.५" X १०" 50 पॅड | 72 | 66 | 74 | NQ | 55 | 45 | NQ | 105 | 95 |
| 231.0 | फिरतीवर जाण्याचे फॉर्म100सफेद, ७० जीएसएम३३x२१ से.मी. 25 पॅड | 75 | 66 | 88 | NQ | 60 | 60 | NQ | 98 | 115 |
| 232.0 | येलो पेजेस (पिवळे कागद, छपाईसह)सुट्टेपिवळा, ७५ जीएसएम१३" X ८" 10000 नग | 0.71 | 1.55 | 0.97 | NQ | 0.75 | 0.7 | NQ | 2.48 | 3 |
| 233.0 | Plastic Folder With Clip & PrintingRigid & Inside 2 Pocket, Dark Blue ColourLegal/Fullscaper Size 1000 नग | 32 | 14 | 200 | NQ | NQ | NQ | NQ | 58 | 29.8 |
| 234.0 | Plastic Folder With Clip & PrintingRigid & Inside 2 Pocket, Red ColourLegal/Fullscaper Size 1000 नग | 32 | 14 | 200 | NQ | NQ | NQ | NQ | 56 | 29.8 |
| 235.0 | Plastic Folder With Clip & Printing Rigid & Inside 2 Pocket, Green ColourLegal/ Fullscaper Size 1000 नग | 32 | 14 | 200 | NQ | NQ | NQ | NQ | 56 | 29.8 |
| 236.0 | संगणक प्रि-प्रिंटेड छपाई | | | | | | | | | |
| 237.0 | संगणक प्रिंटेड रुम बुकींग पावतीकंटीन्युअसटिएनपीएल, ७५ जीएसएम, रंगीत मोनोग्रामसह, पाठपोठ छपाई६" X ८" X २" नंबरींगसह 690000 फॉर्म्स | 0.67 | 0.65 | NQ | 0.432 | NQ | NQ | 0.5 | 0.95 | 0.5796 |
| 238.0 | संगणक प्रिंटेड प्रसाद कुपन्सकंटीन्युअसटिएनपीएल, ७५ जीएसएम, रंगीत मोनोग्रामसह, १ फॉर्म्समध्ये ४ कुपन्स ६" X २" X १" नंबरींगसह 4000000 फॉर्म्स | 0.34 | 0.25 | NQ | 0.174 | NQ | NQ | 0.19 | 0.72 | 0.1788 |
| 239.0 | संगणक प्रिंटेड विशेष प्रसाद भोजन कुपन्सकंटीन्युअसटिएनपीएल, ८० जीएसएम, ६" X ४" X २" नंबरींगसह 800000 फॉर्म्स | 0.39 | 0.35 | NQ | 0.24 | NQ | NQ | 0.19 | 0.64 | 0.2295 |
| 240.0 | संगणक प्रिंटेड मोफत प्रसाद भोजन कुपन्सकंटीन्युअसटिएनपीएल, ७५ जीएसएम, रंगीत मोनोग्रामसह, १ फॉर्म्समध्ये ४ कुपन्स ६" X २" X १" नंबरींगसह 5000000 फॉर्म्स | 0.34 | 0.25 | NQ | 0.167 | NQ | NQ | 0.19 | 0.72 | 0.1788 |
| 241.0 | संगणक प्रिंटेड कॅन्टीन कुपन्स पावतीकंटीन्युअसटिएनपीएल, ९० जीएसएम, रंगीत मोनोग्रामसह, १ फॉर्म्समध्ये ४ कुपन्स ४.५" X ८" X १" नंबरींगसह 1000000 फॉर्म्स | 0.38 | 0.2 | NQ | 0.162 | NQ | NQ | 0.17 | 0.65 | 0.1763 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 242.0 | संगणक प्रिंटेड देणगी पावती, वॉटर मार्क सह कंटीन्युअस४ रंगात, ७० जीएसएम, प्रिंट साईज २४X१६१/२२५.५ cm X १८ cm परफोरेशन नंबरींगसह 2500000 फॉर्म्स | 0.45 | 0.77 | NQ | 0.63 | NQ | NQ | 0.39 | 1.19 | 0.3992 |
| 243.0 | संगणक कापड विक्री पावती कंटीन्युअस ७० जीएसएम, कार्बन लेस६" X ८" X २" नंबरींगसह 50000 फॉर्म्स | 0.89 | 1.2 | NQ | 1 | NQ | NQ | 1.7 | 0.99 | 1.75 |
| 244.0 | संगणकीय पुस्तके, फोटो बील पावती कंटीन्युअस टिएनपीएल, ७० जीएसएम, ६" X ४" X २" नंबरींगसह 100000 फॉर्म्स | 0.37 | 0.4 | NQ | 0.243 | NQ | NQ | 0.18 | 0.7 | 0.2295 |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५-१६ करीता कार्यालयीन व जनरल व संगणक प्रि-प्रिंटेड स्टेशनरी छपाईकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच ज्यासाठी समान निम्नतम दर आलेले आहेत, त्यांना समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

११ **जुने प्रसादालय येथील कॅन्टीन किचनकरीता एल.पी.गॅस पाईप लाईन बनविणेकामी प्राप्त दरपत्रके उघडणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७.१०२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४२४ अन्वये जूने प्रसादालय येथील कॅन्टीन किचनकरीता एल.पी.जी गॅस पाईप लाईन बसविणेकामी एक्सप्लोझिव्ह विभागाचे मान्यताप्राप्त एजन्सीकडून विहीत पध्दतीने कोटेशन्सची मागणी करण्यास व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ४९,८८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

सदरच्या मान्यतेनुसार दिनांक १२.१२.२०१५ चे पत्रानुसार एक्सप्लोझिव्ह विभागाचे मान्यता प्राप्त पाच एजन्सीकडून कोटेशन्स मागविण्यात आलेले होते. त्यापैकी खालील चाद पुरवठादार यांनी विहित मुदतीत दरपत्रक सादर केलेले आहेत.

१. ग्लोब गॅस इक्वयूपमेंट प्रा.लि. मुंबई -४०००६३
२. यशराज टेक्नोक्रेटर्स,नाशिक
३. एच जोशी ब्रदर्स, नाशिक
४. ॲटो हाड्रो न्युमॅटिक सिस्टिम्स, नाशिक

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले दरपत्रके मा.उपसमितीचे सभेत उघडणे आवश्यक आहे.

**आवश्यक मान्यता** : प्रशासकीय

**शासनाच्या उच्च न्यायालयाचे मान्यतेची आवश्यकता** : नाही

जूने प्रसादालय येथील कॅन्टिन किचनकरीता एल. पी. गॅस पाईप लाईन बसविणेकामी प्राप्त झालेले दरपत्रके आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता ठेकेदारांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नांव | निविदेत देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|
| १ | ग्लोब गॅस इक्युपमेंट इंडस्ट्रीज प्रा.लि.मुंबई | ८०,१७०/- |
| २ | यशराज टेक्नोक्रेटर्स, नाशिक | ५७,८९०/- |
| ३ | एच जोशी ब्रदर्स ., नाशिक | ४९,०८०/- |
| ४ | ॲटो हायड्रो न्युमॅटिक सिस्टीम्स, नाशिक | ६०,२८०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, जुने प्रसादालय येथील कॅन्टीन किचनकरीता एल.पी.गॅस पाईप लाईन बनविणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील एच.जोशी ब्रदर्स, नाशिक यांचे रु.४९,०८०/- मात्र निम्नतम दर स्वीकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

१२ **माहिती तंत्रज्ञान विभागासाठी अत्यावश्यक सेवेकरीता २५ नग संगणक संच खरेदीकामी प्राप्त ई-निविदामधील पात्र निविदाधारकांच्या Commercial निविदा उघडून त्यातील निम्मत्तम पुरवठाधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) नुसार.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:** मा. व्यवस्थापन समितीचे दि. 08/09/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 292.

**प्रास्ताविक:** माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत विविध विभागांना कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक संगणके, प्रिंटर्स, युपीएस व इतर अनुषांगिक तांत्रिक साहित्य वेळोवेळी खरेदी करुन वापरासाठी देण्यात आलेले आहेत. बहुतेक सर्व संगणक संच हे सरासरी 6 ते 10 वर्षापासून वापरात आहेत. सदर संगणकाचे साहित्य दैनंदिन वापरामुळे निकामी/ खराब व कालबाह्य झाल्याने तसेच माहिती तंत्रज्ञानातील वेळोवेळी झालेल्या बदलाने, काही

साहित्यांचे उत्पादन बंद झालेले आहे. त्यामुळे नादुरुस्त झालेले तांत्रिक साहित्य दुरुस्त करणेसाठी आवश्यक स्पेअर पार्टस् बाजारात उपलब्ध होत नाही.

सबब, अनेक विभागांमध्ये कार्यालयीन कामकाजासाठी नविन संगणकांची उपलब्धता करुन देणे गरजेचे आहे. संगणक, प्रिंटर, लॅपटॉप, सर्व्हर व इतर आयटी उपकरणांचे आयुष्यमान (Life) ठरविणेबाबत शासन निर्णय क्रमांक मातंस/ नस्ती07/ प्र.क्र.89/39 मंत्रालय, मुंबई दिनांक 01 ऑगस्ट 2011 नुसार नियमावली तयार करण्यात आलेली आहे. त्यातील कलम 1 व 2 नुसार संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, सर्व्हर व इतर सर्व आयटी संबंधित उपकरणांचे वयोमान 5 वर्ष निश्चित करण्यात आलेले आहे. सद्यस्थिती 5 वर्षापेक्षा जास्त वयोमान झालेले 126 संगणके असून त्यांचे स्पेअरपार्ट मिळत नाही. त्यानुसार मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार संगणक संच व इतर अनुषांगीक तांत्रिक साहित्य खरेदीकामीची प्रक्रिया विभागामार्फत सुरु असुन सदर प्रक्रियेस संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही होणेकामी विलंब लागण्याची शक्यता आहे.

तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार व दि. 04/07/2015 रोजीचे परिपत्रकान्वये कुंभमेळा 2015 निमित्ताने श्री साईभक्तांना सोयी-सुविधा पुरविणेसाठी विविध उपाययोजना सुरु करण्यात आल्या होत्या तसेच संस्थानचे विविध विभागात संगणक कार्यरत असुन कुंभमेळा पर्वणीच्या काळात शिरडीत श्री साईभक्तांची गर्दी होण्याची शक्यता असल्याने सर्व कांऊटर्स वर एक-एक संगणक संच अत्यावश्यक सेवा म्हणुन तयार ठेवणे गरजेचे होते.

त्यानुसार दि. 08/09/2015 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावात नमुद केलेले 25 नग संगणक संच शासनाच्या दर करारानुसार खरेदी करणेत यावे. दर करारावर उपलब्ध नसल्यास सदरहु संगणक संच खरेदीकामी ई-निविदांची मागणी करण्यात यावी, असे ठरले. तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 9,95,000/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

परंतु, कुंभमेळा-2015 धर्तीवर अत्यावश्यक सेवेकरीता 25 नग संगणक संच तातडीने खरेदी करणेकामी उपरोक्त खर्चास मान्यता घेण्यात आली होती. परंतु, कुंभमेळा-2015 कालावधी संपुण गेल्यानंतर दि. 10/10/2015 रोजी व्यवस्थापन समितीचे ठरावाची प्रत कार्यवाहीसाठी इकडील विभागाकडे प्राप्त झालेली आहे.

सबब, संस्थानचे विविध विभागातील दैनंदिन तसेच कार्यप्रणालीचे वापरासाठी संगणकाची अत्यंत आवश्यकता असल्याने दि.08/09/2015 रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील प्रस्तावीत तपशिलानुसार व निर्णयानुसार 25 नग संगणक संच तातडीने खरेदी करणे अत्यावश्यक आहे.

| **Detail/ Specification & Make** | नग |
|---|---|
| Lenovo<br>Intel Core i3- Processor , 3rd generation or above, onboard Integrated Graphics,10/1000 LAN, onboard USB, 4 GB DDR3 RAM, 500 GB Hard Drive, No Optical Drive ,18.5" Monitor with LED Back Light, USB Optical Mouse and Keyboard<br>Windows 8 professional 64 bit<br>3 Yr Next business day onsite service. | 25 |

उपरोक्त नमुद केलेले तांत्रिक साहित्य हे संस्थानचे विविध विभागांना विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या तांत्रिक सेवा सुविधांच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. संस्थानचे विविध विभागांचे मागणीचा विचार करता, विषयांकीत प्रकरणाबाबत संस्थानचे विहित दि. 20/10/2015 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये Lenovo कंपन्याचे निविदाधारक/ पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन तसेच जनसंपर्क विभागामार्फत महाराष्ट्रातील प्रमुख शहरामधील वर्तमानपत्रात शासकीय दराप्रमाणे तसेच संस्थानचे वेबसाईटवरही जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

त्यानुसार विविध कंपन्याचे निविदाधारक /पुरवठाधारकांकडुन मागविण्यात आलेल्या प्राप्त ई-निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | कंपनीचे नाव | आवक नंबर दिनांक |
|---|---|---|
| 1 | Sujata Computers Pvt. Ltd., Pune | 17208 30/11/2015 |
| 2 | Racca Infotech Pvt. Ltd., Nashik | 17677 05/12/2015 |
| 3 | Oddisys India IT Solutions Pvt. Ltd., Pune | 17942 09/12/2015 |
| 4 | B. J. Automation, Mumbai | 17995 09/12/2015 |
| 5 | Minitek Systems (I) Pvt. Ltd., | 18111 10/12/2015 |
| 6 | Cybernet.it Pvt. Ltd., Pune | 18262 12/12/2015 |
| 7 | KJM Group System Solutions, Bhayander (E) | 18327 14/12/2015 |

उपरोक्त प्राप्त पुरवठाधारकांच्या तांत्रिक ई-निविदा दि.17/12/2015 रोजीचे परिपत्रकान्वये दि.19/12/2015 रोजी उघडण्यात आले आहेत. त्यावेळी खालील अधिकारी/कर्मचारी उपस्थितीत होते.

| अ.नं. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| 1 | श्री सुर्यभान गमे | प्रशासकीय अधिकारी |
| 2 | श्री उत्तमराव गोंदकर | प्रशासकीय अधिकारी |
| 3 | श्री दिलीप उगले | प्रशासकीय अधिकारी |
| 4 | श्री विनोद कोते | ज्युईडीपी मॅनेजर. |
| 5 | श्री रमेश पुजारी | तांत्रिक सहाय्यक |
| 6 | श्री एसकुसारे . | कंत्राटी कर्मचारी अंतर्गत लेखापरिक्षण विभाग |
| 7 | श्री अनिल भोरकडे | लिपीक, माहिती तंत्रज्ञान विभाग |

वरीलप्रमाणे उपस्थितांसमोर उघडण्यात आलेल्या तांत्रिक ई-निविदेमधील पुरवठाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| Description | Vendor | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Sujata Computers Pvt. Ltd., Pune | Racca Infotech Pvt. Ltd., Nashik | Oddisys India IT Solutions Pvt. Ltd., Pune | B. J. Automation, Mumbai | Minitek Systems (I) Pvt. Ltd., | Cybernet.it Pvt. Ltd., Pune | KJM Group System Solutions, Bhayander (E) |
| Authorised Dealer | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| Pan ST CER | - | - | - | Yes | - | - | - |
| Income Tax Return and balance sheet certified by CA With Annual turn over | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| List of Organization where the service are implemented | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| VAT TIN Number/Service Tax Certificate, Pan Card | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| Tender Fee DD Amount of Rs. 500/- | Yes | Yes | Yes | यांनी निविदा शुल्क व बयाना रक्कम दिलेली नाही परंतु म.शासनाचे दि . 30/10/2015 रोजीचे अध्यादेशानुसार पात्र धरता येईल. | Yes | Yes | यांनी निविदा शुल्क व बयाना रक्कम दिलेली नाही परंतु म.शासनाचे दि .30/10/2015 रोजीचे अध्यादेशानुसार पात्र धरता येईल. |
| EMD DD Amount of Rs. 9,950/- | Yes | Yes | Yes | | Yes | Yes | |
| Remark | Accepted | Accepted | Accepted | Accepted | Accepted | Accepted | Accepted |

सदरच्या तांत्रिक ई-निविदा संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडु यांनी तपासल्या असुन उपरोक्त पात्र निविदाधारक/पुरवठाधारकांच्या Commercial ई-निविदा मा. उप-समितीचे सभेत उघडुन त्यातील न्युनत्तम निविदाधारक/ पुरवठाधारकास कार्यादेश देता येईल.

**मागणी:** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे दि. 08/09/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 292 अन्वये नमुद साहित्य कुंभमेळा 2015 करीता खरेदीकामी मान्यता घेण्यात आलेली होती. परंतु, कुंभमेळा-2015 कालावधी संपुण गेल्यानंतर दि. 10/10/2015 रोजी व्यवस्थापन समितीचे ठरावाची प्रत कार्यवाहीसाठी इकडील विभागाकडे प्राप्त झालेली आहे. तरी उपरोक्त नमुद केलेले तांत्रिक साहित्य हे संस्थानचे विविध विभागांना विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या तांत्रिक सेवा सुविधांच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे.

संस्थानचे विविध विभागांचे मागणीचा विचार करता, विषयांकीत प्रकरणाबाबत ई-निविदा प्रक्रियेव्दारे कार्यवाही करण्यात येऊन प्राप्त झालेल्या तांत्रिक ई-निविदा उपस्थितासमोर उघडण्यात आल्या आहेत. सदरच्या प्राप्त तांत्रिक ई-निविदा संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडु सो., यांनी तपासल्या असुन उपरोक्त पात्र निविदाधारक/पुरवठाधारकांच्या Commercial ई-निविदा मा. उप-समितीचे सभेपुढे उघडुन त्यातील न्युनत्तम निविदाधारक/पुरवठाधारकास कार्यादेश येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** 1) शासन निर्णय क्रमांक मातंस/नास्ती 07/प्र.क्र.89/39 मंत्रालय मुंबई यांचा दिनांक 01 ऑगस्ट, 2011 रोजीचा निर्णय. 2) महाराष्ट्र शासनाचे जा.नं.GAD-मातंस042/01/2014 –DIT (MH) दि.14/08/2014 रोजीचा अध्यादेश. 3) केंद्र शासनाचे Computer/IT-1 /RC 71090000/ 1215/81/ 04878/ 4542 / 53760 दि. 25/03/2015 रोजीचा अध्यादेश. 4) महाराष्ट्र शासनाचे उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रं. भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 दि. 30/10/2015 रोजीचा अध्यादेश.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे विषयार्कीत प्रकरणी पात्र निविदाधारक/ पुरवठाधारकांच्या Commercial ई-निविदा मा.उप-समितीचे सभेपुढे उघडुन त्यातील न्युन्नतम निविदाधारक/ पुरवठाधारकास कार्यादेश देणेकामी प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, माहिती तंत्रज्ञान विभागासाठी अत्यावश्यक सेवेकरीता आवश्यक असलेले २५ नग संगणक संच खरेदीकामी निविदेमध्ये एकाच कंपनीचे दर मागविलेले असल्यामुळे सदरहू निविदाप्रक्रिया रद्द करणेत येऊन, प्रस्तावित संगणक संच खरेदी करणेसाठी नामांकित कंपन्यांकडून दर मागविणेसाठीचा प्रस्ताव त्रीसदस्य समिती सभेसमोर मान्यतेसाठी सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

१३ **अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेच्या वार्षिक दुरुस्ती देखभाल (AMC) करीता प्राप्त झालेल्या कमर्शियल फेर ई-निविदा (तृतिय वेळ) उघडून निर्णय घेणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थानचे विविध विभागांना अंतर्गत व बाहेरील दुरध्वनी संपर्कासाठी शांतीनिवास इमारतीमध्ये सिमेंस कंपनीची दुरध्वनी यंत्रणा बसविण्यात आलेली आहे.या मुख्य दुरध्वनी यंत्रणेतुन ओएफसी केबलव्दारे (१) समाधी मंदिर परीसर (२) श्री साईबाबा हॉस्पिटल,श्री साईनाथ रुग्णालय,साईनगर स्टॉफ क्वार्टर्स व व्दारावती निवासस्थान (३) श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम्स, शैक्षणिक संकुल, अधिकारी व डॉक्टर्स क्वार्टर्स (४) नविन प्रसादालय या चार ठिकाणी सिमेंस कंपनीच्या दुरध्वनी यंत्रणा बसविण्यात आलेल्या आहेत.या दुरध्वनी यंत्रणा विनाखंडीत चालु राहणे कामी मे.सिमेंस एन्टरप्राईज कम्युनिकेशन प्रा.लि.मुंबई यांचेशी अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेचा दि.०१/०९/२०१३ ते दि.३१/०८/२०१४ अखेर एक वर्षाचे कालावधीसाठी दुरुस्ती देखभाल करार करण्यात आलेला होता. सदरचा कालावधी दि.३१/०८/२०१४ रोजी संपुष्ठात आलेला आहे.

तसेच साई आश्रम १ व साई धर्मशाळा या दोन्ही ठिकाणी अंतर्गत व बाहेरील संपर्कासाठी मॅट्रीक्स कंपनीच्या दुरध्वनी यंत्रणा बसविण्यात आलेल्या असुन या दोन्हीही मशिनरीचा Warranty कालावधी जानेवारी २०१५ मध्ये संपलेला आहे. मा.व्यवस्थापन समितीच्या दि.३०/०१/२०१५ चे सभेतील विषय क्र.०४ निर्णय क्र.०४(१०) अन्वये सिमेंस व मॅट्रीक्स या दोन्हीही दुरध्वनी यंत्रणेचे दुरुस्ती देखभाल (AMC) कामा करीता वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

दोन्हीही दुरध्वनी यंत्रणेचे दुरुस्ती देखभाल (AMC) कामा करीता वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा (तृतिय) मागविणेत आलेल्या आहेत. तांत्रिक निविदा सादर करणेचे मुदतीत तांत्रिक निविदा प्राप्त झालेल्या असुन, टिम फाईव्ह टेक्नॉलॉजीस, बेंगलोर या तिस-या निविदाधारकांनी तांत्रिक निविदा सादर न केल्याने व त्यासोबत बयाणा रक्कम व टेंडर फी चे डिडि सादर न केल्यामुळे तांत्रिक निविदा फेरीत बाद झालेले आहेत. त्यानुसार खालील प्रमाणे निविदाधारक तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेले आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव व गांव | शेरा |
|---|---|---|
| ०१ | युनिव्हर्सल कम्युनिकेशन, नाशिक | **पात्र** |
| ०२ | प्रोजीलीटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि., मुंबई | **पात्र** |
| ०३ | टीम फाईव्ह टेक्नॉलॉजीस , बेंगलोर | अपात्र (बयाणा रक्कम व टेंडर फी चे डिडि प्राप्त नाहीत) |

सिमेंस व मॅट्रीक्स या दोन्हीही दुरध्वनी यंत्रणेचे दुरुस्ती देखभाल (AMC) करीता पात्र झालेल्या दोन कमर्शियल फेर ई-निविदा (तृतिय) आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sr.No. | Description of Work / Item(s) | Units | Unify Enterprise Communications Pvt.Ltd. (Rate per Nos in Rs) | Universal Communication (Rate per Nos in Rs) |
|---|---|---|---|---|
| 1.0 | (A) Siemens Hipath 4300 IP Base EPABX System (Main System + 3 IPDA System) | | | |
| 1.01 | Digital Extension (24x4) = 96 Nos<br>Analog Extension (24x30) = 720 Nos<br>Analog Trunk Line (8x2) = 16 Nos<br>Digital Trunk Line (30x2 PRI Line) = 60 Nos<br>AC Win PC Based Operator Console (Hardware & Software) = 3 Nos.<br>8 Port PC Based Voice Mail (Hardware & Software) = 1 Nos.<br>Telesoft Call Billing (Hardware & Software) = 1 Nos.<br>Float Cum Boost Charger (FCBC) Main System = 1 Nos.<br>Music On Hold (Hardware & Software) = 1 Nos | Lump sum Amt.to be Quoted | **299848.00** | 375000.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2.0 | (B) Matrix IP Base Ethernity ME 16 EPABX System (1+ 1 System) | | | |
| 2.01 | P & T Lines (8x2) = 16 Nos.<br>Digital Extension (24x2) = 48 Nos<br>Analog Extension (24x21) = 504 Nos<br>ISDN PRI Line (30x2 PRI Line) = 60 Nos | Lump sum Amt.to be Quoted | 339450.00 | **270000.00** |
| | | | | |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सिमेंस व मॅट्रीक्स या दोन्हीही अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेची वार्षिक दुरुस्ती देखभाल (AMC) करणेसाठी उपरोक्त तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना एक वर्ष अथवा नवीन सिस्टीम बसविणे यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी मेन्टनंन्सचे काम देण्यात यावे.**

**तसेच सदरची सिस्टीम कालबाहय झालेली असल्यामुळे, नवीन ईपीएबीएक्स (अद्ययावत टेलिफोन यंत्रणा) घेणेकामी, शताब्दी वर्षासाठी नेमण्यात आलेले सल्लागार टाटा कन्सल्टंशी यांचा सल्लागार म्हणून अभिप्राय घेण्यात यावा व तसा प्रस्ताव मा.त्रीसदस्य समिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- ध्वनिक्षेपण व टेलिफोन विभागप्रमुख)

---

**१४ सेवाधाम इमारतीचे तळमजल्यावर साईभक्त व नागरिकांकरीता वाढीव टॉयलेटची व्यवस्था करणे कामासाठी प्राप्त निविदांबाबत.**

मा. त्रिसदस्य समितीचे दि.२४/०६/२०१५ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.१६२ (३७) संमत करणेत आलेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, सेवाधाम इमारतीचे तळमजल्यावर साईभक्त तसेच नागरिकांकरीता वाढीव टॉयलेटची व्यवस्था करणेकामी विहीत पध्दतीने ई- निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.७,९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी" अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.

१.) याकामी इकडील विभागाचे दि.१९/०८/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये निविदा सूचना प्रसिध्द करणेस मान्यता देण्यात आली. त्यानुसार दि.१०/०९/२०१५ रोजीच्या दै. आजचा दिनकर या वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.२१/०२/२०१५ रोजीच्या ई-निविदा जमा करण्याच्या अंतीम मुदतीत एकही निविदा प्राप्त न झाल्याने याकामी इकडील दि.०५/१०/२०१५ रोजीचे टिपणी नुसार दुस-यांदा फेर ई – निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.

२:) त्यानुसार दि.०१/११/२०१५ रोजीचे दै. सायं. आनंद, संगमनेर तसेच दि.०२/११/२०१५ चे साप्ताहिक पोलिस पेपर, अ.नगर या वर्तमानपत्रात फेर ई– निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.१६/११/२०१५ रोजीच्या ई- निविदा जमा करण्याच्या अंतीम मुदतीत एकही निविदा प्राप्त न झाल्याने याकामी तिस-यांदा फेर ई– निविदा मागविणेस इकडील दि.०१/१२/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता घेण्यात आली आहे.

**प्रस्तावना**-त्यानुसार याकामी वर्तमान पत्रात ई– निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या ई- निविदांमधील टेक्नीकल बीड दि.२९/०१/२०१६ रोजी उघण्यात आल्या आहेत. उघडण्यात आलेल्या ई-निविदांचे टेक्नीकल बीड मधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | कागदपत्रांचा तपशिल | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बयाना रक्कमेचा डी.डी व को-या निविदेची किंमत | पी.डब्ल्यु डी. रजिस्ट्रेशन | काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र. | ई पी एफ रजिस्ट्रेशन | |
| १ | निखील अजित गुजराथी, कोपरगांव. | जोडले आहे | जोडले आहे | जोडले आहे | जोडले आहे | **पात्र** |
| २ | बी.पी.शिंदे, पढेगाव | जोडले आहे | जोडले आहे | जोडले आहे | जोडले आहे | **अपात्र (कृपया खाली नमूद टिपणीचे अवलोकन होणेस विनंती)** |

उपरोक्तपैकी बी.पी. शिंदे, कोपरगांव यांना यापुर्वी संस्थानचे सर्व्हे नं.५४,५५ व १२५ तसेच गट नं. ८७,८८ येथील टॉयलेट ब्लॉकचे बांधकाम देण्यात आले होते. परंतू त्यांनी सदर कामास वेळेत सुरुवात न केल्याने त्यांचेकडून सदर काम काढून घेण्यात आले होते. तसेच सर्व्हे नं. १२४ मधिल गवरी शेडचे कामही त्यांनी उशिराने पूर्ण केल्याने त्यांना दंड आकारणेत आला होता. त्यामुळे आता वरील कामासाठी त्यांना अपात्र ठरविण्यात यावे असे मत आहे.

ठेकेदार निखील अजित गुजराथी, कोपरगांव यांनी सादर केलेले तांत्रिक लिफाफ्यामधील कागदपत्रांची छाननी केली असता ते तांत्रिक दृष्टया पात्र असल्याचे आढळून आले आहे.

सदरहूकामी तिस-यांदा ई– निविदा मागवून प्राप्त झालेल्या ई– निविदा मधील पात्र ठेकेदार यांचा कमर्शिअल बिड मा. उपसमितीचे दि.०४/०२/२०१६ रोजीचे सभेपुढे उघडणेत आला असून प्राप्त दरांचा तुलनात्मक तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Bidder Name | Estimated Rate | Quoted percentage | Quoted Rate in figures and words | |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Nikhil Ajit Gujarathi, Kopargaon | 7,95,000-/ | -1% | 7,87,050/- | Seven lakh Eighty seven Thousand Fifty Only. |

**तरी सेवाधाम इमारतीचे तळमजल्यावर साईभक्त व नागरिकांकरीता वाढीव टॉयलेटची व्यवस्था करणेच्या कामासाठी निविदाधारक बी.पी. शिंदे, पढेगांव यांना अपात्र ठरविणेस व ठेकेदार निखील अजित गुजराथी, कोपरगांव यांचे रु.७,८७,०५०/- मात्रचे दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**१५. माहिती तंत्रज्ञान विभागासाठी अत्यावश्यक सेवेकरीता नेटवर्क संबधीत तांत्रिक साहित्य खरेदीकामी प्राप्त ई-निविदामधील पात्र निविदाधारकांच्या Commercial ई-निविदा उघडुन त्यातील निम्मत्तम पुरवठाधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :** दि. 08/09/2015 रोजीचे मा. व्यवस्थापन सभेतील निर्णय क्र. 291.

**प्रास्ताविक:** तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार व दि. 04/07/2015 व दि. 24/07/2015 रोजीचे परिपत्रकान्वये कुंभमेळा 2015 निमित्ताने श्री साईभक्तांना सोयी-सुविधा पुरविणेसाठी विविध उपाययोजना सुरु करण्यात आल्या होत्या. त्यानुसार संस्थानचे विविध विभागात संगणक कार्यरत असुन, कुंभमेळा पर्वणीच्या काळात शिरडीत श्री साईभक्तांची गर्दी होण्याची शक्यता असल्याने नेटवर्क संबधीत खालील नमुद केलेले तांत्रिक साहित्य अत्यावश्यक सेवा म्हणुन तयार ठेवणे गरजेचे होते.

तसेच खालील तपशिलातील नमुद केलेले नेटवर्क संबधीत तांत्रिक साहित्य दि. 14/08/2014 रोजीचे महाराष्ट्र शासनाचे अध्यादेशानुसार Manufacturer in RC वर तपासले असता, सदर साहित्य RC वर नसल्याचे निदर्शनास आल्याने, याकामी दि. 11/08/2015 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये संस्थानचे विहित पध्दतीने संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रियेव्दारे विविध पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन खरेदी करणेस तसेच सदरकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 7,33,500/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे सादर करण्यात येऊन त्यास दि. 08/09/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 291 अन्वये मान्यता मिळालेली आहे.

**[अ] हार्डवेअर**

| अ.नं. | साहित्याचे नाव | तपशिल | नग | अंदाजे दर | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 01 | WS-C2960+24TC-L | **Cisco-** Catalyst 2960 Plus 24 10/100 + 2T/SFP LAN Base | 1 Nos. | 3,47,500/- | 3,52,500/- |
| | CAB-IND-10A | 10A Power cable for India | 1 Nos. | | |
| | CAB-CONSOLE-RJ45 | Console Cable 6ft with RJ45 and DB9F | 1 Nos. | | |
| | GLC-LH-SMD= | **Cisco-** 1000BASE-LX SFP transceiver module MMF/SMF 1310nm DOM | 2 Nos. | | |
| | | **Cisco** - 1000BASE- LH SFP | 2 Nos. | | |
| | CON-PSRT-WSC296TC (Support) | **Support-** PRTNR SS 8X5XNBD Catalyst 2960 Plus 24 10/100 + 2T/SFP LA | For 1 Year | 5,000/- | |
| | | | | **एकुण रक्कम** | **3,52,500/-** |

[ब] कंन्झुमेबल-

| अ .नं. | साहित्याचे नाव | कंपनी व ब्रँड | नग | अंदाजे दर | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Cat 6 cable Box | AMP | 05 Box | 9,000/- | 45,000/- |
| 02 | Cat 6 I/O Box With Face Plate Unit (Make) | AMP | 40 Nos. | 600/- | 24,000/- |
| 03 | Cat 6 I/O Jack (For Cat-6 Patch Panel Side) | AMP | 80 Nos. | 300/- | 24,000/- |
| 04 | Cat 6 Patch Cord 2 ft | AMP | 750 Nos. | 200/- | 1,50,000/- |
| 05 | Cat 6 Patch Cord 3 ft | AMP | 50 Nos. | 300/- | 15,000/- |
| 06 | Cat 6 Patch Cord 7 ft | AMP | 40 Nos. | 500/- | 20,000/- |
| 07 | Fiber Patch Cord- SC-LC (3mtr – SM) | AMP | 8 Nos. | 3,500/- | 28,000/- |
| 08 | RJ-45 | AMP | 500 Nos. | 20/- | 10,000/- |
| 09 | Nylon Cable –Tie 200 mm | Branded | 500 Nos. | 6/- | 3,000/- |
| 10 | Nylon Cable –Tie 250 mm | Branded | 500 Nos. | 8/- | 4,000/- |
| 11 | LIU Rack mount 24 Port – fully Loaded | AMP | 1 Nos. | 20,000/- | 20,000/- |
| 12 | Cat 6 – Patch Panel | AMP | 2 Nos. | 7,000/- | 14,000/- |
| 13 | Wall Mount Rack 12U | Netrack/ Precision | 2 Nos. | 12,000/- | 24,000/- |
| | | | | **एकुण रक्कम** | **3,81,000/-** |
| 01 | | | | [अ] हार्डवेअर | 3,52,500/- |
| 02 | | | | [ब] कंन्झुमेबल | 3,81,000/- |
| | | | | **[अ] व[ब] प्रमाणे एकुण रक्कम** | **7,33,500/-+ टॅक्स** |

उपरोक्त नमुद तांत्रिक साहित्य कुंभमेळा 2015 चे खरेदीकामी मान्यता घेण्यात आलेली होती. परंतु, कुंभमेळा-2015 कालावधी संपुण गेल्यानंतर दि. 10/10/2015 रोजी व्यवस्थापन समितीचे ठरावाची प्रत कार्यवाहीसाठी इकडील विभागाकडे प्राप्त झालेली आहे.

तरी, उपरोक्त नमुद केलेले तांत्रिक साहित्य हे संस्थानचे विविध विभागांना विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या तांत्रिक सेवा सुविधांच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. तसेच संस्थानचे विविध विभागांचे मागणीचा विचार करता, विषयांकीत प्रकरणाबाबत संस्थानचे विहित पध्दतीने दि. 20/11/2015 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये विविध कंपन्याचे निविदाधारक /पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन तसेच जनसंपर्क विभागामार्फत महाराष्ट्रातील 05 शहरामधील वर्तमानपत्रात शासकीय दराप्रमाणे तसेच संस्थानचे वेबसाईटवरही जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

त्यानुसार विविध कंपन्याचे निविदाधारक /पुरवठाधारकांकडुन मागविण्यात आलेल्या प्राप्त ई-निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | कंपनीचे नाव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| 1 | R.D. Data Systems, Nashik | 01/01/2016 आ .नं.19498 |
| 2 | Elixir Netconnect Pvt. Ltd. Mumbai | 01/01/2016 आ .नं.19585 |
| 3 | Racca Infotech Pvt. Ltd., Nashik | 01/01/2016 आ .नं.19587 |
| 4 | L.A. Technologies Pvt.Ltd ., Mumbai | 02/01/2016 आ .नं.19690 |
| 5 | Minitech Systems, Nashik | 04/01/2016 आ .नं.19764 |

उपरोक्त प्राप्त पुरवठाधारकांच्या तांत्रिक ई-निविदा दि. 24/07/2015 रोजीचे परिपत्रकान्वये दि. 23/10/2015 रोजी उघडण्यात आले आहेत. त्यावेळी खालील अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

| अ.नं. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री दिलीप झीरपे | मुख्यलेखाधिकारी |
| २ | श्री उत्तमराव गोंदकर | प्रशासकीय अधिकारी |
| ३ | श्री दिलीप उगले | प्रशासकीय अधिकारी |
| ४ | श्री अशोक औटी | प्र.प्रशासकीय अधिकारी |
| ५ | श्री विनोद कोते | ज्यु.ईडीपी मॅनेजर |
| ६ | श्री साईप्रसाद जोरी | तांत्रिक सहाय्यक |
| ७ | श्री अनिल भोरकडे | लिपीक, माहिती तंत्रज्ञान विभाग |

वरीलप्रमाणे उपस्थितांसमोर उघडण्यात आलेल्या तांत्रिक ई-निविदेमधील पुरवठाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| Description | Vendor | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | R.D. Data Systems, Nashik | Elixir Netconnect Pvt. Ltd. Mumbai | Racca Infotech Pvt. Ltd., Nashik | L.A. Technologies Pvt. Ltd., Mumbai | Minitech Systems, Nashik |
| Shop Act License Certificate | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| VAT- TIN Certificate | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| IT Returns of last two financial years (2013-14, 2014-15) | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| Details of RTGS of Tenderer | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| PAN card | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| Letter of Acceptance of all Terms & Conditions of the Tender | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| Tender Fee DD Amount of Rs. 500/- | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| EMD DD Amount of Rs. 7,335/- | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| Remark | Accepted | Accepted | Accepted | Accepted | Accepted |

सदरच्या तांत्रिक ई-निविदा संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडु यांनी तपासल्या असुन उपरोक्त पात्र निविदाधारक/ पुरवठाधारकांच्या Commercial ई-निविदा मा. उप-समितीचे सभेत उघडुन त्यातील न्युन्नतम निविदाधारक / पुरवठाधारकास कार्यादेश देता येईल.

**मागणी:** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे दि. 08/09/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 291 अन्वये नमुद साहित्य कुंभमेळा 2015 करीता खरेदीकामी मान्यता घेण्यात आलेली होती. परंतु, कुंभमेळा-2015 कालावधी संपुण गेल्यानंतर दि. 10/10/2015 रोजी व्यवस्थापन समितीचे ठरावाची प्रत कार्यवाहीसाठी इकडील विभागाकडे प्राप्त झालेली आहे.

तरी उपरोक्त नमुद केलेले तांत्रिक साहित्य हे संस्थानचे विविध विभागांना विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या तांत्रिक सेवा सुविधांच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. तसेच संस्थानचे विविध विभागांचे मागणीचा विचार करता, विषयांकीत प्रकरणाबाबत ई-निविदा प्रक्रियेव्दारे कार्यवाही करण्यात येऊन, प्राप्त झालेल्या तांत्रिक ई-निविदा उपस्थितासमोर उघडण्यात आल्या आहेत. सदरच्या प्राप्त तांत्रिक ई-निविदा संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडु यांनी तपासल्या असुन उपरोक्त पात्र निविदाधारक/पुरवठाधारकांच्या Commercial ई-निविदा मा. उप-समितीचे सभेपुढे उघडुन त्यातील न्युन्नतम निविदाधारक/पुरवठाधारकास कार्यादेश येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :** तांत्रिक व आर्थिक.

प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे विषयाकींत प्रकरणी पात्र निविदाधारक/पुरवठाधारकांच्या Commercial ई-निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | निविदेमधील एकत्रित मूळ दर रु. |
|---|---|---|
| १ | Elixir Netconnect Pvt. Ltd. Mumbai | ४,५७,७००.०० |
| २ | L.A. Technologies Pvt.Ltd., Mumbai | ५,१०,७६५.६० |
| ३ | Minitech Systems, Nashik | ४,४७,६८३.०० |
| ४ | Racca Infotech Pvt. Ltd., Nashik | ३,७४,६४०.०० |
| ५ | R.D. Data Systems, Nashik | ३,६७,८४८.०० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे माहिती तंत्रज्ञान विभागासाठी अत्यावश्यक सेवेकरीता नेटवर्क संबधीत तांत्रिक साहित्य खरेदी करणेकामी R.D. Data Systems, Nashik यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील रु.३,६७,८४८/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

१६. **पिठाची गिरणी खरेदीकामी प्राप्त दरपत्रक उघडणेस मान्यता मिळणेबाबत.**

श्री साईप्रसादालय व लाडू प्रसाद निर्मिती विभागाकरीता 18 इंच साईजच्या 3 गिरणी विहीत पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रुपये 2,00,000/- पर्यंतच्या खर्चास मा. व्यवस्थापन समिती दिनांक १०.११.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ५८१ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त मान्यतेनुसार जा.नं. एसएसएस/वशी-मेकॅनिकल/५६६७/२०१६ दिनांक १३/०१/२०१६ चे पत्रानुसार खालील पुरवठादार यांचेकडून दरपत्रके मागविण्यात आलेली होती :

| अ.नं. | पुरवठादाराचे नाव | अ.नं. | पुरवठादाराचे नाव |
|---|---|---|---|
| १ | जय नवनाथ इंजिनिअरींग वर्क्स, कोल्हापूर | ४ | न्यु अ‍ॅटो अ‍ॅन्ड इलेक्ट्रीकल्स, साकुरी |
| २ | भनसाळी मोटार्स, साकुरी | ५ | विनय मशिनरी, साकुरी |
| ३ | वैशाली मशिनरी अन्ड सेल्स कॉ. अहमदनगर | ६ | भंडारी पाईप्स अ‍ॅन्ड मोटार्स, नाशिक |

उपरोक्त पैकी खालील तीन पुरवठादार यांनी विहीत मुदतीत सिलबंद पाकीटात दरपत्रक सादर केलेले आहे.

| अ.नं. | पुरवठादाराचे नाव |
|---|---|
| १ | जय नवनाथ इंजिनिअरींग वर्क्स, कोल्हापूर |
| २ | भनसाळी मोटार्स, साकुरी |
| ३ | न्यु अ‍ॅटो अ‍ॅन्ड इलेक्ट्रीकल्स, साकुरी |

श्री साईप्रसादालय व लाडू प्रसाद निर्मिती विभागाकरीता गिरणी 3 इंच साईजच्या 18 खरेदीकामी प्राप्त झालेले दरपत्रके आजच्या सभेत उघडणेत आले असता दरपत्रकधारकाने खालील प्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पुरवठादाराचे नाव | प्रति नग दर रु. |
|---|---|---|
| १ | जय नवनाथ इंजिनिअरींग वर्क्स, कोल्हापूर | ६३,९९५.६६ |
| २ | भनसाळी मोटार्स, साकुरी | ५५,९८०.०० |
| ३ | न्यु अ‍ॅटो अ‍ॅन्ड इलेक्ट्रीकल्स, साकुरी | ३९,७००.००<br>(मागणी प्रमाणे मालाचे दर दिलेले नसल्याने अपात्र) |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय व लाडू प्रसाद निर्मीती विभागाकरीता पिठाची गिरणी खरेदीसाठी दोनच पात्र निवीदा प्राप्त झाल्याने याकामी फेरनिवीदा मागणविण्यात याव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

१७. **हायड्रोलिक पॅलेट ट्रक खरेदीकामी प्राप्त दरपत्रक उघडणेस मान्यता मिळणेबाबत**

श्री साईप्रसादालय, भांडार व लाडू प्रसाद निर्मीती विभागासाठी आवाश्यक असलेल्या २ टन क्षमतेच्या ५. नविनदहा नग हायड्रोलिक पॅलेट ट्रक विहीत पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा मया रक्क-रुर .,३०,००० -/ मात्रच्या खर्चास मा.१०पन समिती दिनांक वस्थाव्य .११ .रोजी सभेतील निर्णय क्रं २०१५.४७७ अन्वये मान्यता मिळालेली आहे .

उपरोक्त मान्यतेनुसार जा नं .दि २०१५/५६६६/मेकॅनिकल/एसएसएस .१३ रोजीचे २०१६.१.चे पत्रानुसार खालील पुरवठादार यांचे कडून दरपत्रक मागविणेत ओलेले होते .

| अ.नं. | पुरवठादाराचे नाव | अ.नं. | पुरवठादाराचे नाव |
|---|---|---|---|
| १ | निलकमल लि.अंधेरी, मुंबई | ४ | डब्लू एच. ब्रॅडी अ‍ॅण्ड कंपनी लि.फोर्ट,मुंबई |
| २ | राहुल एन्टरप्राईजेस, सिडको, नाशिक | ५ | अिश्मता इंजिनिअरींग इक्युपमेंट, भोसरी, पुणे |
| ३ | यश टेडींग कं., नाशिक | ६ | कोमल एन्टरप्राईजेस , अंबड, नाशिक |

उपरोक्त पैकी खालील तीन पुरवठादार यांनी विहीत मुदतीत सिलबंद पाकीटात दरपत्रक सादर केलेले आहे .

| अ.नं. | पुरवठादाराचे नाव |
|---|---|
| १ | निलकमल लि.अंधेरी, मुंबई |
| २ | डब्लू एच. ब्रॅडी अ‍ॅण्ड कंपनी लि.फोर्ट,मुंबई |
| ३ | कोमल एन्टरप्राईजेस , अंबड, नाशिक |

उपरोक्तप्रमाणे श्री साईप्रसादालय, भांडार व लाडू प्रसाद निर्मीती विभागासाठी हायड्रोलिक पॅलेट ट्रक खरेदीकामी प्राप्त झालेली दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | पुरवठादाराचे नाव | दरपत्रकधारकांनी देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|
| १ | निलकमल लि.अंधेरी, मुंबई | १,८१,०००/- |
| २ | डब्लू एच. ब्रॅडी अ‍ॅण्ड कंपनी लि.फोर्ट,मुंबई | १,६५,५७०/- |
| ३ | कोमल एन्टरप्राईजेस , अंबड, नाशिक | २,३०,६२५/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, हायड्रोलिक पॅलेट ट्रक खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील डब्लू. एच. ब्रॅडी अॅण्ड कंपनी लि.फोर्ट, मुंबई यांचे रु.१,६५,५७०/- मात्र निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

१८. **आर.ओ प्लॅन्टकरीता मेबरन्स व फिल्टर खरेदीकामी प्राप्त दरपत्रके उघडणेस मान्यता मिळणेबाबत.**

श्री साई प्रसादालयातील आर ओ प्लॅन्टकरीता मेंबरन्स व फिल्टर खरेदी करणेकामी विहीत पद्धतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या रककम रुपये २,५५,०००/- मात्रचे मा.व्यवस्थापन समिति दिनांक २८.११.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८३ अन्वये मान्यता मिळालेली होती

उपरोक्त मान्यतेनुसार जा नं .दि २०१६/५६६८/मेकॅनिकल/एसएसएस .१३ रोजीचे २०१६.१.चे पत्रानुसार खालील पुरवठादार यांचे कडून दरपत्रक मागविणेत आलेले होते .

| अ.नं. | पुरवठादाराचे नाव | अ.नं. | पुरवठादाराचे नाव |
|---|---|---|---|
| १ | पी.बी.एस. इलेक्ट्रोनिकस मुंबई | ५ | अॅक्वा पुरीफायर्ड सर्व्हिसेस, पुणे |
| २ | टेक्नोफाईल, नाशिक | ६ | अॅक्वाटेक एन्टरप्राईजेस, औरंगाबाद |
| ३ | वॉटरटेक सर्व्हिसेस, सिडको, नाशिक | ७ | डि .पी .इंडस्ट्रीज, मुंबई |
| ४ | इन्डो अमेरिकन वॉटर सिस्टीम, वजीनाग्रम आंध्र प्रदेश | | |

उपरोक्त पैकी खालील तीन पुरवठादार यांनी विहीत मुदतीत सिलबंद पाकीटात दरपत्रक सादर केलेले आहे .

| अ.नं. | पुरवठादाराचे नाव | आवक नंबर | आवक दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पी.बी.एस. इलेक्ट्रोनिकस मुंबई | 21215 | 25/01/2016 |
| २ | अॅक्वाटेक एन्टरप्राईजेस, औरंगाबाद | 21186 | 25/01/2016 |
| ३ | डि .पी .इंडस्ट्रीज, मुंबई | 21194 | 25/01/2016 |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेली दरपत्रके आजच्या उपसमिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | पुरवठादाराचे नाव | मेबरन्स | कार्बन फिल्टर | सॅन्ड फिल्टर |
|---|---|---|---|---|
| | | मुळ दर रु. | मुळ दर रु. | मुळ दर रु. |
| १ | पी.बी.एस. इलेक्ट्रोनिकस, मुंबई | **१,९९,६८७.५०** | ३७,९६८.७५ | ३३,१८७.५० |
| २ | अॅक्वाटेक एन्टरप्राईजेस, औरंगाबाद | २,६२,५००.०० | **३१,२५०.००** | **२७,५००.००** |
| ३ | डि .पी .इंडस्ट्रीज, मुंबई | २,५८,२४३.७५ | ४३,९७६.४५ | ४६,०९१.२५ +३२,५०० (सर्व्हिस चार्जेस) |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आर.ओ. प्लॅन्टकरीता मेबरन्स व फिल्टर खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारण्यात येऊन संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.०३ **सन २०१६ मधील संस्थानमार्फत साज-या होणा-या उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- (अ-१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम-२०१४ मधील कलम १९ मध्ये 'भक्तमंडळ' या शीर्षाखाली खालीलप्रमाणे तरतूद करणेत आलेली आहे-

(१) समारंभ, उत्सव, पूजा इत्यादींची शिफारस करण्यासाठी,आश्रयदाते,आजीव सदस्य,सर्वसामान्य सदस्य, सन्मान्य सदस्य, सहयोगी सदस्य आणि संस्था सदस्य (संलग्न) यांचा समावेश असलेले एक भक्त मंडळ असेल, सदस्यत्वाचा प्रत्येक प्रकारासाठी वर्गणीचा दर विनियमांव्दारे निर्धारित करुन दिल्याप्रमाणे असेल.

(२) कोणत्याही व्यक्तीस, मग तिची जात,धर्म अथवा लिंग कोणतेही असेल तरी, भक्त मंडळांचे सदस्यत्व देण्यात येईल.परंतु,अशा व्यक्तीने वयाची अठरा वर्षे पुर्ण केली असली पाहिजेत व ती श्री साईबाबांचा भक्त असली पाहिजे.

(३) भक्त मंडळाच्या सदस्यांचे अधिकार, विशेषाधिकार आणि कर्तव्य विनियमांव्दारे निर्धारित करुन दिल्याप्रमाणे असतील, समिती, भक्त मंडळाच्या सदस्यत्वासाठी अर्ज करणा-या अर्जदाराने पूर्ण करावयाच्या अटी व शर्ती देखील विनियमांव्दारे निर्धारित करुन देईल.

(अ-२) उपरोक्त परिछेद (अ-१) मध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थान व्यवस्थापनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,(शिर्डी) भक्त मंडळ विनियम,२०१३ पारित केलेले आहेत. या विनियमातील कलम (४) भक्त मंडळाच्या सभासदांचे हक्क आणि विशेषाधिकार या मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

(१) भक्त मंडळांच्या सभासदांना संस्थानच्या तीन उत्सवाचे, म्हणजे रामनवमी, गुरुपौर्णिमा आणि साईबाबांची पुण्यतिथी या उत्सवांचे निमंत्रण पाठविण्यात येईल.असे निमंत्रण डाकेने, एक्सप्रेस कुरीयरने, फॅक्स, ई-मेल व्दारा किंवा इलेक्ट्रॉनीक संपर्काच्या इतर पध्दतीने पाठविण्यात येईल.

(२) वर उल्लेख केलेल्या तिन अधिकृत उत्सवानंतर प्रत्येक सभासद डाकेने 'उदी प्रसाद' प्राप्त होण्यास पात्र असेल.

(३) हे विनियम लागू होण्यापूवीचे आश्रयदाते आणि आजिव सभासदांचे सर्व हक्क आणि विशेषाधिकार पुढे चालू राहतील.

(अ-३) मा.शासनाने सन २००४ चा अधिनियम पारित करणेपूर्वी संस्थानचा कारभार मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे देखरेखीत मा.दिवाणी न्यायालय,मुंबई यांनी टिपणी दावा क्र.३४५७/६० दि.१८/१०/१९८२ अन्वये मंजूर केलेल्या योजनेनुसार (Scheme)चालत असे या (Scheme) मध्ये भक्तमंडळ बाबत खालील प्रमाणे तरतूद आहे.

(i) Invitations to Members to attend the three utsavas of shirdi Viz Ramnavami , Guru pournima and Punyatithi of Shri Saibaba Shall be extended by Publishing the same in English and Marathi newspapers having wide circulution personal invitation shall be in the discretion of the Executive Officer to extend personal invitations to ordinary members:

(ii) Every member shall be entitled to receive the 'Udiprasad' at his address by post after each of the three official festivals without payments of any charges.

उपरोक्त परिछेद अ(१) (२) (३) मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार सन २०१५ अखेर संस्थान व्यवस्थापना मार्फत साज-या करणेत आलेल्या श्री रामनवमी,श्री गुरुपौर्णिमा, श्रीपुण्यतिथी (विजयादशमी) उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका व उदीप्रसाद भक्तमंडळ सभासदांना पोष्टाव्दारे पाठविणेत आलेल्या आहेत. तसेच व्यवस्थापनामार्फत देणगीदार भक्त, मा.मंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मान्यवर अधिकारी व शिर्डी ग्रामस्थ यांना निमंत्रण पाठविण्यात येते. माहे नोव्हेंबर-२०१५ अखेर १,८१,००० इतके संस्थान भक्तमंडळाचे सभासद आहे. जानेवारी-२०१५ पासून भक्तमंडळ सभासद शुल्क मध्ये वाढ झाल्याने सध्या भक्तमंडळ सभासद संख्येत वाढ अल्प प्रमाणात होत आहे. सन २०१६ मधील उत्सवांसाठी भक्त मंडळ सभासद संख्या अंदाजे खालील प्रमाणे आहे, यामध्ये घट किंवा वाढ होऊ शकते.

| अ.न | उत्सव | सभासद संख्या ( अंदाजे) |
|---|---|---|
| १. | श्री रामनवमी | १,८१,००० |
| २. | श्री गुरुपौर्णिमा | १,८२,००० |
| ३. | श्री पुण्यतिथी (विजयादशमी) | १,८३,००० |

सन-२०१५ मध्ये साजरा करण्यात आलेल्या श्री रामनवमी,श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सव तीनही उत्सवांच्या पत्रिका छपाई कामी रु.९,६३,७१५/- मात्र खर्च आलेला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे व्यवस्थापन समितीचे वतीने दसरा (विजयादशमी) उत्सव-२०१५चे अंदाजपत्रकीय खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे कडे रक्कम रु.५२,४६,२००/- मात्र मान्यतेसाठी सिव्हील ॲपलिकेशन सादर केले होते. मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठचे दि.१५/१०/२०१५ रोजीचे निकालाव्दारे निमंत्रण पत्रिका छपाई,स्टिकर,उदीप्रसाद भरणे मजूरी खर्च रु. ५,००,०००/- व निमंत्रण पत्रिका पोस्टेज खर्च रु ९,९६,०००/- चे खर्च वगळण्यात येवून उर्वरित खर्चास मान्यता दिलेली आहे.

मा.उच्च न्याययालयाने नां मंजूर केलेल्या श्रीपुण्यतिथी उत्सव -२०१५ चे निमंत्रण पत्रिका छपाई व पोस्टेज खर्चा बाबत पुर्नःविचार याचिका दाखल करण्यात आलेली आहे.सदरची पुर्नःविचार याचिका मा. न्यायालयाचे विचाराधीन आहे.

**प्रस्ताव**- प्रत्येक उत्सवापूर्वी निमंत्रण पत्रिका छपाईकामी दरपत्रके मागविणेस मान्यता घेऊन टिपणी सादर करणे, निमंत्रणपत्रिकेचा मसुदा मान्य करुन घेणे, छपाई (प्रेस) धारक यांचे कडून दरपत्रक मागविणे तुलनात्मक तक्ता तयार करणे, निम्नतम दरधारकास छपाई कामी कार्यादेश देणे, सर्व निमंत्रण पत्रिकांना घडया घालणे, पाकीटावर पत्ते प्रिंट करणे, पाकिटे चिटकविणे, फ्रॅंकिग करणे, पत्रिकांची राज्याच्या नावानुसार विभागणी करुन पोष्टात टाकणे इ.कामे करावे लागतात. तसेच निमंत्रण पत्रिका निमंत्रकांना वेळेत पोहच होणे आवश्यक आहे.या भक्तमंडळाचे सभासद संपुर्ण देश-विदेशात आहेत. या मध्ये कर्नाटक,आंध्रप्रदेश, तामिळनाडू या राज्यात हजारो सभासद संख्या आहेत. संस्थान मार्फत छपाई करण्यात येणा-या पत्रिका हया आर्ट पेपरवर (90 GSM) या कागदाच्या प्रकारावर छपाई करणेत येतात.

उपरोक्त परिछेदांत विवेचन केल्यानुसार, सन-२०१६ मध्ये साज-या होणा-या तीनही उत्सवांसाठी पत्रिका छपाई करुन घेणेसाठी अंदाजे रु.१२,००,०००/- ( रु. बारा लाख ) मात्र इतका खर्च येईल.

सन-२०१६ साठी पत्रिका छपाई करणेसाठी काढण्यात येणा-या निविदा दरपत्रकांमध्ये पुढील बाबी विचारात घेता येतील. या मध्ये पत्रिका, पाकीट छपाई करणे,पत्रिकेची घडी घालून पत्रिका पाकीटात भरुन देणे. पाकीटांना गमटेप वापरणे. या मुद्दयांचा समावेश करता येईल. यामुळे आमंत्रितांना वेळेत पत्रिका पोहच होण्यास मदत होईल व वेळ वाचेल असे नम्र मत आहे.

सन-२०१६ मधील संस्थान व्यवस्थापना मार्फत साज-या करण्यात येणा-या श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी (विजयादशमी) या तीन मुख्य उत्सवासाठी पत्रिका व पाकीटे छपाई करणेसाठी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्दकरुन, विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून अंतिम निर्णय घेणेकामी, तसेच याकामी अंदाजे रक्कम रु.१२,००,०००/- (रु.बारा लाख) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणस विंनती.

निर्णय क्र.७८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन- २०१६ मधील संस्थान व्यवस्थापनामार्फत साजरे करण्यात येणा-या श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी (विजयादशमी) या तीन मुख्य उत्सवासाठी पत्रिका व पाकीटे छपाई करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१२,००,०००/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहू खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५/ विधी अधिकारी)

---

विषय नं.०४ **श्री रामनवमी उत्सव- २०१६ साजरा करणेस व त्याकामीच्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम ,२००४ मध्ये **कलम १७ समितीचे कर्तव्ये व अधिकार** या शीर्षाखाली उपकलम (१) मध्ये खालील तरतुद आहे.

*".... राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास आधीन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमतेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदीरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा –अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी/ विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील."*

*उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार व पुर्वापार रुढी परंपरेनुसार संस्थान व्यवस्थापनामार्फत धार्मिक पुजा विधी, उत्सव साजरे केले जात आहेत.*

श्री साईबाबांनी हयातीत, श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री रामनवमी उत्सव सुरु केला. त्यास अनुसरुन मंदिर विभागाकडील दि.०९/१२/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीनुसार श्री रामनवमी उत्सव गुरुवार, दिनांक १४/०४/२०१६ ते शनिवार, दिनांक १६/०४/२०१६. असा तीन दिवस साजरा होणार आहे.(चैत्र शु.८ शके १९३८ ते चैत्र शु.१० शके १९३८ ) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

सन-२०१६ मध्ये साजरा करावयाचे श्री रामनवमी उत्सवासाठी पुढीलप्रमाणे नियोजन करावे लागणार आहे.

| अ.नं | तपशील | रामनवमी -२०१६ चे उत्सवाचे अनुषंगाने करावयाचे नियोजन//कामे |
|---|---|---|
| ०१ | उत्सव निमत्रंण पत्रिका व उदीप्रसाद | भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना तसेच मान्यवरांना उत्सवाच्या निमत्रंण पत्रिका पाठवाव्या लागतात. यंदाचे श्री रामनवमी उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १८२००० पत्रिका छपाई करुन घ्याव्या लागतील. तसेच नेहमीप्रमाणे वर्तमान पत्रातून प्रेस नोट (न्यूज ॲटम) म्हणून प्रसिध्दी देण्यात येईल. (विशेष टिप्पणी- सन २०१६ मध्ये साजरे होणारे उत्सवाचे निमंत्रण पत्रिका छपाई बाबत अलहिदा स्वतंत्र प्रस्ताव मा. व्य.स.चे सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेत आलेला आहे.) |
| ०२ | **अ) उत्सव व्यवस्था** | **कलाकार कार्यक्रम** |
| | प्रारंभ दिवस,गुरुवार दि.१४/०४/२०१६ चैत्र शु ८ शके १९३८ | सायंकाळी ७.३० ते रात्रौ १०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदान स्टेजवर आयोजित करणे. |
| | मुख्य दिवस शुक्रवार दि.१५/०४/२०१५ चैत्र शु ९ शके १९३८ | १) सायंकाळी ७.३० ते १०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर ) आयोजित करणे. २) रात्रौ. १०.०० ते सकाळी ५.०० पर्यत (दि.१५/०४/२०१६) या वेळेत इच्छुक कलाकारांचा साईभजनांचा कार्यक्रम. या मुख्य दिवशी समाधी मंदीर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | सांगता दिवस शनिवार दि.१६/०४/२०१६. चैत्र शु.१० शके १९३८ | सायंकाळी ७.३० ते १०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर) उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम निश्चीत करावयाचे आहेत. इच्छुक कलाकारांची पत्रे प्राप्त झालेनंतर कलाकार / कार्यक्रम निश्चीती बाबत सदरचा विषय मा. उपसमितीचे सभेपुढे सादर केला जाईल. |

| | | |
|---|---|---|
| | ब) कीर्तन कार्यक्रम | श्री रामनवमी कीर्तन कार्यक्रम ह.भ.प.दासगणू महाराज आश्रम,गोरटे, हे करीत असतात.त्यांचेकडून आलेले कीर्तनकार कीर्तन करतात. निमंत्रित कीर्तनकारांची व कलाकारांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात येईल. निमंत्रित कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदीर विभागामार्फत अदा करण्यात येईल.<br>उत्सवाची सांगता गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील |
| ०३ | श्री सत्यनारायण पूजा व अभिषेक पूजा | गर्दीच्या काळात व्यवस्थापनाच्या दृष्टीने उत्सवकाळात श्री साई सत्यव्रत पुजा व अभिषेक पूजा बंद ठेवण्यात येतात. उत्सवकाळात दिनांक-१४/०४/२०१६ ते दि.१६/०४/२०१६ अखेर श्रीसाईसत्यव्रत पुजा व अभिषेक पुजा बंद ठेवता येतील. |
| ४ | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात दि.१४/०४/२०१६रोजी सकाळी ६.१५ वाजता श्री व्दारकामाई मंदीरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दि.१५/०४/२०१६ सकाळी ५.४५ वाजता त्यांची समाप्ती होईल. मा.त्रिसदस्यीय (व्यवस्थापन) समितीचे सदस्य पहिले ०३ अध्याय वाचतील व राहिलेले ५० अध्याय प्रत्येकी एक असे ५० भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नावे दि.१३/०४/२०१६रोजी मंदीर कार्यालयात नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नावे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. अखंड पारायणाकरीता व्दारकामाई मंदीर रात्रभर उघडे राहील.श्री रामनवमी उत्सवात पोथी,वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक,पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता मा.सदस्यांची नावे ठरविणे आहे. |
| ०५ | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी शुक्रवार दि.१४/०४/२०१६ रोजी सकाळी ९.१५ वाजता श्रींचे पालखीचे गावातून मिरवणूक व मुख्य दिवशी शनिवार दि.१५/०४/२०१६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता रथाची गावातून मिरवणूक निघेल. |
| ०६ | कावडी व निशाणाची मिरवणूक | उत्सवाचे मुख्य दिवशी दिनांक १५/०४/२०१६ रोजी सकाळी ५.१५ वाजता श्रींचे कावडी सायंकाळी ४.०० वाजता निशाणाची मिरवणूक राहील. श्री रामनवमीचे दिवशी परिसरातील गांवकरी व साईभक्त गोदावरी नदीचे पवित्र पाणी कावडीने घेऊन येतात. यासाठी समाधी मंदीराचे बाहेरील बाजूस दक्षिण गेटच्या समोर अभिषेक मुर्ती ठेऊन स्वतंत्र व्यवस्था करण्यात येते. कावडीधारकांना श्रीफळ प्रसाद दिला जातो. या वर्षीही तशी कार्यवाही करण्यात येईल. |
| ७ | विद्युत रोषणाई | श्री रामनवमी उत्सवात श्री व्दारकामाई मडळ, मुंबई हे समाधी मंदीर, व्दाराकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदीर परिसरात सोईप्रमाणे विनामुल्य विद्युत रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा-नाष्टयाची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे-येण्याचा खर्च त्यांना देण्यात येतो. या उत्सवातही त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. विद्युत विभागामार्फत त्यांना या उत्सवात रोषणाई करणेचे पत्र देण्यात आलेले आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| ०८ | संरक्षण व्यवस्था | उत्सव काळात समाधी मंदीर व मंदीर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारामार्फत नेहमीप्रमाणे जादा सुरक्षारक्षक नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना संरक्षण विभागा मार्फत विनंती करण्यात येईल. |
| ०९ | प्रसाद-भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टान्नासह रुपये १०/- या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते. मा.त्रिसदस्य समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय तसेच निमंत्रित कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजनाची व्यवस्था नेहमीप्रमाणे केली जाईल. साईभक्तांचे सोयीसाठी अन्नपाकिटे,चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅंटीनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टान्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी सुरु करणेत येईल. या सबंधीत विभागाकडुन नियोजन करणेस येईल.<br>सन २०१५ चे पुण्यतिथी उत्सवात तिनही दिवसांचे प्रसाद भोजनात मिष्टांन्न पदार्थ म्हणून बुंदी (नुक्ती) देण्यात आली होती. याही उत्सवात मागील उत्सवाप्रमाणे मिष्टान्न देता येईल. |
| १० | लिलाव | श्रींना अर्पण केलेल्या वस्त्रांची व इतर वस्तुंची नेहमीप्रमाणे प्रसाद रुपाने जाहीर लिलावाने उत्सवाचे तिनही दिवशी विक्री करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ११ | देणगी काऊंटर्स | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदीर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊंटर्स तीन शिफटमध्ये सुरु ठेवण्यात येतील. तसेच उत्सवाचे इतर दिवशी देणगी काऊंटर्सची वेळ सकाळी ४ वा. ते रात्रौ ११ वा. पर्यंत करण्यात येईल. |
| १२ | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणारा जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यात नेमण्यात येईल. |
| १३ | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे साईप्रसाद नं.१ व नं.२, व्दारावती, भक्तनिवासस्थान इ. इमारतीमधून तसेच साईनगर,धर्मशाळा व न.भ.निवासस्थान परिसरात स्वतंत्र मंडप टाकून पालखी पदयात्रीसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदीर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ.व उन्हाळी मंडपही टाकणेत येतील. आवश्यकतेनुसार व गरजेनुसार त्यात वाढ करता येईल याकामी बांधकाम विभागासह इतर संबंधीत विभागामार्फत नियोजन करणेत येईल. पालखी धारकांची आलेल्या पत्रानुसार सर्व निवासस्थाने एकत्रीत नियोजन करतील. |
| १४ | प्रथमोपचार केंद्र | मागील उत्सवात संस्थानमार्फत दिक्षीतवाडा येथे तीनही दिवशी तीन शिफट मध्ये प्रसादालय परिसरात व पिंपळवाडी रोड वरील दर्शनरांग प्रवेशव्दार येथे पहिल्या व तिस-या दिवशी दोन शिफ्ट मध्ये व मुख्य दिवशी तीन शिफ्ट मध्ये असे दोन ठिकाणी प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात आले होते. तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदीर परिसरात ठेवण्यात आली होती.त्याप्रमाणे या उत्सवात कार्यवाही करण्यात येईल. |
| १५ | पालखी व्यवस्था | श्री रामनवमी उत्सवात मुंबई तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था श्री साईबाबा धर्मशाळा येथे करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवसथा करण्यात येईल.येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. त्याचप्रमाणे येणा-या पालख्यांसाठी पिण्याचे पाण्याची व्यवस्था सिन्नर ते शिर्डी रस्त्यावर मागील श्री रामनवमी प्रमाणे यंदाही लागणार आहे. त्या सबंधी खर्चाची टिपणी पाणीपुरवठा विभाग तयार करुन मंजूरीसाठी सादर करतील.गरजेनुसार पालख्या मुक्कामाचे ठिकाणी खर्डी,लतीफवाडी,घाटनदेवी, खंबाळे, वेल्लोळी, नाशिक, शिंदे, सिन्नर (एम.आय.डी.सी),खोपडी, दत्तमंदीर, पांगरी, वावी, हॉटेल वनराई, पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोण फाटा,सायाळे ,जवळके, डो-हाळे, इ.ठिकाणी पालखी मंडप, वीजव्यवसस्था व पाणी व्यवस्था करणेत येईल.तसेच दोन वर्षापासून पालखीतील पदयात्री शिर्डी मध्ये आल्यावर त्यांना संस्थानतर्फे एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून विनामुल्य देण्यात येते. त्यानुसार यावर्षीही एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून विनामुल्य देण्यात येईल. |
| १६ | कुस्त्या हंगामा | श्री रामनवमी उत्सवात कुस्त्यांचा हगामा गावक-यांमार्फत भरविण्यात येतो. सन २०१५ चे उत्सवात कुस्त्यांचे हंगामासाठी मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रु.७,००,०००/- मात्र मंजूर होती. त्यापैकी रुपये रु.६,९२,९००/-मात्र खर्च झालेला आहे.<br>कुस्त्या हंगामासाठी या वर्षी अंदाजपत्रकीय तरतुदीत मागील वर्षाप्रमाणे रु.७,००,०००/-तरतुद दर्शविण्यात आलेली आहे. मा.त्रिसदस्यीय समितीचे मंजुरी नुसार सदर तरतुद कमी /जास्त करता येईल. |
| १७ | पाणीपुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉलला पाणी सोडणे बाबत विनंती करण्यात येईल.नियमित पाणीपुरवठा राहिल याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १८ | खर्चाचे अंदाजपत्रक | श्री रामनवमी उत्सव-२०१५ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ६०,५५,०००/- (रु.साठ लाख पंच्चावन्न हजार) मात्र इतक्या रकमेस मंजुरी देण्यात आली होती. प्रत्यक्ष खर्च रुपये ५३,६२,६७८/- (एकुण त्रेपन्न लाख बासष्ठ हजार सहाशे अठ्ठयात्तर) मात्र इतका खर्च झाला होता.<br>श्री रामनवमी २०१६ करीता अंदाजपकीय रक्कम रुपये-७७,००,०००/- (रु.सत्यात्तर लाख) मात्र मंजूरीसाठी सादर केलेले आहे. |

**श्री रामनवमी उत्सव -२०१६ अंदाजपत्रक-**

| अ.नं. | तपशील | विभाग | श्री रामनवमी उत्सव २०१५ | | श्री रामनवमी उत्सव २०१६ |
|---|---|---|---|---|---|
| | | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | तरतूद |
| १ | मंडप कमानी स्टेज | बांधकाम | ८,३६,४१० | १४,३७,२८८ | ११,५१,५२९ |
| २ | कलाकार, कीर्तनकाराची बिदागी | मंदीर | ५,६७,६०० | १४,५९८ | ४,४०,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | भक्तांना मिष्टान्न मजुरीसह | प्रसादालय | ८,००,८९९ | ५,६२,७६२ | ७,९३,५८८ |
| ४ | विद्युत रोषणाई | विदयुत | १०,००,००० | ९,९७,०१४ | १०,००,००० |
| ५ | निमंत्रण पत्रिका, छपाई, उदीप्रसादासह | वशी५-,८ | १२,००,००० | १३,२०,९७५ | ४,००,००० |
| ६ | पोस्टेज खर्च | जावक | | | १०,००,००० |
| ७ | एल.ई.डी. पडदा | सीव्ही.टी.सी. | ० | ० | ६,००,००० नवीन तरतूद |
| ८ | फुल सजावट | बगीचा | ० | ० | २,००,००० नवीन तरतूद |
| ९ | जादा कामगार | कामगार | ३,००,००० | १,१८,३६३ | ३,००,००० |
| १० | पदयात्री,पालख्या,पिण्याचे पाणी व्यवस्था | | ६,००,००० | १,६८,१८६ | ४,३५,००० |
| ११ | आयत्या वेळचा प्रासंगिक खर्च (जादा टॅंकर भाडोत्री लावावयाचे झाल्यास) | पाणीपुरवठा | ० | ० | ३,००,००० नवीन तरतूद |
| १२ | संस्थान परिसर करिताभाडोत्री पाणी टॅंकर लावणे खर्च | | ० | ० | ३,००,००० नवीन तरतूद |
| १३ | कुस्ती हंगामा | | ७,००,००० | ६,९२,९०० | ७,००,००० |
| १४ | इतर खर्च (जाहिरात, वाहन भाडे, सभा नाष्टा, कॅमेरा, टी.व्ही. ई. दुरुस्ती) | जनसंपर्क, वाहन, साईप्रसाद, प्रसादालय, सीव्ही.टी.सी. | ५०,०९१ | ५०,५९२ | ७९८८३ |
| | | **एकुण** | **६०,५५,०००** | **५३,६२,६७८** | **७७,००,०००** |

उपरोक्त परिशिष्टात अ.न.०७ मध्ये भक्तांच्या दर्शन रांगेत व संस्थान मंदिर परिसरात लावणेत येणारे एलईडी पडदे (सीसीटीव्ही व्दारे मंदिराचे प्रक्षेपण) साठी नव्याने तरतूद करणेस आलेली आहे. तसेच अ.नं ८ मध्ये बगीचा विभागा मार्फत मंदिर व मंदिर परिसरात करावयाच्या फुल सजावटीसाठी देणगीदार साईभक्तांचा प्रस्ताव प्राप्त न झाल्यास संस्थान मार्फत फुल सजावट करणेसाठी अंदाजीत खर्चासाठी नव्याने तरतूद करणेत आलेली आहे.-

या व्यतिरिक्त सध्या महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीमुळे धरणांमधील पाणी साठे खूपच कमी असल्याने उत्सवाचे कालावधीत (उत्सवापूर्वी) पिण्याचे पाण्याचे आवर्तन (रोटेशन) न मिळाल्यास पालखी, पदयात्री मुक्कामी ठिकाणासह संस्थान परिसरातून भाडोत्री टॅंकरव्दारे पाणी विकत घेऊन पिण्याचे पाण्याची सोय करावी लागणार आहे. त्यामुळे उपरोक्त परिशिष्टात अ.न ११ व १२ करीता नव्याने तरतूद करणेत आलेली आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.१६/१०/२०१२ रोजीचे निर्देशानुसार श्री रामनवमी उत्सव खर्च “Major financial Decision” असल्याकारणाने यासाठी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यता मिळाले नंतर मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणे आवश्यक राहिल.

श्री रामनवमी उत्सव-२०१६ साजरा करणेस,याकामी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रुपये ७७,००,०००/- (रु.सत्यात्तर लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.७९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सालाबादप्रमाणे श्री रामनवमी उत्सव-२०१६ साजरा करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.७७,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहू खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५/ विधी अधिकारी)

---

विषय नं.०५ **दि.०६/१०/२०१५ व दि.०७/१०/२०१५ रोजी श्री. सुरेश पुंजा ठोके यांनी मा.अध्यक्ष महोदय व मा.कार्यकारी अधिकारी सो., व उपविभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी यांचेकडे श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी व श्री.सुभाष नारायण गर्कल (सेवा निवृत्त) प्र.अ. यांचेबद्दल दिलेल्या तक्रार अर्जाबाबत.**

प्रस्ताव- श्री.सुरेश पुंजा ठोके,गोगलगांव यांनी श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीचे महाराष्ट्र शासनाकडुन दि.०७-०८-२००९ रोजी मंजुर शिर्डी संस्थानच्या कर्मचारी आकृतीबंधात सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नती झालेल्या प्रशासकिय अधिका-यांनी पदाचा व अधिकाराचा गैरवापर करुन सन २०१३-१५ या झालेल्या कामांमध्ये मोठया प्रमाणात पैशाचा अपहार झाला असल्याची दाट शक्यता असल्यामुळे अति.प्रशासकिय अधिकारी श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे व

श्री.सुभाष नारायण गर्कल यांनी बेकायदेशीर मार्गाने त्यांनी मिळविलेल्या पदाची व कमाविलेल्या संपत्तीची एस.आय.टी.समोर तसेच आयकर व लाचलुचपत खात्यामार्फत चौकशी करुन दोषी आढळणा-या अधिका-यावर बेकायदेशीर संपत्ती कमविण्याचा अपसंपदेचा गुन्हा दाखल करुन त्यांची सर्व संपत्ती (स्थावर व जंगम) जप्त करुन शासन जमा करुन त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांना त्वरीत अटक करुन बडतर्फकरणेबाबत अशा विषयाचा अर्ज मा.अध्यक्ष महोदय,मा.जिल्हाधिकारी,मा.कार्यकारी अधिकारी व मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी विभाग शिर्डी यांचे नावे प्राप्त झालेल्या दि.०७-१०-२०१५ व दि.०६-१०-२०१५ रोजीचे तक्रार अर्ज इकडील कार्यालयास दिलेला आहे.श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे,प्रशासकिय अधिकारी यांना जा.नं.एसएसएसवशी-७ए/ २८४५/ २०१५ दि.२७-१०-२०१५ अन्वये त्यांचे लेखी म्हणणे मागविणेत आले होते.त्यास अनुसरुन त्यांनी दि.३१-१०-२०१५ रोजी सादर केलेले आहे.श्री.गर्कल हे सेवानिवृत्त झालेले आहेत. तसेच श्री.अशोक रंभाजी औटी,तत्कालीन प्र.प्रशासकिय अधिकारी, आस्थापना विभाग यांना जा.नं.एसएसएसवशी-७ए/२८१६/२०१५ दि.२७-१०-२०१५ रोजीचे अन्वये अहवाल मागविणेत आलेला होते.त्यास अनुसरुन त्यांनी दि.०२-११-२०१५ रोजीचा अहवाल सादर केलेला आहे.

श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकिय अधिकारी यांनी दि.३१-१०-२०१५ रोजी सादर केलेले लेखी खुलाशात तक्रारदाराचे म्हणणे चुकिचे व खोटे असून ते वरिष्ठांची दिशाभूल करणारे आहे असे म्हटले असुन त्या सोबत सादर केलेल्या कागदपत्रांचा तसेच शिर्डी पोलीस स्टेशन शिर्डी येथे तक्रारदाराविरुध्द नोंदविलेल्या तक्रारीची/ गुन्हयाची चौकशी पडताळणी/तपासणी केल्यास मी यात निर्दोश असल्याचे दिसुन येईल.सबब,माझे लेखी अहवाल व म्हणणेचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन तक्रारदार श्री.सुरेश पुंजा ठोके, मु.पो.गोगलगांव, ता.राहाता, जि.अहमदनगर यांनी माझे विरुध्द मा.अध्यक्ष महोदय,साहेब,कार्यकारी अधिकारी साहेब व मा.उप विभागीय अधिकारी यांचे नावे सादर केलेले दि.०६-१०-२०१५ व दि.०७-१०-२०१५ रोजीचे तक्रार अर्ज निकाली काढुनसदर प्रकरण बंद (फाईल) करणेत यावे.अशी नम्र विनंती आहे.सोबत अ.नं.०१ ते ९२ इत्यादी कागदपत्रांच्या छायांकित प्रती अवलोकनार्थ व पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आलेल्या आहेत.असे म्हटलेले आहे.सोबतश्री.गमे यांनी दिलेला खुलासा पाने नं.०१ ते ७५ जोडली आहे)

तसेच श्री.अशोक रंभाजी औटी,प्र.प्रशासकिय अधिकारी,सामान्य प्रशासन विभाग यांनी श्री.सुरेश पुंजा ठोके, मु.पो.गोगलगांव यांचे दि.०६-१०-२०१५ व दि.०७-१०-२०१५ रोजीचे तक्रार अर्जा संदर्भात जा.नं. एसएसएसवशी-७ए/२८१६/२०१५ दि.२७-१०-२०१५ अन्वये लेखी अहवाल सादर करणेस सांगीतले होते. त्यास अनुसरुन श्री.अशोक रंभाजी औटी यांनी त्यांचा दि.०२-११-२०१५ रोजीचा स्वयंस्पष्ट लेखी अहवाल सादर केलेला असुन त्यात त्यांनी," १) संदर्भ क्रं.१ ते ६ नुसार प्रशासकिय अधिकारी पदाच्या व्यक्तीचे नियमबाहय नेमणुक झाल्याचे तक्रारदारांचे म्हटले असले तरी त्यास कोणताही ठोस आधार देण्यात आलेला नाही.श्री.सुर्यभान गमे हे प्रशासकिय अधिकारी होणेपुर्वी कामगार अधिकारी होते.तर श्री.सुभाष गर्कल हे प्रशासकिय अधिकारी होणेपुर्वी विधी अधिकारी होते. संस्थानचा हिशोब लेखाशाखेमध्ये मुख्यलेखाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली काटेकोरपणे ठेवला जातो. कामगार अधिकारी व विधी अधिकारी यांचा संस्थानच्या ठेवण्यात हिशोबामध्ये कोणताही संबंध येत नाही.मुख्यलेखाधिकारी या पदावर शासन प्रतिनियुक्तीवर वर्ग १ चे अधिकारी काम करत आहेत.सर्व हिशोबाचे पुर्व अंतर्गत व शासन नियुक्त वैधानिक लेखापरिक्षण होत असते.सबब,तक्रारदारांची तक्रार चुकिची आहे.अशा तक्रारीमुळे संस्थान विषयी भक्तांमध्ये विनाकारण गैरसमज पसरतो,संस्थानने अशा खोटया बदनामीकारक तक्रारी विरुध्द फौजदारी व दिवाणी दावा दाखल केल्यास अशा खोटया तक्रारी येणार नाहीत असे नम्र मत आहे.तक्रारदाराची याबाबतची तक्रार प्रथमदर्शनी निराधार,चुकिची आधारहिन वाटते.तक्रारदारास या विषयी तक्रार करण्याचा कोणताही नैसर्गिक न्यायाचा हक्क नाही. याबाबत तक्रारदारास स्वंतः इतराविषयी बाजू घेण्याचे वकिलपत्र कोणी दिले? तक्रारदराचा यामध्ये रस का? (Why third party interst?) हे प्रश्न अनुत्तरीत आहेत. श्री.गर्कल,प्रशासकिय अधिकारी हे दि.३०-०६-२०१५ रोजी संस्थानमधुन सेवानिवृत्त झाले आहेत.प्रशासकिय अधिका-यांच्या नेमणुका हया संस्थानाच्या नियमानुसार व शासनाने ठरवून दिलेल्या आकृतीबंधानुसार झालेल्या आहेत.तक्रारदाराने नमुद केलेले मुद्दे योग्य नाहीत.तसेच ते चुकिच्या पध्दतीने व ठोस आधारहिन मांडलेले दिसून येत आहेत.उपस्थित केलेले मुद्दे मोघम व विनाकारण बदनामी करणारे आहेत.प्रशासन कोणा एका व्यक्तीच्या म्हणण्याप्रमाणे चालत नाही.त्यावर वरिष्ठांचे नियंत्रण असते.७) मा.व्यवस्थापन समितीने निर्णय घेताना सर्व माहितीसह सर्वांगीण चर्चा करुन निर्णय घेण्यात आलेला आहे. तक्रार हि वस्तुस्थितीस वस्तुस्थितीस धरुन नाही.उपस्थिती मुद्दे तक्रादाराचे स्वंयमनिर्मित व दिशाभुल करणारे दिसून येत आहेत.८) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीच्या आस्थापनेवरील पदांचा आकृतीबंध शासनाने दि.७ ऑगष्ट २००९ रोजी निर्णयामधील १ ते ११ अटी व शर्तीच्या अधिन राहून त्यास मंजुरी दिलेली आहे.संस्थानने जा.नं.एसएसएस/वशी-०१/४२६७/२०१४ दि.०९-१२-२०१४ प्रमाणे प्रतिनियुक्तीने दोन प्रशासकिय अधिकारी नेमण्याबाबत मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई-३२ यांना पत्र पाठविलेले आहे.सेवा प्रवेश नियम तयार करण्याचे काम चालु आहे.९) प्रथम दर्शनी तक्रारदाराचे उपस्थित मुद्दे हे अतिशोक्ती व केवळ संबंधीतांची बदनामी करणारे दिसून येत आहेत.संस्थानचा कारभार पारदर्शी असुन बाहेरील लोकांनी केवळ सुडबुध्दी किंवा कर्मचा-यांव्रील एकमेकांचा वाद व हेवेदावे यामुळे संस्थानची नाहक बदनामी होत असल्याने या प्रकरणी कायदेशीर कार्यवाही करणे ऊचीत आहे.सदर चुकिची माहिती बाहेर पुरविणा-यांचा शोध घेवुन त्यांच्यावर ही कडक शिस्तभंगाची कार्यवाही करणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

निष्कर्षः- श्री.सुरेश पुंजा ठोके,मु.पो.गोगलगांव,ता.राहाता,जि.अहमदनगर यांनी दि.०७-१०-२०१५ रोजी श्री.गमे व श्री.गर्कल,प्रशासकिय अधिकारी यांच्या विरोधात केलेली तक्रार केवळ मानसिक त्रास व बदनामी करण्याच्या दृष्टीने केली असुन त्यात संस्थानची नाहक बदनामी होत आहे.यावर वेळीस कायदेशीर कार्यवाही करणे आवश्यक आहे.जेणेकरुन यापुढे अशा खोटया व नाहक बदनामी करणा-या तक्रारींना आळा बसेल.असे म्हटलेले आहे.

उपरोक्त विषयास अनुसरुन श्री.ठोके यांनी दि.११-०१-२१६ पासुन उपोषण सुरु केलेले होते.सदर प्रकरणाचे गांर्भीय विचारात घेवुन श्री.ठोके यांना परावृत्त करणेकरीता दि.१४-०१-२०१६ रोजी दुपारी ०१.०० वाजेच्या दरम्यान उप कार्यकारी अधिकारी,श्री.आप्पासाहेब शिंदे,प्रशासकिय अधिकारी,श्री.उत्तम पंढरीनाथ गोंदकर,श्री.दिलीप त्रिंबकराव उगले,प्र.प्रशासकिय अधिकारी,श्री.अशोक रंभाजी औटी व प्र.कामगार अधिकारी,श्री.रविंद्र नवले यांनी श्री.ठोके यांना समक्ष भेटुन त्यांनी दि.०७-१०-२०१५ रोजीचे अर्जान्वये केलेल्या मागणीबाबत चौकशी केली असुन येत्या १५ दिवसात मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेमध्ये याबाबत विषय सादर करणेत येईल व त्यावर झालेला निर्णय आपणांस कळवुन त्यानुसार कार्यवाही करणेत येईल.असे सांगीतलेले असुन त्याबाबत त्यांना जा.नं.एसएसएसवशी-७ए/५७२८/२०१६ दि.१४-०१-२०१६ रोजीचे पत्र दिले आहे.तसेच मा.कार्यकारी अधिकारी यांनी उपोषणकर्ते श्री.ठोके यांना दि.१५-०१-२०१६ रोजी प्रत्यक्ष भेटुन दि.०७-१०-२०१५ रोजीचे अर्जान्वये केलेल्या मागणीबाबत चौकशी केली असुन येत्या १५ दिवसात मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेमध्ये याबाबत विषय सादर करणेत येईल व त्यावर झालेला निर्णय आपणांस कळवुन त्यानुसार कार्यवाही करणेत येईल.असे सांगीतले आहे.तद्नंतर त्यांनी उपोषण सोडलेले आहे.

<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-</u> श्री.सुरेश पुंजा ठोके,मु.पो.गोगलगांव,ता.राहाता,जि.अहमदनगर यांनी दि.०६-१०-२०१५ व दि.०७-१०-२०१५ रोजी श्री.गमे व श्री.गर्कल,प्रशासकिय अधिकारी यांच्या विरोधात केलेली तक्रारव त्यांनी तक्रारीसोबत पुरावे दाखल कोठल्याही कागदपत्रे जोडलेली नाही.सदरची तक्रार चुकिची व खोटी असुन केवळ कुणाच्या तरी सांगण्यावरुन, मानसिक त्रास देण्याचे हेतुने दिलेली असल्याचे वस्तुस्थिवरुन,तसेच श्री.गमे दि.३१-१०-२०१५ रोजीचा लेखी खुलासा व श्री.औटी यांनी दि.०२-११-२०१५ रोजीचे लेखी खुलाशाचे अवलोकन करता दिसुन येते.सदर लेखी खुलासा व लेखी अहवालाचे अवलोकन करता सदरचे तक्रार अर्जात तथ्य आढळुन येत नाही व सदरचे तक्रारीस कोठलाही आधार अथवा पुरावा नसल्याचे दिसुन येते.सबब,श्री.सुरेश पुंजा ठोके, मु.पो.गोगलगांव, ता.राहाता यांनी श्री.गमे यांचे विरुध्द दिलेल्या दि.०६-१०-२०१५ व दि.०७-१०-२०१५ रोजीचे तक्रार अर्जाचे प्रकरण बंद करुन, दप्तरी दाखल करता येईल व तसे श्री.ठोके यांना लेखी पत्रान्वये कळविण्यात येईल असे मत आहे.

सोबत दि.०५-१२-२०१६ रोजीचा सादर केलेला अहवाल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णय क्र.८० **दि.०६/१०/२०१५ व दि.०७/१०/२०१५ रोजी श्री. सुरेश पुंजा ठोके यांनी मा.अध्यक्ष महोदय व मा.कार्यकारी अधिकारी सो., व उपविभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी यांचेकडे श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी व श्री.सुभाष नारायण गर्कल (सेवा निवृत्त) प्रशासकीय अधिकारी यांचेविरोधात केलेल्या तक्रारींच्या चौकशी अहवालाचे अवलोकन करण्यात आले असता, श्री. सुरेश पुंजा ठोके यांनी सदरच्या केलेल्या तक्रारी चुकीच्या व खोटया असून केवळ कुणाच्या तरी सांगण्यावरुन, मानसिक त्रास देण्याचे हेतुने केल्या असल्याचे अहवालात निष्पण्ण झालेले आहे.**

**याच चर्चेचे वेळी, तक्रारदार श्री.ठोके यांचे विरुध्द शिर्डी पोलिस स्टेशन येथे एन.सी.आर. क्र.४६२/ २०१५ व लोणी परिसरात काम करत असलेल्या ठेकेदारास श्री.सुरेश पुंजा ठोके यांनी ब्लॅकमेल केलेसंदर्भात लोणी पोलिस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं.२४/ २०१६ असे गुन्हे दाखल झालेले आहे. तसेच मा.ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट वर्ग-१ राहाता येथे एस.सी.सी. नं. ७६/ २०१६ अन्वये दाखल झालेल्या फौजदारी गुन्हयांची माहिती सभेस देण्यात आली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री.ठोके यांचे तक्रार अर्जाचे प्रकरण बंद करुन दप्तरी दाखल करणेत यावे व तसे श्री.सुरेश पुंजा ठोके यांना लेखी पत्राद्वारे कळविणेत यावे.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

विषय नं.०६ **आऊटसोर्स कंत्राटी कर्मचा-यांना इनसोर्समध्ये कंत्राटी कर्मचारी म्हणून समाविष्ठ करुन घेणे तसेच त्यांना इतर कंत्राटी कर्मचा-यांप्रमाणे संस्थानचे हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.**

प्रस्ताव- मा.ना.श्री राधाकृष्ण विखे पाटील,विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र राज्य यांचेकडे शिर्डी शहर आणि परिसरातील स्थानिक ग्रामस्थांनी/ कर्मचा-यांनी वेळोवेळी झालेल्या बैठकीमध्ये केलेल्या मागण्या व त्यांचे प्रश्नाबाबत संस्थानचे साईनिवास अतिथीगृह येथे दि.२१.०१.२०१६ रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत श्री साईबाबा संस्थानचे विविध विभागात काम करीत असलेल्या आऊट सोर्स कंत्राटी कर्मचा-यांना इनसोर्समध्ये कंत्राटी कर्मचारी म्हणून समाविष्ठ करुन घेणे.तसेच त्यांना इतर कंत्राटी कर्मचा-यांप्रमाणे संस्थानचे हॉस्पिटलमध्ये वैदयकिय सुविधा उपलब्ध करुन देणे बाबत चर्चा झाली.

अ) श्री साईबाबा संस्थानचे श्रीसाईप्रसादालय विभाग, श्री साईआश्रम भक्तनिवास, श्री साईआश्रम धर्मशाळा, व्दारावती भक्तनिवासस्थान, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटल इत्यादि ठिकाणी हाऊसकिपींग, मेंटनंन्स, लेबर इ. काम विविध ठेकेदारांमार्फत आऊटसोर्सीग पध्दतीने चालत आहे. या सर्व ठिकाणी आज अखेर एकूण १६०४ कंत्राटी कर्मचारी काम करत आहे. सन २००९ साली श्री साईबाबा संस्थानचा कर्मचारी आकृतीबंध शासनकडून मंजूर करण्यात आलेला आहे. त्यानंतर श्री साईआश्रम भक्तनिवासस्थान व साईआश्रम धर्मशाळा विभागाची निर्मीती ही सन २०११ मध्ये झालेली असल्याने, आकृतीबंधात सदर ठिकाणी कर्मचारी मंजूर नसलेने संबंधित ठिकाणचे कामकाजा करीता आऊटसोर्स पध्दतीने कंत्राटी कर्मचारी लावणेत येत आहेत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना कंत्राटी पध्दतीने अकुशल,कुशल कर्मचारी व सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत मे. जय भवानी एंटरप्रायजेस,पुणे व मे. मॉडर्न व्ही आर सिक्युरीटी फोर्स लि.पुणे यांना कार्यादेश देण्यात आलेले असून, सदर दोन्ही एजन्सी मार्फत एकूण २२७५ कुशल,अकुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेत येत आहेत. सदर कंत्राटी कर्मचा-यांना सध्या संस्थानमध्ये कंत्राटदारामार्फत कामावर असलेल्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायदयास अनुसरुन शॉप अॅन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नुसार अकुशल,अर्धकुशल,कुशल कंत्राटी कामगार व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी यांना वेतन दर देण्यात येत आहे. उदयोग,उर्जा,कामगारविभाग, मुंबई यांचेकडील किमान वेतन दराबाबत अधिसुचनेस किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत शॉप अॅन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ अनुसुचित उदयोगातील किमान वेतन दरास अनुसरुन मुळवेतन व मा.कामगार आयुक्त,मुं. यांचेकडील वेळोवेळी घोषीत होणा-या नोटीफिकेशन नुसार स्पेशल अलैंउंस देण्यात येत आहे.तसेच सध्या कंत्राटी कर्मचा-यांना किमान वेतनदराप्रमाणे वेतन दिले जाते व त्यामध्ये प्रॉव्हीडंट फंड -१३.३६ टक्के, सर्व्हीस चार्जेस (लेबर-०.००१ टक्के सिव्हीलियन सुरक्षा गार्ड-०.०१ टक्के ,माजी सैनिक सुरक्षा गार्ड यांना-०००१ टक्के ) देण्यात येतो व सर्व्हीस टॅक्स-१४.५० टक्केसह, सानुग्रह अनुदान८.३३ टक्के (वर्षाला दिपावली निमीत्त) असे एकूण वेतन दिले जाते.

उपरोक्त एकूण **१६०४** आऊटसोर्स कंत्राटी कर्मचा-यांना संस्थानचे इनसोर्समध्ये वेळोवेळी होणा-या रिक्त जागांवर कंत्राटी कर्मचारी म्हणून समाविष्ठ करुन घेता येईल व तसेच संस्थानमध्ये कंत्राटी कर्मचारी नव्याने कंत्राटदारामार्फत कामावर घेतांना त्यांना प्रथम इनसोर्स कंत्राटी कामगार म्हणून कामावर न घेता आऊट सोर्स कंत्राटी कर्मचारी म्हणून कामावर घेता येईल. तसेच सध्याचे आऊट सोर्स कंत्राटी कर्मचा-यांना इनसोर्समध्ये समाविष्ठ करुन घ्यावयाचे झाल्यास प्रति महिना रक्कम रु.१,४६,५८,०४५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

ब) सध्या संस्थानमध्ये ठेकेदारामार्फत कामावर असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना मोफत वैदयकिय सेवेस व त्या संबंधित नियमावलीस मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९.११.२०११ निर्णय क्र.७६५(२३) (ब)अन्वये मान्यता मिळालेली असून, सदर नियमावली दि.०१.०१.२०१२ पासून इनसोर्स कंत्राटी कामगारांसाठी लागू करण्यात आलेली आहे. त्यात-

१) कंत्राटी कर्मचारी व त्यांचे कुटूंबीय म्हणजे पती/पत्नी जे इतर ठिकाणी लाभदायक नोकरीस नाही असे. ब). कंत्राटी कर्मचा-यावर पुर्णपणे अवलंबुन असलेले आई-वडिल व अविवाहीत मुले मुली तसेच १८ वर्षा खालील भाऊ,बहीण.

**२) वैदयकिय उपचारासाठी वार्षीक मर्यादा व सेवेचा कालावधी खालील प्रमाणे –**

| | |
|---|---|
| ०१ ते ०५ वर्षापर्यंत सेवा झालेले कंत्राटी कर्मचारी | वैदयकिय बिल मर्यादा रु.३००००/-पर्यंत |
| ०५ ते १० वर्षापर्यंत सेवा झालेले कंत्राटी कर्मचारी | वैदयकिय बिल मर्यादा रु.४००००/-पर्यंत |
| १० वर्ष व त्यापेक्षा अधिक झालेले कंत्राटी कर्मचारी | वैदयकिय बिल मर्यादा रु.५००००/- पर्यंत |

तसेच वर नमूद केलेल्या रकमेच्या मर्यादे पुढील वैदयकिय खर्च संबंधित रुग्णास भरावा लागेल. अशी नियमावली आहे. सन मार्च २०१४ ते एप्रिल-२०१५ अखेर आज मितीस संस्थानकडे कंत्राटदारामार्फत कामावर असलेल्या इनसोर्स कंत्राटी कर्मचा-यांनी श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटल येथे मोफत वैदयकिय उपचार घेतलेले असून त्यावर एकूण रक्कम **रु.३६,४९,६१३**/- इतका खर्च झालेला आहे.

आऊटसोर्सीग पध्दतीने कामावर असलेल्या **१६०४** कर्मचा-यांना सध्याचे इनसोर्स कंत्राटी कर्मचा-यांप्रमाणे संस्थानचे हॉस्पिटलमध्ये मोफत वैदयकिय सुविधा उपलब्ध करुन दयावयाची झाल्यास याकामी सुमारे **रु.२५,७३,१७७**/- इतका वार्षिक अतिरिक्त आर्थिक भार पडेल असे मत आहे.(रु.३६,४९,६१३ ÷ २२७५ कर्मचारी = १६०४.०० सरासरी प्रती कर्मचारी खर्च × १६०४ आऊटसोर्स कर्मचारी = **रु.२५,७३,१७७/-** इतका खर्च प्रती वर्षी अपेक्षित आहे.)

तरी उपरोक्त अ व ब प्रमाणे आऊट सोर्स कंत्राटी कर्मचा-यांना इनसोर्समध्ये कंत्राटी कर्मचारी म्हणून समाविष्ठ करुन घेणे तसेच आऊटसोर्स कंत्राटी कर्मचा-यांना इतर इनसोर्स कंत्राटी कर्मचा-यांप्रमाणे संस्थानचे हॉस्पिटलमध्ये वैदयकिय सुविधा उपलब्ध करुन देणे बाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णय क्र.८१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू समिती अस्थायी स्वरुपाची असल्यामुळे आऊटसोर्स कंत्राटी कर्मचा-यांना इनसोर्समध्ये कंत्राटी कर्मचारी म्हणून समाविष्ठ करुन घेणे तसेच त्यांना इतर कंत्राटी कर्मचा-यांप्रमाणे संस्थानचे हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देणेबाबतचा धोरणात्मक निर्णय घेऊ शकत नसलेबाबत समितीचे मत झाल्याने सदरहू विषय तूर्त तहकुब ठेवण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

**विषय नं.०७** **कुंभमेळा २०१५ चे कालावधीत खरेदी करण्यात आलेले सुरक्षा साहित्यांचे बिले अदा करणेकामी घेण्यात आलेले पोलिस विभागाचे अभिप्रायानुसार मुदतीनंतर प्राप्त होणारे सुरक्षा साहित्य ताब्यात घेऊन पोलिस विभागाचे ताब्यात देणेबाबत.**

**प्रस्ताव-** कुंभमेळा गर्दीचे नियोजनकामी पोलिस अधिक्षक कार्यालय अहमदनगर यांचे क्र.जिविशा/निधी/4551/2015 दि.10/06/2015 चे पत्रानुसार पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी सुरक्षा साहित्य मिळणेबाबत इकडील कार्यालयास कळविले होते. त्याअनुषंगाने सी.सी.टी.व्ही. सेल विभागामार्फत व्यवस्थापन समितीचे मान्यतेने निवीदा प्रक्रिया राबवून न्युनतम दर असलेले पुरवठाधारक यांना सुरक्षा साहित्य पुरविणेबाबत कार्यादेश देण्यात आलेले आहे. पुरवठा आदेशाप्रमाणे संबंधीत पुरवठादार यांनी कुंभमेळा कालावधीत मुदतीत पुरवठा केलेल्या सुरक्षा साहित्याचा तपशिल सोबत परिशिष्ट –अ प्रमाणे सादर केलेला आहे. तसेच मुदतीनंतर कुंभमेळा कालावधीत आलेले सुरक्षा साहित्याचा तपशिल टिपणी सोबत परिशिष्ट- ब प्रमाणे सादर केलेला आहे. तसेच कुंभमेळा झालेनंतर पुरवठादार यांचेकडून येणे बाकी असलेले सुरक्षा साहित्याचा तपशिल सोबत परिशिष्ट – क प्रमाणे सादर केलेला आहे. कुंभमेळा कालावधीत मुदतीनंतर आलेले परिशिष्ट- ब मधील सुरक्षा साहित्य ताब्यात घेवून त्यांचे बिले आदा करणेबाबत तसेच अद्याप प्राप्त न झालेले परिशिष्ट-क मधील सुरक्षा साहित्य संस्थानचे ताब्यात घ्यावे किंवा कसे याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी इकडील कार्यालयाकडून टिपणी सादर करण्यात आलेली होती. सदरचे विषयावर सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय झालेला आहे.

1. परिशिष्ठ अ मध्ये नमूद केलेले सुरक्षा साहित्य मुदतीमध्ये प्राप्त झालेले असुन त्यांच्या बिलाची रक्कम संबंधीतास आदा करणेत यावी.

2. परिशिष्ठ ब मध्ये नमूद केलेले सुरक्षा साहित्य मुदतीनंतर प्राप्त झालेले असून सदरहू साहित्याची श्रींचे समाधी शताब्दी वर्षामध्ये आवश्यकता भासेल का, याची पोलिस विभागाकडून खात्री करुन घ्यावी व जे साहित्य आवश्यक असेल, असे साहित्य स्विकारणेत येऊन, त्यांच्या बीलाची रक्कम संबंधीतास आदा करणेत यावी.

3. परिशिष्ठ क मध्ये नमूद केलेले सुरक्षा साहित्य अद्यापपर्यंत प्राप्त झालेले नाही. परंतू त्यामधील अ.नं.1 चे शिर्डी पोलिस स्टेशनचे हद्दीत टॉवर उभारणीचे काम चालू असून ते वगळता इतर अ.नं.2 ते 5 चे साहित्य स्विकारणेत येवू नये.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांना जा.नं.एसएसएस/ वशि/संरक्षण/ 5410/2015 दि.29/12/2015 चे पत्राने कुंभमेळा कालावधीतच परंतू विहीत मुदतीनंतर प्राप्त व अद्याप ताब्यात न घेतलेले सुरक्षा साहित्याची श्रींचे समाधी शताब्दी वर्षामध्ये आवश्यकता भासेल काय याबाबत विचारणा करणेत आलेली आहे. याबाबत पोलिस अधिक्षक अहदनगर यांनी दि.30/12/2015 चे पत्राने कळविले आहे की, सिंहस्थ कुंभमेळा 2015 कालावधीत श्री साईबाबा संस्थान, शिडी यांनी खबरदारीच्या उपाययोजना म्हणून खरेदी करण्यात आलेले, पोलीस विभागाने मागणी केलेले सुरक्षा साहित्य जे मुदतीनंतर प्राप्त झालेले आहे. त्या साहित्याची संदर्भिय यादी प्राप्त झाली. सदर यादीतील साहित्य हे साईबाबा शताब्दी वर्षाकरीता शिर्डी येथे येणाऱ्या भाविकांच्या गर्दीच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस विभागास उपयोगात येणार आहे. तरी सदरचे सुरक्षा विषयक साहित्य श्री साईबाबा संस्थानचे डेडस्टॉक रजिस्टरला नोंदी ठेवून पोलीस विभागास वापरण्यास देण्यात यावेत. ज्या वस्तु पोलीस विभागाकडून वापरुन खराब होतील त्या वस्तु संस्थानकडे परत करण्यात येतील. तरी संदर्भिय पत्रातील प्राप्त झालेले, मुदतीनंतर प्राप्त झालेले परंतु अद्याप पावेतो पोलीस प्रशासनाने ताब्यात न घेतलेले सर्व सुरक्षा विषयक साहित्य पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात यावेत असे कळविले आहे. तसेच यापुर्वी उपविभागीय पोलिस अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे जा.क्र.2441/2015 दि.21/10/2015 चे पत्राने मॅनीला रोप मिळणेबाबत कळविले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार -

1) परिशिष्ठ-अ मधील मुदतीत प्राप्त झालेले सुरक्षा साहित्याचे बीले आदा करणेकामी लेखाशाखा विभागाकडे सादर करण्यात आलेली आहेत.

2) परिशिष्ठ-ब मधील मुदतीनंतर प्राप्त झालेले सुरक्षा साहित्याबाबत पोलिस विभागाचा अभिप्राय घेवुन अभिप्राय पत्रासह बिले आदायगीसाठी लेखाशाखा विभागाकडे सादर करण्यात आलेली आहे.

3) परिशिष्ठ-क मधील अ.नं.01 चे अँग्युलर वायरलेस टॉवर स्विकारणेबाबत व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेली असुन अँग्युलर वायरलेस टॉवरचे बिल आदा करणेकामी अँग्युलर वायरलेस टॉवरचे काम पुर्ण झालेबाबत पोलिस विभागाचा अभिप्राय घेणेसाठी टिपणी व पत्र स्वाक्षरीसाठी सादर केलेले आहे.

पोलिस अधिक्षक अहमदनगर यांनी दि.30/12/2015 चे पत्रामध्ये मुदतीनंतर प्राप्त झालेले परंतु अद्याप पावेतो पोलीस प्रशासनाने ताब्यात न घेतलेले सर्व सुरक्षा विषयक साहित्य पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलिस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात यावे असे कळविले आहे. कुंभमेळा संपलेनंतर मुदतीनंतर प्राप्त होणारे खालीलप्रमाणे सुरक्षा साहित्य अद्याप पुरवठादार यांचेकडून ताब्यात घेतलेले नाही.

| अ.नं. | पुरवठादाराचे नांव | कार्यादेश नं. व दिनांक | साहित्याचा तपशिल | नग | सुरक्षा साहित्याची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| 01. | युनीक डेल्टा फोर्स सिक्युरिटी प्रा.लि. पुणे | 3071<br>28/08/2015 | नॉन लिनीयर जंक्शन डिटेक्टर | 01 | 11,00,000/-<br>+ (Taxes Extra) |
| 02. | मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कं. प्रा.लि. नोईडा | 3069<br>28/08/2015 | मॅनीलारोप | 10000 मिटर | 18,50,000/-<br>+ (Taxes Extra) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 03. | -----------\|\|------------ | ----\|\|---- | ड्रॅगन लाईट टॉर्च | 10 | 1,59,500/- + (Taxes Extra) |
| 04. | -----------\|\|------------ | ----\|\|---- | ब्रेथ ॲनालायझर वुईथ टॉर्च | 13 | 6,14,250/- |
| 05. | मे.एस.एस.एंटरप्राईजेस, नाशिक | 3070 28/08/2015 | प्रि फॅब्रीकेटेड ट्रॅफीक पोस्ट | 20 | 8,80,000/- + (Taxes Extra) |

मा. व्यवस्थापन समिती दि.10/11/2015 चे सभेमध्ये परिशिष्ट-क मधील अद्याप प्राप्त न झालेले सुरक्षा साहित्य स्विकारणेत येवू नये असा निर्णय झालेला आहे. परंतू पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी मुदतीनंतर प्राप्त होणारे सुरक्षा साहित्य हे शताब्दी वर्षाकरीता शिर्डी येथे येणाऱ्या भाविकांच्या गर्दीच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस विभागास उपयोगात येणार आहे असे कळविले असल्याने उपरोक्त परिशिष्ट-क मधील उर्वरीत सुरक्षा साहित्य संबंधीत पुरवठादार यांचेकडून घेवून शताब्दी वर्ष 2018 चे नियोजनकामी शिर्डी पोलिस स्टेशनचे ताब्यात द्यावे किंवा कसे याबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.८२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांचे पत्राचा विचार करता असे दिसून येते की, परिशिष्ट क मध्ये नमुद केलेले अ.नं.०१ ते ०५ चे साहित्य श्रींचे महासमाधी शताब्दी वर्षाकरीता शिर्डी येथे येणाऱ्या भाविकांच्या गर्दीच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस विभागास उपयोगात येणार आहे. तसेच सदरहू साहित्य खरेदीकामी येणा-या खर्चास मा.उच्च न्यायालयाची मान्यताही घेण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रस्तावित साहित्य संबंधीत पुरवठादार यांचेकडून घेवून त्यामधील अ.नं.०२ चे मॅनीलारोप वगळता इतर साहित्य शताब्दी वर्ष- 2018 चे नियोजनकामी शिर्डी पोलिस स्टेशन, शिर्डी यांचे ताब्यात देण्यात यावे. तसेच मॅनीलारोप ज्या वेळेस आवश्यकता असेल त्याच वेळेस शिर्डी पोलिस स्टेशन, शिर्डी यांना उपलब्ध करुन देण्यात यावा, असे ठरले.**

**तसेच सदरहू साहित्य स्विकारलेनंतर संबंधीत पुरवठाधारक यांची बीले अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

विषय नं.०८ **वाढीव शिर्डी संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजनेत (निळवंडे धरण उद्भव धरुन) समावेश होणेबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी, ग्रामपंचायत डो-हाळे व निमगाव (को.) यांनी केलेल्या मागणीबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अधिनियम कलम 21 मधील पोट-कलम (1) च्या खंड (क) अन्वये " मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे " अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:-** संस्थानची सध्याची पाण्याची वाढती गरज व सद्यस्थितीतील पाण्याची टंचाई लक्षात घेता, संस्थानकरीता वाढीव पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत राबविणेबाबत संस्थानचे मा. व्यवस्थापन समितीचे दि.१३/०२/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.०४ अन्वये ठरलेले आहे. त्यानुसार श्री साईबाबा संस्थान, शिर्डीकरीता पाणी पुरवठा करणेसाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन प्रस्तावित योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करणे इ. कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी शासनाकडे सादर केलेल्या सदरहू योजनेत शिर्डी संस्थान तसेच सभोतालची २ गांवे कनकुरी व पिंपळवाडी यांचा समावेश आहे. या योजनेची एकुण किंमत रु.२१५.९७ असून, त्यापैकी योजनेतील २ गावांसाठी किंमत रु.१९.०४ कोटी इतकी येते. त्यामुळे एकुण योजनेच्या किमतीपैकी शिर्डी संस्थानसाठी रु.२१५.९७ – रु.१९.०४ = रु.१९६.९३ कोटी इतकी किंमत येते. सदर योजनेत संस्थानसाठी रु.१९६.९३ कोटी इतका हिस्सा येतो. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सादर केलेल्या सदर योजनेसाठी निळवंडे धरण हा उद्भव प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

सदरहू योजनेत समावेश होणेसाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे दि.०७/०२/२०१४ रोजीचे पत्र, ग्रामपंचायत डो-हाळे यांचे दि.१९/०२/२०१४ रोजीचे पत्र व ग्रामपंचायत निमगांव (को) यांचे दि.२५/०२/२०१४ रोजीचे पत्र संस्थान कार्यालयास प्राप्त झालेले होते. सदरहू पत्रात केलेल्या मागणीप्रमाणे सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे निर्णयार्थ सादर करण्यात आलेला होता.

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय:-** *मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.०५/०६/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्रं.३९५ अन्वये सदरहू प्रस्तावाबाबत खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.*

*" यावर सविस्तर चर्चा होवून, संस्थानच्या पाणी पुरवठा योजनेत समोवश होणेसाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी, ग्रामपंचायत डो-हाळे व ग्रामपंचायत कार्यालय, निमगांव (को) यांनी विनंती केलेली आहे. परंतु शिर्डी नगरपंचायत यांचेसाठी निळवंडे धरणांमध्ये पाण्याचे आरक्षण आहे काय? संस्थानचे योजनेत समावेश केल्यानंतर पाणी आणणेसाठी वापरल्या जाणा-या पाईपलाईनची क्षमता किती आहे, तसेच पाणी वाटप,पाणी शुध्दीकरण, दुरुस्ती देखभाल या सर्व बाबींचा तांत्रिक दृष्टया तपशीलवार सविस्तर अहवाल मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागरी व ग्रामीण विभाग, संगमनेर यांचेकडुन घेऊन, सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले."*

**प्रस्ताव:-** वरील निर्णयानुसार मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण विभाग, संगमनेर यांना जा.क्रं.एसएसएस/वशी/पाणीपुरवठा/२२२३/२०१४, दि.६ ऑगस्ट, २०१४ रोजीचे व जा.क्रं.एसएसएस/ वशी/ पाणीपुरवठा/ ५२९१/ २०१५,दि.२६/१२/२०१५ रोजीचे पत्रान्वये विषयांकित मागणीबाबत तांत्रिक दृष्टया छाननी करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल इकडील कार्यालयास पाठविणेसाठी कळविण्यात आलेले होते.

याबाबत मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागरी व ग्रामीण विभाग, संगमनेर यांचे जा.क्रं./ तांशा/२४/२०१६, दि.०५/०१/२०१६ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास दि.१६/०१/२०१६ रोजी प्राप्त झालेले आहे. सदरचे पत्रात त्यांनी वाढीव शिर्डी संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी ग्रामपंचायतीसाठी संयुक्त पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण विभाग, संगमनेर मार्फत निळवंडे धरण उद्भव धरुन सर्वेक्षण करुन सविस्तर अंदाजपत्रके रु.२१५.९७ लक्ष किमतीचे वेळोवेळी शेरे पुर्तता करुन मा.सदस्य सचिव (म.जी.प्रा) यांचे स्तरावरुन त्यांचे पत्र क्रं.मजीप्रा/मनिसंवस कक्ष/ना-३६५/५८/२०१४, दि.१३/०१/२०१४ अन्वये

शासनास सादर करण्यात आली आहे. विषयांकित योजनेचा प्रस्ताव शासनास सादर झालेवर शासनाने प्रस्तुतची योजना शिर्डी संस्थानसाठीच करणे योग्य राहील व यासाठी लागणारा पुर्ण निधी शिर्डी संस्थानकडुन प्राप्त करुन पुर्ण ठेव पध्दतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने ही योजना करावी व योजनेत समाविष्ठ असलेली अन्य दोन गांवे स्वतंत्रपणे राष्ट्रीय ग्रामिण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाताळावित असे स्पष्ट आदेश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने निळवंडे धरणात १४.४० द.ल.घ.मि.पाणी-आरक्षणाचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर पाणी आरक्षणात शिर्डी नगरपंचायत,शिर्डी, ग्रामपंचायत डो-हाळे व ग्रामपंचायत निमगांव (को) यांच्यासाठी आवश्यक पाणी मागणीचा समावेश केलेला नाही. तसेच यातील शिर्डी शहर नागरी योजने अंतर्गत तर ग्रामपंचायत डो-हाळे व ग्रामपंचायत निमगांव (को) ग्रामीण योजने अंतर्गत येतात. त्यामुळे सदर ग्रामपंचायतीचा समावेश करणेसाठी जिल्हा परिषदेचा ठराव होणे आवश्यक आहे. तसेच सदरचे योजनेत शिर्डी नगरपंचायत,शिर्डी, ग्रामपंचायत डो-हाळे व ग्रामपंचायत निमगांव (को) यांचा समावेश केल्यास खर्चात वाढ अपेक्षित आहे.

तसेच या योजनेचे सर्वेक्षण करुन अंदाजपत्रके तयार करणेकामी रु.७० लक्ष किमतीची निविदा निश्चित करण्यात येवून या योजनेचे सर्वेक्षण, अंदाजपत्रके व आराखडे तयार करण्यात येवून शासनास सादर केलेले आहेत. याकामी संस्थानने भरलेली रु.१० लक्ष इतकी रक्कम ठेकेदारास अदा केलेली असुन उर्वरीत ६० लक्ष रकमेचा निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे जमा करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

तरी वरीलप्रमाणे नमुद ठराव व सर्वेक्षण निविदेच्या देयक अदायगीसाठी आवश्यक असणारी उर्वरीत रु.६० लक्ष इतकी रक्कम जमा करावी म्हणजे विषयांकित योजनेत सुचविलेली शिर्डी नगरपंचायत,शिर्डी, ग्रामपंचायत डो-हाळे व ग्रामपंचायत निमगांव (को) यांचा समावेश घेवून योजना पुन्हा नव्याने तयार करणेत येवून शासनास सादर करता येईल व पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल असे कळविलेले आहे.

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी नमुद केलेप्रमाणे उपरोक्त योजनेत संस्थानकरीता निळवंडे धरणात १४.४० द.ल.घ.मि.पाणी आरक्षणाचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर पाणी आरक्षणात शिर्डी नगरपंचायत,शिर्डी, ग्रामपंचायत डो-हाळे व ग्रामपंचायत निमगांव (को) यांच्यासाठी आवश्यक पाणी मागणीचा समावेश केलेला नाही. तसेच यातील शिर्डी शहर नागरी योजने अंतर्गत तर ग्रामपंचायत डो-हाळे व ग्रामपंचायत निमगांव (को) ग्रामीण योजने अंतर्गत येतात. त्यामुळे सदर ग्रामपंचायतीचा समावेश करणेसाठी जिल्हा परिषदेचा ठराव होणे आवश्यक आहे. तसेच सदरचे योजनेत शिर्डी नगरपंचायत,शिर्डी, ग्रामपंचायत डो-हाळे व ग्रामपंचायत निमगांव (को) यांचा समावेश केल्यास खर्चात वाढ अपेक्षित आहे व योजनेचे सर्वेक्षण करुन अंदाजपत्रके तयार करणेकामी रु.७० लक्ष किमतीची निविदा निश्चित करण्यात आलेली आहे. याकामी संस्थानने भरलेली रु.१० लक्ष इतकी रक्कम अदा करणेत आलेली असून, त्यांनी मागणी केलेली उर्वरीत ६० लक्ष रकमेचा निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे जमा करावयाचा झाल्यास मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सविनय सादर.

निर्णय क्र.८३ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की,** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी **निळवंडे धरणावरुन संस्थानला पाणी आणणेकामी दररोज किती तास पाणी देऊ केलेले आहेत व किती तास चालल्यास संस्थानची आवश्कता भागणार आहे. तसेच काही तास उरत असतील तर प्रस्तावित गावांना पाणी देता येईल किंवा कसे याबाबतचा तौलानिक अभ्यास करुन, सविस्तर प्रस्ताव सभेसमोर फेरसादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

विषय नं.०९ **श्री साईबाबा संस्थान शिर्डी करीता पाणी पुरवठा करणेसाठी निळवंडे धरणातून थेट पाईपलाईन प्रस्तावित योजनेबाबत.**

प्रस्ताव- (अ) संस्थानची सध्याची पाण्याची वाढती गरज व सद्यस्थितीतील पाण्याची टंचाई लक्षात घेता, संस्थानकरीता वाढीव पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत राबविणेबाबत संस्थानचे मा. व्यवस्थापन समितीचे दि.१३/०२/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.०४ अन्वये ठरलेले आहे. त्यानुसार श्री साईबाबा संस्थान, शिर्डीकरीता पाणी पुरवठा करणेसाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन प्रस्तावित योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करणे इ. कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी

शासनाकडे सादर केलेल्या सदरहू योजनेत शिर्डी संस्थान तसेच सभोतालची २ गांवे कनकुरी व पिंपळवाडी यांचा समावेश आहे. या योजनेची एकुण किंमत रु.२१५.९७ कोटी असून, त्यापैकी योजनेतील २ गावांसाठी किंमत रु.१९.०४ कोटी इतकी येते. त्यामुळे एकुण योजनेच्या किमतीपैकी शिर्डी संस्थानसाठी रु.२१५.९७ – रु.१९.०४ = रु.१९६.९३ कोटी इतकी किंमत येते. सदर योजनेत संस्थानसाठी रु.१९६.९३ कोटी इतका हिस्सा येतो.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सादर केलेल्या सदर योजनेसाठी निळवंडे धरण हा उद्भव प्रस्तावित करण्यात आलेला आहे. निळवंडे धरणांतून पाणी आरक्षणास पाटबंधारे खात्याची तत्वत: मान्यता आहे. पाटबंधारे खात्याच्या दि.१०/०४/२०१३ च्या पत्रान्वये रु.१८३.९३ कोटी हिस्सा शिर्डी संस्थानने उचलावा, असे कळविण्यात आलेले आहे. सदर अंशदानाच्या रकमेचा समावेश योजनेच्या अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात आलेला नाही.

वरील नमुद केलेप्रमाणे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संगमनेर यांनी कळविल्यानुसार प्रस्तुतची योजना ही शिर्डी संस्थानकडुन पूर्ण ठेव पध्दतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत राबववयाची झाल्यास कनकुरी व पिंपळवाडी या दोन गावांसाठीची किंमत वगळता संस्थानसाठी रु.१९६.९३ कोटी मात्र इतका हिस्सा येतो. तसेच लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर यांनी कळविल्यानुसार प्रकल्प खर्चाचा प्रमाणशिर वाटा रु.१८३.९३ कोटी खर्च संस्थानने उचलणे अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे योजनेची किंमत रु.१९६.९३ कोटी व पाणी आरक्षणासाठी प्रकल्प खर्चाचा प्रमाणशिर वाटा रु.१८३.९३ कोटी याप्रमाणे एकुण रु.३८०.८६ कोटी मात्र इतका निधी संस्थानकडुन उपलब्ध करणेबाबत **तसेच,**

ब) मा.ना.राधाकृष्ण ए.विखे पाटील, तत्कालिन मा.मंत्री कृषी व पणन महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांनी, पाणी पुरवठा योजनेबाबत मा.श्री अनिल कवडे, सदस्य श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तथा जिल्हाधिकारी,अहमदनगर यांना अग्रेषित केलेले दि.२५/०६/२०१४ रोजीचे पत्राची प्रत इकडील कार्यालयास प्राप्त झालेली होती. उपरोक्त पत्रात तत्कालिन मा.मंत्री महोदय यांनी कळविले होते की, शिर्डी करीता पाणी पुरवठा करणेसाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन योजना प्रस्तावित केलेली आहे. सदर योजना संस्थानमार्फत ठेव स्वरुपात रक्कम जमा करुन राबविण्यात यावी असे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने सुचविले आहे.

तथापि केवळ संस्थानकरीताच स्वतंत्र व थेट पाईपलाईन करणे योग्य होणार नाही. तसेच योजनेचा संपुर्ण खर्च सुध्दा संस्थानमार्फत करणे उचित वाटत नाही. याच योजनेत शिर्डी शहरासह नजिकच्या केलवड, खडकेवाके, को-हाळे, डो-हाळे, वाळकी, नांदुर्खी बु., नांदुर्खी खु., कनकुरी व पिंपळवाडी या कायमस्वरुपी टंचाईग्रस्त गावांचा समावेश केल्यास केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनेसाठी निधी उपलब्ध होऊ शकेल. त्यामुळे संस्थानवरील खर्चाचा बोजा कमी होईल.

उपरोक्त गावांकरीता यापुर्वीच स्वतंत्र साठवण तलाव, उंच जलकुंभ व वितरण व्यवस्था तयार करण्यात आलेल्या आहेत. फक्त मुख्य पाईपलाईन नव्याने करुन त्याव्दारे अस्तित्वातील साठवण तलावात पाणी सोडण्याची व्यवस्था करावी लागणार आहे.

या योजनेमुळे शिर्डी शहरासह आजुबाजुच्या गावांना पाण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने संस्थान व शिर्डी शहराच्या पाणी पुरवठा योजनेवर ताण येणार नाही व कायस्वरुपी टंचाईग्रस्त गावांना पिण्याचे पाण्याची शाश्वत सुविधा उपलब्ध होवू शकणार आहे. त्यामुळे स्थानिक नागरीकांबरोबरच साई भक्तांनाही याचा लाभ होणार असल्याने, सदरच्या योजनेसाठी श्री साईबाबा संस्थानने पुढाकार घ्यावा. योजनेसाठी स्वतंत्र प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करण्याबाबत व आवश्यक लोकवर्गणी संस्थानर्मांफत उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करावी अशी विनंती करण्यात आलेली होती.

सदरहू प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०७/२०१४ रोजीचे सभेत सादर करण्यात आलेला होता. यावर खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

*"श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीकरीता पाणी पुरवठा करण्यासाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन आणणेच्या योजनेमुळे शिर्डी शहरासह आजुबाजुच्या गावांना पाण्याची सुविधा उपलब्ध होणार असून त्यामुळे संस्थान आणि शिर्डी शहराच्या पाणी पुरवठा योजनेवर ताण येणार नाही व कायसवरुपी टंचाईग्रस्त गावांना पिण्याचे पाण्याची शाश्वत सुविधा उपलब्ध झाल्याने स्थानिक नागरीकांबरोबरच साईभक्तांनाही याचा लाभ होणार आहे. तसेच श्री साईबाबा शताब्दी महोत्सवापुर्वी याबाबत कार्यवाही होणे गरजेचे असल्याने सदरच्या योजनेसाठी श्री साईबाबा संस्थानने पुढाकार घेवून स्वतंत्र प्रकल्प सल्लागाराची नेमणूक व आवश्यक लोकवर्गणी उपलब्ध करुन देणे समितीला आवश्यक वाटते.*

*यावर सविस्तर चर्चा होवून, प्रस्तावित बाब धोरणात्मक व मेजर फायनान्शीयल असल्यामुळे समिती त्यावर निर्णय घेऊ शकत नाही. यासाठी, सदरहू योजना का आवश्यक आहे, याबाबतची सर्व कारणे नमूद करुन प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावा काय? अशा मार्गदर्शनपर सुचना व आदेश मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत यावा व मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी, असे ठरले."*

उपरोक्त विषयास अनुसरुन प्रस्तुत प्रकरणी संस्थानचे विधी विभागार्मांफत ॲड. आर.एन.धोर्डे यांचेमार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ येथे सिव्हील ॲप्लिकेशन नं. १२३४६ दाखल करण्यात आलेले होते.

प्रस्तुत सिव्हील ॲप्लिकेशनमध्ये मे.कोर्टाने दि.२२/१२/२०१४ रोजी तारीख नेमलेली होती. उपरोक्त सिव्हील अर्जामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात दि.२२/१२/२०१४ रोजी आदेश दिलेला आहे. सदर आदेशाची प्रत इंटरनेटवर दि. ०३/०२/२०१५ रोजी प्राप्त झालेली होती. मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे दि.२२/१२/२०१४ रोजीचे आदेशाची प्रत सोबत जोडलेली आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात याबाबतचा अंतिम निर्णय प्रलंबित असून, मा.कोर्टाने दि.२२/१२/२०१४ रोजी सदर योजनेचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करणेबाबत दिलेल्या आदेशान्वये मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे जा.क्रं.एसएसएस/वशी/पाणीपुरवठा/४०२६/२०१५, दि.१९/१०/२०१५ अन्वये प्रशासकिय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

याबाबत दि.१९/१०/२०१५ रोजीचे प्रशासकिय मान्यतेसाठी सादर करणेत आलेल्या प्रस्तावास अनुसरुन मा.कक्ष अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांनी मा.कक्षअधिकारी नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अग्रेषित पत्र क्रमांक-संकिर्ण-२०१५/प्र.क्र.३३७/पापु-२२, दि.०९/१२/२०१५ ची प्रत माहितीस्तव इकडील कार्यालयास दि.३१/१२/२०१५ रोजी प्राप्त झालेली आहे. सदरचे पत्रात महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या, महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानास, शासन निर्णय, दि.२३/०१/२०१४ अन्वये, दि.३१/०३/२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून यानंतर या अभियानांतर्गत कोणतेही नविन प्रस्ताव मंजुर करण्यात येणार नसल्याचा व पुढील कामे नगर विकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या JNNURM व नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत घेण्याबाबतचा निर्णय, शासन निर्णय, दि.२३/०१/२०१४ अन्वये घेण्यात आला आहे. तसेच, शासन निर्णय, नगर विकास विभाग, दि.२१/०८/२०१४ अन्वये राज्यातील सर्व शहरामध्ये नागरी, पायाभुत व सामाजिक सुविधा निर्माण करणे व त्यांच्या बळकटीकरणांसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत पाणी पुरवठा, मलनि:सारण, घनकचरा व्यवस्थापन या योजनांचाही समावेश करण्यात आला आहे व त्या अनुषंगाने सदर प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात याबाबतचा अंतिम निर्णय प्रलंबित आहे. सदर योजनेतून होणारा पाणी वापर हा साईभक्तांसाठी होणार आहे. व्यावसायिक नाही. त्यामुळे पाणी आरक्षणाची रक्कम रु. १८४ कोटी शासनाकडुन माफ होणेबाबत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता. सदरचे प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीचे अनुसरुन वाढीव श्री साईबाबा संस्थान शिर्डी साठी निळवंडे जलाशयातुन १४.६५ दलघमी. पाणी आरक्षणापोटी भाग भांडवल रक्कम रु.१८४ कोटी शासनाकडुन माफ होणेसाठी मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय महाराष्ट्र शासन मुंबई यांचेकडे जा.नं.एसएसएस/ वशी/ पाणीपुरवठा/ ५६९१/ २०१६, दि.१४/०१/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

तरी सदरचा प्रस्ताव माहितीस्तव सादर.

निर्णय क्र.८४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान शिर्डी साठी निळवंडे जलाशयातुन १४.६५ दलघमी. पाणी आरक्षणापोटी भाग भांडवल रक्कम रु.१८४ कोटी शासनाकडुन माफ होणेसाठी मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय महाराष्ट्र शासन मुंबई यांचेकडे जा.नं.एसएसएस/ वशी/ पाणीपुरवठा/ ५६९१/ २०१६, दि.१४/०१/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

विषय नं.१० **पाणी टंचाई कालावधीत संस्थान मान्य दराने मंदिर परिसर, श्री साईप्रसादालय, श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ रुग्णालय व साईनगर स्टाफ क्वॉर्टर इ.करीता भाडोत्री टँकर धारकांकडून दि.०६/०१/२०१६ ते दि.१४/०१/२०१६ या कालावधीत पाणी पुरवठा उपलब्ध करुन घेणेस व त्यासाठी आलेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियम कलम 21 मधील पोट-कलम (1) च्या खंड (क) अन्वये " मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे " अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मौजे कनकुरी येथील ३३२ एम.एल. क्षमतेच्या साठवण तलावास ५०० मायक्रॉन जाडीचे HDPE Geomembrane Sheet टाकणेचे कामास सुरुवात झालेली आहे. नाताळ उत्सव कालावधीत श्री क्षेत्र शिर्डी येथे श्रीसाईचे दर्शनासाठी मोठया प्रमाणावर भाविकांची गर्दी झालेली होती. दरम्यानचे कालावधीत पाटबंधारे विभागाकडुन पाण्याचे रोटेशन न आल्याने संस्थानचे साठवण तलावातुन संस्थान परिसरास पाणी पुरवठा करणेसाठी मोठया प्रमाणावर अडचणी निर्माण झाल्या. साईभक्तांना पाणी उपलब्ध करुन देणेसाठी पाणी वितरण व्यवस्थेवर मोठया प्रमाणावर ताण पडला.

साईभक्तांसाठी तातडीने पाणी उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने पाणी पुरवठा विभागाकडुन भाडोत्री टँकर लावणेस, त्यासाठी येणारे अंदाजे रु.९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी व भाडोत्री टँकरधारकांचे दर निश्चित करणेचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांना मिळणेसाठी मा.त्रिसदस्यीय समितीचे मान्यतेस प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.२८/१२/२०१५ रोजीचे सभेत सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली होती.

कोपरगांव येथील श्री वाल्मिकराव कातकडे यांनी संस्थानकरीता पाणी वाहतुक करणेसाठी २ ट्रक टॅकर व श्री.राजेंद्र जगताप, शिर्डी यांचेकडुन १ ट्रॅक्टर टॅकर विनामुल्य उपलब्ध झालेले होते. सदर टॅंकरकरीता डिझेलची व्यवस्था संस्थानचे वाहन विभागाकडुन उपलब्ध करणेत येवून त्याव्दारे पाणी वाहतुक सुरु करण्यात आली. सदरची व्यवस्था अपुरी पडल्याने भाडोत्री टॅकरव्दारे तातडीने पाणी उपलब्ध करुन घेणे आवश्यक असल्याने मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.२८/१२/२०१५ रोजीचे निर्णयास अनुसरुन तसेच दि. २९/१२/२०१५ रोजीचे टिपणीवरील सुरुवातीस ३ लाख रुपये खर्च करणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी रक्कम मंजुर करुन कोटेशन मागविणेचे कार्यवाहीस दिलेल्या मान्यतेस अनुसरुन संस्थान परिसरास भाडोत्री टॅकरव्दारे पाणी पुरवठा करुन घेणेसाठी तातडीने कार्यवाही करुन दरपत्रके मागविण्यात आलेली होती.

**प्रस्ताव:-** दि.२९/१२/२०१५ रोजी साठवण तलावातील पाणी पातळी कमी झाल्यामुळे संस्थानचे नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम) व साईआश्रम भक्तनिवास या इमारतीकरीता तातडीने पाणी पुरवठा सुरुळीत करणे गरजेचे असल्याने टॅंकरधारकांना जे निम्नतम दर असतील त्याप्रमाणे बीले आदा करणेत येईल असे ठरवून तातडीने दि.२९/१२/२०१५ पासून संस्थानचे नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम) व साईआश्रम भक्तनिवास या इमारतीकरीता व दि.०४/०१/२०१६ पासून संस्थान साठवण तलाव कोरडे पडल्याने इतरही ठिकाणी भाडोत्री टॅकरव्दारे पाणी पुरवठा सुरु करणेत आला.

याकामी रु. ०.१३ प्रती लिटर याप्रमाणे निम्नतर दर प्राप्त झालेने भाडोत्री टॅंकरधारकांकडुन रु.०.१३ प्रती लिटर या दराने संस्थानकरीता पाणी उपलब्ध करुन घेणेस तसेच इतर जे टॅकरधारक रु.०.१३ प्रती लिटर या दराने पाणी पुरवठा करणेस तयार असतील त्यांचेकडुन वरील मान्य दराने संस्थानकरीता पाणी पुरवठा उपलब्ध करुन घेणेस इकडील विभागाकडील दि.०२/०१/२०१६ रोजीचे टिपणीन्वये मान्यता घेण्यात आलेली होती.

त्यानुसार दि.०६/०१/२०१६ ते दि.१४/०१/२०१६ या कालावधीत पाणी पुरवठा विभागाकडुन मंदिर परिसर, श्री साईप्रसादालय, श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ रुग्णालय व साईनगर स्टाफ क्वॉर्टर इ. करीता मोफत व भाडोत्री टॅकरव्दारे खालीलप्रमाणे पाणी पुरवठा करुन घेणेत आलेला आहे. सदरचे ठिकाणांकरीता भाडोत्री टॅकरव्दारे पाणी पुरवठा करणेसाठी झालेला खर्च तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कालावधी | ठिकाण | टॅकर व्यवस्थेव्दारे उपलब्ध करुन घेणेत आलेले एकुण पाणी (लिटर) | | दर रुपये प्रलिटर. | विकत घेण्यात आलेले पाणी एकुण खर्च रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मोफत | विकत | | |
| ०१ | दि.०६.०१.२०१६ ते दि.१४.०१.२०१६ | मंदिर परिसर | **१२,००० लिटर.** | २३,५७,५०० लिटर | ०.१३ | ३,०६,४७५/- |
| ०२ | दि.०६.०१.२०१६ ते दि.१४.०१.२०१६ | श्री साईप्रसादालय | **१,३३,५०० लिटर** | २२,९९,५०० लिटर | ०.१३ | २,९८,९३५/- |
| ०३ | दि.०६.०१.२०१६ ते दि.१४.०१.२०१६ | श्री साईबाबा हॉस्पिटल | ० | १०,२०,५०० लिटर | ०.१३ | १,३२,६६५/- |
| ०४ | दि.०६.०१.२०१६ ते दि.१४.०१.२०१६ | श्री साईनाथ रुग्णालय | **२०,००० लिटर** | १०,७७,००० लिटर | ०.१३ | १,४०,०१०/- |
| ०५ | दि.०६.०१.२०१६ ते दि.१४.०१.२०१६ | साईनगर स्टाफ क्वॉर्टर | ० | ५,९३,००० लिटर | ०.१३ | ७७,०९०/- |
| | | **एकुण-** | **१,६५,५०० लि.** | **७३,४७,५०० लि.** | **०.१३** | **९,५५,१७५/-** |

मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.२८/१२/२०१५ रोजीचे सभेत भाडोत्री टॅंकर लावणेस व भाडोत्री टॅकरधारकांचे दर निश्चित करणेचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांना मिळणेसाठी मान्यता देण्यात आलेली आहे. याकामी रु. ०.१३ प्रती लिटर याप्रमाणे निम्नतर दर प्राप्त झालेने भाडोत्री टॅंकरधारकांकडुन रु.०.१३ प्रती लिटर या दराने संस्थानकरीता पाणी उपलब्ध करुन घेणेस तसेच इतर जे टॅकरधारक रु.०.१३ प्रती लिटर या दराने पाणी पुरवठा करणेस तयार असतील त्यांचेकडुन वरील मान्य दराने संस्थानकरीता पाणी पुरवठा उपलब्ध करुन घेणेत आलेला आहे.

दि.०६/०१/२०१६ ते दि.१४/०१/२०१६ या कालावधीत मंदिर परिसर, श्री साईप्रसादालय, श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ रुग्णालय व साईनगर स्टाफ क्वॉर्टर इ. करीता १,६५,५०० लिटर पाणी मोफत टॅकरधारकांकडुन व ७३,४७,५०० लिटर पाणी भाडोत्री टॅंकरधारकांकडुन उपलब्ध करुन घेणेत आलेले आहे. रु. ०.१३ प्रती लिटर याप्रमाणे भाडोत्री टॅकरव्दारे पाणी पुरवठा करुन घेणेसाठी एकुण रु.९,५५,१७५/- मात्र खर्च आलेला आहे. तरी उपरोक्त खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** आपणास जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडुन पाण्याचे रोटेशन उशिरा सुरु झाल्याने व संस्थान साठवण तलावास कागद टाकणेचे काम सुरु असल्याने भाडोत्री टॅकरव्दारे पाणी पुरवठा करुन घ्यावा लागलेला आहे. तरी दि.०६/०१/२०१६ ते दि.१४/०१/२०१६ या कालावधीत मंदिर परिसर, श्री साईप्रसादालय, श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ रुग्णालय व साईनगर स्टाफ क्वॉर्टर इ. करीता संस्थान मान्य दराप्रमाणे पाणी पुरवठा करुन घेणेस व त्यासाठी झालेल्या रु. ९,५५,१७५/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता व भाडोत्री टॅकरव्दारे पाणी पुरवठा करुन घेणेसाठी केलेल्या कार्यवाहीस मान्यता मिळावी ही विनंती.

निर्णय क्र.८५ यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०६/०१/२०१६ ते दि.१४/०१/२०१६ या कालावधीत मंदिर परिसर, श्री साईप्रसादालय, श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ रुग्णालय व साईनगर स्टाफ क्वॉर्टर इ. करीता १,६५,५०० लिटर पाणी मोफत टँकरधारकांकडुन व ७३,४७,५०० लिटर पाणी भाडोत्री टँकरधारकांकडुन रु. ०.१३ प्रती लिटर याप्रमाणे उपलब्ध करुन घेणेत आलेले आहे. या भाडोत्री टँकरव्दारे पाणी पुरवठा करुन घेणेसाठी एकुण रु.९,५५,१७५/- मात्र खर्च आलेला आहे, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.११ श्री साईबाबा ज्युनियर कॉलेजमधील मुलींसाठी बससेवा सुरु करणेबाबत.**

प्रस्ताव- मा.श्री राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्ष नेता, यांचेकडे शिर्डी शहर आणि परिसरातील स्थानिक ग्रामस्थांनी/ कर्मचा-यांनी विविध प्रश्नांबाबत मागण्या केलेल्या आहेत. पैकी, अ.नं. ०२ ने श्री साईबाबा ज्युनिअर कॉलेज मधिल मुलींसाठी बससेवा सुरु करणे बाबत मागणी केलेली आहे.

त्यानुसार, श्री साईबाबा ज्युनिअर कॉलेज, शिर्डी यांचेकडून ज्युनिअर कॉलेजमध्ये सन-२०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये इयत्ता ११ वी. व १२ वी. मध्ये शिक्षण घेत असलेल्या मुलींची माहिती मागविली असता सध्या ज्युनिअर कॉलेज मध्ये शिर्डी व शिर्डी परिसरातील साधारण १५ कि.मी. अंतरामधील मुली शिक्षण घेत असुन त्यांची संख्या एकुण ७१२ आहेत. त्याबाबतचा तक्ता सोबत जोडला आहे. सदर तक्त्यातील ठळक माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | गांवाचे नांव | मुलींची संख्या | अंदाजे अंतर | आवश्यक बस संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | शिर्डी (स्थानिक) | २७८ | ०३ कि.मी. | ०५ बसेस |
| ०२ | नांदुर्खी खु. व बु. | ५६ | ०६ कि.मी. | ०१ बस |
| ०३ | कनकुरी व डो-हाळे, वेस, को-हाळे व मनेवाडी | ८१ | १० कि.मी. | २ बसेस |
| ०४ | साकुरी, राहाता, पिंपळस, अस्तगांव | ४२ | ०७ कि.मी. | ०१ बस |
| ०५ | पिंपळवाडी, बिरेगांव, बन, न.पा.वाडी | ६९ | ०६ कि.मी. | ०१ बस |
| ०६ | रुई, (शिंगवे, पुणतांबा, कोहकी) | ३१ | ०५ कि.मी. | ०१ बस |
| ०७ | सावळीविहीर खु. व बु. | ६३ | ०४ कि.मी. | ०१ बस |
| ०८ | निघोज व निमगांव, निमागांववाडी, निमशेवाडी | ९२ | ०२ कि.मी. | ०२ बसेस |
| | **एकुण संख्या** | **७१२** | **४३ कि.मी.** | **१४ बसेस** |

उपरोक्त शिर्डी ग्रामस्थ/ कर्मचा-यांच्या मागणीनुसार, ज्युनिअर कॉलेजच्या मुलींकरीता स्कुल बसेस चालु करावयाचे झाल्यास -

१) सदरचे ज्युनिअर कॉलेज सकाळी १०.०० ते ०५.०० या वेळेत असल्यामुळे सर्व मुलींना एकाच वेळेस शाळे मध्ये घेवुन यावे लागेल व परत घरी सोडवे लागेल. त्याकामी उपरोक्त मुलींची संख्या विचारात घेता शिर्डी मधील मुली बसचा वापर करणार नाही असे गृहीत धरुन नवीन ०९ बसेस खरेदी करणे आवश्यक आहे. सदर कामी प्रति बस अंदाजे रु.२०,००,०००/- प्रमाणे एकुण बसेस करीता रु.१,८०,००,०००/- इतका खर्च येईल.

२) प्रति बसकरीता ०१ वाहन चालक व ०१ मतदनीस या प्रमाणे एकुण ०९ बसेस करीता ०९ वाहन चालक व ०९ मदतनीस कर्मचारी भरती करावी लागतील या कामी ०१ वाहन चालकाचे प्रति महा वेतन रु.२०,०००/- व मदनीस कर्मचारी प्रतिमहा वेतन रु.१५,०००/- प्रमाणे ०९ बसेस करीता प्रतिमहा रु.३,१५,०००/- प्रमाणे रु.३७,८०,०००/- इतका वार्षिक वेतन खर्च अपेक्षीत आहे.

३) ०९ बसेस करीता प्रति दिन अंदाजे १६० कि.मी. अंतराकरीता रु.२४००/- प्रमाणे वार्षिक (२९० दिवसाकरीता) अंदाजे रु.६,९६,०००/- मात्र इधन खर्च अपेक्षीत आहे.

४) ०९ बसेसचे दुरुस्ती व देखभाल खर्च- प्रति बस रु.६०,०००/- प्रमाणे ०९ बसेस करीता रु.५,४०,०००/- खर्च अपेक्षीत आहे.

उपरोक्त अ.नं.०१ ते ०४ करीता खालील प्रमाणे एकुण खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशिल | भांडवली खर्च (रु.) | अंदाजे वार्षिक खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | नवीन ०९ बसेस खरेदी खर्च | १,८०,००,०००/- | ३६,००,०००/- (२०% घसारा) |
| ०२ | कर्मचारी वेतन खर्च (वार्षिक) | --- | ३७,८०,०००/- |
| ०३ | इंधन खर्च (वार्षिक) | --- | ६,९६,०००/- |
| ०४ | दुरुस्ती व देखभाल खर्च (वार्षिक) | --- | ५,४०,०००/- |
| | **एकुण अंदाजे खर्च** | **१,८०,००,०००/-** | **८६,१६,०००/-** |

सद्यस्थितीमध्ये श्री साईबाबा ज्यु. कॉलेज, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत साईभक्तांसाठी बांधकाम करण्यात आलेल्या साईआश्रम भाग-०२ मध्ये चालु आहे. सदर कॉलेज शिर्डी पासुन निमगांव परिसरात येत असुन कॉलेजला येणा-या मुली काही स्वतःच्या वाहनांनी व काही पालकांच्या सोबत कॉलेजला येतात.

पैकी उपरोक्त एकुण ७१२ मुलींपैकी किती मुली सदर बससुविधेचा उपभोग घेतील हे निश्चितपणे सांगता येत नाही तथापि, शिर्डीतील २७८ मुली वगळता उर्वरीत ४३४ मुलींनी स्कुलबस सुविधेचा फायदा घेतल्यास त्यांचेकडून प्रति मुलीसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या प्रचलित तिकीट दराने स्कुलबस फी आकारता येईल. त्यानुसार, एकुण सरासरी अंदाजे रु.१८,८९,६००/- इतकी स्कुलबस फी वसुल होईल. वार्षिक खर्च रु.८६,१६,०००/- मात्र वजा जाता रु.६७,२६,४००/- मात्र ऐवढा आर्थिक भार संस्थानला सोसावा लागेल.

अ) श्री साईबाबा ज्यु. कॉलेज करीता मुलींना ने-आण करणे कामी स्कुलबस सुविधा द्यावयाची झाल्यास वाहन विभागाकडे बसेस उपलब्ध नाही त्यामुळे सदर कामी नवीन १४ स्कुल बसेस खरेदी कराव्या लागतील.

शिर्डी गावातील २७८ मुली वगळता ०९ स्कुल बसेस खरेदी कराव्या लागतील. त्या करीता अंदाजे रु.१,८०,००,०००/- पर्यंत खर्च येईल. सदरचा प्रस्ताव धारणात्मक असल्याने मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करुन त्यास मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपिठ, औरंगाबाद यांचे मान्यता घ्यावी लागेल.

**किंवा**

ब) सध्या प्रायोगिकतत्वावर श्री साईबाबा ज्यु. कॉलेजच्या मुलींना ने-आण करणे कामी स्कुलबस सुविधा पुरविण्याचे काम ट्रॅव्हलर कॉन्ट्रॅक्टर मार्फत आऊट सोर्सिंग पध्दतीने (भाडोत्री बसेस) ई-निविदा काढुन देता येईल. सदर कामी प्रति दिनी (५२ सिट) प्रती बस रु.६,०००/- प्रमाणे शिर्डी व्यतिरीक्त बाहेरगांवावरुन येणा-या मुलींसाठी ०९ बसेससाठी २३० दिवसांसाठी अंदाजे एकुण १,२४,२०,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

**सद्यस्थिती-** सध्या वाहन विभागाकडे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल करीता १२ स्कुलबसेस असुन दोन शिफ्टमध्ये वापरात आहेत.

**मागणी-** तरी संस्थानचे श्रीसाईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थीनींकरीता नवीन ०९ स्कुल बसेस खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.८६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, ज्या-ज्या गावांमध्ये श्री साईबाबा ज्युनियर कॉलेजमधील मुलींसाठी बससेवा सुरु करावयाचे प्रस्तावीत आहे. त्या गावांमध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची बस सुविधा उपलब्ध नसलेबाबत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून लेखी माहिती घ्यावी व अशी बससेवा उपलब्ध नसलेने संस्थानची बससेवा सुरु करणेबाबत त्या ठिकाणच्या ग्रामपंचायतींचा ठराव घेण्यात यावा व त्यासह सविस्तर प्रस्ताव पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होणेपूर्वी सभेपुढे फेरसादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

विषय नं.१२ **संस्थान ११ वाहनांच्या फुटलेल्या काचा बदली करणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थानचे सुमारे १२ स्कूल बसेस, ११ प्रवासी बसेस, १३ मालवाहतूक, वाहनांचा शालेय विद्यार्थीची ने-आण करणे, कामी साईभक्तांची नगरसूल रेल्वेस्टेशन, साईनगर रेल्वेस्टेशन, बसस्टॅंड, भक्तनिवासस्थान, प्रसादालय, मंदिर इ. ठिकाणहून ने-आण करणे, संस्थानचे वेगवेगळया विभागाची दैनंदिन मालवाहतूक करणे इ. कामे करण्यासाठी सतत कार्यरत आहेत.

त्यापैकी खालील वाहनांच्या काचा रस्त्यातील खडयामुळे व्हायब्रेशन होऊन, समोरील वाहनाचे टायर खालून दगड उडाल्यामुळे फुटलेल्या आहेत. सदर वाहनांची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे-

| अ.नं. | वाहन क्रमांक | वाहन प्रकार |
|---|---|---|
| 1 | MH-17-V-1702 | टाटा सुमो |
| 2 | MH-17-T-3101 | स्कुल बस |
| 3 | MH-17-T- 8503 | स्कुल बस |
| 4 | MH-17-T-9501 | स्कुल बस |
| 5 | MH-17-T-3301 | भक्तनिवास बस |
| 6 | MH-17-T-3302 | भक्तनिवास बस |
| 7 | MH-17-T-8505 | भक्तनिवास बस |
| 8 | MH-17-K-9370 | भक्तनिवास बस |
| 9 | MH-17-T-7109 | नगरसुलबस |
| 10 | MH-17-T-7111 | मालवाहतूक गाडी |
| 11 | MH-17-AG-2420 | रुग्णवाहीका |

साईभक्त, शालेय विदयार्थी यांना ईजा होवू नये याकरीता सुरक्षीततेचा उपाय म्हणून प्रस्तुत वाहनांच्या काचा त्वरीत बदलने आवश्यक आहे.

वर नमुद केले प्रमाणे वाहनांचे काचा दुरुस्ती कामी येणा-या खर्चाची रक्कम विमा कंपनीकडे क्लेमसाठी सादर करता येईल.

सदर कामी नाशिक, अहमदनगर, पुणे, येथील वृत्तपत्रात शासकीय दराने निविदा जाहिरात प्रसिध्द करुन काचा बदली करण्याचे काम करणा-या बॉडी बिल्डर्स / कंपनी यांना निविदा फॉर्मव्दारे काचेच्या कामाचे मोजमाप व इतर तांत्रीक तपशिल कळवून विहीत पध्दतीने कोटेशन प्रक्रीया राबवून निम्नत्तम पुरवठादारामार्फत उपरोक्त वाहनांचे काचा दुरुस्तीचे काम करुन घेता येईल. सदर कामी अंदाजे रु.२,९०,०००/- (अक्षरी रक्कम रु. दोन लाख नव्वद हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.८७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या प्रस्तावित ११ वाहनांच्या फुटलेल्या काचा विहीत पध्दतीने कोटेशन मागवून बदलवून घेण्यास व याकामी येणा-या अंदाजे रु.२,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** — (कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

विषय नं.१३ **संस्थान वाहनांसाठी तसेच विद्युत जनित्रांना लागणारे इंधन खरेदी करणे बाबत.**

प्रस्ताव- अ) सध्या वाहन विभागाकडे विविध विभागाचे दैनंदिन कामकाजाकरीता कार्यालयीन-11, रुग्णवाहीका-13, मालवाहतुक-25, बसेस-23 व टुव्हिलर-03 अशा एकुण 75 वाहने वापरात आहेत.

उपरोक्त प्रमाणे वाहन विभागाकडे सद्य परिस्थीतीत असलेल्या वाहनांसाठी वार्षिक सर्वसाधारणपणे 1,30,000 (एक लाख तिस हजार) लिटर इंधनची (डिझेल / पेट्रोल) आवश्यकता असते.

ब) तसेच विद्युत विभागामार्फत (01) मंदिर परीसर (02) साईबाबा भक्तनिवासस्थान (03) रुग्णालय+साईनगर (04) साई धर्मशाळा (05) नवीन स्टाफ क्वार्टर (06) श्री साई प्रसादालय (07) साईआश्रम भाग-01 व (08) साईआश्रम भाग-02 या आठ वेगवेगळया ठिकाणी विद्युत पुरविण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून विज कनेक्शन जोडून घेण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास भारनियमन काळात पर्यायी विजपुरवठ्या साठी वरील ठिकाणी विद्युत जनित्रांची सोय करण्यात आलेली आहे. या जनित्रांसाठी मागील आर्थिक वर्षात आतापर्यंत अंदाजे 1,00,000 (एक लाख) लिटर इतके इंधन खर्च झालेले आहेत.

वाहनांकरीता खरेदी करण्यात येणारे इंधन ही बाब पुर्णपणे वाहनाचे वापराचे प्रमाणावर तसेच विद्युत जनित्रांला खरेदी करावे लागणारे इंधन ही बाब भारनियमनावर अवलंबुन असल्याने इंधन खरेदी करता होणारा खर्च कमी जास्त प्रमाणात लागतो.

दि.27/04/2013 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.406 नुसार, संस्थान वाहनासाठी तसेच विद्युत जनीत्रांना लागणारे इंधन खरेदी कामी, मे. साईसिध्दी पेट्रोलियम, शिर्डी या पेट्रोल पंपधारकाकडून संस्थानने इंधन खरेदी केल्यास मे. साईसिध्दी पेट्रोलियम, शिर्डी हे संस्थानला प्रती लिटर 30 पैसे प्रमाणे सवलत देण्यास व एक महिन्यापर्यंत क्रेडीटवर इंधनाचा पुरवठा करण्यास तयार आहेत, सदरचा पंप संस्थानचे वाहन विभागापासून कमी अंतरावर असल्याने तसेच मे. साईसिध्दी पेट्रोलियम, शिर्डी यांनी प्रती लिटर 30 पैसे प्रमाणे संस्थानला सवलत दिल्याने त्यांचेकडून यापुढे संस्थानचे विविध विभागांना लागणारे सर्व प्रकारचे इंधन घेणेस मान्यता देणेत आली. मा.आमदार श्री राधाकृष्ण विखे पाटील सहकारी ट्रक्स वाहतूक संस्था लि., प्रवरानगर संचलीत मे. इंडीयन ऑईल कार्पोरेशन लि., साकुरी व मे. श्री साई सर्व्हिस सेंटर, सावळीविहीर हे देखील संस्थानला प्रती लिटर 30 पैसे आणि एक महिन्यापर्यंत क्रेडीट देणेस तयार असतील तर याही पंपावरुन संस्थानचे विविध विभागांना लागणारे सर्व प्रकारचे इंधन आवश्यकतेनुसार खरेदी करणेत यावे, असे ठरले.

उपरोक्त निर्णयानुसार, मे. साईसिध्दी पेट्रोलियम, शिर्डी यांना इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/1268/2013, दि.13/06/2013 रोजीचे पत्राने संस्थानचे विविध विभागांना लागणारे डिझेल / पेट्रोलचा पुरवठा करणे कामी कार्यादेश देण्यात आलेला असुन मे. साईसिध्दी पेट्रोलियम, शिर्डी यांचे प्रमाणेच श्री साई सर्व्हिस सेंटर, सावळीविहीर व मा. आमदार श्री राधाकृष्ण विखे पाटील सहकारी ट्रक्स वाहतूक संस्था लि., प्रवरानगर संचलीत मे. इंडीयन ऑईल कार्पोरेशन लि., साकुरी यांना संस्थान करीता डिझेल / पेट्रोल खरेदी दर प्रति लिटर रु.0.30 पैसे सवलत व बिलास एक महिना क्रेडीटवर इंधन पुरवठा करणे बाबत विचारणा करण्यात आली होती. याबाबत त्यांनी तयारी दर्शविल्याने त्यांनाही इकडील जा.नं.एसएसएस/ वाहन/1960 व 1961, दि.09/07/2013 रोजीचे पत्राने कार्यादेश देण्यात आला होता. आजतागायत सदर तिनही पेट्रोलपंपावरुन संस्थान वाहने व विद्युत विभागाकडील विद्युत जनित्रांकरीता लागणारे इंधन प्रचलित दरात प्रति लिटर रु.0.30 पैसे सवलतीचे दराने खरेदी करण्यात येत आहे.

साई समर्थ पेट्रोलियम, इस्सार ऑईल लि. नगर-मनमाडरोड, निमगांव प्रोप्रा. श्री विजयराव पुंजाजी काळे यांनी दि.29/10/2015 रोजीचे पत्राने, मी एस्सार कंपनीच डिलर असुन माझा पेट्रोल व डिझेलचा आऊटलेट नगर-मनमाड हायवे निघोज या ठिकाणी असुन शिर्डी पासुन जवळ आहे. मी श्री साईबाबा संस्थानला रोजच्या गरजेनुसार आमच्या आऊटलेटवरुन डिझेल सप्लाय घेण्यात तयार असेल तर कंपनीकडून श्री साईबाबा संस्थानला प्रति लिटर ४० ते ५० पैसे डिस्काऊंट कंपनी देण्यास तयार आहे. कृपया मला डिझेल सप्लाय करण्याची परवानगी मिळावी, अशी विनंती केलेली आहे.

तरी संस्थान वाहनासाठी तसेच विद्युत जनीत्रांना लागणारे इंधन खरेदी कामी अहमदनगर-मनमाड या महामार्गावरील शिर्डी पासुन 05 कि.मी अंतरातील पेट्रोलपंपधारकांकडून नव्याने प्रचलित इंधन दरात प्रति लिटर सुट व इंधन बिलास एक महिना क्रेडीट मिळणे बाबत सुधारीत दरपत्रक घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.८८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान वाहनासाठी तसेच विद्युत जनीत्रांना लागणारे इंधन खरेदी कामी अहमदनगर-मनमाड या महामार्गावरील शिर्डी पासुन 05 कि.मी अंतरातील पेट्रोलपंपधारकांकडून नव्याने प्रचलित इंधन दरात प्रति लिटर सुट व इंधन बिलास एक महिना क्रेडीट मिळणे बाबत सुधारीत दरपत्रक घेणेस मान्यता देण्यात आली. सदरहू प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत पुर्वीची पध्दत चालू ठेवणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

विषय नं.१४ **२७ व्या रस्ता सुरक्षा अभियान २०१६ करीता दिलेल्या आर्थिक मदतीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम-२००४ मधील तरतुद-** भाग चार मध्ये १४ (घ) भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेण्याचे अधिकार असतील, असे नमुद आहे.

**प्रस्ताविक-** मा.उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपुर यांनी संदर्भिय पत्राने, रस्ता सुरक्षा अभियान दि.११/०१/२०१६ ते २५/०१/२०१६ ह्या कार्यकाळात राबविण्यात येणार आहे.

शिर्डी देवस्थानला राज्यातुन व परराज्यातुन दर्शनासाठी येणा-या भाविकांची संख्या जास्त असुन तसेच आपले कार्यक्षेत्रात साखर कारखाने आहे व त्यासाठी ऊस वाहतुक करणेसाठी ट्रॅक्टर, ट्रॉली व बैलगाडीचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. रस्ता सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन जनतेचे जनजागरण व्हावे ह्यासाठी शिर्डी व परिसरात सुरक्षेच्या संदर्भात फलक व ट्रॅक्टर, ट्रॉली व बैलगाडीना परावर्तक व रेडीयम लावण्याचे योजले आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी अपघातांना आळा बसण्यास बरीच मदत होऊ शकेल.

| अ.नं. | तपशिल | अंदाजे रक्कम |
|---|---|---|
| ०१ | रोड फलक ५० ३/४ फ्रेमसह<br>१० ६/४ फ्रेमसह | २०,०००.०० |
| ०२ | परावर्तीत पट्टी १०००० ट्रॉली व बैलगाडी ५ फुट प्रति | १,००,०००.०० |
| | **एकुण अंदाजे रक्कम (रु.)** | **१,२०,०००.००** |

या प्रस्तावित शासनाच्या रस्ता सुरक्षा अभियानाचे कार्यक्रमासाठी आपल्या संस्थेकडून वरील साहित्यासाठी आर्थिक मदत मिळावी ही विनंती केलेली आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव या नुसार छाननी / शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान-** आर्थिक खर्चाची बाब आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** तरी शासनाच्या २७ व्या रस्ता सुरक्षा अभियान २०१६ करीता दिलेल्या आर्थिक मदत एकुण रक्कम रु.१,२०,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख विस हजार) मात्र खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.८९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाच्या २७ व्या रस्ता सुरक्षा अभियान २०१६ करीता रु.१,२०,०००/- मात्र आर्थिक मदत देणेकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

विषय नं.१५ **प्रवासी बसचे स्कुल बसमध्ये रुपांतर करणेकामी झालेल्या वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ अन्वये कलम क्र. २१ (ज)** त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विश्वस्तव्यवस्थेतर्फे देय असलेले कोणतेही कर,भाडे, भरपाई, आकार व इतर रकमा यांचे प्रदान.

**प्रस्ताविक:-** इंग्लिश मिडीयम स्कुल यांचे दि.०४.०१.२०१४ चे जादा स्कूल बस मागणीनुसार वाहन विभागाकडील बस क्रमांक MH-17-K-9371, MH-17-T-9501,MH-17-T-9502 यावर सविस्तर चर्चा होऊन, तिन प्रवासी बसेसचे स्कुलबसमध्ये रुपांतरीत करणेत याव्यात. तसेच त्यासाठी आर.टी.ओ. कार्यालयाचे नियमानुसार बसेसमध्ये आवश्यक ते बदल करुन घेणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली होती. उपरोक्त मान्यतेने व आर.टी ओ.कार्यालयाचे नियमानुसार प्रवासी बसेसचे स्कुल बस मध्ये रुपांतर करणे करीता वाहनांस कलर करणे स्पिड गव्हर्नर बसविणे तसेच बसचे खिडक्यांना पाईप बसविणे ड्रायव्हर केबीन वेगळी करणे, आपत्कालीन दरवाजा बसविणे इ. कामी प्रचलित पध्दतीने कोटेशन बोलावून निम्नतम पुरवठा धारकांकडून वाहनाचे काम करुन घेण्यात आले. त्यासोबत वाहनांचा आर.टी.ओ. टॅक्स फी इ. कामे करण्यात आलेली आहे. त्याचा प्रत्यक्ष झालेला खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.न. | कामाचे खर्चाचा तपशील | रक्कम रु. |
|---|---|---|
| अ. | आर.टी.ओ. नियमानुसार कलर करणे | ४३,३००/- |
| ब. | स्पिड गव्हर्नर बसविणे | २१,०००/- |
| क. | आर ना पाईप बसविणेओ नियमानुसार खिडक्यां.टी., ड्रायव्हर केबीन वेगळी करणे, दप्तर रॅक बसविणे, आपत्कालीन दरवाजा बसविणे | ४२,०००/- |
| | **दूरुस्ती खर्च एकुण रक्कम रु.** | **१,०६,३००/-** |

| | | |
|---|---|---|
| १. | **वाहन क्र.एम.एच.१७- टी-९५०१** आर.टी.ओ टॅक्स फी | |
| | दि.०१.११.२०१४ ते दि.३१.०१.२०१५ – तिमाही प्रवासी टॅक्स फी | १०,७९१.०० |
| | दि.०१.०२.२०१५ ते दि. ३०.०४.२०१५ – तिमाही प्रवासी टॅक्स फी | १०,७९१.०० |
| | दि.०१.०५.२०१५ ते दि.३१.०७.२०१५ प्रवासी टॅक्स फी- | १०,४९४.०० |
| | दि.०१.०८.२०१५ ते ३१.०७.२०१६ स्कुल बस टॅक्स फी- | ३,६००.०० |
| | CFRA फी- | ६००.०० |
| | To PGODP फी- | ९००.०० |
| | **एकुण रक्कम रु.** | **३७,१७६.००** |
| २. | **वाहन क्र.एम.एच.१७- टी-९५०२** आर.टी.ओ टॅक्स फी | |
| | दि.०१.११.२०१४ ते दि.३१.०१.२०१५ – तिमाही प्रवासी टॅक्स फी | १०,७९१.०० |
| | दि.०१.०२.२०१५ ते दि. ३०.०४.२०१५ – तिमाही प्रवासी टॅक्स फी | १०,७९१.०० |
| | दि.०१.०५.२०१५ ते दि.३१.०७.२०१५ प्रवासी टॅक्स फी- | १०,४९४.०० |
| | दि.०१.०८.२०१५ ते ३१.०७.२०१६ स्कुल बस टॅक्स फी- | ३,६००.०० |
| | CFRA फी- | ६००.०० |
| | To PGODP फी- | ९००.०० |
| | **एकुण रक्कम रु.** | **३७,१७६.००** |
| ३. | **वाहन क्र.एम.एच.१७- के-९३७१** आर.टी.ओ टॅक्स फी | |
| | दि. ०१.११.२०१४ ते ३१.०१.२०१५ तिमाही प्रवासी टॅक्स फी | १७,०८६.०० |
| | दि. ०१.०२.२०१५ ते दि.३०.०४.२०१५ तिमाही प्रवासी टॅक्स फी | १७,०८६.०० |
| | दि.०१.११.२०१२ ते दि.३१.१०.२०१५ – पर्यावरण टॅक्स फी | ६,१५६.०० |
| | दि.०१.०५.२०१५ ते दि. ३१.०७.२०१५ – तिमाही प्रवासी टॅक्स फी | १६,६१६.०० |
| | दि.०१.०८.२०१५ ते दि.३१.०७.२०१६ स्कुल बस टॅक्स फी- | ५,७००.०० |
| | CFRA फी- | ६००.०० |
| | To PGODP फी- | ९००.०० |
| | **एकुण रक्कम रु.** | **६४,१४४.००** |
| | **वाहन आर.टी.ओ. टॅक्स खर्च एकुण रक्कम रु.** | **१,३८,४९६.००** |
| | **वाहन दूरुस्ती खर्च+ वाहन आर.टी.ओ. टॅक्स खर्च एकुण रक्कम रु.** | **१,०६,३००+१,३८,४९६= २,४४,७९६.००** |

**मागणी:-** तीन प्रवासी बसेसचे स्कुल बस मध्ये रुपांतर करणे कामी वाहनाचे दूरुस्ती खर्च रक्कम रु.१,०६,३००/- मात्र खर्च झालेला आहे. सदरचा खर्च मोटार कार दूरुस्ती खर्च या अंदाजपत्रकातून करण्यात आलेला आहे. तसेच वाहनाचे आर.टी.ओ. टॅक्स रक्कम रु.१,३८,४९६/- मात्र प्रत्याक्षात खर्च झालेला आहे. सदरचा खर्च कर व भाडे या अंदाजपत्रकातून करण्यात आलेला आहे. तीन प्रवासी बसेसचे स्कूल बस मध्ये रुपांतर करणे कामी वाहनाचे दूरुस्ती व आर.टी.ओ. टॅक्स भरणे याकामी प्रत्यक्ष खर्च एकुण रक्कम रु.२,४४,७९६/-मात्र खर्च झालेला आहे. तथापि मंजूर रक्कमेपेक्षा रक्कम रु.१,४४,७९६/- (अक्षरी रक्कम रु.एक लाख चव्वेचाळीस हजार सातशे श्याण्णव मात्र) वाढीव खर्च झालेला आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** वाहन विभागाकडील ०३ प्रवासी बसेसचे स्कुल बसमध्ये रुपांतरीत करणे कामी झालेल्या वाढीव खर्चाची रक्कम रु.१,४४,७९६/- पर्यंतचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.९० **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाहन विभागाकडील ०३ प्रवासी बसेसचे स्कुल बसमध्ये रुपांतरीत करणेकामी झालेल्या रु.१,४४,७९६/- मात्र वाढीव खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

विषय नं.१६ **वाहन क्र.एमएच-१७/एजी-२४१८ वाहनाचे दरुस्ती कामाबाबत.**

प्रस्ताव- वाहन विभागाकडील वाहन क्र.एमएच-१७/एजी-२४१८ (टाटा विंगर रुग्णवाहीका) या वाहनाचा वापर श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये उपचार घेणा-या रुग्णांना पुढील उपचाराकरीता बाहेरील रुग्णालयात घेवुन जाणे तसेच डिस्चार्ज झालेले रुग्ण घरी सोडविणे कामी होत आहे. दि.२९/११/२०१५ रोजी वाहन चालक यांचे तक्रारी रजिस्टर पान नं.८५ अ.नं.४९९ नुसार, सदर वाहन लोणी येथुन पेशंट सोडल्यानंतर परतीच्या प्रवासात येतांना बाभळेश्वर येथे बंद झालेमुळे टोचन करुन वाहन विभागात आणली होती. सदर वाहनाची वाहन विभागातील मोटार मेकॅनिक कर्मचारी यांचेकडून तपासणी केली असता सदर वाहनाचे टायमिंग बेल्ट व त्याचे बेअरींग खराब झाल्याचे अढळुन आलेने सदर पार्ट नवीन खरेदी करुन बसविण्यात येवुन वाहनाची ट्राय घेतली असता, सदर वाहनाचे सिलेंडर हेड मधील वाल बेंड असल्याने सदर सिलेंडर हेडचे काम टाटा कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून काम करुन घेणे आवश्यक आहे.

टाटा विंगर रुग्णवाहीका ही तातडीची सेवा देणारे वाहन असलेने दि.२९/११/२०१५ रोजी टाटा कंपनीचे अधिकृत डिलर, स्टर्लिंग मोटर्स प्रा.लि., बाभळेश्वर यांचेकडे दुरुस्तीकामा करीता पाठविण्यात आलेले आहे. या बाबत स्टर्लिंग मोटर्स प्रा.लि., बाभळेश्वर यांचेकडे खर्चा बाबत चौकशी केली असता त्यांनी अंदाजे रु.३०,०००/- (अक्षरी रक्कम रु. तिस हजार) पर्यंत खर्च अपेक्षीत असलेचे कळविलेले आहे.

उपरोक्त वाहनाचे दुरुस्ती कामाकरीता येणा-या खर्चाची रक्कम वाहन विभागाचे मोटारकार दुरुस्ती खर्च या अंदाजपत्रकातुन करता येईल.

तरी वरील प्रमाणे टाटा विंगर रुग्णवाहीका क्र.एमएच-१७/एजी-२४१८ या वाहनाचे दुरुस्तीचे काम टाटा कंपनीचे अधिकृत डिलर, स्टर्लिंग मोटर्स प्रा.लि., बाभळेश्वर यांचेकडून करुन घेणेस व या कामी येणा-या रु.३०,०००/- (अक्षरी रक्कम रु. तिस हजार) पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.९१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, टाटा विंगर रुग्णवाहीका क्र.एमएच-१७/एजी-२४१८ या वाहनाचे दुरुस्तीचे काम टाटा कंपनीचे अधिकृत डिलर, स्टर्लिंग मोटर्स प्रा.लि., बाभळेश्वर यांचेकडून करुन घेणेस व या कामी येणा-या अंदाजे रु.३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

विषय नं.१७ **प्रवासी बस क्र.एमएच-१७-टी-८५०४ व एमएच-१७-टी-८५०५ या दोन बसेसचा वार्षिक टॅक्स भरणेबाबत.**

प्रस्ताव- वाहन विभागाकडील प्रवासी बस क्र. एमएच-१७-टी-८५०४ व एमएच-१७-टी-८५०५ या बसेसचा वापर श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे निवास करणा-या साईभक्तांना मंदीर परिसर व प्रसादालय येथे ने-आण करणे कामी होत आहे. सदर बसेसच्या वार्षिक आर.टी.ओ. टॅक्सची मुदत दि.३१/०३/२०१६ रोजी संपुष्टात येत असुन पुढील एक वर्षाचा (दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ अखेर) टॅक्सची रक्कम भरणे आवश्यक आहे. मा. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर यांचे नियमानुसार, खालील तपशिला प्रमाणे रक्कम भरावी लागणार आहे.

| अ.नं. | बस क्रमांक | वाहन प्रकार | आसन क्षमता | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| ०१ | एमएच-१७-टी-८५०४ | प्रवासी बसेस | ५४ सिटर | ५४,०००.०० |
| ०२ | एमएच-१७-टी-८५०५ | प्रवासी बसेस | ५४ सिटर | ५४,०००.०० |
| | | | **एकुण रक्कम (रु.)** | **१,०८,०००.००** |

उपरोक्त प्रमाणे दोन बसेस वाहनांचा आर.टी.ओ. कार्यलयात वार्षिक टॅक्स भरणे कामी रु.१,०८,०००/- (अक्षरी रक्कम रु.एक लाख आठ हजार) मात्र खर्च येणार आहे. सदर खर्च मोटारकार कर व भाडे या अंदाजपत्रकातुन करता येईल. सदर टॅक्सची रक्कम आर.टी.ओ. कार्यालयात मा. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपुर यांचे नांवे अॅडव्हान्स डी.डी. आदा करावी लागणार आहे.

तरी बस क्र. एमएच-१७-टी-८५०४ व एमएच-१७-टी-८५०५ या दोन प्रवासी बसेसच्या वार्षिक (दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ अखेर) टॅक्सची रक्कम आर.टी.ओ. कार्यालयात भरणेस व या कामी येणा-या एकुण रक्कम रु.१,०८,०००/- (अक्षरी रक्कम रु.एक लाख आठ हजार) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.९२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, क्र. एमएच-१७-टी-८५०४ व एमएच-१७-टी-८५०५ या दोन प्रवासी बसेसच्या वार्षिक (दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ अखेर) टॅक्सची रक्कम आर.टी.ओ. कार्यालयात भरणेस व या कामी येणा-या एकुण रक्कम रु.१,०८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

विषय नं.१८ **आर्थिक वर्ष २०१५-१६ व २०१६-१७ करिता अंतर्गत लेखापरिक्षक (Internal Auditor) यांची मुदतवाढ/ नेमणुकीबाबत प्रस्ताव फेरसादर.**

प्रस्ताव- संस्थानमध्ये दैनंदिन कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे, त्या अनुषंगाने आर्थिक व्यवहारात व कामकाजातही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच आर्थिक व्यवहारां संबंधीत केंद्र व राज्य शासनाकडुन विविध आर्थिक, आयकर, सेवाकर, व्हॅट इ. विषयक कायदे पारित होतात. या कायद्यातील नव-नविन तरतुदींचा प्रभाव दैनंदिन आर्थिक कामकाजात पडत असतो. वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने व आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन.वेळीच त्याच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही करण्यासाठी व अंतर्गत नियंत्रण सक्षम राहण्यासाठी पुर्व लेखापरीक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक व करसल्लागार यांच्या नेमणुका करण्यात येतात.

अशाप्रकारे संस्थान, रुग्णालये विभाग, माहिती व सुविधा केंद्रे याकरिता अंतर्गत लेखापरिक्षक यांच्या नेमणुका करण्यात आल्या होत्या, त्यांची मुदत ३१ जुलै,२०१५ रोजी संपत असल्याने पुढील मुदतवाढ तथा नेमणुक आदेश देणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मिटींग विभागाकडे दि.२७.०७.२०१५ रोजी देण्यात आला होता. त्यावर दि.०८.१०.२०१५ रोजीचे मा.व्य.स.चे सभेत निर्णय क्र.३५६ अन्वये अंतर्गत लेखापरिक्षकांची निवड कशाच्या आधारे करण्यात आलेली आहे. लेखापरिक्षकांचे मागील वर्षीचे मानधन कीती व सध्याचे दर कीती आहेत. तसेच त्यांच्या कामाचे ठिकाण यासह चार्टर्ड अकौंटंट असोसिएशनकडून मानधनाची माहिती घेण्यात येवुन सविस्तर सर्वसामावेशक तुलनात्मक असा प्रस्ताव फेर सादर करण्यात यावे असे ठरले.

त्यास अनुसरुन उपरोक्त बाबींची पुर्तता करुन फेरप्रस्ताव सादर करण्यात आला होता. दि.२८.११.२०१५ रोजीचे मा.व्य.स.सभेत निर्णय क्र. ५६३ अन्वये संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येवुन, नामांकित (साधारणतः रु.५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनूभव असलेल्या) अंतर्गत लेखापरिक्षकांना बंद पाकिटामध्ये त्यांचे फीसह अर्ज करण्यासाठी आवाहन करणेत यावे. तसेच मुदतीमध्ये आलेल्या अर्जांची उपसमिती सभेसमोर छाननी करणेत येऊन त्यामधील पात्र लेखापरिक्षकांच्या फीचा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ त्रीसदस्सीय समिती सभेपुढे सादर करणेत यावा. असा निर्णय संमत झाला होता. सदर निर्णयाची प्रत दि.०१.०१.२०१६ रोजी प्राप्त झाली आहे.

त्यास अनुसरुन साधारणतः ५०० कोटीचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या लेखापरिक्षण संस्थांचे अधिकृत संकेतस्थळावर दि.१३.०१.२०१६ रोजी अवाहन करण्यात आले असुन दि.२८.०१.२०१६ पर्यंत फीसह बंद पाकीट अर्ज पाठविण्याची मूदत देण्यात आली आहे. तथापी आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता यामधुन लेखापरिक्षकांची निवड करुन लेखापरिक्षण करुन घेणे शक्य दिसत नाही. मार्च २०१६ अखेर सदर आर्थिक वर्ष संपत असल्याने व पुर्वीचे अंतर्गत लेखापरिक्षक यांनी फी वाढी अभावी ३१ मार्च २०१५ अखेर लेखापरिक्षण करुन पुढील काम थांबविले आहे. तसेच यापुर्वी लेखापरिक्षकांची नेमणुक मा.व्य.स.निर्णय क्र.१०००/दि.२०.११.२०१४ अन्वये विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात येवुन, साधारणः रु.४००/- कोटी उलाढालीची अट घालण्यात आली होती. त्यास अनुसरुन ४५ लेखापरिक्षण संस्थांनी अर्ज केले होते. निर्णयानुसार त्यापैकी अर्जांमधुन अनुभव व मानधन याबाबींचा सर्वांगीण विचार करुन अनुक्रमे ५ लेखापरिक्षण संस्थांचे पॅनल तयार करण्यात आले होते. त्यापैकीच अनुक्रमे २ व ३ चे लेखापरिक्षण संस्थांना अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन रु.१,३०,०००/-+ सेवाकर याप्रमाणे संस्थान व रुग्णालये विभागाकरीता नेमणुकीसाठी प्रस्तावीत करण्यात आले होते. यासाठी पुर्वीच्या लेखापरिक्षण संस्थांनी रुपये पाच लाखांची मागणी केली होती. तरी खालील बाबींचा विचार करता

१. आर्थीक वर्ष ३१ मार्च, २०१६ अखेर संपत असल्याने,

२. प्रस्तावीत केलेल्या लेखापरिक्षण संस्था विहित पध्दतीने वर्तमानपत्रात जाहीरात देवुन आलेल्या आहेत.

३. त्यांचे कामाचा अनुभव व उलाढाल ४०० कोटी पर्यंतची आहेत संस्थानची उलाढाल साधारणः तेवढीच आहे.

४. लेखापरिक्षण फी रु.१,३०,०००/-+सेवाकर इतकी आहे. तर पुर्वीच्या लेखापरिक्षकांनी मात्र रु.५,००,०००/- + सेवाकराची मागणी केली आहे. सदर फी सुध्दा कमी आहे.

आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता खालील प्रमाणे प्रस्तावीत केलेप्रमाणे-

| अ.क्र. | संस्थेचे नाव | मागणी केलेले मानधन/ फी रु. | (ICAI) संस्थेचे मानधन निर्देश | प्रस्तावीत |
|---|---|---|---|---|
| १ | मे.के.के.चाणाणी ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस मुंबई. **संस्थानकरिता** | १,३०,०००/-+ सेवाकर | ५,४०,०००+ सेवाकर प्रति वर्ष *(रु.१५०० *३ प्रतिनिधी * ४ महिने)* | रु.१,३०,०००+ सेवाकर प्रति वर्ष<br>१. पुर्वीपेक्षा सदर फी कमी आहे.<br>२. ISO गुणवत्ता प्रमाणपत्र<br>३. कामाचा अनुभव व फर्म मोठी |
| २ | मे.ए.डी.अंजीकर ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, मुंबई. **रुग्णालये विभाग** | १,३०,०००/-+ सेवाकर | ५,४०,०००+ सेवाकर प्रति वर्ष *(रु.१५०० *३ प्रतिनिधी * ४ महिने)* | रु.१,३०,०००+ सेवाकर प्रति वर्ष<br>१. पुर्वीपेक्षा सदर फी कमी आहे.<br>२. ISO गुणवत्ता प्रमाणपत्र<br>३. कामाचा अनुभव व फर्म मोठी |
| ३ | मे.एन.पी.रेडीज, चार्टर्ड अकौटंटस मुंबई परकीय चलन व मुंबई कार्यालय | २५,०००/- प्रत्यक्ष खर्च यापैकी जे कमी असेल ते | ४५,०००+सेवाकर (१५००*३० दिवस) | रु.२५,००० प्रति वर्ष<br>१. पुर्वीइतकीच फी आहे.<br>२. कामाचा अनुभव व फर्म मोठी<br>३. सदर बाबत स्वतंत्र रिपोर्ट FCRA दिल्ली येथे सादर करावा लागतो.<br>४. त्यांचे काम समाधानकारक आहे. |
| ४ | मे.अमोल.सी.दातार ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंट पुणे माहिती व सुविधा केंद्र हैद्राबाद, चेन्नई, सिकंदराबाद | रु. ५०,०००/- प्रति वर्ष | ५०,०००+सेवाकर (१५००*३० दिवस+रेल्वे तिकीट) | रु.५०,००० प्रति वर्ष<br>१.पुर्वीइतकीच फी आहे.<br>२.तिन्ही माहिती व सुविधा केंद्राच्या ठिकाणी जावुन प्रत्यक्ष लेखापरिक्षणाचे कामकाज करावे लागते.<br>३. त्यांचे काम समाधानकारक आहे. |

अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन नियुक्ती/मुदतवाढ देवून पुढील २०१६-१७ आर्थिक वर्षाकरीता निर्णय क्र.५६३/२८.१०.२०१५ अन्वये संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देवून प्राप्त झालेल्या अर्जांची छानणी उपसमितीचे सभेपुढे करुन, त्यामधील पात्र लेखापरिक्षकांच्या तुलनात्मक तक्ता मा.त्रीसदस्सीय समितीचे सभेपुढे सादर करुन नियुक्ती करणेबाबतचा प्रस्ताव यथावकाश सादर करता येईल. तरी सदर प्रस्ताव निर्णयास्तव मा.त्रिसदस्सीय समितीचे सभेपूढे सादर.

निर्णय क्र.९३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील तक्त्यामध्ये नमुद केलेल्या अ.नं.०१ ते ०४ अंतर्गत लेखापरिक्षक (Internal Auditor) यांची आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली. तसेच सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत लेखापरिक्षक (Internal Auditor) नेमणूकीकामी संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येऊन, नामांकित लेखापरिक्षकांकडून अर्जांची मागणी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

**विषय नं.१९** **श्री साईबाबा हॉस्पिटल मेडीकल स्टोअर व भांडार विभागासंबंधीत सर्जिकल साहित्य, औषधे व इतर खरेदीचे विशेष लेखापरिक्षक नेमणुकीबाबत फेरसादर.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा हॉस्पीटलमधील मेडीकल स्टोअर व भांडार विभागाशी संबंधीत सर्जिकल साहित्य, औषधे इ. खरेदीमध्ये कार्यकारी अधिकारी यांना गंभीर उणीवा आढळुन आल्या होत्या. त्यावर मा.कार्यकारी अधिकारी यांनी प्राथमिक चौकशी अहवाल तयार करुन संबंधीतांवर प्राथमिक कार्यवाही केली आहे. संबंधीत गैरव्यवहाराचे थोडक्यात सर्वसाधारण स्वरुप खालीलप्रमाणे –

१. आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा नसणे ( आदेश एका कंपनीचा व माल वेगळया कंपनीचा)

२. निविदेमध्ये औषधांचे प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेले परिमाण (उदा. ७५० ml Spirit ची बाटली बाजारात अस्तित्वात नाही. परंतु निविदेत ते परिणाम ठेवले. परिणामी Competition झाली नाही. त्यामुळे एकाच पुरवठादाराला आदेश द्यावा लागले की जो पुरवठादार ६५० ml चीच बाटली वर्षानुवर्षे देत होता.)

३. Spirit च्या वाहतुकीसाठी Tender term & Condition मध्ये तरतुद नसतांना संस्थान वाहनांचा वापर करण्यात आला.

अशाप्रकारे गेली ६ ते ७ वर्षापासुन चालू असण्याचा अंदाज असल्याने लेखापरिक्षणाचा आवाका खूप मोठा आहे. सदरील लेखापरिक्षण नेहमीच्या लेखापरिक्षकांकडुन करुन घेण्यापेक्षा शासनाच्या रुग्णालयांच्या लेखापरिक्षणाचा अनुभव असलेला राज्य शासनाच्या स्थानिक निधी लेखापरिक्षण विभाग (Local Fund) यांचेकडुन करुन घेण्याचे नियोजन होते. जा.क्र.एसएसएस/वशी-लेखा/१२६/१५ दि.०८.०४.२०१५ अन्वये त्यांचेकडे मागणी केली होती. तथापि क्र.स्था.१८/ब/श्री साईबाबा संस्थान शिर्डी/विलेप/अेअे-३/६८८ दि.२९.०४.२०१५ चे पत्रानुसार लेखापरिक्षण करता येणार नाही अशा आशयाचे पत्र स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागाने दिले होते.

तद्नंतर सदरील विभागाशी पुनःश्च दुरध्वनीवरुन चर्चा केली असता त्यांनी ऑगस्ट नंतर लेखापरिक्षण करण्याचे मान्य केले. त्यासाठी त्यांनी आणखी सविस्तर प्राथमिक चौकशी अहवालाची मागणी केली. यावर मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडे शासनाला स्मरणपत्र पाठविणेसाठी टिपणी सादर केली असता कार्यकारी अधिकारी व मुख्यलेखाधिकारी यांची चर्चा झाली. सदरील चर्चेमध्ये सध्या शासनाने नेमलेले वैधानिक लेखापरिक्षक तयार असतील तर त्यांचेकडुन विशेष लेखापरिक्षण करुन घेण्यास हरकत नाही. शासन नियुक्त वैधानिक लेखापरिक्षक मे.शिंदे चव्हाण गांधी ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस् यांचेशी चर्चा केली असता त्यांनी लेखापरिक्षण करण्याची तयारी दर्शविली आहे.

शासनाने वैधानिक लेखापरिक्षणाकरिता रु.१ लाख वार्षिक फी निश्चित केली होती. सदरं विशेष लेखापरिक्षणाकरिता चार्टर्ड अकौंटंटस् असोसिएशनच्या निर्देशानुसार व ब-वर्ग शहर गृहीत धरता साधारणतः मॅडेजप्रमाणे १ सीए व एक सेमीक्वालिफाईड मदतनीस गृहीत धरल्यास (२००००+५०००*१५ दिवस) रु.३,७५,०००/- इतकी फी होते. तथापि त्यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा केली असता साधारणतः ५० % फीमध्येच रु.१,८५,०००/- त्यांनी एकुण सात वर्षाचे विशेष लेखापरिक्षण करण्याची तयारी दर्शविल्याने शासनमान्य वैधानिक लेखापरिक्षकांकडून सदर कामकाजाचे लेखापरिक्षण करुन घेण्यासाठी दि.२८.११.२०१५ रोजीचे मा.व्य.स.च्या सभेमध्ये प्रस्ताव सादर केला होता त्यावर निर्णय क्र.५६४ सम्मत झाला आहे. त्यामध्ये लेखापरिक्षणातील कामाचे स्वरुप, लेखापरिक्षक किती कर्मचारी पुरविणार, यासर्व बाबींचा सामावेश करण्यात येवून फेरप्रस्ताव सादर करण्यास सुचविले आहे. त्यासंबधित साधारणतः कामाचे स्वरुप, कर्मचारी संख्या व संभाव्य कालावधी खालीलप्रमाणे प्रस्तावीत केला आहे.

| अ.क्र. | आवश्यक बाबी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | विशेष लेखापरिक्षणामधील कामाचे स्वरुप- | वार्षिक औषध खरेदी- निविदा, चर्चा वाटाघाटी, खरेदी आदेश, मटेरियल आवक, भांडार साठा, अतिरिक्त साठा, साठा वितरण, कालबाह्य औषध साठा, व औषध खरेदी विभाग व मध्यवर्ती औषध भांडारा संबधित खरेदी, वितरण व शिल्लक साठा संबधित रेकॉर्ड तपासणे कालावधी- आर्थिक वर्ष २००७-०८ ते २०१३-१४ |
| २ | लेखापरिक्षक व इतर कर्मचारी संख्या | साधारणतः १ सनदी लेखापाल (सी.ए.) अधिक इतर २ सहाय्यक लेखापरिक्षक |
| ३ | लेखापरिक्षणासाठी साधारणतः अवाश्यक असणारा कालावधी | साधारणतः प्रति वर्ष २ दिवस असे एकुण १५ दिवस |

अशाप्रकारे साईबाबा हॉस्पीटलमधील मध्यवर्ती औषध खरेदी विभाग, औषध भांडार विभागासंबधीत उपरोक्त नमुद केलेल्या एकुण सात वर्ष कालावधीतील दप्तराचे विशेष लेखापरिक्षण/तपासणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी विशेष लेखापरिक्षक म्हणुन शासन नियुक्त वैधानिक लेखापरिक्षक मे. शिंदे चव्हाण गांधी ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस् यांचेकडुन त्यांनी मान्य केलेल्या रु.१,८५,०००/- इतक्या फीमध्ये करुन घेणेकामीचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीपुढे निर्णयार्थ फेरसादर करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील मेडीकल स्टोअर व भांडार विभागासंबंधीत सर्जिकल साहित्य, औषधे व इतर खरेदीचे सन- २००७-०८ ते २०१३-१४ या सात वर्ष कालावधीतील दप्तराचे विशेष लेखापरिक्षण/तपासणी करणेकामी शासन नियुक्त वैधानिक लेखापरिक्षक मे. शिंदे चव्हाण गांधी ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस् यांची विशेष लेखापरिक्षक म्हणून रु.१,८५,०००/- मात्र एकत्रित फीवर नेमणूक करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ कामगार अधिकारी)

विषय नं.२० **शिर्डी येथील बर्डे वस्ती (राहाता शिर्डी शिवरस्ता) येथे रस्त्यावरील खड्डयामध्ये मुरुम टाकणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद :-**

*".. अधिनियम २००४ कलम १७. (१) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान प्रथेनुसार धार्मिक विधी पुजाअर्चा समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करून देणे आणि अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील.*

*(२) विशेषकरून आणि पोटकलम (१) मधील तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता समिती - (झ) सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन देखभाल व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील."*

*"... अधिनियम २००४ कलम २१ मधील " (१क) पोट-कलम (१) च्या तरतुदींना अधीन राहून विश्वस्तव्यवस्थेस, राज्य शासनाच्या पुर्व मंजूरीने आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या देशाव्दारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तींच्या अधीन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकिय विभागांना, शासकिय महामंडळांना, शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना सहाय्यक अनुदान देता येईल." अशी तरतुद आहे.*

**प्रस्ताव :-** दिनांक १०/११/२०१५ रोजीचे पत्रान्वये, मा. ना. राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील, विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी खालील प्रमाणे कळविले आहे.

".. श्री. रावसाहेब पंढरीनाथ बर्डे व इतर, रा. शिर्डी या नागरिकांनी बर्डे वस्ती ( राहाता शिर्डी शिवरस्ता) येथे रस्त्यावर पडलेल्या खड्यामध्ये मुरुम टाकुन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. सदर ठिकाणी मोठ मोठे खड्डे पडलेले असल्यामुळे नागरिकांची येण्या जाण्यांसाठी गैरसोय होत आहे. कृपया, वरिल ठिकाणी रस्त्यावर मुरूम टाकुन देणेबाबत उचित कार्यवाही करावी, ही विनंती."

या सुमारे १.८० कि.मी. लांब व २.७५ मी. रुंदीचे रस्त्यावरील मोठया आकाराचे खड्डे मुरुमाने बुजविणेसाठी रु.२२,५७५/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरहु रस्ता हा शिर्डी नगरपंचायतीचे अखत्यारीतील असल्याने विषयांकीत रस्त्यावर मुरुम टाकणेकामी येणारे खर्चास व अधिनियमातील उपरोक्त तरतुदीनुसार शासनाचे विधी व न्याय विभागाची मान्यता घेणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.९५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित रस्ता शिर्डी नगरपंचायतीचे अखत्यारीतील असल्याने या रस्त्यावरील खड्डयामध्ये मुरुम टाकणेकामी येणा-या अंदाजे रु.२२,५७५/- मात्र येणा-या खर्चास अधिनियमातील तरतुदीनुसार शासनाचे विधी व न्याय विभागाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.२१ **कै.शंकर नाथा गोंदकर यांनी संस्थानला देणगीदाखल दिलेल्या सिटी सर्व्हे नं.२० मधील ज़ागेत मंदिर विभागातील पुजा-यांसाठी संडास, बाथरुम व वॉश बेशीनची सुविधा करणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अधिनियमाचे कलम– १७ मधील पोटकलम (१) मध्ये भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:** दि.१८/१०/२०१३ रोजी झालेल्या मा. त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.८५० अन्वये संस्थानला देणगी मिळालेल्या सिटी सर्व्हे नं. २० मधील जागेत मंदिर विभागातील पुजा-यासाठी संडास, बाथरुम व वॉश बेशीनची सुविधा करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१.२५ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहेत.

**प्रस्तावना:-** मा.प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधिश तथा मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दि.२८/०८/२०१३ रोजी मंदिर परिसराची पाहणी दरम्यान श्री शंकर नाथा गोंदकर यांनी देणगी दिलेल्या सिटी सर्व्हे नं.२० मध्ये पुजा-यांसाठी संडास बाथरुम बांधणेबाबत निर्देश दिले होते.

श्रींचे समाधी चौथ-यावर पुजारी सोवळे व चोपदार गणेश घालून काम करतात. सदर कर्मचा-यांसाठी पूर्वीचे ध्यानमंदिर व सध्याचे संरक्षण विभागाचे कंट्रोल रुमचे ठिकाणी संडास / बाथरुमची व्यवस्था केलेली आहे. सदरचे ठिकाणी एकच संडास असल्यामुळे एका वेळी फक्त एकच कर्मचारी जाऊ शकतो. तसेच सदर ठिकाणी मंदिर कर्मचा-याव्यतिरिक्त कंट्रोल रुमचे कर्मचारी वापर करतात. त्यामुळे मंदिर कर्मचा-यांना जास्तवेळ त्याठिकाणी थांबून रहावे लागते. करीता सिटी सर्व्हे क्र.२० मधील जागेत पुजा-यांसाठी दोन संडास, एक युरीनल व एक बाथरुम तातडीने बांधून मिळणेबाबत तसेच पुजारी व चोपदार यांचेकरीता सदरहू जागेत कायमस्वरुपी दोन मजल्याची बिल्डींगचे बांधकाम करुन मिळणेबाबत अधिक्षक, मंदिर विभाग यांनी विनंती केली होती.

सदर ठिकाणी कायमस्वरुपी बहूमजली बांधकाम करावयाचे झाल्यास त्याठिकाणी विद्यमान विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय होणारे बांधकाम करावे लागेल. करीता सदर ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात दोन संडास एक

बाथरुम व वॉश बेशीनची व्यवस्था करणेकामी येणारे रक्कम रु.१.२५ लक्ष मात्रचे अपेक्षीत खर्चास उपरोक्त निर्णय क्र.८५० अन्वये मान्यता देण्यात आली होती.

दि.१२/११/२०१३ रोजी तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली मंदिर परिसर सुरक्षा व्यवस्थेबाबत झालेल्या आढावा बैठकीत समाधी मंदिराचे उत्तर बाजूकडील डोनेशन काऊंटरचे विस्तारीकरण करणेकामी लगतची पुजारी चेंजींग रुमचे स्थलांतर, शांतीनिवास इमारत तळमजला जिन्या लगत पश्चिम बाजूस पूर्वीचे संस्थान कामगार सोसायटीचे स्टॉलचे जागेत करण्यात यावे, असे निर्देश दिले. त्यानुसार शांतीनिवास इमारत तळमजला जिन्यालगतचे पश्चिम बाजूकडील रुममध्ये पुजा-यांसाठी चेंजींग रुम, टॉयलेट व वॉश बेसीनची व्यवस्था करणेकामी दि.१०/०१/२०१४ रोजीचे टिपणी अन्वये येणारे अंदाजे रु.१.४२ लक्ष मात्रचे खर्चास व याकामी आवश्यक मटेरिअलचे व मजूरी दराचे ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागविणेस तसेच याकामी मा. त्रिसदस्य समितीची कार्योत्तर मंजूरी घेणेकामी मान्यता देणेत आली. त्यानुसार इकडील विभागामार्फत सिव्हील कामासाठी आवश्यक मटेरिअल खरेदी करुन सदरचे काम पूर्ण केले आहे.

याकामासाठी एकूण रु.१,७७,२२६/- मात्र खर्च झालेला असून, मा. त्रिसदस्य समितीचे दि.१७/०७/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.५७१ अन्वये त्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर रुमचे काम इकडील विभागामार्फत पूर्ण करुन रुमचा वापर पुजा-यांचे चेंजींग रुमसाठी सुरु करणेत आलेला आहे. तसेच देणगी मिळालेल्या सिटी सर्व्हे क्र.२० मधील जागेत संस्थान कर्मचारी सोसायटी तर्फे मोबाईल लॉकर व्यवस्था सुरु करणेत आलेली आहे.

तरी दि.१८/१०/२०१३ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.८५० अन्वये संस्थान देणगी मिळालेल्या सिटी सर्व्हे क्र.२० चे जागेत मंदिर विभागातील पुजा-यांसाठी संडास बाथरुम व वॉश बेसीन सुविधा करणेकामी येणारे अंदाजे १.२५ लक्ष मात्रचे खर्चाचे वर नमूद व्यवस्थापन समिती निर्णय निरस्त होणेस विनंती.

निर्णय क्र.९६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेनुसार दि.१८.१०.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८५० निरस्त करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.२२ **शिर्डी, राहाता या शहरांचे बाहेरुन जाणारा बाहयवळण रस्ता (२३ किमी) विकसीत करणेकामी सार्वजनिक बांधकाम विभागास निधी उपलब्ध करुन देणेबाबत.**

प्रस्ताव- कोपरगांव-अहमदनगर या राज्यमार्गातंर्गत, कोपरगांव--कोल्हार या टप्प्यातील रस्त्याचे चौपदरीकरणाचे कामातील, शिर्डी-राहाता या शहराचे बाहेरुन जाणा-या पिंप्री निर्मळ ते निमगांव या अंदाजे २३ किलोमीटर लांबीचे बाहयवळण रस्त्याचे कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागास रु.१४० ते १५० कोटी मात्र निधी उपलब्ध करुन देणेबाबत मा.त्रिसदस्य समितीचे दिनांक १२ मार्च, २०१५ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र. ८१ खालील प्रमाणे संमत करणेत आला.

*".. यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी-राहाता शिर्डी - राहाता या शहराच्या बाहेरुन जाणारा बाह्यवळण रस्ता (२३ कि. मी.) विकसीत करणेकामी सार्वजनिक बांधकाम विभागास रु. १४० ते १५० कोटी मात्र निधी उपलब्ध करुन देणेस परवानगी घेणेसाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील अप्लीकेशन दाखल करण्यात यावे तसेच अधिनियमातील तरतुदीनुसार विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचीही मान्यता घेण्यात यावी. उपरोक्त मान्यता मिळालेनंतर प्रस्तावित केलेप्रमाणे निधी उपलब्ध करुन देणेस तत्वतः मान्यता देण्यात आली.*

*परंतु यासंबंधी मा. उच्चन्यायालयाचा पूर्वी काय निकाल झालेला आहे, याची पडताळणी करुन पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. "*

वर नमुद केलेल्या निर्णयानुसार, शिर्डी-राहाता या शहरांच्या बाहेरुन जाणारा बाह्यवळण रस्ता (२३ किमी) विकसीत करणेकामी सार्वजनिक बांधकाम विभागास रु.१४० ते १५० कोटी मात्रचा निधी सार्वजनिक बांधकाम विभाग (जागतिक बँक प्रकल्प), अहमदनगर यांना कामाचे प्रगती व आवश्यकतेनुसार टप्प्या-टप्प्याने उपलब्ध करुन देणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. विधी विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे जा. क्र. एसएसएसटी/ बांधकाम/ ६५१२/२०१५ दि.०४ एप्रिल, २०१५ रोजीचे पत्रान्वये सादर करणेत आला आहे.

तसेच विषयांकीत रस्त्याचे कामासाठी निधी उपलब्ध करुन देणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे परवानगीसाठी सिव्हील ॲप्लीकेशन नं.४७५४/२०१५ दि.दि.२१/०४/२०१५ अन्वये सादर करणेत आले होते. त्यावर मा. उच्च न्यायालयाने दि.२४/०४/२०१५ रोजी खालील प्रमाणे ऑर्डर केलेली आहे.

01. Mr. Chaukidar, learned counsel for the Applicant submits that this Court had taken cognizance of attendance of the devotees from entire country and abroad at Shirdi and had directed the State Government to act in tune with its policy to have 6 lane road for 1250 meters length and 4 lane road for the stretch of Kolhar to Kopargaon. It had directed the State to complete the said works within four months from the date of order dated 2nd April.

02. Learned A.G.P. on instructions states that as far as the work of four lane State High Way 10 is concerned out of 41.80 Km. Length of road 28 Kms. work of D.B.M. Is completed. Out of three big bridges the work of one bridge is completed and remaining two bridges will be completed by 31st May, 2015. It is also stated in the communication received by the learned A.G.P. from the Executive Engineer, World Bank Project that out of 1250

meter road as was directed vide order of this Court the work of the 6 lane road to the extent of fifty per cent is over and remaining work would be completed by 31st May, 2015. The said communication is taken on record and marked "X" to the civil application No.4754 of 2015.

03. In view of the said communication received by the State, which is marked "X", the civil application stands disposed of.

तरी विषयांकीत कामासाठी मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी वरील प्रमाणे ऑर्डर केलेली आहे. माहितीस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.९७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी, राहाता या शहरांचे बाहेरुन जाणारा बाहयवळण रस्ता (२३ किमी) विकसीत करणेकामी सार्वजनिक बांधकाम विभागास निधी उपलब्ध करुन देणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी सिव्हील ॲप्लीकेशन नं.४७५४/२०१५ वर दि.२१/०४/२०१५ रोजी दिलेल्या आदेशाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.२३ **व्दारावती भक्तनिवास व श्री साईनाथ रुग्णालय परिसरात Rain Water Harvesting योजणा राबविणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना :** शिर्डी शहर व परिसरात भुजल पातळी अत्यंत खोलवर गेलेली आहे. गेल्या काही वर्षात पर्जन्यमानातही घट झालेली आहे. त्यामुळे विशेषतः उन्हाळयामध्ये पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवत आहे. मागिल दोन-तिन वर्षात एप्रिल ते जून या कालावधीत संस्थानला मोठ्या प्रमाणावर पाणी टंचाईस तोंड द्यावे लागले. त्यामुळे उपलब्ध होणा-या पाण्याची बचत करणे गरजेचे आहे. त्यासाठी Rain Water Harvesting चे माध्यमातून पावसाचे पाणी जमिनीत जिरवून भूजल पातळीत सुधारणा करता येईल त्या दृष्टीने संस्थानचे द्वारावती भक्तनिवास व श्री साईनाथ रुग्णालय इमारतींचे छतावर साचणारे पावसाचे पाणी Rain Water Harvesting सिस्टीमद्वारे संकलीत करुन भूजल पुनर्भरण करता येईल.

यापूवी संस्थानचे साई आश्रम भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास्थान (५०० रुम) व शैक्षणिक संकुल परिसरात Rain Water Harvesting प्रकल्प राविणेत आलेला आहे. करीता द्वारावती भक्तनिवास व श्री साईनाथ रुग्णालय परिसरात Rain Water Harvesting प्रकल्प हाती घेता येईल.

शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडील जा.क्र.न.पं./बांध/टे.क्र.८/२/१९७६/२०१४ दि.२३/०६/२०१४ रोजीचे पत्रानुसार पर्जन्यजल पुनर्भरण करणेची व्यवस्था केलेनंतर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम १२७ ब नुसार मालमत्ता करात २% सुट अनुज्ञेय आहे.

**प्रस्ताव:** उपरोक्त बाबींचा विचार करता, द्वारावती भक्तनिवास व श्री साईनाथ रुग्णालय परिसरात Rain Water Harvesting प्रकल्प राबविलेस जमिनीमधील पाण्याचे पातळीत वाढ होईल. तसेच नगरपंचायतीचे पत्रानुसार पर्जन्यजल पुनर्भरण करणेची व्यवस्था केलेनंतर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम १२७ ब नुसार मालमत्ता करात २% सुट अनुज्ञेय असल्याने, सदरहू प्रकल्प हाती घेता येईल. त्यासाठी इकडील विभागामार्फत तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रु.८,७८,४२९/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

तरी विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रु.८,७८,४२९/- मात्रचे खर्चास सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.९८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवास व श्री साईनाथ रुग्णालय परिसरात Rain Water Harvesting योजणा राबविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.८,७८,४२९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.२४ **शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पुर्वीचे स्वागत कक्ष) जागेत शौचालय बांधकाम करणेकामी प्राप्त निविदांबाबत.**

प्रस्ताव- सन २०१५ चे कुंभमेळा कालावधीत शिर्डीत भाविकांची जादा गर्दी होती. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरिक्त सोयीसुविधा विशेषतः सार्वजनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, (विशेषतः महिलासाठी) पाणी पुरवठा, सुरक्षा, अतिरिक्त प्रसाद भोजन व्यवस्था, अल्पोहार इत्यादी, सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणेत आलेल्या आहेत. तसेच सन २०१७-१८ मध्ये होणा-या श्री साईबाबा महासमाधि शताब्दी महोत्सवाचे कालावधीत होणारे संभाव्य गर्दीचे अनुषंगाने करावयाचे सोयी-सुविधांचे नियोजन करणेत येत आहे.

शिर्डी येथे भक्तांच्या सोईसुविधेसाठी स्वच्छता गृहे व स्नानगृहे उभारणेकामी मा.त्रिसदस्य समितीचे दि.३०/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ०५ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"... .उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५-१६ मध्ये शिर्डी येथे होणा-या संभाव्य गर्दीचे अनुषंगाने शौचालय बांधकाम करणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन आणि मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठाची परवानगी घेण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली.त्यासाठी समिती सदस्यांनी संयुक्तिक पहाणी करुन संबधीत परीसराच्या उपलब्धतेनुसार तीन ठिकाणी जागा निश्चित कराव्यात, असे ठरले."*

उपरोक्त निर्णयानुसार दि.२६/०४/२०१५ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे मा. अध्यक्ष-तथा-प्रधान जिल्हा सत्र न्यायाधीश, अहमदनगर. मा.सदस्य-तथा-जिल्हाधिकारी, अहमदनगर तसेच मा.सदस्य-तथा-कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालील तीन जागाची पहाणी करुन त्या ठिकाणी शौचालय उभारणेस मान्यता दिलेली आहे.

१. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५००खोल्यां) समोरील नगर-मनमाड रस्त्यालगत पुर्व बाजूचे मोकळया जागेत.

२. शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पूर्वीचे स्वागत कक्ष) जागेत.

३. जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळया जागेत (साईप्रसाद निवासस्थाने परीसरात)

उपरोक्तपैकी शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पूर्वीचे स्वागत कक्ष) जागेत शौचालयाचे बांधकाम करणेकरीता येणारे रक्कम रु.९,७०,१९२/- मात्रचे खर्चास व वर्तमान पत्रातील जाहिराती द्वारे ई – निविदा मागविणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०८/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २४४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

१) त्यानुसार सदर कामासाठी विभागीय कार्यालय नाशिक यांचेमार्फत दि.१९/०८/२०१५ रोजीचे दैनिक नाशिक दौरा, नाशिक व दैनिक गांवकरी, अ.नगर या वर्तमानपत्रात व साप्ताहिक गोदाजल, कोपरगाव येथे निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.०१/०९/२०१५ पर्यंतच्या ऑनलाईन निविदा जमा करण्याच्या अंतिम मुदतीत एकही निविदा जमा झाली नाही.

२) त्यामुळे इकडील विभागाचे दि.०७/०९/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये याकामी फेर ई – निविदा प्रसिध्द करणेस मान्यता देणेत आली असुन दि.२०/०९/२०१५ रोजीच्या दैनिक गांवकरी या वर्तमानपत्रात व साप्ताहिक नगर संकेत, अहमदनगर येथे निविदा सुचना प्रसिध्द करणेत आल्या होत्या. दि.१३/१०/२०१५ पर्यंतच्या ऑनलाईन निविदा जमा करण्याच्या अंतीम मुदतीत एकाच ठेकेदाराची ऑनलाईन निविदा जमा झालेली होती.

याकामी दि.३०/१०/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर तिस-यांना निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या ई – निविदांमधील टेक्नीकल बीड दि.०९/१२/२०१५ रोजी उघण्यात आले आहेत. त्यावेळी खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.नं | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.ए.आर.औटी | प्रशासकीय अधिकारी |
| २ | श्री. डी. झिरपे, | मुख्यलेखाधिकारी |
| ३ | श्री. डी.एम. देसाई | उप अभियंता |
| ४ | श्री. एस. एम. जोरी | उप अभियंता |
| ५ | श्री. जी. आर. कोराटे | कनिष्ठ अभियंता |
| ६ | श्री. आर.एस. साबळे | ज्यु. ई डी पी विभाग, प्रतिनिधी |

उघडण्यात आलेल्या ई – निविदांचे टेक्नीकल बीडमधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | ठेकेदाराचे नांव | कागदपत्रांचा तपशिल | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बयाना रक्कमेचा डी.डी व को-या निविदेची किंमत | सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंद केल्याचे प्रमाणपत्र. | मागील तीन वर्षात बांधकाम क्षेत्रात केलेल्या कामाचे दाखला | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी विभागाकडे नोंद आहे. /नाही. | |
| ०१ | संजय जी. गायकवाड, राहाता | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | आहे. | पात्र |
| ०२ | पराग डी. देशपांडे, पुणे | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | नाही. | अपात्र |

वरील प्रमाणे अ.नं. १ व २ चे ठेकेदार यांनी सादर केलेले तांत्रिक लिफाफ्यामधील कागदपत्रांची छाननी केली असता, क्र. १ चे ठेकेदार तांत्रिक दृष्टया पात्र असल्याचे आढळून आले आहे. तसेच अ.क्र.२ चे ठेकेदार यांची कर्मचारी भविष्यनिधी कार्यालयकडे नोंदणी नसल्याने ते अपात्र आहेत.

सदरहूकामी तिस-यांदा ई– निविदा मागवून प्राप्त झालेल्या ई– निविदा मधील पात्र ठेकेदार यांचा कमर्शिअल बिड मा. उपसमितीचे दि.०४/०२/२०१६ रोजीचे सभेपुढे उघडणेत आला असून प्राप्त दरांचा तुलनात्मक तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Bidder Name | Estimated Rate | Quoted percentage | Quoted Rate in figures and words | |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Sanjay Gaikawad, Rahata | 9,70,192.00 | 0.00% | 9,70;192.00 | Nine lakh seventy Thousand One Hundred and ninety Two Only. |

तरी शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पुर्वीचे स्वागत कक्ष) जागेत शौचालय बांधकाम करणेकामी प्रस्तावात नमूद केलेल्या ई– निविदा प्रक्रियेचे अवलोकन करणेत येऊन, ठेकेदार संजय गणपत गायकवाड, राहाता यांचे रु.९,७०,१९२/- मात्रचे दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.९९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरामध्ये येणा-या साईभक्तांकरीता सार्वजनिक स्वच्छतागृहांची (विशेषतः महिलासाठी) व्यवस्था करणेसाठी, शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पुर्वीचे स्वागत कक्ष) जागेत शौचालय बांधकाम करणेकामी प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस, समिती अध्यक्ष व समिती सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात येऊन, सदरहू काम तातडीने सुरु करणेत आलेले आहे, त्याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.२५ **सेवाधाम इमारतीचे तळमजल्यावर साईभक्त व नागरिकांकरीता वाढीव टॉयलेटची व्यवस्था करणे कामासाठी प्राप्त निविदांबाबत.**

प्रस्ताव- उपरोक्त विषयाबाबत मा. त्रिसदस्य समितीचे दि.२४/०६/२०१५ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.१६२ (३७) संमत करणेत आलेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, सेवाधाम इमारतीचे तळमजल्यावर साईभक्त तसेच नागरिकांकरीता वाढीव टॉयलेटची व्यवस्था करणेकामी विहीत पध्दतीने ई- निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.७,९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी" अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.

३.) याकामी इकडील विभागाचे दि.१९/०८/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये निविदा सूचना प्रसिध्द करणेस मान्यता देण्यात आली. त्यानुसार दि.१०/०९/२०१५ रोजीच्या दै. आजचा दिनकर या वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.२१/०२/२०१५ रोजीच्या ई-निविदा जमा करण्याच्या अंतीम मुदतीत एकही निविदा प्राप्त न झाल्याने याकामी इकडील दि.०५/१०/२०१५ रोजीचे टिपणी नुसार दुस-यांदा फेर ई – निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.

४.) त्यानुसार दि.०१/११/२०१५ रोजीचे दै. सायं. आनंद, संगमनेर तसेच दि.०२/११/२०१५ चे साप्ताहिक पोलिस पेपर, अ.नगर या वर्तमानपत्रात फेर ई – निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.१६/११/२०१५ रोजीच्या ई- निविदा जमा करण्याच्या अंतीम मुदतीत एकही निविदा प्राप्त न झाल्याने याकामी तिस-यांदा फेर ई – निविदा मागविणेस इकडील दि.०१/१२/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता घेण्यात आली आहे.

**प्रस्तावना-** त्यानुसार याकामी वर्तमान पत्रात ई – निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या ई- निविदांमधील टेक्नीकल बीड दि.२९/०१/२०१६ रोजी उघण्यात आल्या आहेत. उघडण्यात आलेल्या ई- निविदांचे टेक्नीकल बीड मधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | कागदपत्रांचा तपशिल | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बयाना रक्कमेचा डी.डी व को-या निविदेची किंमत | पी.डब्ल्यु डी. रजिस्ट्रेशन | काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र. | ई पी एफ रजिस्ट्रेशन | |
| १ | निखील अजित गुजराथी, कोपरगांव | जोडले आहे | जोडले आहे | जोडले आहे | जोडले आहे | **पात्र** |
| २ | बी.पी. शिंदे, पढेगांव | जोडले आहे | जोडले आहे | जोडले आहे | जोडले आहे | अपात्र (कृपया खाली नमूद टिपणीचे अवलोकन होणेस विनंती) |

उपरोक्तपैकी बी.पी. शिंदे, कोपरगांव यांना यापुर्वी संस्थानचे सर्व्हे नं.५४,५५ व १२५ तसेच गट नं. ८७,८८ येथील टॉयलेट ब्लॉकचे बांधकाम देण्यात आले होते. परंतू त्यांनी सदर कामास वेळेत सुरुवात न केल्याने त्यांचेकडून सदर काम काढून घेण्यात आले होते. तसेच सर्व्हे नं. १२४ मधिल गवरी शेडचे कामही त्यांनी उशिराने पूर्ण केल्याने त्यांना दंड आकारणेत आला होता. त्यामुळे आता वरील कामासाठी त्यांना अपात्र ठरविण्यात यावे असे मत आहे.

ठेकेदार निखील अजित गुजराथी, कोपरगांव यांनी सादर केलेले तांत्रिक लिफाफ्यामधील कागदपत्रांची छाननी केली असता ते तांत्रिक दृष्टया पात्र असल्याचे आढळून आले आहे.

सदरहूकामी तिस-यांदा ई– निविदा मागवून प्राप्त झालेल्या ई– निविदा मधील पात्र ठेकेदार यांचा कमर्शिअल बिड मा. उपसमितीचे दि.०४/०२/२०१६ रोजीचे सभेपुढे उघडणेत आला असून प्राप्त दरांचा तुलनात्मक तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Bidder Name | Estimated Rate | Quoted percentage | Quoted Rate in figures and words | |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Nikhil Ajit Gujarathi, Kopargaon | 7,95,000.00 | -1% | 7,87,050.00 | Seven lakh Eighty seven Thousand Fifty Only. |

तरी सेवाधाम इमारतीचे तळमजल्यावर साईभक्त व नागरिकांकरीता वाढीव टॉयलेटची व्यवस्था करणे कामासाठी निविदाधारक बी.पी. शिंदे, पढेगांव यांना अपात्र ठरविणेस व ठेकेदार निखील अजित गुजराथी, कोपरगांव यांचे रु.७,८७,०५०/- मात्रचे दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेचे प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१०० **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरामध्ये येणा-या साईभक्तांकरीता सार्वजनिक स्वच्छतागृहांची (विशेषतः महिलासाठी) व्यवस्था करणेसाठी, सेवाधाम इमारतीचे तळमजल्यावर शौचालयाचे वाढीव बांधकाम करणेकामी प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस, समिती अध्यक्ष व समिती सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात येऊन, सदरहू काम तातडीने सुरु करणेत आलेले आहे, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.२६ **साईभक्तांच्या सुविधेकरीता संस्थानचे जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळया जागेत शौचालयाचे बांधकाम करणेकामी प्राप्त निविदांबाबत.**

प्रस्ताव- सन २०१५ चे कुंभमेळा कालावधीत शिर्डीत भाविकांची जादा गर्दी होती. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरीक्त सोयीसुविधा विशेषतः सार्वजनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, (विशेषतः महिलासाठी) पाणी पुरवठा, सुरक्षा, अतिरीक्त प्रसाद भोजन व्यवस्था, अल्पोहार इत्यादी, सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणेत आलेल्या आहेत. तसेच सन २०१७-१८ मध्ये होणा-या श्री साईबाबा महासमाधि शताब्दी महोत्सवाचे कालावधीत होणारे संभाव्य गर्दीचे अनुषंगाने करावयाचे सोयी-सुविधांचे नियोजन करणेत येत आहे.

शिर्डी येथे भक्तांच्या सोईसुविधेसाठी स्वच्छता गृहे व स्नानगृहे उभारणेकामी मा.त्रिसदस्य समितीचे दि.३०/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ०५ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"....उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिहंस्थ कुंभमेळा सन २०१५-१६ मध्ये शिर्डी येथे होणा-या संभाव्य गर्दीचे अनुषंगाने शौचालय बांधकाम करणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन आणि मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरगाबांद खंडपिठाची परवानगी घेण्यास तत्वताः मान्यता देण्यात आली.त्यासाठी समिती सदस्यांनी संयुक्तिक पहाणी करुन संबधीत परीसराच्या उपलब्धतेनुसार तीन ठिकाणी जागा निश्चित कराव्यात, असे ठरले."*

उपरोक्त निर्णयानुसार दि.२६/०४/२०१५ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे मा. अध्यक्ष-तथा-प्रधान जिल्हा सत्र न्यायाधीश, अहमदनगर. मा.सदस्य-तथा-जिल्हाधिकारी, अहमदनगर तसेच मा.सदस्य-तथा-कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालील तीन जागाची पहाणी करुन त्या ठिकाणी शौचालय उभारणेस मान्यता दिलेली आहे.

१. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५००खोल्यां) समोरील नगर-मनमाड रस्त्यालगत पुर्व बाजूचे मोकळया जागेत.

२. शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पूर्वीचे स्वागत कक्ष) जागेत.

३. जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळया जागेत (साईप्रसाद निवासस्थाने परीसरात)

उपरोक्तपैकी जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळया जागेत (साईप्रसाद निवासस्थाने परीसरात) जागेत शौचालयाचे बांधकाम करणेकरीता येणारे रक्कम रु.९,७०,१९२/- मात्रचे खर्चास व वर्तमान पत्रातील जाहिराती द्वारे ई – निविदा मागविणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०८/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २४३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

१. त्यानुसार सदर कामासाठी विभागीय कार्यालय नाशिक यांचेमार्फत दि.१९/०८/२०१५ रोजीचे दैनिक महाराष्ट्र निरोप दया, नाशिक व दैनिक नवामराठा, अहमदनगर या वर्तमानपत्रात व साप्ताहिक फौजदार टाईम्स, अहमदनगर येथे निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.०१/०९/२०१५ पर्यंतच्या ऑनलाईन निविदा जमा करण्याच्या अंतिम मुदतीत एकही निविदा जमा झाली नाही.

२. त्यामुळे इकडील विभागाचे दि.०४/०९/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये याकामी फेर ई – निविदा प्रसिध्द करणेस मान्यता मिळाली असुन दि.२०/०९/२०१५ रोजीच्या दैनिक केसरी, अहमदनगर या वर्तमानपत्रात व साप्ताहिक गोदाजल, कोपरगाव येथे निविदा सुचना प्रसिध्द करणेत आल्या होत्या. दि.१३/१०/२०१५ पर्यंतच्या ऑनलाईन निविदा जमा करण्याच्या अंतीम मुदतीत एकही निविदा जमा झालेली नाही.

याकामी दि.३०/१०/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या ई– निविदांमधील टेक्नीकल बीड दि.०९/१२/२०१५ रोजी उघण्यात आले आहेत. त्यावेळी खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.नं | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.ए.आर.औटी | प्रशासकीय अधिकारी |
| २ | श्री. डी. झिरपे, | मुख्यलेखाधिकारी |
| ३ | श्री. डी.एम. देसाई | उप अभियंता |
| ४ | श्री. एस. एम. जोरी | उप अभियंता |
| ५ | श्री. जी. आर. कोराटे | कनिष्ठ अभियंता |
| ६ | श्री. आर.एस. साबळे | ज्यु. ई डी पी विभाग, प्रतिनिधी |

उघडण्यात आलेल्या ई – निविदांचे टेक्नीकल बीडमधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | ठेकेदाराचे नांव | कागदपत्रांचा तपशिल | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बयाना रक्कमेचा डी.डी व को-या निविदेची किंमत | सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंद केल्याचे प्रमाणपत्र. | मागील तीन वर्षात बांधकाम क्षेत्रात केलेल्या कामाचे दाखला | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी विभागाकडे नोंद आहे. /नाही. | |
| ०१ | संजय जी. गायकवाड, राहाता | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | आहे. | पात्र |

वरील प्रमाणे ठेकेदार यांनी तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता, ठेकेदार तांत्रिक दृष्टया पात्र असल्याचे आढळून आले आहे.

सदरहूकामी तिस-यांदा ई– निविदा मागवून प्राप्त झालेल्या ई– निविदा मधील पात्र ठेकेदार यांचा कमर्शिअल बिड मा. उपसमितीचे दि.०४/०२/२०१६ रोजीचे सभेपुढे उघडणेत आला असून प्राप्त दरांचा तुलनात्मक तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Bidder Name | Estimated Rate | Quoted percentage | Quoted Rate in figures and words | |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Sanjay Gaikawad, Rahata | 9,70,192.00 | 0.00% | 9,70,192.00 | Nine lakh seventy Thousand One Hundred and ninety Two Only. |

तरी साईभक्तांच्या सुविधेकरीता संस्थानचे जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळया जागेत शौचालयाचे बांधकाम करणेकामी प्रस्तावात नमूद केलेल्या ई- निविदा प्रक्रियेचे अवलोकन करणेत येऊन, ठेकेदार संजय गणपत गायकवाड, राहाता यांचे रु.९,७०,१९२/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१०१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरामध्ये येणा-या साईभक्तांकरीता सार्वजनिक स्वच्छतागृहांची (विशेषतः महिलासाठी) व्यवस्था करणेसाठी, जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळया जागेत शौचालय बांधकाम करणेकामी प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस, समिती अध्यक्ष व समिती सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात येऊन, सदरहू काम तातडीने सुरु करणेत आलेले आहे, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.२७ **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) समोरील नगर-मनमाड रस्त्यालगत पुर्व बाजूने मोकळया जागेत शौचालयाचे बांधकाम करणेकामी प्राप्त निविदांबाबत.**

प्रस्ताव- **प्रस्ताव-** सन २०१५ चे कुंभमेळा कालावधीत शिर्डीत भाविकांची जादा गर्दी होती. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरिक्त सोयीसुविधा विशेषतः सार्वजनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, (विशेषतः महिलासाठी) पाणी पुरवठा, सुरक्षा, अतिरिक्त प्रसाद भोजन व्यवस्था, अल्पोहार इत्यादी, सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणेत आलेल्या आहेत. तसेच सन २०१७-१८ मध्ये होणा-या श्री साईबाबा महासमाधि शताब्दी महोत्सवाचे कालावधीत होणारे संभाव्य गर्दीचे अनुषंगाने करावयाचे सोयी-सुविधांचे नियोजन करणेत येत आहे.

शिर्डी येथे भक्तांच्या सोईसुविधेसाठी स्वच्छता गृहे व स्नानगृहे उभारणेकामी मा.त्रिसदस्य समितीचे दि.३०/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ०५ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

*".. ..उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५-१६ मध्ये शिर्डी येथे होणा-या संभाव्य गर्दीचे अनुषंगाने शौचालय बांधकाम करणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन आणि मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठाची परवानगी घेण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली.त्यासाठी समिती सदस्यांनी संयुक्तिक पहाणी करुन संबधीत परीसराच्या उपलब्धतेनुसार तीन ठिकाणी जागा निश्चित कराव्यात, असे ठरले."*

उपरोक्त निर्णयानुसार दि.२६/०४/२०१५ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे मा. अध्यक्ष-तथा-प्रधान जिल्हा सत्र न्यायाधीश, अहमदनगर. मा.सदस्य-तथा-जिल्हाधिकारी, अहमदनगर तसेच मा.सदस्य-तथा-कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालील तीन जागाची पहाणी करुन त्या ठिकाणी शौचालय उभारणेस मान्यता दिलेली आहे.

1. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान(५००खोल्यां) समोरील नगर-मनमाड रस्त्यालगत पुर्व बाजूचे मोकळया जागेत.
2. शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पूर्वीचे स्वागत कक्ष) जागेत.
3. जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळया जागेत (साईप्रसाद निवासस्थाने परीसरात)

उपरोक्तपैकी शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पूर्वीचे स्वागत कक्ष) जागेत शौचालयाचे बांधकाम करणेकरीता येणारे रक्कम रु.९,७०,१९२/- मात्रचे खर्चास व वर्तमान पत्रातील जाहिराती द्वारे ई – निविदा मागविणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०८/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २४४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

३) त्यानुसार सदर कामासाठी विभागीय कार्यालय नाशिक यांचेमार्फत दि.१९/०८/२०१५ रोजीचे दैनिक नाशिक दौरा, नाशिक व दैनिक गांवकरी, अ.नगर या वर्तमानपत्रात व साप्ताहिक गोदाजल, कोपरगाव येथे निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.०१/०९/२०१५ पर्यंतच्या ऑनलाईन निविदा जमा करण्याच्या अंतिम मुदतीत एकही निविदा जमा झाली नाही.

४) त्यामुळे इकडील विभागाचे दि.०७/०९/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये याकामी फेर ई – निविदा प्रसिध्द करणेस मान्यता देणेत आली असुन दि.२०/०९/२०१५ रोजीच्या दैनिक गांवकरी या वर्तमानपत्रात व साप्ताहिक नगर संकेत, अहमदनगर येथे निविदा सुचना प्रसिध्द करणेत आल्या होत्या. दि.१३/१०/२०१५ पर्यंतच्या ऑनलाईन निविदा जमा करण्याच्या अंतीम मुदतीत एकाच ठेकेदाराची ऑनलाईन निविदा जमा झालेली होती.

याकामी दि.३०/१०/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर तिस-यांना निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या ई – निविदांमधील टेक्नीकल बीड दि.०९/१२/२०१५ रोजी उघण्यात आले आहेत. त्यावेळी खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.नं | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.ए.आर.औटी | प्रशासकीय अधिकारी |
| २ | श्री. डी. झिरपे, | मुख्यलेखाधिकारी |
| ३ | श्री. डी.एम. देसाई | उप अभियंता |
| ४ | श्री. एस. एम. जोरी | उप अभियंता |
| ५ | श्री. जी. आर. कोराटे | कनिष्ठ अभियंता |
| ६ | श्री. आर.एस. साबळे | ज्यु. ई डी पी विभाग, प्रतिनिधी |

उघडण्यात आलेल्या ई – निविदांचे टेक्नीकल बीडमधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | ठेकेदाराचे नांव | कागदपत्रांचा तपशिल | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बयाना रक्कमेचा डी.डी व को-या निविदेची किंमत | सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंद केल्याचे प्रमाणपत्र. | मागील तीन वर्षात बांधकाम क्षेत्रात केलेल्या कामाचे दाखला | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी विभागाकडे नोंद आहे. /नाही. | |
| ०१ | संजय जी. गायकवाड, राहाता | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | आहे. | पात्र |
| ०२ | पराग डी. देशपांडे, पुणे | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | नाही. | अपात्र |

वरील प्रमाणे अ.नं. १ व २ चे ठेकेदार यांनी सादर केलेले तांत्रिक लिफाफ्यामधील कागदपत्रांची छाननी केली असता, क्र. १ चे ठेकेदार तांत्रिक दृष्टया पात्र असल्याचे आढळून आले आहे. तसेच अ.क्र.२ चे ठेकेदार यांची कर्मचारी भविष्यनिधी कार्यालयकडे नोंदणी नसल्याने ते अपात्र आहेत.

सदरहूकामी तिस-यांदा ई – निविदा मागवून प्राप्त झालेल्या ई – निविदा मधील पात्र ठेकेदार यांचा कमर्शिअल बिड मा. उपसमितीचे दि.०४/०२/२०१६ रोजीचे सभेपुढे उघडणेत आला असून प्राप्त दरांचा तुलनात्मक तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Bidder Name | Estimated Rate | Quoted percentage | Quoted Rate in figures and words | |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Sanjay Gaikawad, Rahata | 9,70,192.00 | 0.00% | 9,70,192.00 | Nine lakh seventy Thousand One Hundred and ninety Two Only. |

तरी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) समोरील नगर-मनमाड रस्त्यालगत पुर्व बाजूने मोकळया जागेत शौचालय बांधकाम करणेकामी प्रस्तावात नमूद केलेल्या ई– निविदा प्रक्रियेचे अवलोकन करणेत येऊन, ठेकेदार संजय गणपत गायकवाड, राहाता यांचे रु.९,७०,१९२/- मात्रचे दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यदेश देणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१०२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरामध्ये येणा-या साईभक्तांकरीता सार्वजनिक स्वच्छतागृहांची (विशेषतः महिलासाठी) व्यवस्था करणेसाठी, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) समोरील नगर-मनमाड रस्त्यालगत पुर्व बाजूचे मोकळया जागेत शौचालय बांधकाम करणेकामी प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस, समिती अध्यक्ष व समिती सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात येऊन, सदरहू काम तातडीने सुरु करणेत आलेले आहे, त्याची नोंद घेण्यात आली.**

**तसेच उपरोक्त निर्णय क्र.९९ ते १०२ मध्ये नमुद स्वच्छता गृहांच्या पुढील देखभालीच्या व्यवस्थेबाबत कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अवगत करावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.२८ **इंग्लिश मिडीयम स्कुल संगणकाकरीता U.P.S. खरेदी बाबत.**

प्रस्ताव- **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतुद** - सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४) दि.१७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमामधील क्रमांक १७ ( १) व १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मरनरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक:- नवीन प्रस्ताव**

**प्रास्ताविक** – श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल ऑफिस व संगणक लॅबमध्ये ३० संगणक संच कार्यरत असून भविष्यात ४० संगणक होण्याची शक्यता असुन स्कुलमध्ये इयत्ता १ ली पासुन ते इयत्ता १० वी पर्यतचे सर्व वर्गाची सरल माहिती Online भरणे, चाचणी परिक्षा, सत्र परिक्षा निकाल तयार करणे, N.T.S.परिक्षा फॉर्म भरणे, स्कॉलरशिप परिक्षा फॉर्म भरणे, S.S.C. परिक्षा फॉर्म भरणे, विद्यार्थ्यासाठी असलेली विविध शिष्यवृत्तीची Online माहिती भरणे, तसेच कार्यालयात शाळेसबंधी विविध विषयांच्या महत्वाच्या टिपण्याची कामे चालतात.

परंतु काही वेळा अचानक विद्युत पुरवठा खंडीत होऊन सर्व संगणक प्रणाली बंद पडुन कामात व्यत्यय येऊन काम बंद पडते. संगणक प्रणाली अखंडीत चालु राहाणे करिता A.P.C.कंपनीचा १० K.V.A. Online U.P.S. With ४५ मिनिट बॅकअप S.M.F.बॅटरी, रॅक अॅड इंटरलिंक फॉर बॅटरी सर्व करांसहित २,७०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख सत्तर हजार मात्र ) १० K.V.A. चा U.P.S. नग ०१ खरेदी करणे अत्यावश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय**– उपरोक्त नमुद केलेले ४० संगणकांसाठी १० K.V.A. Online U.P.S. संस्थानचे विहित पध्दतीने दर पत्रके मागवून खरेदी करता येईल असे नम्र मत आहे.

**मागणी**- श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल करीता **U.P.S.** खरेदी करणेकामी येणारे अंदाजे रु.२,७०,०००/- (अक्षरी रु. दोन लाख सत्तर हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१०३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, इंग्लिश मिडीयम स्कुलमधील संगणकाकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे १० नग U.P.S. विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. मात्र तत्पुर्वी सदरहू U.P.S. शासनाच्या दर करारावर आहेत का, ते पहावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

विषय नं.२९ **आरोग्य विभागातील कायम व कंत्राटी कर्मचा-यांच्या मुलांकरीता पाळणाघर सुरु करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद** – क्र. १७ (१) व १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहारूय करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी , शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**प्रस्तावित**– मा.श्री. विजय कुमार सदस्य राष्ट्रीय सफाई कर्मचारी भारत सरकार नवी दिल्ली यांनी दिनांक १६.०९.२०१५ रोजी मा.कार्यकारी अधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी, सर्व खातेप्रमुख तसेच सफाई कामगारांसमवेत बैठक आयोजित करण्यात येऊन सफाई कामगारांच्या समस्या विषद केलेल्या आहेत. त्यास अनुसरुन सफाई कामगारांच्या मुले/ मुली ०२ ते ०३ या वयोगटातील मुलांकरिता इंग्लिश मिडीयम स्कुल विभागामार्फत पाळणाघर सुरु करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

**अ)** बांधकाम विभागामार्फत योग्य ठिकाणी ०२ खोल्यांचे बांधकाम करणे गरजेचे आहे. कारण दरवर्षी नैसर्गिक तुकडीवाढीमुळे वर्ग खोल्या अपु-या पडत आहेत. यापूर्वी बांधकाम विभागास वरील मजल्याचे बांधकाम करणे बाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. बांधकाम विभागाने एफ एस आय कमी असल्याने कारण सांगुन असमर्थता दर्शविली आहे. बांधकाम विभागाने ०२ खोल्यांचे योग्य ठिकाणी बांधकाम करुन दिल्यास माहे जुन २०१६ पासुनआरोग्य विभागातील कायम व कंत्राटी कर्मचा-यांच्या मुलांकरिता पाळणाघर सुरु करता यईल.

**ब)** लहान मुलाना करमणूक म्हणुन खेळणी खरेदी कराव्या लागतील.

**क)** कॅन्टीन विभागामार्फत दूध, बिस्किटे, फळे असा पोषक आहार द्यावा लागेल.

ड) ज्या ठिकाणी पाळणा घर चालविले जातात अशा ठिकाणांना भेटी देऊन माहिती घ्यावी लागेल याकरिता आरोग्य विभागा कडून कमीतकमी २० मुले मिळाली तरच पाळणाघर सुरु करता येईल. असे नम्र मत आहे.
इ) संस्थनमध्ये यापुर्वी पाळणाघर चालविले जात नव्हते, त्यामुळे पाळणा घरासंबंधी अटी शर्ती शासन नियम या सर्व बाबींची माहिती घ्यावी लागले.
ई) उपरोक्तप्रमाणे पाळणाघराची माहिती घेतलेनंतर मुलांना सांभाळण्यासाठी प्रशिक्षित महिला कर्मचारी , आया कामगार विभागा मार्फत कंत्राटी स्वरुपात घेता येतील.

**विभागाचा अभिप्राय** – मा.श्री विजय कुमार सदस्य राष्ट्रीय सफाई कर्मचारी भारत सरकार यांनी निर्देशित केलेप्रमाणे इंग्लिश मिडीयम स्कुलकडे पाळणाघर सुरु करणेकामी उपरोक्त प्रमाणे अ, ब, क, ड, इ, ई कार्यवाही बाबत सदरचा विषय मा. त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१०४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन निर्णयानुसार संस्थानमधील सर्व महिला कर्मचा-यांच्या मुला-मुलींसाठी एकत्रित पाळणाघर सुरु करणेकामी सुधारित प्रस्ताव सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल/ प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

विषय नं.३० **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल करीता नवीन झेरॉक्स मशीन खरेदी बाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये नविन झेरॉक्स मशिन खरेदीकामी खालीलप्रमाणे कार्यवाही झालेली आहे.

अ) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल करिता सन २००८ मध्ये मे. रिको कंपनी मॉडेल नं.२०२० डी फोटो कॉपीयर प्रती मिनिट २० कॉपीज या स्पीडचे रु. १,०१,९२०/- किमतीचे झेरॉक्स मशिन खरेदी विभागामार्फत खरेदी करणेत आले आहे. सदर मशिन कॉपीजची मर्यादा ६ लाख प्रती नग होती. सन २०१४ अखेर या मशिनवर एकुण ८ लाखापेक्षा जास्त कॉपीज काढण्यात आलेल्या आहेंत. सदर मशीनची कॉपीज काढण्याची मर्यादा संपलेली असून सदर मशीनची कायम दुरुस्ती करावी लागत आहे. तसेच वेळोवेळी ड्रम, डेव्हलपर व टोनर टाकावे लागत असून झेरॉक्स कॉपीज खराब निघत आहेत. सन २०१०-११ पासून झेरॉक्स मशिनचे सर्व्हिसिंग कॉंट्रक्ट देण्यात येत असून, सन २०१३-१४ अखेर एकुण रु ६०,०००/- मात्र इतका खर्च झालेला आहे. तसेच सर्व्हिसिंगचे वेळोवेळी लागणारे ड्रम, डेव्हलपर व टोनर शाळेकडून खरेदी करणेत आले आहेत.

त्यामुळे खालील वर्णनाचे झेरॉक्स मशिन खरेदी करणेस व त्याकामी येणारे रक्कम रु १,५०,०००/- मात्रचे खर्चास मा.व्य.समीतीचे दि.०९/१२/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१०४० अन्वये मान्यता मिळालेली आहे.

| झेरॉक्स मशीन तपशिल | अंदाजे किंमत रुपये |
|---|---|
| Digital Copier With Printer(Size A5-A3 ) Minimun Copying Speed-20,cpm Zoom: 50-200%,Duplex inbuilt, 600 dpi Resolution, Paper Tray Capacity: 250 X 1 Sheets Tray,500x1 sheets, 100 Sheet By pass. RAM 128 MB, Color Scanner. | रु. 1,50,000/- |

सदरचे मशिन खरेदीचा प्रस्ताव संस्थानचे विहित पध्दतीप्रमाणे खरेदी विभागाकडे वर्ग करणेत आला होता. खरेदी विभागामार्फत कोटेशन/निविदा मागवून मशिन खरेदी संबधी सर्व कार्यवाही पूर्ण करुन मा. व्यवस्थापन समितीचे सभेत विषय सादर करणेत आला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०४/२०१५ रोजी सभेतील निर्णय क्र.११६ नुसार झेरॉक्स मशीन खरेदीबाबत विभागाचे मागणीनुसार शासनाकडील उपलब्ध दरपत्रकासह सदरहुन प्रस्ताव फेरसादर करण्यात यावा असे ठरले त्यामुळे खरेदी विभागामार्फत जा.नं.७७/२०१५ दि.१५/०६.२०१५ रोजी प्रस्ताव पुन्हा इंग्लिश मिडीयम स्कुलकडे पाठविण्यात आलेला आहे.

ब) त्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०४/२०१५ सभेतील निर्णय क्र.११६ नुसार शासनाकडील रेट कॉन्ट्रक्ट बाबत (R.C.) माहीती घेऊन मे. रिको इंडिया लि. नवी दिल्ली यांनी भारत सरकार, नवी दिल्ली यांचेशी केलेल्या रेट कॉन्टॅक्ट ची यादी रिको कंपनीचे अधिकृत डिलरने डिजीटल ऑफिस सोल्युलेशन अहमदनगर यांनी सादर केलेले आहे. यांनी सदर यादीनुसार खालील वर्णनाचे झेरॉक्स मशिन इंग्लिश मिडीयम स्कुल करिता खरेदी करता येईल.

| अ.क्र. | खरेदीचा तपशिल | वर्णन | शासन दरानुसार निश्चित केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| ०१. | Digital Multifunctional Copier Machines {Size A-3} | Minimum copying/ printing speed {cpm}: 35/35 paper size {original/Image}: A3/ A3RAM {MB}:256, Hard Disk:20GB,Byepass:50 Sheets | रु. १,७२,६६०/- + व्हॅट ------------------------ रु. १,८१,२९३/- |

श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकरिता झेरॉक्स मशिन खरेदीकामी रु.१,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. मात्र शासन दरानुसार रिको कंपनीचे मशिन खरेदीस रु.१,८१,२९३/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

सदर मशिनबाबत मे.रिको इंडीया लिमिटेड, नवी दिल्ली यांनी भारत सरकार, नवी दिल्ली यांचेशी दराबाबत करार केलेला असल्याने, महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय शासन निर्णय क्र.भांकस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग–III/ उदयोग-४ दि.३० ऑक्टोबर, २०१५ नुसार सदर मशिन खरेदीकामी दरपत्रके अथवा निविदा न मागविता मे.रिको इंडिया लिमिटेड, नवी दिल्ली यांचे अहमदनगर जिल्हयातील अधिकृत वितरक मे. डिजीटल ऑफिस सोल्युशन, अहमदनगर यांचेकडून उपरोक्त वर्णनाचे व रक्कम रु.१,८१,२९३/- मात्रचे किमंतीचे झेरॉक्स मशिन मा.व्य.समितीचे मान्यतेने खरेदी करता येईल. तरी सदरच्या खरेदीसाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी मा.व्य.मं.समिती समोर निर्णयार्थ सादर,

निर्णय क्र.१०५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल करीता ०१ नग नवीन झेरॉक्स मशीन विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,८१,२९३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. मात्र तत्पुर्वी सदरहू झेरॉक्स मशीन शासनाच्या दर करारावर आहे का, ते पहावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

विषय नं.३१ **श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरीता प्रयोगवहया (जर्नल) छपाई करणेबाबत.**

प्रस्ताव- **संदर्भ** - शासन निर्णय क्र. भांखस- २०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, मंत्रालय, मुंबई-३२ दि. ३०/१०/२०१५

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** क्र.१७(१) व १७ (२) (ध) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील.तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** नवीन प्रस्ताव.

**प्रास्तविक:-** श्री साईबाबा कनिष्ठ महाविदयालयात सन २०१६-२०१७ मध्ये इ.११ वी विज्ञान शाखेत ३२० विदयार्थी व १२ वी विज्ञान शाखेत २६२ याप्रमाणे ५८२ विदयार्थी शिक्षण घेणार आहेत.या वर्गातील विदयार्थ्यांना भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र,माहिती तंत्रज्ञान व गणित या विषयांच्या प्रयोगवहयाची (जर्नल) छपाई करुन विद्यार्थ्यांना विक्रीस उपलब्ध करुन देणे आहे.

**मागणी:-** खालीलप्रमाणे प्रयोगवहयांची छपाई करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | छपाई तपशिल | मागिल शिल्लक | छपाई संख्या | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | भौतिकशास्त्र- जर्नल | १३० | ५०० | ७५.०० | ३७,५००.०० |
| ०२ | रसायनशास्त्र - जर्नल | १२२ | ५०० | ६५.०० | ३२,५००.०० |
| ०३ | जीवशास्त्र - जर्नल | १२७ | ५०० | ८०.०० | ४०,०००.०० |
| ०४ | माहिती तंत्रज्ञान- जर्नल | २५६ | ४०० | ६०.०० | २४,०००.०० |
| ०५ | गणित - जर्नल | ३५ | ५०० | ६०.०० | ३०, ०००.०० |
| | | | | **एकूण रुपये -** | **१,६४,०००.००** |

( अक्षरी रुपये – एक लाख, चौसष्ट हजार )

प्रयोगवहयाची (जर्नल) छपाई ही रक्कम रुपये दहा लाखा पेक्षा कमी असल्याने सदर खर्चाच्या विषयास प्रस्तावित कामी शासनाची/मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.सदर छपाई खर्च हा सन २०१५-१६ चे अंदाज पत्रकीय तरतुद रुपये ६ लाख मंजुर करण्यात आली आहे. सदरचा खर्च शिल्लक रक्कम रुपये-२,३७,९००/- मधून करता येईल.

**संस्थान अधिनियम/ठराव या नुसार अनुमान:-** खर्चाचा विषय आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** वरीलप्रमाणे प्रयोगवहयांची (जर्नल) छपाई कोटेशन मागवून करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु. १,६४,०००/-(अक्षरी रुपये- एक लाख,चौसष्ट हजार) मात्रचे खर्चास तसेच प्रयोगवहयांच्या छपाई न्यूनतम दरावर १०% सेवाशुल्क आकारुन प्रयोगवहया विक्री करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.१०६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे प्रयोगवहया (जर्नल) ची विहीत पध्दतीने कोटेशन मागवून छपाई करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,६४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू प्रयोगवहया छपाई दरावर १०% सेवाशुल्क आकारुन विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात याव्या, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

विषय नं.३२ **श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरीता उत्तरपत्रिकांची छपाई करणेबाबत.**

प्रस्ताव- शासन निर्णय क्र. भांखस- २०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, मंत्रालय, मुंबई-३२ दि. ३०/१०/२०१५

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** क्र.१७(१) व १७ (२) (ध) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील.तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** मा. त्रिसदस्यीय समिती सभा दि.१०नोव्हेंबर,२०१६ चे सभेतील निर्णय क्र.५१४

**प्रास्तविक:-** कनिष्ठ महाविदयालयातील ११ वी कला,वाणिज्य व विज्ञान शाखेत ७५३ विदयार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच इ.११वी माहे जून २०१६ मध्ये कला,वाणिज्य व विज्ञान शाखेत ८०० विदयार्थी प्रवेश घेतील. या वर्गातील विदयार्थ्यांना सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात चाचणी व वार्षिक परीक्षेसाठी विदयार्थ्यांना घेण्यात येणा-या परीक्षासाठी उत्तरपत्रिकांची आवश्यकता आहे. मा. त्रिसदस्यीय समिती सभा दि. १० नोव्हेंबर,२०१६ चे सभेतील निर्णय क्र. ५१४ नुसार उत्तर पत्रिकांची छपाई ही रक्कम रु. ३,००,०००/- पर्यंत असल्याने प्रचलित पध्दतीने छपाईधारकांकडून कोटेशन मागवून छपाई करता येइल.

**मागणी:-** खालीलप्रमाणे उत्तरपत्रिकांची छपाई करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | छपाई तपशिल | छपाई संख्या | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | उत्तर पत्रिका (पुरवणी) २ पानी ७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर - A 4 साईज | २०००० प्रती | ००.७५ प्रती नग | १५०००.०० |
| | उत्तर पत्रिका (पुरवणी) ४ पानी ७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर - A 4 साईज | १०००० प्रती | १.५० प्रती नग | १५०००.०० |
| ०२ | उत्तर पत्रिका ८ पानी ७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर - A 4 साईज | २०००० प्रती | २.५० प्रती नग | ५००००.०० |
| ०३ | उत्तर पत्रिका १२ पानी ७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर - A 4 साईज | २०००० प्रती | ३.५० प्रती नग | ७००००.०० |
| ०४ | उत्तर पत्रिका १६ पानी ७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर - A 4 साईज | १५००० प्रती | ४.०० प्रती नग | ६००००.०० |
| | | | एकूण रुपये- | २,१०,०००.०० |

वरील उत्तरपत्रिकांची छपाई करणेकामी अंदाजे रुपये- २,१०,०००/- (अक्षरी रुपये- दोन लाख, दहा हजार) मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च उत्तरपत्रिकां छपाईकामी बजेट तरतुद रु,२५,००,०००/- मधून करता येईल.

**संस्थान अधिनियम/ठराव या नुसार अनुमान:-** खर्चाचा विषय आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** मा. त्रिसदस्यीय समिती सभा दि. १० नोव्हेंबर,२०१६ चे सभेतील निर्णय क्र.५१४ नुसार प्रास्तविक मध्ये नमुद केलेप्रमाणे उत्तर पत्रिकांची छपाई ही रक्कम रु. ३,००,०००/- पर्यंत असल्याने प्रचलित पध्दतीने छपाईधारकांकडून कोटेशन मागविणेस तसेच त्याकामी येणा-या अंदाजे रुपये- २,१०,०००/- (अक्षरी रुपये- दोन लाख, दहा हजार) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.१०७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे उत्तरपत्रिकांची विहीत पध्दतीने कोटेशन मागवून छपाई करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

विषय नं.३३ **श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरीता लॅपटॉप खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- शासन निर्णय क्र भांखस- २०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, मंत्रालय, मुंबई-३२ दि. ३०/१०/२०१५

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** क्र.१७ (१) व १७(२)(ध) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** नवीन प्रस्ताव. .

**प्रास्तविक-** श्री साईबाबा कनिष्ठ महाविदयालयातील ११ वी विज्ञान शाखेच्या तीन तसेच इ.१२ वी विज्ञान शाखेच्या तीन तुकडया असून, विद्यार्थी संख्या ४८० आहे. विद्यार्थ्यासाठी संगणक प्रयोग शाळेत संगणकावर प्रात्यक्षिक करण्याचे शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यासाठी प्रात्यक्षिक करणेकामी यापूर्वी खरेदी करण्यात आलेले २५ नग संगणक अपुरे पडत आहे. विद्यार्थी संख्या विचारात घेता लॅपटॉप खरेदी करणे आवश्यक आहे. सध्या मार्केट मध्ये संगणकाची किंमत जास्त आहे तर लॅपटॉपची किंमत कमी असते. लॅपटॉपसाठी फिटींगची आवश्यकता भासत नाही. संगणक मात्र एका जागेवरुन दुस-या जागेवर स्थलांतर करणेस कालावधी लागतो. त्यासाठी लॅपटॉप खरेदी करावयाचे आहेत.

**मागणी:-** लॅपटॉप यांचा तपशिल खालीलप्रमाणे.

Laptop Specification :- (DELL/HP/LENOVO)

Laptop - (QTY- 12 NOS )
Processor:- Core i3 4th GEN ( 3.3GHZ, 4 MB Cache)/ H81 Chipset/4 GB DDR3 RAM/ 500 GB HDD/Bluetooth/ Wireless Optical Mouse/Wi-Fi/Media Card Reader/DVD R-RW/ RJ- 45, Webcam/Win 10 SL 64 Bit/Screen size 15.6 Inch LED TFT/ Warranty:- 3 Years Parts/3 Years Onsite.

वरील लॅपटॉप खरेदी करणेकामी अंदाजे रुपये- ३,००,०००/- (अक्षरी रुपये- तीन लाख ) मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०१५-१६ संगणक खरेदी बजेट तरतूद रक्कम रु.१०,००,०००/- मधून करता येईल. संदर्भीय शासन निर्णयानुसार लॅपटॉप खरेदी ही रक्कम रु. ३,००,०००/- पर्यंत आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव या नुसार अनुमान:-** खर्चाचा विषय आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** वरील लॅपटॉप संस्थानचे वेबसाईट वर जाहिरात देणेस व प्रचलित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रुपये- ३,००,०००/- (अक्षरी रुपये- तीन लाख) मात्र खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.१०८ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, विद्यार्थ्यांना लॅपटॉप वापरणे योग्य होणार नसल्याने आवश्यकतेनुसार लॅपटॉप ऐवजी संगणक खरेदी करणेत यावे. याकरिता उपरोक्त विषय नं.३२ ते ३६ मध्ये नमुद केलेप्रमाणे लॅपटॉप/ टॅबलेट/ संगणक संच/ प्रींटर्स एकत्रित खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेत यावी. तसेच याकामी येणा-या एकत्रित खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

विषय नं.३४ **श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरीता संगणक खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- शासन निर्णय क्र. भांखस- २०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, मंत्रालय, मुंबई-३२ दि. ३०/१०/२०१५

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** क्र.१७(१) व १७ (२) (ध) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किवा तसे करण्यास सहाय्य करील.तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** मा.व्यवस्थापन समिती दि.२८/११/२०१५ चे सभेतील निर्णय क्र.५३१

**प्रास्तविक-** श्री साईबाबा कनिष्ठ महाविदयालयातील ११ वी विज्ञान शाखेच्या तीन तसेच इ.१२ वी विज्ञान शाखेच्या तीन तुकडया असून, विद्यार्थी संख्या ४८० आहे. विद्यार्थ्यासाठी संगणक प्रयोग शाळेत संगणकावर प्रात्यक्षिक करण्याचे शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यासाठी प्रात्यक्षिक करणेकामी यापूर्वी खरेदी करण्यात आलेले २५ नग संगणक अपुरे पडत आहे. विद्यार्थी संख्या विचारात घेता संगणक खरेदी करणे आवश्यक आहे.

**मागणी:-** संगणक यांचा तपशिल खालीलप्रमाणे.

All In One Desktop Specifiction :- (DELL/HP/ACER/LENOVO)

| |
|---|
| All In One Desktop (QTY- 25 NOS.)<br>Processor :- Core i3 4th GEN. (3.3 GHZ, 4 MB Cache)/ H81 Chipset/4 GB DDR3 RAM/1 TB HDD/Bluetooth/ Wireless Keyboard & Wireless Optical Mouse/Wi-Fi/ Media Gard Reader/DVD R-RW/ RJ- 45, Webcam/Win 10, SL 64 Bit/Screen size 20 Inch LED TFT /Warranty:- 3 Years Parts/3 Years Onsite. |

वरील संगणक खरेदी करणेकामी अंदाजे रुपये- ९,६०,०००/- (अक्षरी रुपये- नऊ लाख,साठ हजार) मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०१५-१६ संगणक खरेदी बजेट तरतूद रक्कम रु.१०,००,०००/- मधून करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** वरील प्रास्तविक संगणक खरेदी संस्थानचे खरेदी विभागामार्फत ई-टेंडर मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रुपये- ९,६०,०००/- (अक्षरी रुपये- नऊ लाख, साठ हजार) मात्र खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.१०९ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, विद्यार्थ्यांना लॅपटॉप वापरणे योग्य होणार नसल्याने आवश्यकतेनुसार लॅपटॉप ऐवजी संगणक खरेदी करणेत यावे. याकरिता उपरोक्त विषय नं.३२ ते ३६ मध्ये नमुद केलेप्रमाणे लॅपटॉप/ टॅबलेट/ संगणक संच/ प्रींटर्स एकत्रित खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेत यावी. तसेच याकामी येणा-या एकत्रित खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

विषय नं.३५ **नवीन संगणक संच, लॅपटॉप, टॅबलेट व प्रींटर्स खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम- सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम १७ (२ ड) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी , शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

**प्रास्ताविक–** आपले श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सध्या खालील प्रमाणे ११ व्यवसायांच्या (ट्रेडच्या) २२ तुकडया कार्यरत आहेत. सदर ट्रेड हे केंद्र शासनाच्या कौशल्य विकास मंत्रालय अंतर्गत डायरेक्टोरेट जनरल ऑफ एम्प्लॉयमेंट अ‍ॅण्ड ट्रेनिंग DGE&T यांचे मान्यतेने व राज्य शासनाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखाली चालविले जाते.

| अ.नं. | ट्रेड | प्रशिक्षण कालावधी | तुकडींची प्रशिक्षणार्थी संख्या | | एकूण प्रशिक्षणार्थी संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष | | |
| 01 | इलेक्ट्रीशियन | | 21 | 21 | 42 | |
| 02 | फिटर | | 21 | 21 | 42 | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 03 | टर्नर | 2 वर्ष | 16 | 16 | 32 | |
| 04 | मोटर मेकॅनिक | | 21 | 21 | 42 | |
| 05 | मेकॅ.रेफ्री.ॲण्ड एसी | | 26 | 26 | 52 | |
| 06 | मशिनिष्ट ग्राईण्डर | | 16 | 16 | 32 | |
| 07 | टुल ॲण्ड डायमेकर(जिग्ज ॲण्ड फिक्चर ) | | 21 | 21 | 42 | |
| 08 | इन्फॉरमेशन ॲण्ड कम्नयुनिकेशन टेक्नॉलॉजी सिस्टीम मेंटनन्स (ICTSM) | | 18 | 21 | 39 | |
| | | 1 वर्ष | प्रथम पाळी | व्दितीय पाळी | | |
| 09 | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिग असिस्टंट COPA | | 20 | --- | 20 | |
| 10 | वेल्डर | | 21 | 21 | 42 | |
| 11 | ट्रॅक्टर मेकॅनिक | | 21 | 21 | 42 | |
| | | एकूण | 222 | 205 | 427 | |

वरील ट्रेड व्यतिरिक्त संस्थेमध्ये महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्या. (MKCL) यांचे MS-CIT हे संगणक अभ्यासक्रमाचे अभ्यासकेंद्र चालविले जाते. वरील ITI व्यवसायांमध्ये अ.क्र.८ व ९ हे व्यवसाय संगणकाशीथेट संबधित अभ्यासक्रम आहेत. वरील सर्व अभ्यासक्रमासाठी सध्या संस्थेकडे असलेल्या संगणक संचाची स्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | संगणक तपशील/मेक | संख्या | खरेदी/देणगी तारीख | सध्या स्थिती | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | चालू व वापरात | बंद व वापरात येऊ शकत नसलेले | |
| 01 | Wipro | 01 | खरेदी 2004 | --- | 01 | |
| 02 | L.G. | 06 | देणगी 2005 | --- | 06 | |
| 03 | Compaq | 03 | देणगी 2006 | --- | 03 | |
| 04 | Compaq | 07 | देणगी 2007 | --- | 07 | |
| 05 | H.C.L. | 23 | खरेदी 2007 | 14 | 09 | |
| 06 | I.B.M. (Lenova) | 01 | खरेदी 2007 | 01 | --- | |
| | एकूण | 41 | | 15 | 26 | |

वरिल प्रमाणे एकूण ४१ संगणकापैकी १५ संगणक सध्या कार्यरत असले तरी त्यांची क्षमता व स्पेसिफिकेशन सध्या नव्याने आलेल्या कार्यप्रणाली (Operating System) या सध्याच्या उपलब्ध जुन्या संगणकावर Match होत नाहीत किंवा Support करत नाहीत. त्यामुळे नव्याने सम◌ाविष्ट झालेले किंवा नविन कार्यप्रणालीनंतरचे संगणक प्रशिक्षण आपण प्रशिक्षणार्थ्यांना देणे अशक्य होत आहे.तसेच सध्याच्या वरिल संगणकाचे Standard Life सहा वर्ष संपल्याने ते कालबाहयही झालेले आहेत.

ऑगस्ट, २०१४ सत्रापासून डी.जी.ई.टी, नवी दिल्ली यांनीसंस्थेतील सर्व व्यवसायांच्या एम्प्लॉयबिलीटी स्किल हा अनिवार्य विषय सुधारित अभ्यासक्रमानुसार निश्चित केलेली आहे. त्यासाठी सर्व व्यवसायांच्या प्रशिक्षणार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणे कामी लेटेस्ट कॉन्फीग्रेशचे १० संगणक संचासह एक संगणक लॅबोरेटरी बनविणे अनिवार्य केलेले आहे. तसेच २०१४ च्या सुधारीत अभ्यासक्रमासनुसार कोपा ट्रेडसाठी १० संगणकव १ लॅपटॉप आय.सी.टी.एस.एम. ट्रेडसाठी १२ संगणक १ लॅपटॉप व २ टॅबलेट त्यांच्या त्यांच्या संगणक लॅबसाठी समाविष्ट केले आहेत. यांची व उपलब्ध साहित्याची एकत्रित स्थिती खालील प्रमाणे.

| अ.नं. | लॅब तपशिल | आवश्यक साहित्य व (उपलब्ध साहित्य) | | | | निव्वळ आवश्यक साहित्य | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संगणक | लॅपटॉप | टॅब | प्रिंटर | संगणक | लॅपटॉप | टॅबलेट | प्रिंटर |
| 1 | एम्प्लॉबिलिटी स्कील विषय व MS-CIT कक्ष एकत्रित | 10 (4) | 00 (00) | 00 (00) | 01 (01) | 10 | 00 | 00 | 01 |
| 2 | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिग असिस्टंट (COPA) ट्रेड | 10 (09) | 02 (00) | 00 (00) | 02 (02) | 10 | 02 | 00 | 02 |
| 3 | इन्फॉरमेशन ॲण्ड कम्नयुनिकेशन टेक्नॉलॉजी सिस्टीम मेंटनन्स (ICTSM) | 12 (01) | 01 (00) | 02 (00) | 04 (03) | 12 | 01 | 02 | 04 |
| | | 32 (14) | 03 (0) | 02 (0) | 7 (0) | 32 | 03 | 02 | 07 |

वरीलप्रमाणे सध्या सुधारीत अभ्यासक्रम मानकानुसार एकूण ३२ संगणक, २ लॅपटॉप, २ टॅबलेटची तसेच ४ प्रिंटर्सची आवश्यकता आहे. सध्या संस्थेत असलेल्या संगणकापैकी १० संगणक पुढील एक वर्षापर्यंतवापरता येतील, उर्वरीतमध्ये २४ संगणक २ लॅपटॉप, २ टॅबलेट व ४ प्रिंटर्स खरेदी करावे लागेल, दोन संगणक – परीक्षा प्रवेश प्रक्रीयेसाठी तपशिल व अंदाजे खर्च खालील प्रमाणे.

| Sr.No. | Description | Qty.Req. | Appx.Rate | Appx.Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 01 | HP / Dell / Lenova<br>Intel Core I3-Processor (Dual Core,3MB Cache, 3.40GHz, w/HD 4400 Graphics)<br>Standard Power Supply,4GB (1x2GB) 1600MHz DDR3 Non –ECC.<br>500 GB,3Sinch Serial ATA (7.200 Rpm) Hard Drive<br>No Optical Drive,Intel Core I3 Label<br>19" Square Monitor with LED Back Light<br>Intel Intergrated Graphics, USB Optical Mouse and Keyboard.<br>Window 8.1 Pro 64 bit with paper Licence.<br>3 Yr Next Business Day Onsite Service. | 20 Set | 37000/- | 7,40,000.00 |
| 02 | (HP / Dell / Lenova ) Laptop<br>Microsoft Window 10 Professional class 64-Bit desktop with Microsoft Window 7 Pro 64-Bit or higher on system with paper Licence.<br>Intel Core I7-4712MQ (2.3GHz,6MB),Must support Virtualization.<br>8.0GB,1600MHz,with at least one (1) free slot for additional memory,expandable to 16.0GB.<br>Installed 512MB (non-shared memory)<br>15.4 Inch, WXGA.<br>1TB, 7200 RPM.<br>8X DVD +/-RW.<br>Four (4) USB v2.0 or v3.0 (**Minimum of one (1) of these ports must be USB v3.0).<br>One (1) HDMI v1.4 OR One (1) Display Port/Mini Display Port.<br>Integrated Gigabit Ethernet (10,100,1000), Wake on LAN.<br>1.0 Megapixels for Still Photos,9 Megapixies for Video Resolution, 30fps@720,Adobe, Flash compatible, Window 10/817 compatible,supports Skype for Business.<br>A/C adapter w/3' power cord.<br>Battery Life average 6 hrs.<br>3 Year, Next Business Day, On-Site Service. | 02 Nos. | 40000/- | 80,000.00 |
| 03 | Tablet P.C. ( HP / Dell / Lenova )<br>10.1 Inch HD Multi-Touch Display.<br>NVIDIA Tegra 2 Dual Core Mobile Processor.<br>Android 3.0 Honeycomb.<br>NVIDIA GeForce GPU.<br>1GB DDR2 Memory.<br>32GB on board.<br>Micro SD memory card up to 32 GB.<br>802.11b/g/n Wireless(802.11n2.4GHz only)<br>Bluetooth 2.1+EDR.<br>Micro USB 2.0 Port,USB 2.0Pord,Micro HDMI Out (support Dual Display)<br>5MP Rear Facing Camera with Auto Focus and single LED flash 2MP Front Facing Camera.<br>Sensor: G-Sensor, E-Compass, L-Sensor, Gyro-meter. | 02 Nos. | 30000/- | 60,000.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Rechargeble Lithium-ion polymer Battery.<br>Up to 8-hours battery life. | | | |
| 04 | **LCD Projector:-** LCD projector (1024x768) having minimum 2800 Lumens brighness,aspect ratio-4, Resolution-1024x768,Contrast ratio-3000:1,with all necessary accessaries & having DLP technology, make Sony VPL-EX275 | 02 Nos. | 40000/- | 80,000.00 |
| 05 | Passbook Printer make HP/ Canon/Epson/ Samsung/ Ricoh | 01 No. | 8000/- | 8,000.00 |
| 06 | USB Harddisk 1 TB Memory make Sony/ Samsung/ Seggate | 03 Nos. | 4000/- | 12,000.00 |
| | | — | | **9,80,000.00** |

मागणी:- डी.जी.ई.टी. नवी दिल्ली यांच्या संकेत-स्थळावरील या व्यवसायाच्या नविन २०१४ च्या अभ्यासक्रम पुस्तिकेनुसार (Latest Revised Syllabus) ICTSM व COPA या व्यवसायाठी वरिलप्रमाणे संगणक संच, लॅपटॉप,टॅब व प्रिंटर खरेदी करावे लागतील.

अनुमान – वरील प्रमाणे कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत –** वरील नमुद केलेले संगणक संच व साहित्य खरेदी करणेस अंदाजे रु. ९,८०,०००/- (रुपये नऊ लाख ऐंशी हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदरील संगणकसंच / साहित्य खरेदी विभागार्फत विहीत प्रचलित पध्दतीने खरेदी करणेस व येणा-या खर्चास निर्णयासाठी मा.व्यवस्थापन समिती समोर फेरसादर.

निर्णय क्र.११० **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, विद्यार्थ्यांना लॅपटॉप वापरणे योग्य होणार नसल्याने आवश्यकतेनुसार लॅपटॉप ऐवजी संगणक खरेदी करणेत यावे. याकरिता उपरोक्त विषय नं.३२ ते ३६ मध्ये नमुद केलेप्रमाणे लॅपटॉप/ टॅबलेट/ संगणक संच/ प्रींटर्स एकत्रित खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेत यावी. तसेच याकामी येणा-या एकत्रित खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.** (कार्यवाही- प्राचार्य, आय.टी.आय.)

---

विषय नं.३६ **श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर करीता संगणक खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद –** क्र.१७ (१) व १७ (२)(ध) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक धोरण संस्था स्थापन करील.

**प्रास्ताविक-** श्री साईबाबा कन्या विद्यालयाकरीता इ.५वी ते १०वीच्या एकुण १२ वर्ग तुकडया असुन ६८८ विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थिनीसाठी संगणक प्रयोगशाळेत संगणकावर प्रात्यक्षिक करण्याचे शिक्षण दिले जाते. विद्यार्थिनींसाठी प्रात्यक्षिक करणेकामी यापूर्वी खरेदी करण्यात आलेले २५ नग संगणक अपुरे पडत आहेत. विद्यार्थिनी संख्या विचारात घेता ०५ नग (Desktop QTY-04 Nos. & Laptop QTY-01 Nos.) संगणक खरेदी करणे आवश्यक आहे. खरेदी करावयाचा संगणकाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**मागणी-** संगणक व लॅपटॉप यांचा तपशिल खालीलप्रमाणे

C) All In One Desktop Specification :-

**All In One Desktop (QTY-04 NOS.)**

Processor :- Core i3 4th GEN. (3.3 GHZ, 4MB Cache)/H81 Chipset/4 GB DDR3 RAM/500 GB HDD/ Bluetooth/ Wireless keyboard & Wireless Optical Mouse/Wi-Fi/Media Gard Reader/ DVD R-RW/ RJ-45, Webcam/Win 8.1 SL 64 Bit/Screen size 20 Inch LED TFT/Warranty :- 3 Years Parts/3 Years Onsite.

D) Laptop Specification :-

**Laptop (QTY-01 NOS.)**

Processor:- Core i3 4th GEN. (3.3 GHZ, 4MB Cache)/H81 Chipset/4 GB DDR3 RAM/500 GB HDD/ Bluetooth/ Wireless keyboard & Wireless Optical Mouse/Wi-Fi/Media Gard Reader/ DVD R-RW/ RJ-45, Webcam/Win 8.1 SL 64 Bit/Screen size 15.6 Inch LED TFT/ Warranty :- 3 Years Parts/3 Years Onsite.

वरील संगणक खरेदी करणेकामी अंदाजे रूपये १,६०,००० /- (अक्षरी रक्कम रूपये – एक लाख साठ हजार) मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च अंदाजपत्रक सन २०१५-१६ च्या मशिनरी दुरूस्ती व देखभाल बजेट तरतूद रक्कम रू. २,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये – दोन लाख) मात्र मधून करता येईल.

**संस्थान अधिनियम/ठराव या नुसार अनुमान- आर्थिक खर्चाचा विषय आहे.**

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत-** संगणक खरेदी आय.टी. विभागामार्फत एच.पी., लेनोव्हो व डेल कंपनीचे विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करता येईल. सदर संगणक आय.टी. विभागामार्फत खरेदी करणेस व खरेदीकामी अंदाजे रू.१,६०,००० /- (अक्षरी रक्कम रूपये– एक लाख साठ हजार) मात्र खर्चाचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१११ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, विद्यार्थ्यांना लॅपटॉप वापरणे योग्य होणार नसल्याने आवश्यकतेनुसार लॅपटॉप ऐवजी संगणक खरेदी करणेत यावे. याकरिता उपरोक्त विषय नं.३२ ते ३६ मध्ये नमुद केलेप्रमाणे लॅपटॉप/ टॅबलेट/ संगणक संच/ प्रींटर्स एकत्रित खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेत यावी. तसेच याकामी येणा-या एकत्रित खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.** (कार्यवाही- प्र.प्राचार्या, कन्या विद्या मंदिर)

---

विषय नं.३७ **ए.पी.सी. (5-KVA) युपीएस च्या बॅटरीज खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद**– क्र.१७ (१) व १७ (२)(ध) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक धोरण संस्था स्थापन करील.

**प्रास्ताविक-** श्री साईबाबा कन्या विद्यालयाकरीता इ.५वी ते १०वीच्या एकुण १२ वर्ग तुकडया असुन ६८८ विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थिनीसाठी संगणक प्रयोगशाळेत संगणकावर प्रात्यक्षिक करण्याचे शिक्षण दिले जाते. विद्यार्थिनींसाठी प्रात्यक्षिक करणेकामी खरेदी करण्यात आलेले युपीएस ए.पी.सी.(5-KVA) आय.टी.लॅब मध्ये वापरात आहे. सदर युपीएस जा.क्र.एसएसएसटी/आय.टी./३१३३/२००९ अन्वये मे.डायनॅमिक सोल्यूशन पुणे यांचेकडून खरेदी करणेत आलेला आहे. सदर यु.पी.एस. कन्या विद्या मंदिर विभागात आय.टी.लॅबमध्ये कार्यरत असुन यु.पी.एस. करीता कंपनीने दिलेला १ वर्षाचा वॉरंटी पिरीएड संपलेला आहे. त्यामुळे नवीन १२ व्होल्ट/१८ ए.एच. क्षमतेच्या नवीन १६ नग बॅटरीज खरेदी करणे आवश्यक आहे.

**मागणी-** कन्या विभागातील आय.टी. लॅबमधील यु.पी.एस. व्यवस्थित काम देत नसल्याचे पत्र आय.टी. विभागाला जा.क्र.२२७ अन्वये दि.१४/१०/२०१५ कळविलेले आहे. आय.टी. विभागामार्फत तपासणी केली असता बॅटरीज खराब झाल्याचे निदर्शनास आले. सदर नवीन १६ नग बॅटरीज खरेदी करणेकामी सर्व करांसहीत एकुण रू.४०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये – चाळीस हजार)

मात्र इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे. यु.पी.एस. खरेदी केल्यापासून सदर बॅटरीज आज पावेतो बदलणेत आलेल्या नाहीत. आय.टी. विभागामार्फत अशा प्रकारच्या बॅटरीजचा पुरवठा करू शकणा-या विविध पुरवठाधारकांकडुन कोटेशन मागवुन सदर १२ व्होल्ट/१८ ए.एच. क्षमतेच्या बॅटरीज निम्नतम दराने खरेदी करता येतील व जुन्या बॅटरीज बाय बॅक करता येतील असे मत आहे.

वरील १६ नग बॅटरीज खरेदी करणेकामी अंदाजे रूपये ४०,०००/-(अक्षरी रक्कम रूपये – चाळीस हजार) मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च अंदाजपत्रक सन २०१५-१६ च्या कार्यालयीन संगणकीकरण बजेट तरतूद रक्कम रूपये ४०,०००/-(अक्षरी रक्कम रूपये – चाळीस हजार) मात्र मधून करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत-** 5-KVA युपीएस करीता १२ व्होल्ट/१८ ए.एच. क्षमतेच्या १६ नग बॅटरीज आय.टी. विभागामार्फत खरेदी करणेकामी विविध पुरवठाधारकांकडुन कोटेशन मागवुन निम्नतम दराने बॅटरीज खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रू. ४०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये – चाळीस हजार) मात्रचे खर्चास तसेच जुन्या बॅटरीज बाय बॅक करणेचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.११२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर करीता ए.पी.सी. (5-KVA) युपीएस च्या प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे बॅटरीज विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.४०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.प्राचार्या, कन्या विद्या मंदिर)

---

विषय नं.३८ **श्री साई प्रसादालयात संपुर्ण दिवस मोफत भोजन योजना सुरु करणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम 2004 मधील तरतुद:- सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.14 (भाग-4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील 14 (2-घ) नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेण्याचे. तसेच 21 (1-घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:- संदर्भ क्रं.1 ते 5**

**प्रास्ताविक:-** अ) श्री संजय भास्कराव काळे, कोपरगांव यांचे विषयांकितकामी संदर्भिय अं.नं.1 नूसार इकडील विभागाकडे पत्र प्राप्त झालेले आहे. त्यांनी पत्रात पान क्रं.1 वर म्हटले आहे की, "दि.27/04/2013 रोजी झालेल्या व्यवस्थापन समिती सभेत विषय नं.15 (आयत्या वेळेचा) व निर्णय क्रं.428 प्रमाणे आपण संस्थानने मोफत प्रसादभोजन चालू करण्याचे संकल्पनेवर चर्चा केली. सदर सभेत व्यवस्थापन समिती भोजन पुरवणेसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींवर चर्चा करुन हया निर्णया पर्यंत पोहचली कि सर्व दिवस मोफत प्रसादभोजन देण्यात हरकत नाही. सदरचे प्रसादभोजन मोफत दिल्यास अंदाजे 9.96 कोटी रुपयांची प्राप्त होणारी रक्कम बंद होणार. सदरहु बाब

मेजर फायानान्शीयल असल्याने मा.उच्च न्यायालय याची परवानगी घ्यावी असे ठरले. संस्थानने आज अखेर मा.उच्च न्यायालयात मोफत प्रसादभोजनाचा प्रस्ताव सादर केलेला नाही. ही खेदाची बाब."

**तसेच पान क्रं.2 वर म्हटले आहे की-** "शेतकरी संपला, बाजार पेठ संपली. हया वर्षी शेतकऱ्याने दिवाळी केली नाही. गरीब शेतकरी, शेतमजुराला काम नाही, अन्न धान्य नाही. यामुळे दि.27/04/2013 रोजी प्रलंबीत ठेवलेला मोफत प्रसादभोजनाचा निर्णय संस्थानने त्वरीत अमलात आणावा."यापुर्वी याबाबत असे म्हटले आहे.

**ब)** साईभक्तांना विनामुल्य मोफत प्रसादभोजन सुरु करणेबाबत मा.व्यवस्थापन समिती सभेत वेळोवेळी चर्चा व निर्णय झालेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

1) संदर्भिय अं.नं.2 मा.व्यवस्थापन (त्रिसदस्य) समिती दि.12/06/2012 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.446 नूसार साईभक्तांसाठी मोफत प्रसादभोजन व्यवस्था सुरु करणेबाबत खालीलप्रमाणे सुचना झालेल्या आहेत. - हा निर्णय आर्थिकदृष्टया अत्यंत महत्वाचा असल्याने या बाबत सर्व बाबींचा सर्वांगीण दृष्टया सांगोपांग विचार करुन प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.

2) त्यानूसार सदरचा प्रस्ताव संदर्भिय अ.नं.3 ने मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती दि.08/10/2012 रोजीचे सभेपुढे सादर केला असता निर्णय क्रं.831 अन्वये- सदरहु विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली मात्र याबाबत सर्व माहीती तपशीलासह सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो पुढील सभेपुढे सादर करावा असे, ठरले.

3) त्यानूसार सदरचा प्रस्ताव पुन्हा संदर्भिय अ.नं.4 नूसार मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती दि.27/04/2013 रोजीचे सभेपुढे सादर केला असता निर्णय क्रं.428 नूसार- या विषयावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या विभागप्रमुख व मुख्यलेखाधिकारी यांच्या अभिप्रायामध्ये तथ्य वाटत नाही. विभागप्रमुख यांचे अभिप्रायानूसार संस्थानने सुरु केलेल्या अन्नदान योजनेतून सद्य परिस्थितीत 125 ते 150 दिवस साईभक्तांनी दिलेल्या देणगीमधून मोफत प्रसाद भोजन देण्यात येत आहे. उर्वरीत 200 ते 240 दिवसही मोफत प्रसादभोजन दिल्यास प्रती साईभक्तांकडून रु.10/- याप्रमाणे वार्षिक अंदाजे रु.6 ते 7 कोटी मात्र येणारा निधी बंद होईल. परंतू सन 2012-2013 या आर्थिक वर्षामध्ये प्रसादालयामध्ये साईभक्तांनी रु.10/- प्रती व्यक्ती याप्रमाणे सशुल्क प्रसादभोजन घेवून रु.9.96 कोटी जमा झालेले आहेत. या दोन्ही रकमांमध्ये तफावत असल्यामुळे फायनान्शीयल बाबींचा सविस्तर अभ्यास करुन प्रस्ताव पुढील सभेपुढे ठेवण्यात यावा असा निर्णय झालेला आहे .

तसेच, मा.उच्च न्यायालयाने मान्यता दिल्यास बाबांचा प्रसाद म्हणून विनामुल्य एक लाडू पाकीट बाबांचे दर्शन घेऊन मंदिरामधून बाहेर पडताना प्रत्येक साईभक्तांना देण्याचा समितीचा विचार आहे. यामुळे भक्तांना लाडूप्रसाद घेणेसाठी रांगेमध्ये उभे राहण्याची आवश्यकता राहणार नाही व त्यांचा वेळही वाचेल आणि लाडू विक्री काऊंटर बंद करणेत येऊन तेथील कर्मचारी इतरत्र वापरता येतील. यासाठी येणारा अंदाजे रु.18 कोटी मात्र खर्च संस्थानला करावा लागणार आहे. सदरचा विषय मेजर फायनान्शीयल असल्याने याकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे मार्गदर्शन घेण्यात यावे, असे ठरले.

4) त्यानूसार सदरचा प्रस्ताव संदर्भिय अ.नं.5 ने मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती दि.21/06/2013 रोजीचे सभेपुढे सादर केला असता निर्णय क्रं.436 अन्वये - सदरहु विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

5) संदर्भिय अं.नं.5 नूसार मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती दि.26/07/2013 रोजीचे सभेत विषयांकितकामी फेर प्रस्ताव सादर करणेत आला. त्यानूसार निर्णय क्रं.538 अन्वये- यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयामार्फत ज्या गरीब व्यक्तींकडे प्रसादभोजनासाठी पैसे नाहीत, असे गरीब गरजू व्यक्ती, परिसरातील अंध, अपंग, मुकबधीर, मतीमंद शाळेतील मुले, वारकरी संप्रदायाचे शिक्षण घेणारे विद्यार्थी, वृध्दाश्रम, श्री साईबाबा/श्री साईनाथ रुग्णालयातील रुग्ण यांना मोफत प्रसादभोजन देण्यात येत आहे.

तसेच, देणगीदार साईभक्तांचे इच्छेनूसार सन-2008 पासून साईभक्तांसाठी मोफत प्रसादभोजन योजना सुरु असून, या योजनेमध्ये मोफत भोजन देणाऱ्या साईभक्तांचे संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. उदा. 2008-2009- 23 दिवस, 2009-10- 42 दिवस, 2010-2011- 65 दिवस, 2011-2012- 138 दिवस, 2012-2013- 184 दिवस. सन 2013-14 मध्ये याचा विचार करता, श्री साई प्रसादालयामध्ये संस्थानमार्फत साईभक्तांना मोफत प्रसादभोजन देणेऐवजी, मोफत प्रसादभोजनासाठी देणगी देणाऱ्या देणगीदार साईभक्तांमध्ये वाढ होवून वर्षातील जास्तीत-जास्त दिवस सामान्य साईभक्तांना मोफत प्रसादभोजन मिळेल यासाठी देणगीदार साईभक्तांना प्रोत्साहीत करावे.

मोफत प्रसादभोजन योजनेबाबतची माहीती व या योजनेमध्ये दान देणाऱ्या भक्तांची नावे प्रसादालय व मंदिर परिसरामध्ये फलक उभारुन किंवा डिस्प्ले बोर्डद्वारे प्रदर्शित करणेत यावी, असे ठरले .

**अशाप्रकारे ब)** मध्ये नमूद करणेत आलेल्या अं.नं.1 ते 5 नूसार मा.व्यवस्थापन समिती सभेत साईभक्तांना विनामुल्य प्रसादभोजन व्यवस्था सुरु करणेबाबतचे विषयावर चर्चा झालेली आहे. दि.27/04/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.428 हा दर्शन रांगेत साईभक्तांना विनामुल्य लाडूप्रसाद देणेबाबतचा प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे पाठविणेत यावा असा आहे.

**क)** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.27/04/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.428 नूसार साईभक्तांना दर्शन रांगेत मोफत लाडू प्रसाद देणेबाबतचा प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणेत आलेला होता. त्यास मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांनी मान्यताही दिलेली आहे. त्यानूसार 50 ग्रॅम वजनाचे प्रत्येकी दोन लाडूचे एक पाकीट दर्शनरांगेमध्ये प्रत्येकी दि.15 ऑगस्ट -2013 रोजीपासून साईभक्तांना मोफत देण्यात येत आहेत. **लाडूचे मोफत पाकीट वाटप व खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.**

| कालावधी | लाडू पाकीटे वाटप संख्या | प्रत्यक्ष उत्पादन खर्च |
|---|---|---|
| माहे.ऑगस्ट-2013 ते जुलै-2014 | 1,84,82,400 | रु.24,47,86,974/- |
| माहे.ऑगस्ट-2014 ते जुलै-2015 | 1,74,80,650 | रु.21,24,01,229/- |

मोफत लाडू/बुंदी वाटपबाबत संस्थानला कुठलाही निधी/फंड मिळत नाही. मोफत लाडू/बुंदी वाटप करणेत येणाऱ्या खर्चाची रक्कम ही अन्नदान निधीत मिळणाऱ्या रक्कमेमधून करणेत येते. त्यामुळे दर्शनरांगेत मोफत वाटप करणेत येणाऱ्या लाडू/बुंदी पाकीटाचा संस्थानवर अंदाजे वार्षिक रु.24 ते 25 कोटी इतक्या रकमेचा बोजा पडत आहे. त्यामुळे भक्तांना विनामुल्य प्रसादभोजन देणे आर्थिक दृष्टीने अडचणीचे आहे असे इकडील कार्यालयाचे मत आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभेच्या मान्यतेने सन 2007-2008 पासून देणगीदार साईभक्तांचे इच्छेनूसार साईभक्तांसाठी मोफत प्रसादभोजन योजना सुरु झालेली आहे. सदर योजनेमध्ये सन 2007-2008 पासून आजपावेतो खालीलप्रमाणे रक्कम जमा झालेली असून ज्या-त्या वर्षात जमा तारखेनूसार खर्च होत आहे.

| | |
|---|---|
| सन 2007-2008 | रु.20,29,600/- |
| सन 2008-2009 | रु.31,93,515/- |
| सन 2009-2010 | रु.1,02,31,004/- |
| सन 2010-2011 | रु.1,60,44,191/- |
| सन 2011-2012 | रु.3,22,20,135/- |
| सन 2012-2013 | रु.4,33,61,344/- |
| सन 2013-2014 | रु.5,38,46,887/- |
| सन 2014-2015 | रु.7,42,48,986/- |

वरीलआकडेवारी पाहता उपरोक्त मोफत प्रसादभोजन योजनेत दरवर्षी 30 ते 35 टक्क्यांनी वाढ झालेली दिसून येत आहे.

01 एप्रिल-2014 ते 31 मार्च 2015 अखेर या वित्तीय वर्षात 590 देणगीदार साईभक्तांनी 287 दिवसांसाठी मोफत प्रसादभोजन योजनेअंतर्गत भक्तांना विनामुल्य प्रसादभोजन देणेसाठी रक्कम रु.7,42,48,986/- इतकी रक्कम जमा केलेली आहे. या वर्षामध्ये एकूण 1,29,46,618 इतक्या साईभक्तांनी प्रसादभोजनाचा लाभ घेतलेला असून दैनंदीन सरासरी 35470 इतके भक्त दरोज प्रसादभोजन घेत होते. म्हणजेच वर्षामध्ये जवळपास सरासरी 210 दिवस भक्तांच्या देणगीतून मोफत प्रसादभोजन सुरु होते. म्हणजेच सध्य स्थितीत 58% भोजन हे मोफतच देण्यात येत आहे व भविष्यात ती वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे श्री काळे यांचे पत्रातील मोफत योजना ही संकल्पना भक्तांच्या देणगीतून मोठया प्रमाणात चालू आहे.

तसेच 'साईभक्तांना विनामुल्य प्रसादभोजन' सुरु केल्यास मोफत प्रसादभोजन योजना ही भक्तांचे इच्छेनूसार सुरु झालेली योजना असल्यामुळे सदर योजनेमध्ये येणारी देणगी बंद होण्याचा धोका असून भक्तांच्या भावना दुखावल्या जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर योजनेत मिळणारा निधी हा मोठया स्वरुपात मिळत आहेत. त्याचा विनीयोग चांगल्या कार्यासाठी होत आहे. तसेच सध्या साईभक्तांना पुरविणेत येणारी प्रसादभोजन व्यवस्था प्रौढ व्यक्तीस रु.10/- या अत्यल्प दरात पुरविणेत येते. प्रसादभोजनाचे प्रती ताटास अंदाजे रु.24/- ते 25/- इतका खर्च येतो. म्हणजेच प्रसादभोजनाचे प्रती ताटामागे रु.14/- ते 15/- इतकी चारीटी संस्थान देत आहे. तसेच कॅन्टीन विभागामार्फत भक्तांना पुरविणेत येणारा चहा-रु.2/-, कॉफी-रु.2/-, व दुध-रु.3/- या अत्यल्प दरात विक्री करणेत येत असून यामध्ये देखील संस्थान चहाचे प्रती कपास रु.0.91 पैसे, कॉफी प्रती कप रु.1.33 पैसे व दुधास प्रती कपी रु.1.34 पैसे याप्रमाणे चारिटी देत आहे. भक्तांना पुरविणेत येणाऱ्या प्रसादभोजनाचा खर्च, चहा, कॉफी, दुध व दर्शन रांगेत मोफत लाडू/बुंदी प्रसाद हा सर्व खर्च अन्नदान फंडात जमा होणाऱ्या रक्कमेमधूनच करणेत येतो. त्यामुळे श्री काळे यांची मागणीही फारशी रास्त नाही असे या कार्यालयाचे नम्र मत आहे.

साईभक्तांना विनामुल्य प्रसादभोजन व्यवस्था सुरु केल्यास बाबांचे प्रसादाचे महत्व कमी होवून, शिरडीमध्ये बेरोजगारी, पाकीटमारी, गुंडगिरी प्रवृत्ती वाढून, परिसरातील लोकांची काम करण्याची तयारी राहणार नाही. तसेच मोफत प्रसादभोजन योजना ही साईभक्तांचे इच्छेनूसार सुरु करणेत आलेली योजना आहे. भक्तांना विनामुल्य प्रसादभोजन सुरु केल्यास सदर योजनेत भक्त देणगी देण्याची शाश्वती नाही. त्यामुळे संस्थानला विनाकारण साधारण: 9 ते 10 कोटीच्या वार्षिक नुकसान होणे नाकारता येत नाही.

मागणी :- प्रस्तावित केलेप्रमाणे साईभक्तांना विनामुल्य प्रसादभोजन देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेत साधारणत: पाच वेळेस सादर करणेत आलेला आहे. सदर बाब आर्थिक दृष्टया अत्यंत महत्वाची असल्याने संस्थानमार्फत साईभक्तांना मोफत प्रसादभोजन देणेऐवजी, मोफत प्रसादभोजनासाठी देणगी देणाऱ्या देणगीदार साईभक्तांमध्ये वाढ होऊन वर्षातील जास्तीत-जास्त दिवस सामान्य साईभक्तांना मोफत प्रसादभोजन मिळेल यासाठी देणगीदार साईभक्तांना प्रोत्साहीत करावे.

या योजनेमध्ये दान देणाऱ्या भक्तांची नांवे प्रसादालय व मंदिर परिसरामध्ये फलक उभारुन डिस्प्ले बोर्डद्वारे प्रदर्शित करणेत यावे. असे निर्णय घेतलेले आहे. सदर निर्णयान्वये श्री साई प्रसादालयात देणगीदार भक्तांचे डिस्प्ले

बोर्ड बनिवणेत येत असून त्यास उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. सदर देणगीमधूनच 58% प्रसादभोजन हे मोफत दिले जात आहे. त्यात वाढ होऊन संपुर्ण वर्षभर प्रसादभोजन मोफत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे संदर्भिय अं.नं.1 नूसार विषयांकितकामी प्राप्त झालेला श्री संजय भास्कराराव काळे, कोपरगांव यांच्या अर्जातील छावणी बाबतचा विषय यापुर्वी बांधकाम विभागाकडून चालू होता व पुर्वी छावण्या केल्याही होत्या त्याची सर्व कार्यवाही बांधकाम विभागामार्फत चालू होती त्यामुळे याबाबतची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत होणेस मान्यता असावी.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत**:- उपरोक्त प्रास्तविक व मागणीनूसार साईभक्तांना विनामुल्य प्रसादभोजन व्यवस्था सुरु करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीने सदरचा प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे पाठविणेत यावा, असा कोणताही निर्णय झालेला नाही. त्यामुळे विषयांकित कामी असलेले अर्जदार श्री संजय भास्करराव काळे, कोपरगांव यांचे अर्जात विनामुल्य प्रसादभोजन सुरु करणेबाबत, जे त्यांनी अर्जात म्हटले आहे, त्यामध्ये स्पष्टता वाटत नाही. श्री काळे यांचे विनंती अर्जानूसार, "चालू वर्षी दुष्काळ पडलेला आहे, खरीप हंगाम मोकळा गेलेला आहे, शेतात पीक आले नाही, शेतकऱ्याने दिवाळी केली नाही, शेतमजुराला काम नाही याकरीता संस्थानने मोफत प्रसादभोजनाचा निर्णय त्वरीत अंमलात आणावा." असे म्हटले आहे. परंतू सध्याचे परिस्थितीचा विचार करता संस्थानमध्ये भक्तांना सकाळी अल्पोपहारसाठी पुरविणेत येणार अन्नपाकीट फक्त रु.4/- मध्ये देवून त्यामागे रु.6/- चरिटी देण्यात येत आहे. प्रसादभोजन हे फक्त रु.10/- म्हणजेच प्रती ताटामागे रु.14/- ते 15/- चारीटी देण्यात येत आहेत. तसेच चहा, कॉफी व दुध व दर्शन रांगेतील मोफत बुंदी प्रसाद हे देखील चारिटी देवून पुरविणेत येत आहे.

अशाप्रकारे साईभक्तांना पुरविणेत येणाऱ्या महत्वाच्या सुविधा उदा.अल्पोपहार, प्रसादभोजन, चहा, कॉफी व दुध व दर्शन रांगेत मोफत बुंदी प्रसाद या सर्व सुविधा चारिटी देवून पुरविणेत येत आहे. दुष्काळी परिस्थिती ही चिरकाल टिकत नसते, परंतू संस्थानमध्ये एकदा सुरु झालेली योजना ही पुन्हा बंद करणे संस्थानचे दृष्टीने अत्यंत महत्वाची बाब असल्यामुळे मोफत प्रसादभोजन सुरु करु नये असे या कार्यालयाचे मत आहे. करीता सदरचा प्रस्ताव हा आर्थिक व धोरणात्मक असल्यामुळे मा.त्रिसदस्सीय समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.११३ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साई प्रसादालयात संपुर्ण दिवस मोफत भोजन योजना सुरु करणेकामी श्री.संजय काळे यांनी त्यांचे पत्रामध्ये उल्लेख केलेल्या दि.२७.०४.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४२८ तसेच व्यवस्थापन समिती सभेमध्ये यापुर्वी वेळोवेळी झालेल्या निर्णयांसह सविस्तर प्रस्ताव फेरसादर करणेत यावा.**
(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

विषय नं.३९ **श्री साई प्रसादालयात दैनंदिन वापराकरीता स्टेनलेस स्टील, ॲल्युमिनीयम, फायबर वस्तु खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम व तरतुद:-** सन **2004** चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.**14** (भाग-4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील **14 (2 घ)** नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते उपाययोजना हाती घेण्याचे. तसेच **21 (1 घ)** नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

**प्रास्ताविक:-** श्री साई प्रसादालयात दैनंदीन 40,000 ते 60,000 हजार साईभक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेत असतात. प्रसादभोजनामध्ये साईभक्तांना दोन भाज्या,चपाती/ पुरी,दाळ,बर्फी, चटणी इ.पदार्थ देण्यात येत असतात. तसेच सकाळी अल्पोपहार म्हणून अन्नपाकीटे देण्यात येत असतात. प्रसादभोजनातील पदार्थ व अन्नपाकीटे तयार करुन वितरण करणेकामी ॲल्युमिनीयम पातेले, पराती, स्टे. स्टील घमेले, स्टे.स्टील छिद्र असलेले टप, स्टे.स्टील बादली, स्टे.स्टील कॅन, ओगराळे, फायबर कॅन, फायबर पॅलेट व प्लास्टीक क्रेट्सचा वापर करणेत येत आहे.

श्री साई प्रसादालय अंतर्गत साईआश्रम भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईनाथ रुग्णालय येथे स्वयंसेवी प्रसादभोजन व्यवस्था सुरु आहे. सदर ठिकाणी प्रसाद भोजन वितरीत करणेसाठी वरील सर्व साहित्यांची आवश्यकता असते.

8 जानेवारी 2009 रोजी भव्य दिव्य श्री साई प्रसादालय भक्तांचे सेवेसाठी सुरु करणेत आलेले होते. त्यावेळी वर नमूद केलेले साहित्य/उपकरणे ही सन 2007-2008 मध्ये खरेदी करणेत आलेली आहेत. सदरचे साहित्य, भांडी ही 7 ते 8 वर्षापासून सततच्या वापरामुळे झिज होवून खराब झालेली आहेत. त्यामुळे उपरोक्त साहीत्य/भांडी अभावी भक्तांना प्रसादभोजन व्यवस्था पुरविणेकामी मोठया अडचणी येत आहेत.

भक्तांना वेळेत अन्नपाकीटे व विनाप्रतिक्षा प्रसादभोजन मिळावे यासाठी खालीलप्रमाणे साहित्य/उपकरणे, भांडी खरेदी करणेकामी प्रसादालय विभागामार्फत मा.व्यवस्थापन समिती सभेच्या प्रशासकीय मान्यतेने विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून खरेदी करता येईल. खालीलप्रमाणे साहित्य खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.2,95,000/- इतका खर्च अपेक्षीत आहे. करीता, श्री साई प्रसादालय अंदाजपत्रकामध्ये सन 2015-2016 करीता प्रसादालय भांडी खरेदीकामी रक्कम रु.10,00,000/- ची तरतुद करणेत आलेली आहे.

खरेदी करावयाचे साहित्य/भांडी,उपकरणे यांची यादी खालीलप्रमाणे.

अ) ॲल्युमिनीयम वस्तु

| अ.नं. | वस्तुंचा तपशिल | खरेदी करावयाचे नग |
|---|---|---|
| 01 | ॲल्युमिनीयम पराती | 12 नग |
| 02 | ॲल्युमिनीयम पातेले | 02 नग |

ब) स्टे स्टील वस्तु

| अ. नं. | वस्तुंचा तपशिल | खरेदी करावयाचे नग |
|---|---|---|
| 01 | स्टे स्टील लहान बादली, स्टे.स्टील 202 ग्रेड | 25 नग |
| 02 | स्टे स्टीलचे टप, स्टे.स्टील 202 ग्रेड | 10 नग |
| 03 | स्टे स्टील झारे, स्टे.स्टील 202 ग्रेड | 05 नग |
| 04 | स्टे स्टील ओगराळे, स्टे.स्टील 202 ग्रेड | 100 नग |
| 05 | स्टिल जग, स्टे.स्टील 202 ग्रेड | 20 नग |
| 06 | स्टिल कॅन, स्टे.स्टील 304 ग्रेड | 10 नग |

क) फायबर वस्तु-

| अ नं | वस्तुंचा तपशिल | खरेदी करावयाचे नग |
|---|---|---|
| 01 | फायबर पॅलेट | 25 नग |
| 02 | फायबर कॅन 40 लिटर | 30 नग |
| 03 | प्लास्टीक क्रेटस् | 50 नग |
| 04 | फायबर जग ( रायडर) | 60 नग |

**संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनूमान :-** अर्थिक

**मागणी:-** उपरोक्त प्रास्तविक केलेप्रमाणे, वर नमूद केलेले साहित्य/उपकरणे ही सन 2007-2008 मध्ये खरेदी करणेत आलेली आहेत. सदरची भांडी/साहित्य 7 ते 8 वर्षापासून सततच्या वापरामुळे झिज होवून खराब झालेली आहेत. त्यामुळे सदर साहीत्याअभावी भक्तांना प्रसादभोजन पुरविणेकामी अडचणी येवू नये यासाठी वर नमूद केलेप्रर्माणे अ), ब) व क) नूसार सदरचे साहित्य मा.व्यवस्थापन त्रिसदस्सीय समितीची प्रशासकीय मान्यता घेवून विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून खरेदी करता येईल. त्यास मान्यता असणे गरजेचे आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** शासन निर्णय क्रं.भांखस/प्र.क्रं.82/भाग-3/उद्योग-4 दि.30 ऑक्टोबर, 2015 चे खरेदी निविदा प्रक्रियेनूसार, "ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रुपये 3 लाखापेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात व रु 3 लाखांपेक्षा असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्यात यावी. अशी मुभा देण्यात आलेली आहे."

त्यानूसार श्री साई प्रसादालयात प्रसादभोजन तयार करुन वितरीत करणेकामी, साठविणेकामी व साईआश्रम भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान व साईनाथ रुग्णालय येथे स्वयंसेवी प्रसादभोजन पुरवितांना अडचणी येऊ नये याकरीता वर नमूद केलेप्रमाणे अ), ब) व क) नूसार साहीत्य/भांडी/उपकरणे विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 2,95,000/- (अक्षरी रक्कम दोन लाख पंच्यान्नव हजार मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.११४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयात दैनंदिन वापराकरीता प्रस्तावात नमुद केलेनुसार स्टेनलेस स्टील, ॲल्युमिनीयम, फायबर वस्तु विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२,९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

विषय नं.४० **सन २०१६-१७ करीता मोतीचुर लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी ठेकेदारी पध्दतीने बनविणेकामी असलेल्या ठेकेदारांना मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावीत केलेले अध्यादेश व विनियम मधील २१(घ) नुसार साईभक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

**प्रस्ताविक-** श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना साईबाबांचा प्रसाद मिळावा या हेतूने मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व अधिनियमास अनुसरुन संस्थानचे कॅन्टीन विभागामार्फत लाडू प्रसाद विक्री काऊंटरवर मोतीचूर लाडू पाकिटांची विक्री करण्यात येते. तसेच मंदिर दर्शन रांगेत भक्तांना बुंदी पाकिटे वाटप करण्यात येतात तसेच प्रसादालयात भक्तांना भोजनात मिष्टान्न म्हणून रवा बर्फी देण्यात येत आहे. सदरचे मोतीचूर लाडू, बुंदी तसेच बर्फी तयार करण्याचे काम लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागा मार्फत नेमण्यात आलेल्या दोन कॉन्ट्रॅक्टरमार्फत करुन घेण्यात येत आहे.

सन २०१५-१६ (दि.०१/०४/२०१५ ते दि.२९/०२/२०१६) या कालावधीसाठी जा.नं.एसएसएस/ वशी/लाडू-प्रसाद/ ५९३३/३४/२०१५ दि.०३/०३/२०१५ अन्वये १) श्री साई केटरर्स, श्रीरामपूर २) श्री साई सिध्दी महीला बचत गट, शिरडी यांना मोतीचूर लाडू (१००० नग निर्मिती व पॅकिंग करणे) तसेच सुट्टी बुंदी (१०० ग्रॅम वजनाची ५०० पाकिटे निर्मिती व पॅकिंग) करणेसाठी प्रत्येकी रु.२२५/- या निम्नतम दराने दोन्ही कॉन्ट्रॅक्टर यांना निर्मितीचे कॉन्ट्रॅक्ट विभागून देण्यात आलेले आहे. तसेच बर्फी निर्मिती कामी श्री साई केटरर्स, श्रीरामूपर यांना ०१ क्विंटल साखरेची बर्फी तयार करणेस रु.१९०/- इतका मजूरी दर देण्यात आलेला आहे. आता सदरहू कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दि.२९/०२/२०१६ रोजी संपत आहे.

सन २०१६-१७ (दि.०१/०३/२०१६ ते दि.२८/०२/२०१७) या कालावधीसाठी नव्याने मोतीचूर बुंदीचे लाडू, बुंदी, बर्फी निर्मितीचे उक्ते टेंडर पध्दतीने मंजूरीची ई निविदा प्रसिध्द करुन नव्याने ठेकेदारांची नियुक्ती करणेकामी सादर केलेल्या प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळालेली आहे परंतू ठराव प्राप्त झालेला नाही.

ठराव प्राप्त झाल्यानंतर निर्मितीकामी येणा-या खर्चास मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांची मान्यता मिळणेससाठी संस्थानचे विधी विभागामार्फत अर्ज सादर करता येईल.

मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळणेसाठी काही कालावधी लागणार आहे तरी या कालावधीत निविदा प्रकिया पुर्ण करणेस तसेच मा. उच्च न्यायालयाची मान्यता मिळेपर्यंत दोन्ही ठेकेदारांकडून लाडू, बुंदी निर्मितीचे काम आहे त्याच मंजूर दराने त्यांचेकडून करुन घेणेस मान्यता मिळावी, ही विनंती. तसे दोन्ही ठेकेदारांना स्वतंत्र (वाढीव कालावधीचे) पत्र देता येईल.

सदरचा विषय मा. व्यवस्थापन मंडळाचे त्रिसदस्य समितीपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.११५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६-१७ करीता मोतीचुर लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी ठेकेदारी पध्दतीने बनविणेकामी येणा-या खर्चास मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळून ई-निविदा प्रकियेद्वारे नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपावेतो सध्या काम करत असलेल्या ठेकेदारास आहे त्याच अटी/ शर्तीवर मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

विषय नं.४१ **प्रसाद लाडू/ बूंदी वाहतूकीसाठी कॅरेटस खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- महाराष्ट्र विधान मंडळाने अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व विनियम १७ (१) मधील कलमानूसार भक्तगणाना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देणेची तरतूद केली आहे.

कॅन्टीन विभागासाठी प्रसाद लाडू व प्रसाद बुंदी पाकीटांची वाहतूक करणेसाठी निलकमल कंपनीचे जे.बी.पी ५०० (एल) X ४०० (एच) साईजचे ३५ नग प्लॅस्टीक कॅरेटर्स विहीत पध्दतीने पुरवठाधारकांने न्युनतम दर असलेने त्याचे कडून रु.१०८९ प्रती नग या दराने ३५ कॅरेटर्स खरेदी करण्यात आले आहे.

कॅन्टीन विभागाकडे प्रसाद लाडू व प्रसाद बुंदी वाहतूकीसाठी एकूण ४९० कॅरेटस आहे.त्यापैकी २२५ कॅरेटस तुटलेले व निकामी झालेले आहे.सध्या कॅन्टीन विभागाकडे सुस्थीतीतील असलेले २६५ कॅरेटस शिलूलक आहे.सततच्या वापरामूळे सुस्थितीत असलेले कॅरेटसही तुटण्याची व वाहतूकसाठी कॅरेट कमी पडणेची शक्यता आहे.कॅन्टीन विभागाकडे प्रसाद लाडू विक्री व दर्शनरांगेतील साईभक्तांना प्रसाद बुंदी पाकीटे वाटपाचे काम दैंनदिन करणेत येत असलेने सदर कामी प्रसाद लाडू पाकीटे साठविणेसाठी व बुंदी प्रसाद पाकीटांची जादा प्रमाणात वाहतूक करणेसाठी जास्तीत जास्त प्लॅस्टीक कॅरेटसची आवश्यकता आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/११/२०१४ रोजी झालेल्या सभेत विषय नं.१२ निर्णय क्र.९९९ नुसार रु.५ लाख पेक्षा कमी रक्कमेची खरेदी संबधीत विभागांनी विहीत पध्दतीने खरेदी प्रक्रिया राबवून साहित्य खरेदी करणेबाबत निर्णय झालेला असून संदर्भ क्र.०२ चे परिपत्रकान्वये विभागांना कळविण्यात आलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेत विषय नं.१ निर्णय क्र.२०० नुसार रु.१० लाख् व त्यापेक्षा कमी खर्चाचे साहित्य संबधीत विभागांनी उपसमितीचे मान्यतेने विहीत पध्दतीने खरेदी प्रक्रिया राबवणे व उपसमितीने मान्यता दिल्यानंतर त्याचा अहवाल (प्रस्ताव) त्रिसदस्यीय समितीचे सभेसमोर अवलोकनार्थ सादर करणेत येवून त्रिसदस्य समितीची मान्यता मिळाल्यांनतर संबंधीताना कार्यादेश /पुरवठा आदेश देण्यात यावा,याबाबत निर्णय झालेला आहे.व संदर्भीय क्र.०३ चे आदेशान्वये विभगांना कळविण्यात आलेले आहे. -

तसेच सदर कॅरेट खरेदीही १० लाखापेक्षा कमी असल्याने त्यास मा.हायकोर्ट .मुंबई खंडपीठ औरगांबाद यांची मान्यता घेणेची आवश्यकता नाही.

उपरोक्तकामी कॅन्टीन विभागासाठी निलकमल कंपीनीचे जे.बी.पी.५०० (एल) X ३६० (बी) X ४००(एच) साईजचे २०० नग प्लॅस्टीक कॅरेटर्सची खरेदी करणे आवश्यक आहे.याकामी रुपये ११००/- मात्र् प्रति नग याप्रमाणे एकूण रु.२,२०,०००/- मात्र् खर्च अपेक्षित आहे.

कॅन्टीन विभागाकडे निलकमल कंपनीचे प्लॅस्टीक कॅरेट वापरात असून ते मजबूत व जादा टिकाऊ आहे. उपरोक्तप्रमाणे निलकमल कंपीनीचे जे.बी.पी.५०० (एल) X३६० (बी) X ४००(एच) साईजचे २०० नग प्लॅस्टीक कॅरेटर्सची खरेदी करणे आवश्यक आहे.मा.व्यवस्थापन समितीचे संदर्भिय क्र.२ चे निर्णयानुसार प्लॅस्टीक कॅरेट खरेदीकामी रु.५ लाखापेक्षा कमी खर्च अपेक्षित असलेने विभागामार्फत निविदा प्रक्रीया राबवून खरेदीची कार्यवाही

करता येईल. सदर खर्च कॅन्टीन विभागाकडील भक्तांना प्रसाद व्यवस्था या शिर्षकाखाली असलेल्या बजेट मधून करता येईल. याकामी रु.२,१२,४५,९९९/- मात्र् रक्कम शिल्लक आहे.

तरी कॅन्टीन विभागाकरीता निलकमल कंपनीचे जे.बी.पी ५०० (एल) X ३६० (बी) X ४०० (एच) साईजचे २०० नग प्लॅस्टीक कॅरेटस दरपत्रके मागवून खरेदी करणेस याकामी रु.२,२०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी मा.व्यवस्थापन उपसमित्तीचे सभेत चर्चा होवून निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णय क्र.११६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टीन विभागाकडे प्रसाद लाडू/ बूंदी वाहतूकीसाठी आवश्यक असलेले निलकमल कंपनीचे जे.बी.पी ५०० (एल) X ३६० (बी) X ४०० (एच) साईजचे २०० नग प्लॅस्टीक कॅरेटस विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,२०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

विषय नं.४२ **शुध्द पिण्याच्या पाण्याची बाटली विक्री दरात बदल करणेबाबत.**

प्रस्ताव- सन-2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.21 (1) (घ) मध्ये भक्तांना जेवण पुरविणे व अन्‍्छत्र चालविणे अशी तरतूद करणेस आलेली आहे.

कॅन्टीन विभागामार्फत साईभक्तांना चहा,कॉफी,दूधाचे विक्री बरोबरच शुध्द पिण्याचे पाणी बाटलीची विक्री करणेत येते.संदर्भीय पत्रानुसार श्री स्वामी समर्थ डीस्ट्रींब्युटर्स तिसगाव मे.पुष्कर ट्रेंडर्स, शिरडी व श्री साई ॲग्रो इंडस्ट्रीज टाकळी यांना माहे नोव्हे -१५ ते मार्च -१६ अखेर या कालावधीत प्रत्येक पुरवठाधारकाने १ लिटर पाणी बाटली ६,६७,००० नग व ५०० मिली पाणी बाटली १,६६,६६६ नग याप्रमाणे शुध्द पिण्याचे पाणी बाटलीचा पुरवठा करणेबाबतचे आदेश विभागून देण्यात आले आहेत.संबधीत तिनही पुरवठा धारकांकडून खालील दराप्रमाणे शुध्दपिण्याचे पाणी बाटलीचा पुरवठा करणेत येत आहे.

०१) पॅकेज्ड ड्रींकीग वॉटर 1 लिटर रु.६.२० प्रतिनग

०२) पॅकेज्ड ड्रीकीग वॉटर बाटली ५०० मिली रु.४.७० प्रति नग

कॅन्टीन विभागामार्फत पुरवठाधारकांकडून पुरवठा करणेत येणा'या पिण्याचे पाणी बाटलीची मूळ खरेदी व विक्री करुन मिळणारी रक्कम खालील प्रमाणे

**अ)**

| अ.नं | मालाचा तपशील | विक्रीचा दर | खरेदीचा दर | मिळणारी रक्कम |
|---|---|---|---|---|
| 01 | पॅकेज्ड ड्रीकींग वॉटर 1लिटर | ८००. | ६२०. | १८०. |
| 02 | पॅकेज्ड् ड्रीकींगवॉटर 500 मिली | ६००. | ४७०. | १३०. |
| | | | **एकूण रुपये -** | ३१०. |

कॅन्टीन विभागामार्फत मुख्य कॅन्टीन नविन भक्तनिवास, दर्शनरांग काऊंटर श्री साईबाबा हॉस्पीटल दारावती भक्तनिवास, साई आश्रम भक्तनिवास या ठिकाणी पॅकेज्ड ड्रीकींग वॉटर बाटलीची विक्री करणेत येते. 1लिटर बाटली 3500 नग व 500 मिली बाटली 1100 नग या प्रमाणे दैनंदिन सरासरी विक्री केली जाते. सदयस्थितीत कॅन्टीन विभागामार्फत १ लिटर पाणी बाटली रु.८/- व ५०० मिली पाणी बाटली रु.६/- या दराप्रमाणे विक्री करणेत येत आहे. रकमेची देवाण-घेवाण पूर्णाकीत नसल्याने विक्री काऊंटरवर नाणेटंचाईची समस्या तिव्रपणे जाणवते. भक्तांकडून पाणीबाटली घेतलेनंतर १०, २०, ५० ची नोट दिली जाते. त्यामूळे साईभक्तांना सुटे पैसे परत देणेस अडचणी येतात.काऊंटरवर जास्त प्रमाणात सुटीनाणी नसतात.प्रंसगी भक्तांशी वादविवाद होतात हि समस्या दररोज जाणवत आहे.

एक लिटर पॅकेज्ड ड्रीकींग वॉटर बाटली रु.८/- ऐवजी रु.१०/- व ५०० मिली ड्रीकींग वॉटर बाटली रु.६/- ऐवजी रु.५/- या प्रमाणे विक्री केल्यास मिळणारी रक्कम खालील प्रमाणे

**ब)**

| अ.नं | मालाचा तपशील | विक्रीचा दर | खरेदीचा दर | मिळणारी रक्कम |
|---|---|---|---|---|
| 01 | पॅकेज्ड ड्रीकींग वॉटर 1लिटर | १०/- | ६.२० | ३.८० |
| 02 | पॅकेज्ड् ड्रीकींगवॉटर 500 मिली | ५/- | ४.७० | ०.३० |
| | | | **एकूण रुपये -** | ४.१० |

मागणी- एक लिटर ड्रीकींग वॉटर बाटली रु.८/- प्रतिनग ऐवजी रु.१०/- प्रतिनग व ५०० मिली ड्रीकींगवॉटर बाटली रु.६/- ऐवजी रु.५/- प्रतिनग या दराप्रमाणे विक्री करावी असे नम्र मत आहे.

अ व ब् प्रमाणे संध्या ड्रीकींग वॉटर बाटलीची विक्री चालू असून त्यामधून रु.३.१० इतकी रक्कम खरेदी दरावर जास्त् मिळत आहे. ब. प्रमाणे विक्री केल्यास रु.४.१० इतकी रक्कम खरेदी दरावर जास्त मिळेल त्यामूळे खरेदी विक्रीचे दरात फक्त रु.१/- ची नाममात्र वाढ होईल. भक्तांशी आर्थिक व्यवहार करतांना नाणेटंचाईची समस्या दुर होईल भक्तांची सुटे पैसे देवाण- घेवाण बाबत तक्रारी येणार नाहीत.पूर्णकिंत रक्कम देणे घेणेसाठी व्यवहारीक अडचणी येणार नाहीत असे नम्र मत आहे.

तरी एक लिटर पाणी बाटली विक्रीची किमंत रु.८- ऐवजी रु.१०/- व ५०० मिली पाणी बाटली विक्रीची किंमत रु.६/- ऐवजी रु.५/- या दराप्रमाणे विक्री करणे बाबत विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.११७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साईभक्तांशी आर्थिक व्यवहार करतांना नाणेटंचाईची समस्या व सुटटया पैशांच्या देवाण- घेवाणीबाबतच्या तक्रारी याचा विचार करता, कॅन्टीन विभागामाफ्रत एक लिटर पाणी बाटली रु.८- ऐवजी रु.१०/- व ५०० मिली पाणी बाटली रु.६/- ऐवजी रु.५/- या दराप्रमाणे साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.४३** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फ मान्यवरांना श्री साई दैनंदिनी २०१६ व दिनदर्शीका २०१६ विनामुल्य भेट देणेबाबत.**

प्रस्ताव- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र१४ कलम नं. १७ (ठ) मध्ये खालील प्रमाणेतरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार – प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

श्री साईबाबांचा प्रचार व प्रसार म्हणून इतर प्रकाशनाखेरीज दरवर्षी संस्थान मार्फत श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशीत केली जाते. दरवर्षी मा.अध्यक्ष महोदय,मा.विश्वस्त, मा.कार्यकारी अधिकारी,मा.उपकार्यकारी अधिकारी व सर्व प्रशासकीय अधिकारी यांना संस्थानच्या वतीने श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका विनामूल्य भेट म्हणून दिल्या जातात. व त्याची रक्कम प्रकाशने विभाग खाते (Publication Expenses) खर्ची टाकली जाते.

सन २०१६ च्या दैनंदिनी व दिनदर्शिका संस्थानतर्फे विनामूल्य भेट देणेकामी खालील प्रमाणे मान्याता असावी.

| अ.नं | तपशिल | दैनंदिनी-२०१६ रु.७५/- नग संख्या | दिनदर्शिका (१ पाने) २०१६ रु.२०/- नग संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | मा.अध्यक्ष महोदय | १०० | १०० |
| ०२ | मा.जिल्हाधिकारी तथा मा.सदस्य, त्रिसदस्य समिती | १०० | १०० |
| ०३ | मा.कार्यकारी अधिकारी तथा मा.सदस्य, त्रिसदस्य समिती | १०० | १०० |
| ०४ | मा.उपकार्यकारी अधिकारी | १०० | १०० |
| ०५ | सर्व प्रशासकीय अधिकारी (प्रत्येकी २५ प्रमाणे) | १०० | १०० |
| | **एकुण नग** | ५०० | ५०० |
| | **एकुण किंमत** | **३७,५००/-** | **१०,०००/-** |

श्री साई दैनंदिनी मोफत वाटप किंमत रु. ३७,५००/- + श्री साई दिनदर्शीका मोफत वाटप किंमत रु. १०,०००/- एकूण रुपये. ४७,५००/- (अक्षरी रुपये. सत्तेचाळीस हजार पचाशे मात्र.)

संस्थानतर्फे वेळोवेळो प्रकाशने/फोटो/सीडी उपलब्धतेप्रमाणे सप्रेम भेट देण्याची प्रथा आहे.सदर पध्दतीस मा.व्यवस्थापन समितीची दि.१२.०६.२०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.४२९ नुसार स्थायी मान्यता मिळालेली होती.

मागिल वर्षी दैनंदिनी व दिनदर्शिका २०१५ मोफत वाटप प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०.०१.२०१५ विषय क्र. १९ निर्णय क्र. १९ अन्वये "श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका सन २०१५ विनामूल्य भेट देणे हा विषय जानेवारी उलटून गेल्याने कालबाहय झाला आहे. या विषयावर पुढील वर्षी विचार करण्यात यावा, यावर्षी विनामूल्य दैनंदिनी व दिनदर्शिका देऊ नयेत, असे ठरले."

सबब वरीलप्रमाणे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका सन २०१६ विनामूल्य भेट देणेकामी मा.व्यवस्थापन सभेपुढे विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.११८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे मान्यवरांना चालू वर्षी प्रत्येकी फक्त २५ नग श्री साई दैनंदिनी २०१६ व दिनदर्शीका २०१६ विनामुल्य भेट देणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच यापुढे प्रत्येक वर्षी व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य यांना प्रत्येकी फक्त २५ नग याप्रमाणे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शीका विनामुल्य भेट देण्यात यावी, असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४४** **श्री साईलीला अंक सभासदांना पाठविणेसाठी पाकीटे छपाईकामी प्राप्त सिलबंद उघडण्यात आलेल्या दरपत्रकांच्या अहवालाबाबत.**

प्रस्ताव- मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०८.१०.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३३६ नुसार श्री साईलीला अंक सभासदांना पाठविणेसाठी पाठविणेसाठी पाकीटे छपाई करुन घेणेकामी येणा-या रक्कम रु. २,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार साईलीला अंक सभासदांना पाठविणेसाठी पाकीटे छपाई करुन घेणेकामी दि. २४.११.२०१५ ते दि. ०१.१२.२०१५ या कालावधीत प्रेसधारकांकडून सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या . प्रेसधारकांच्या सिलबंद निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | आवक नं. |
|---|---|---|
| ०१ | प्रवरा ऑफसेट, लोणी | १७३२५/ १२.०१.२०१५ |
| ०२ | रॉका प्रिंटर्स, नाशिक | १६९८५/ २७.११.२०१५ |
| ०३ | निट प्रिंटर्स, अहमदनगर | १७३६४/ १२.०२.२०१५ |

सदरच्या निविदा मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समोर दि. २५.१२.२१५ रोजी उडण्यात येऊन, खालील प्रमाणे प्रेसधारकांना दर देवू केले आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | साईलिला- मराठी | श्री साईलीला हिंदी-इंग्रजी |
|---|---|---|---|
| | पाकीटाचा आकार | ११.५x ८.५+ १.७<br>प्लॅप ८० जीएसएम क्राप्ट ब्राऊन पेपर | ११.५x ८.५+ १.७<br>प्लॅप ८० जीएसएम क्राप्ट ब्राऊन पेपर |
| | नवीन छपाई संख्या | १००००० | १५०००० |
| | मागिल छपाई दर | ०.५५ | ०.५० |
| | सर्व करांसह | रु.पै. | रु.पै. |
| ०१ | प्रवरा ऑफसेट, लोणी | <u>०.८९</u> | <u>०.८९</u> |
| ०२ | रॉका प्रिंटर्स, नाशिक | १.३३ | १.३१ |
| ०३ | निट प्रिंटर्स, अहमदनगर | १.६५ | १.६५ |

सबब उपरोक्त तक्त्यातील आधोरेखीत केलेले अं.नं. १ चे प्रेसधारक प्रवरा ऑफसेट, लोणी यांचे दर निम्नतम असून त्यांना साईलीला अंक सभासदांना पाठविणेसाठी पाकीटे छपाई कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे. छपाई करणेकामी येणा-या रु. २,२२,५००/- मात्रचे खर्चास मान्यतेसाठी सादर.

निर्णय क्र.११९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईलीला अंक सभासदांना पाठविणेसाठी पाकीटे छपाईकामी प्राप्त सिलबंद उघडण्यात आलेल्या दरपत्रकांच्या अहवालाची नोंद घेण्यात येऊन, तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक मे.प्रवरा ऑफसेट,लोणी यांना कार्यादेश देण्यास व त्याकामी येणा-या रु.२,२२,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

विषय नं.४५ **साईआश्रम भक्तनिवाससाठी कापडी बेडशीट व उशी कव्हर देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत.**

प्रस्ताव- कापडी बेडशीट व उशी कव्हरच्या कपड्याची लाईफ जास्तीत जास्त १६० वेळेस धुवून इस्त्री करुन वापरल्या नंतर संपते. त्यामुळे दरवर्षी नविन कापडी बेडशीट व उशी कव्हरचा वापर निवासस्थानामध्ये करावा लागतो.

या विभागात एकूण १,५३६ खोल्या असून सदरचा विभाग ११/०४/२०१३ रोजी कार्यरत झालेला असून त्यावेळी १९,९६८ बेडशीट खरेदी करुन ते आज तगायत वापरण्यात येत आहेत. दरम्यानच्या काळात बेडशीट खरेदी प्रक्रिया राबविण्यात आली परंतू त्यासाठी जास्त कालावधी लागला.

बेडशीट व उशी कव्हर वापरुन खराब झाल्याने साईभक्त नाराजी व्यक्त करु लागले. त्यासाठी या विभागाकडील दि.२६/१२/२०१४ च्या मंजूर प्रस्तावानुसार या विभागासाठी बेडशीट व उशी कव्हर देणगी स्वरुपात जनसंपर्क कार्यालयामार्फत देणगीदार भक्त यांचे कडून थोड्या-थोड्या प्रमाणात टप्या-टप्याने देणगी स्विकारणेस प्रशासकीय मान्यता घेऊन, त्यानुसार त्यावेळी जनसंपर्क कार्यालयामार्फत साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या विभागांचे बांधकामासाठी देणगी दिलेले साईभक्त श्री.के.व्ही.रमणी साहेब यांना या बाबत विचारणा करण्यात आली होती.

**प्रस्ताव:-** त्यानुसार देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही. रमणी साहेब यांनी दि.१९/०१/२०१६ रोजी दुरध्वनी वरुन बेडशीट, उशी, उशी कव्हर व ब्लॅकेट प्रत्येकी ६,००० नग देणगी स्वरुपात पाठवित असले बाबत कळविलेले आहे. देणगी स्विकारण्यासाठी जा.नं.एसएसएस/वशी-लेखा/३४४५/२०१५ दि.०९/१२/२०१५ रोजीचे आदेशानुसार मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:-** देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.रमणी साहेब यांनी दुरध्वनीवरुन कळविले प्रमाणे बेडशीट, उशी, उशी कव्हर व ब्लॅकेट प्रत्येकी ६,००० नग देणगी स्वरुपात स्विकारणेस मान्यता असावी, ही विनंती.

निर्णय क्र.१२० **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.रमणी, चेन्नई यांचेकडून साईआश्रम भक्तनिवाससाठी बेडशीट, उशी, उशी कव्हर व ब्लॅकेट प्रत्येकी ६,००० नग देणगी स्वरुपात स्विकारणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

विषय नं.४६ **दर्शनआरती पासेसचे देणगी शुल्काबाबत.**

प्रस्ताव- महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार

पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

श्रींच्या दर्शनासाठी येणा-या महत्वाच्या/अतिमहत्वाच्या व्यक्ती तसेच मान्यवरांच्या शिफारशीनुसार येणा-या व्यक्तींना जनसंपर्क विभागामार्फत देण्यात येणा-या व्ही.आय.पी. पासेससाठी शुल्क आकारणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७.०१.२०१० चे सभेतील निर्णय क्रमांक २७२ अन्वये गुरुवार, शनिवार व रविवार या दिवशी दर्शन आरती पासेसवर जनसंपर्क कार्यालयामार्फत शुल्क आकारणेबाबत निर्णय झालेला आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६.०३.२०१० चे सभेतील निर्णय क्रमांक ३०९ अन्वये सशुल्क दर्शन/आरती पासेसची अंमलबजावणी प्रत्यक्षात दिनांक १३.०३.२०१० पासून सुरु करण्यात आलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०४.२०१० चे सभेतील निर्णय क्रमांक ३५८ (२५) अन्वये सशुल्क दर्शन/आरती पासेस सुविधेतुन गुरुवारचा दिवस वगळण्यात आलेला आहे. तसेच साईटेक प्रकल्पांतर्गत दिनांक १४ जुलै २०११ पासून ऑनलाईन दर्शन/आरती सुविधा सुरु करण्यात आलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ९०७ अन्वये सर्व आरत्या करिता शुल्क आकारणेबाबत निर्णय झालेला असून मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १२.०३.२०१५ चे सभेतील निर्णय क्र. ८३ अन्वये दिनांक ०१.०४.२०१५ पासून जनसंपर्क विभागामार्फत व्ही.आय.पी.व्यक्तींकरीता देण्यात येणारे दर्शन पास प्रायोगिक तत्वावर आठवडयातील सातही दिवस शनिवार, रविवारच्या धर्तीवर सध्याच्या प्रचलित पध्दतीने देणगी शुल्क आकारणेत येऊन वितरीत करणेबाबत निर्णय झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये वेळोवेळी झालेल्या निर्णयानुसार जनसंपर्क विभागामार्फत दर्शन/आरतीचे पासेस वितरीत करण्यात येतात. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ चे सभेतील निर्णयानुसार दिनांक १८.११.२०१३ पासून जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणा-या आरती पासेससाठी शुल्क आकारण्यात येते. त्यानुसार दिनांक १८.११.२०१३ ते ३१.१२.२०१५ पर्यंत दर्शन/आरती पासेस वितरणातून संस्थानला १७,९६,३०,२००/- (अक्षरी रुपये सतरा कोटी शहान्नव लाख तीस हजार दोनशे मात्र) इतके उत्पन्न प्राप्त झालेले आहे.

**आठवडयातील सशुल्क दर्शन दिनांक ०१.०४.२०१५ पासून सर्व दिवस सशुल्क**

| अ.नं. | आठवडयातील सशुल्क दर्शन | पासेसची संख्या | रक्कम | एकुण दिवस | प्रतिदिन दर्शन सरासरी संख्या | प्रतिदिन दर्शन सरासरी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | दि.१८.११.२०१३ ते ३१.१२.२०१५ (दर्शन) | ३८८१८२ | ७,९१,५०,०००/- | ४१५ | ९३५ | १,९०,७२२/- |
| | | **एकूण रक्कम** | ७,९१,५०,०००/- | | | |

**सर्व दिवस सशुल्क आरत्या दिनांक १८.११.२०१३ पासून**

| अ.नं. | सर्व दिवस सशुल्क आरती पासेस कालावधी | पासेसची संख्या | रक्कम | एकुण दिवस | प्रति आरती भक्तांची सरासरी संख्या | प्रति आरती सरासरी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | दि.१८.११.२०१३ ते ३१.१२.२०१५ (आरती) | ७७४५३ | १०,०४,८०,२००/- | ७७० | १०० | १,३०,४९३/- |
| | | **एकूण रक्कम** | १०,०४,८०,२००/- | | | |

**ऑनलाईन दर्शन /आरती**

| अ.नं. | ऑनलाईन दर्शन/आरती पासेस कालावधी | पासेसची संख्या | रक्कम | एकुण दिवस | प्रति दर्शन/आरती भक्तांची सरासरी संख्या | प्रति दर्शन/आरती सरासरी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | दि.१८.११.२०१३ ते ३१.१२.२०१५ (दर्शन) | २३८४७५ | ९,५१,५८,०००/- | ७७० | ३०९ | १,२३,५८१/- |
| ०२ | दि.१८.११.२०१३ ते ३१.१२.२०१५ (आरती) | १०६७८५ | १४,३६,८६,५००/- | ७७० | १३८ | १,८६,६०५/- |
| | | **एकूण रक्कम** | २३,८८,४४,५००/- | | | |

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७.०१.२०१० चे सभेतील निर्णय क्रमांक २७२ चे निर्णयानुसार दर्शन पाससाठी प्रति व्यक्ती १००/- रुपये, काकड आरतीसाठी प्रति व्यक्ती ५००/- रुपये तसेच माध्यान्ह, धुपारती व शेजारतीसाठी प्रति व्यक्ती रु.३००/- रुपये प्रमाणे शुल्क आकारण्यात येते. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) ने व्ही.आय.पी. दर्शन/आरतीचे पासेस करीता शुल्क आकारणे सुरुवात केल्यामुळे व्ही.आय.पीं.पास मागणारांची संख्या कमी झालेली असून सामान्य दर्शन रांगेतुन दर्शन/आरतीसाठी येणा-या सर्वसामान्य भक्तास दर्शन/आरतीचा लाभ मोठया प्रमाणात मिळत आहे.

तथापि, जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणा-या दर्शन /आरती पासेसचे शुल्क दुप्पट केल्यास म्हणजे दर्शन पाससाठी रुपये १००/- ऐवजी रुपये २००/- प्रति व्यक्ती, काकड आरतीसाठी रुपये ५००/- ऐवजी रुपये १,०००/- प्रति व्यक्ती, माध्यान्ह, धुपारती व शेजारतीसाठी रुपये ३००/- ऐवजी रुपये ६००/- प्रति व्यक्ती प्रमाणे शुल्क आकारल्यास व्ही.आय.पी.पासेस मागणारांची संख्या अजूनही कमी होऊन सामान्य दर्शन रांगेतून श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना आरतीचा लाभ जास्त प्रमाणात मिळेल व यातून मिळणा-या देणगी रक्कमेचा संस्थानच्या विविध विकास कामासाठी तसेच श्री साईसमाधी शताब्दीचे विविध कामासांठी उपयोग होईल असे मत आहे.

तसेच सशुल्क दर्शन/आरती पासेसबाबत मा.व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णया विरुध्द श्री.मनोज सुरेश पिंगळे, निर्भया फाऊंडेशन, नाशिक यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात क्र.६८/२०१५ अन्वये दाखल केलेली जनहित याचिकाही फेटाळण्यात आली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७.०१.२०१० चे सभेतील निर्णयान्वये जनसंपर्क कार्यालयामार्फत पासेससाठी शुल्क आकारणेबाबतचा निर्णय झालेला आहे. यामध्ये मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने वेळोवेळी बदल करण्यात आले असून त्यावेळी शासनाची अथवा उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात आलेली नसल्याने सदर विषयास शासनाची अथवा उच्च न्यायालयाची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

तरी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणा-या व्ही.आय.पी. दर्शन/आरती पासेसचे मुल्य दुप्पट म्हणजे दर्शनासाठी प्रति व्यक्ती रुपये २००/-, काकड आरतीसाठी प्रति व्यक्ती रुपये १,०००/-माध्यान्ह आरती, धुपारती व शेजारतीसाठी प्रति व्यक्ती रुपये ६००/- प्रमाणे शुल्क वाढ करणेस तसेच सदरची शुल्कवाढ ऑनलाईन दर्शन/आरती पासेससाठी करणेबाबत मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१२१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणा-या व्ही.आय.पी. दर्शन/आरती पासेस घेणारांची संख्या कमी होऊन, दर्शन रांगेमधून येणा-या साईभक्तांना लवकरात लवकर दर्शन मिळावे, याकरीता ऑनलाईन व जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणा-या व्ही.आय.पी. दर्शन/आरती पासेसचे दि.०१ मार्च- २०१६ पासून खालीलप्रमाणे देणगी शुल्क आकारणेत यावे, असे ठरले.**

| दर्शन/ आरती | आकारावयाचे देणगी शुल्क रु. |
|---|---|
| दर्शन | रु.२००/- |
| काकड आरती | रु.६००/- |
| माध्यान्ह आरती | रु.४००/- |
| धुपारती | रु.४००/- |
| शेजारती | रु.४००/- |

(कार्यवाही- जनसंपर्क विभागप्रमुख/ संरक्षण विभागप्रमुख/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख/ मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.४७ **पवनहंस हेलीकॉप्टर लिमिटेड मुंबई यांचे मुंबई-शिर्डी हेलीकॉप्टर सेवा सुरु करणेसाठी संस्थान हेलीपॅडवर लॅण्डींग व टेकऑफ करणेस परवानगी मिळणेबाबतचे पत्र.**

प्रस्ताव- महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

श्री.हिमांशु श्रीवास्तव, विभाध्यक्ष (अभि-सामग्री), पवन हंस हेलीकॉप्टर्स लिमिटेड, मुंबई यांनी त्यांचे दिनांक ०८.०२.२०१६ चे पत्रात, "दिनांक ०४.०२.२०१६ रोजी आपल्या ऑफीसमध्ये पवन हंस हेलीकॉप्टर यांचे मुंबई-शिर्डी हेलिकॉप्टर सेवा सुरु करण्याबाबत चर्चा झाली. आपण आपला बहूमोल वेळ आमच्याशी चर्चा करणेसाठी दिला याबाबत मी प्रथमतः आपला आभारी आहे. उपरोक्त चर्चेनुसार आम्ही आपणास विनंती करतो की, आपण आमच्या हेलीकॉप्टाला श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे हेलिपॅड वापरास खालीलप्रमाणे परवानगी द्यावी.

१. हेलीकॉप्टर लॅण्डींग व टेकऑफ चे वेळी हेलीपॅडवर अग्नीशमन व्यवस्था मोफत करावी.
२. हेलीकॉप्टर लॅण्डींग व टेकऑफ चे वेळी हेलीपॅडवर रुग्णवाहीकेची व्यवस्था मोफत करावी.
३. हेलीकॉप्टर व प्रवाशांसाठी सुरक्षा व्यवस्था करावी.
४. हेलीकॉप्टरने येणा-या प्रवाशांची व्ही.आय.पी.दर्शन व्यवस्था करावी.

याकरीता दिनांक १८.०२.२०१६ रोजी आम्ही ट्रायल लॅण्डीग करणार असून यासाठी आम्हाला परवानगी मिळावी. सदरची सेवा पुढे शनी शिंगणापूरला सुरु करता येईल." असे कळविलेले आहे.

श्री.हिमांशु श्रीवास्तव, विभाध्यक्ष (अभि-सामग्री), पवन हंस हेलीकॉप्टर्स लिमिटेड, मुंबई यांनी त्यांचे पत्रात हेलीकॉप्टर लॅण्डींग व टेकऑफ चे वेळी हेलीपॅडवर अग्नीशमन व्यवस्था व रुग्णवाहीकेची व्यवस्था मोफत करावी. तसेच हेलीकॉप्टर व हेलीकॉप्टाने येणा-या प्रवाशांसाठी सुरक्षा व्यवस्था व हेलीकॉप्टरने येणा-या प्रवाशांची व्ही.आय.पी.दर्शन व्यवस्था करावी अशी मागणी केलेली आहे.

तथापि, मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २४.०५.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४२९ मध्ये संस्थान मालकीच्या हेलिपॅडचा वापर खाजगी संस्था/व्यक्ती/सार्वजनिक संस्था यांना उपलब्धतेनुसार सशुल्क करुन देणेत यावा असा निर्णय झालेला आहे. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०२.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६ अन्वये संस्थानचे हेलिपॅड वापर आकार रुपये २०००/- ऐवजी रुपये ५०००/- व अॅब्युलन्ससाठी प्रति तास रुपये १०००/- ऐवजी रुपये १५००/- आणि नाईट हॉल्टसाठी हेलिपॅड वापर आकार रुपये ५०००/- अधिक रुपये २०००/- असा एकूण रुपये ७०००/- इतका आकार आकारण्यात यावा असे असा निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी दिनांक २३.०३.२०१५ पासून सुरु करण्यात आलेली आहे. तसेच हेलीपॅडवर संरक्षणाचे दृष्टीने संरक्षण विभागामार्फत सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात येते. उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने हेलीकॉप्टार कंपन्याच्या मागणीनुसार व संस्थानच्या उपलब्धतेनुसार हेलीपॅड वापरास परवानगी देण्यात येते. जनसंपर्क विभागामार्फत हेलीकॉप्टर लॅण्डींगची कार्यवाही दिनांक ०१.१०.२००८ पासून सुरु करण्यात आलेली असून आजपर्यंत हेलीपॅड वापर आकार रुपये ९,७१,०००/- व रुग्णवाहीका वापर आकार रुपये ७,९०,२५०/- असे एकूण १७,६१,२५०/- (अक्षरी रक्कम रुपये सतरा लाख एकसष्ट हजार दोनशे पन्नास मात्र) इतके उत्पन्न संस्थानला या सेवेतून प्राप्त झाले आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीचे हेलीपॅड वापरास परवानगी आधीपासून देण्यात येत असल्याने सदर विषयस शासनाची अथवा उच्च न्यायालयाची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

मा.व्यवस्थापन समतीचे दिनांक २८.१२.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६५९ अन्वये संस्थान अग्नीशमन वाहन वापरासाठी पहिले तीन तास रुपये ४,०००/- त्यानंतर प्रती तास रुपये १,०००/- या प्रमाणे तसेच फोमचा, सि.ओ.टू. व ड्राय पावडर सिलेंडरचा वापर झालेस खरेदी दराप्रमाणे दर आकारणी करण्यात यावी असा निर्णय झालेला असून त्यानुसार अग्नीशमन वाहनही संबंधीतास उपलब्ध करुन देता येईल.

तथापि मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०२.२०१५ रोजीचे सभेतील निर्णयानुसार व खालील अटी/शर्तीस अधिन राहून श्री.हिमांशु श्रीवास्तव, विभाध्यक्ष (अभि-सामग्री), पवन हंस हेलीकॉप्टर्स लिमिटेड, मुंबई यांना हेलीपॅड वापरास परवानगी देता येईल.

१. हेलीपॅड वापर आकार रुपये ५,०००/- व हेलीकॉप्टर मुक्कामासाठी असल्यास रुपये २,०००/- अतिरिक्त जनसंपर्क कार्यालयात लॅण्डींग झाल्यावर रोखीने त्याच दिवशी जमा करणे हेलीकॉप्टर कंपनीस बंधकारक राहील.

२. हेलीकॉप्टर लॅण्डींगचे वेळी संस्थानमार्फत रुग्णवाहीका पुरविण्यात येईल त्याचा आकार रुपये १,५००/- प्रति तास प्रमाणे हेलीपॅडवर रुग्णवाहीकेच्या चालकाकडे जमा करावा लागेल.

३. हेलीकॉप्टर लॅण्डींगचे वेळी संस्थानमार्फत अग्नीशमन वाहन पुरविण्यात येईल त्याचा आकार रुपये पहिले तीन तासाकरीता रुपये ४,०००/- त्यानंतर प्रती तास रुपये १,०००/- या प्रमाणे तसेच फोमचा, सि.ओ.टू. व ड्राय पावडर सिलेंडरचा वापर झालेस खरेदी दराप्रमाणे संस्थानकडे जमा करावा लागेल.

४. हेलीकॉप्टर लॅण्डींगसाठी आवश्यक सर्व स्थानिक/शासकीय/निमशासकीय परवानग्या हेलीकॉप्टर कंपनीला घेणे बंधनकारक राहील. तसेच अग्नीशमन व्यवस्था संबंधीत कंपनीला करावी लागेल.

५. जर लॅण्डींग रद्द करावयाचे असेल तर एक दिवस आधी तसे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांना कळविणे आपणास बंधनकारक राहील.

६. हेलीकॉप्टर लॅण्डींग व टेक ऑफ करतांना अपघात होऊन जिवित हानी अथवा इतर प्रकारची कोणतीही हानी झाल्यास त्यास कंपनी जबाबदार राहील. याबाबत संस्थानची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

७. अति महत्वाचे व्ही.आय.पी.चे शिर्डी भेटीच्या दरम्यान अथवा आपतकालीन परिस्थितीत सदर हेलीपॅडचा वापर करणे आवश्यक असेल त्यावेळेस कंपनीची सेवा खंडीत करणे किंवा वेळ बदलणे ही बाब कंपनीवर बंधनकारक राहील. तशी पुर्व सुचना संस्थान कंपनीस देईल.

८. प्रत्येक लॅण्डींगपुर्वी किमान दोन दिवस आगोदर जनसंपर्क विभागाकडे हेलीकॉप्टर लॅण्डींगबाबत फॅक्स पाठवून कळविणे, परवानगी घेणे हेलीकॉप्टार कंपनीस बंधनकारक राहील.

९. सदर हेलीकॉप्टरने येणा-या महत्वाच्या/अतिमहत्वाच्या व्यक्तींनांच नियमाप्रमाणे व्ही.आय.पी.दर्शन पास देता येतील.

१०. संरक्षण विभागामार्फत हेलीपॅडवर सुरक्षा रक्षकची नेमणूक करण्यात येते. याव्यतिरिक्त इतर वाढीव सुरक्षा व्यवस्था संबंधीत कंपनीने करावी.

११. हेलीकॉप्टर लॅण्डींगसाठी परवानगी देणे अथवा रद्द करणेबाबतचे सर्व अधिकारी संस्थान राखून ठेवत आहे.

परंतु श्री.हिमांशु श्रीवास्तव, विभाध्यक्ष (अभि-सामग्री), पवन हंस हेलीकॉप्टर्स लिमिटेड, मुंबई यांनी सदरच्या सुविधा मोफत मिळणेबाबत मागणी केलेली आहे. तरी सदरच्या विषयावर मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चाकरुन निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.१२२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या संस्थानचे कामकाज पहात असलेली समिती अस्थायी असल्यामुळे पवनहंस हेलीकॉप्टर लिमिटेड, मुंबई यांच्या मागण्या मान्य करु शकत नाही, असे त्यांना लेखी स्वरुपात कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- जनसंपर्क विभागप्रमुख)

---

विषय नं.४८ **संस्थानचे मंदिर परिसरात मोबाईल जॅमर यंत्रणा कार्यान्वित करणेकामी ई-निविदा पध्दतीने कार्यवाही होणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद** – सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ मधील ३५५ मधील (घ) साईभक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्ताचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.** - निरंक

**प्रास्ताविक-** संस्थानचे मंदिर परिसरात मोबाईल जॅमर यंत्रणेबाबत दि.२०/१०/२०१५ रोजीचे संरक्षण विभागाचे ओदश पत्रान्वये, अ.नं.०४ मध्ये नमुद केलेप्रमाणे मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे कक्षात दि.०७/१०/२०१५ रोजी सुरक्षा आढावा बैठकीमध्ये मोबाईल जॅमर बंद असलेबाबत आढळुन आलेली असल्याचे नमुद केले आहे. सदर मोबाईल जॅमर चालु करणेबाबत तसेच त्याची वारंवार तपासणी करणेबाबत संरक्षण विभागाने कार्यवाही करणेकामी इकडील विभागास कळविलेले होते. परंतु, यापुर्वी मोबाईल जॅमरबाबतची कार्यवाही संरक्षण विभागामार्फत झालेली असल्याने इकडील विभागामार्फत दि.१५/११/२०१५ रोजीचे मे. Tech-well solution, नासिक यांचे प्रस्तावास अनुसरुन त्यांचेकडुन प्रात्यक्षिक स्वरुपात दि.२३/११/२०१५ पासुन ते दि.२०/१२/२०१५ पर्यंत मंदिराचे आतील बाजुस मोबाईल जॅमर कार्यान्वित करण्यात आलेले होते. सदरचे मोबाईल जॅमर हे तांत्रिक दृष्टया व्यवस्थितरित्या कार्यरत असल्याचे आढळुन आलेले असुन सदर मोबाईल जॅमर मंदिराचे आतील बाजुस प्रात्यक्षिक स्वरुपात कार्यरत केले असल्याचे इकडील विभागाने मा.संरक्षण अधिकारी सो. यांना समक्ष दाखवुन त्यांचे निदर्शनास आणुन दिलेले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही संस्थानचे विहीत पद्धतीने व सुरक्षिततेच्या दृष्टीने संरक्षण विभागामार्फतच होणे अपेक्षित होते. परंतु, मा.उपकार्यकारी अधिकारी सो. यांनी मोबाईल जॅमर यंत्रणेबाबत तांत्रिक ज्ञान संरक्षण विभागाकडे दिसुन येत नाही. सदर सीसीटीव्ही विभागाने सर्व कामे पहाणे उचित होईल, असे मत आहे. त्यानुसार दि.०८/१२/२०१५ रोजीचे टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी कार्यवाही करावी, असे निर्देश दिलेले आहे. सदरचे दि.०८/१२/२०१५ चे टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी दिलेल्या निर्देशास अनुसरुन मे. Tech-well solution, नासिक यांचेकडुन सदरकामी संस्थानचे मंदिर परिसरात मोबाईल जॅमर यंत्रणा कार्यान्वित करणेकामी सर्व्हे करण्यात आलेला असुन खालील तपशीलात नमुद केलेल्या ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने मोबाईल जॅमरबाबतचे साहित्याचा तपशील खालीलप्रमाणे –

| S.No. | PRODUCTS DETAILS | IMAGES | LOCATION | QTY | RATE | TOTAL AMT |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | MOBILE JAMMER BRAND CORTEK 4 ANTENIA WITH POWER SUPPLY ONE WARRANTY |  | SAMADHI MANDIR<br>GATE NO-3<br>GATE NO-4<br>MUSIEAM<br>OPP GURUSTHAN<br>LANDY BAG<br>OLD PRO OFFICE<br>DATTA MANDIR/BOOK STALL<br>UDI COUNTER<br>SHANI GATE<br>PIMAPWADI DARSHAN<br>RANG<br>SHANTINIWAS DARSHAN RANG GROUND FLOOR<br>SHANTINIWAS DARSHAN RANG FIRST FLOOR<br>BHAKTI NIWAS DARSHAN RANG GROUND FLOOR<br>BHAKTI NIWAS DARSHAN RANG FIRST FLOOR | 2<br>1<br>1<br>1<br>1<br>1<br>1<br>1<br>1<br>1<br>1<br>3<br>1<br>1<br>1 | 25500 | 459000 |
| | | | | 18 | 25500 | 459000 |
| 2 | INSTALLATION CHARGES | | | 18 | 500 | 9000 |
| | | | | | TOTAL | 468000 |
| 3 | Underground caballing charges extra | | | | | |

उपरोक्त नमुद तपशीलाप्रमाणे संस्थानचे विहीत पद्धतीने ई-निवीदा मागविणेस तसेच AMC कामी येणा-या अंदाजे रक्कम रु.५,५०,०००/- (रु.४,६८,०००/- + Underground caballing charges) + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता असावी. तसेच उपरोक्त तपशीलातील नमुद ठिकाणी मोबाईल जॅमरबाबतची तांत्रिक कार्यवाही इकडील विभागामार्फत पुर्ण होवुन मोबाईल जॅमर कायान्वित झालेनंतर दि. २८/०८/२०१५ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये सदर साहित्याच्या नोंदी संरक्षण विभागाचे डेडस्टॉकला घेवुन सदरचे बील संरक्षण विभागामार्फत न्युनत्तम पुरवठाधारकास संस्थान नियमाप्रमाणे अदा करणेस मान्यता असावी. तसेच सदरचा खर्च हा रक्कम रु.१० लाखापेक्षा कमी असल्याने त्यास मा.उच्च न्यायालयाची मान्यतेची आवश्यकता नसल्याने उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या तपशीलानुसार सदर साहित्य खरेदीची कार्यवाही ई-निवीदा पद्धतीने खरेदी करणेस तसेच अंदाजे रक्कम रु.५,५०,०००/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी उपरोक्त प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सादर करता येईल.

**मागणी-** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेल्या तपशीलानुसार संस्थानचे विहीत पद्धतीने संस्थानचे मंदिर परिसरात मोबाईल जॅमर यंत्रणा कार्यान्वित करणेकामीची कार्यवाही करणेकामी तसेच याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.५,५०,०००/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यतेस्तव प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान** – तांत्रिक व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय-** उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थानचे मंदिर परिसरात मोबाईल जॅमर यंत्रणा कार्यान्वित करणेकामी संस्थानचे विहीत पद्धतीने ई-निवीदा मागविणेस तसेच AMC कामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ५,५०,०००/- (रु. ४,६८,०००+ Underground caballing charges) + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता असावी. तसेच उपरोक्त तपशीलातील नमुद ठिकाणी मोबाईल जॅमरबाबतची तांत्रिक कार्यवाही इकडील विभागामार्फत पुर्ण होवुन मोबाईल जॅमर कायान्वित झालेनंतर दि. २८/०८/२०१५ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये सदर साहित्याच्या नोंदी संरक्षण विभागाचे डेडस्टॉकला घेवुन सदरचे बील संरक्षण विभागामार्फत न्युनत्तम पुरवठाधारकास संस्थान नियमाप्रमाणे अदा करणेस मान्यता असावी. तसेच सदरचा खर्च हा रक्कम रु.१० लाखापेक्षा कमी असल्याने त्यास मा.उच्च न्यायालयाची मान्यतेची आवश्यकता नसल्याने उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेल्या तपशीलानुसार सदर साहित्य खरेदीची कार्यवाही ई-निवीदा पद्धतीने खरेदी करणेस तसेच अंदाजे रु. ५,५०,०००/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.१२३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मंदिर परिसरात मोबाईल जॅमर यंत्रणा कार्यान्वित करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साहित्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.५,५०,०००/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

---

विषय नं.४९ **जनहित याचीका क्र.२५/२०१२ मधील चौकशी अधिकारी श्री.पी.एस.परांजपे साहेब यांचे चौकशीचे कामकाजाचे बीला संदर्भात ॲडव्होकेट आर.एन.धोर्डे यांचे मार्गदर्शन प्राप्त न झाल्याने उर्वरीत बील अदा करणेबाबत फेरसादर.**

प्रस्ताव- मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे कोर्टात श्री संजय भा. काळे यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरुध्द दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक २५/२०१२ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. १०/१२/२०१४ रोजी दिलेल्या आदेशा नुसार चौकशी अधिकारी श्री पी.एस. परांजपे साहेब रिटायर्ड प्रिन्सीपल डिस्ट्रिक्ट जज्ज, यांची नेमणुक करण्यात आली होती.

श्री.ॲड.पी.एस. परांजपे साहेब, चौकशी अधिकारी यांनी दि.२४/०१/२०१५ पासून चौकशीचे कामकाजास सुरुवात केली. ते चौकशीकामी दि.२४/०१/२०१५ , दि.१४/०२/२०१५ व दि.०८/०३/२०१५ रोजी उपस्थित होते. सदर चौकशीचे कामकाजाचे तीन बीले मा. श्री पी.एस. परांजपे साहेब यांनी दि.१०/०३/२०१५ रोजी संस्थानला सादर केली असुन त्याचा खालील प्रमाणे तपशिल आहे.

| अ.नं. | चौकशीकामी हजर दिनांक | बील / दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १) | दि. २४/०१/२०१५ | पीएसपी /१४-१५/५५<br>दि. १०/०३/२०१५ | २५,०००/- |
| २) | दि. १४/०२/२०१५ | पीएसपी /१४-१५/५७<br>दि. १०/०३/२०१५ | २५,०००/- |
| ३) | दि. ०८/०३/२०१५ | पीएसपी /१४-१५/६०<br>दि. १०/०३/२०१५ | २५,०००/- |
| ४) | इतर खर्च बील | पीएसपी /१४-१५/६२<br>दि. १०/०३/२०१५ | १५,०००/- |
| | एकुण रक्कम रुपये | | ९०,०००/- |

चौकशी अधिकारी, मा. श्री पी.एस. परांजपे साहेब, यांनी मागणी केल्या प्रमाणे तीन तारखांची रक्कम रु. ९०,०००/- दिले अदा करणेचे कार्यात्तर मंजूरीस सादर व पुढील येणारे बीले अदा करणेचे निर्णयार्थ सादर असा विषय मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५/०५/२०१५ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र.१४४ अन्वये प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, "जनहित याचीका क्र.२५/२०१२ मधील चौकशीचे कामकाजाकामी चौकशी अधिकारी, मा. श्री पी.एस.परांजपे साहेब यांना त्यांनी मागणी केल्या प्रमाणे तीन तारखांची रक्कम रु. ९०,०००/- मात्र फी सध्या अदा करण्यात यावी. तसेच चौकशी अधिकारी यांना प्रत्येक तारखेस किती फी द्यावी, याबाबत विधीज्ञा कडून मार्गदर्शन घेण्यात येवून फी निश्चीत करण्यात यावी, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली असल्याचा निर्णय झालेला आहे."

प्रस्तुत ठरावास अनुसरुन दि.०६/०६/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीने व जा.क्र. एसएसएस वशी-विधी/२१६९/२०१५ दि. २०/०७/२०१५ चे पत्राने कोपरगांव येथील ॲडव्होकेट श्री एस.एम.वाघ, कोपरगांव यांना मा.श्री पी.एस.परांजपे, चौकशी अधिकारी यांना जनहित याचीका क्र. २५/२०१२ मध्ये चौकशी कामकाजाकामी अदा करावयाचे फी बाबत मार्गदर्शन करणेबाबत विनंती करण्यात आली होती. त्यांनी दि. १४/०८/२०१५ रोजीचे पत्राने खालील प्रमाणे कळविले आहे.

".. श्री परांजपे साहेब यांनी काय कामकाज केले व किती कामकाज केले तसेच मा. हायकोर्टाचे बीलाबाबत काही आदेश होते किंवा काय याबाबत व्यक्तीशा माहिति नसल्याने त्यांच्या कामकाजाची फी किती मंजूर करावी याबाबत मत प्रदर्शन करणे अशक्य आहे.

तथापी संस्थानचे पॅनलवरील ना.हायकोर्टातील वकीलाकडून अथवा याचीका क्रमांक २५/२०१२ मधील संबंधीत आपले पॅनलवरील वकीलाकडून बीलाबाबत मत घेणे योग्य व संयुक्तीक राहील." असे कळविले आहे.

ॲडव्होकेट श्री. एस.एम.वाघ यांनी कळविल्यानुसार पी.आय.एल. २५/२०१२ मध्ये संस्थानचे वतीने कामकाज पाहीलेले, ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे यांचे वकिलपत्र दिलेले होते. त्यांचेकडून पी.आय.एल. २५/२०१२ मधील चौकशी अधिकारी मा. श्री पी.एस.परांजपे साहेब यांना किती फी द्यावी याबाबत त्यांचे लेखी ओपिनिअन / मार्गदर्शन घेणेचे मान्यतेसाठी व ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे औरंगाबाद यांना द्यावयाचे पत्रावर स्वाक्षरी होणेसाठी दि. ०४/०९/२०१५ रोजी टिपणी सादर करण्यात आली होती. सदरचे मंजूर टिपणी अन्वये जा.क्र. एसएसएस वशी-विधी/३३८१/२०१५ दि. १५/०९/२०१५ रोजीचे पत्र ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे यांना पाठविली होते.

प्रस्तुत पत्राचे अनुशंगाने विधी विभागाचे लिपीक टंकलेखक सालकर यांनी दि.१०/१०/२०१५ रोजी औरंगाबाद येथे ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे यांची समक्ष भेट घेऊन चर्चा केली असता . त्यांनी असे सांगितले की, श्री पी.एस.परांजपे चौकशी अधिकारी यांना जनहितयाचिका क्रमांक २५/२०१२ मध्ये चौकशीचे कामकाजामध्ये किती फी अदा करावयाची, याबाबत प्रत्येक वकीलांचे वेगवेगळे मत असू शकते. मी एखादी ठरावीक रक्कम सांगितल्यानंतर कोणी हरकत घेण्याची शक्यता नाकाराता येत नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी कोणत्याही प्रकारचे लेखी मार्गदर्शन मी करु शकत नाही, असे ॲड श्री आर एन धोर्डे यांनी तोंडी सांगितले आहे, लेखी दिलेले नाही.

श्री ॲड.पी.एस.परांजपे साहेब चौकशी अधिकारी यांनी दि.१५/६/२०१५ रोजी संस्थानला चार बिले सादर केली असून, त्याचा तपशिल खालील प्रमाणेआहे.

| अ.नं. | चौकशीकामी हजर दिनांक | बील / दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १) | १२/०४/२०१५ | पीएसपी /१५-१६/००१<br>दि.०१/०६/२०१५ | २५,०००/- |
| २) | १३/०५/२०१५ | पीएसपी /१५-१६/००२<br>दि.०४/०६/२०१५ | २५,०००/- |
| ३) | १४/०५/२०१५ | पीएसपी /१५-१६/००३<br>दि.०४/०६/२०१५ | २५,०००/- |
| ४) | १४/०६/२०१५ | पीएसपी /१५-१६/००४<br>दि.१५/०६/२०१५ | २५,०००/- |
| ५) | इतर खर्च बील | पीएसपी /१५-१६/००५<br>दि.१५/०६/२०१५ | २०,०००/- |
| | | एकुण रक्कम रुपये | १,२०,०००/- |

दि.१५/०६/२०१५ रोजीचे बीलानुसार दि. ३०/०७/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीने श्री पी.एस. परांजपे यांना निम्मी रक्कम रु. ६०,०००/- अदा करणेत आलेली आहे. उर्वरीत रक्कम ६०,०००/- विधीज्ञाचे मार्गदर्शन मिळाल्यानंतर अदा करावयाची आहे. आतापर्यंत श्री पी.एस.परांजपे यांना रक्कम रु. ९०,०००/- + ६०,०००/- = १,५०,०००/- (अक्षरी एक लाख पन्नास हजार मात्र ) रक्कम अदा केलेली आहे.

उपरोक्त परिस्थीतीत श्री पी.एस.परांजपे, चौकशी अधिकारी यांनी मागणी केलेली चौकशीच्या कामकाजाची उर्वरीत फी रु. ६०,०००/- व यापुढे मागणी केलेली रक्कम अदायीबाबतचे निर्णयार्थचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २८/११/२०१५ रोजीचे सभेपुढे विषय नं. २८ सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ५४६ अन्वये " सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, मा.श्री.पी.एस. परांजपे साहेब रिटायर्ड

प्रिन्सीपल डिस्ट्रिक्ट जज्ज, यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणुक करतेवेळेस किती फी ठरलेली होती तसेच त्यांनी काय काम केलेले आहे, चौकशी पूर्ण झालेली आहे काय व त्याप्रमाणे मा नउच्च.्यायालयामध्ये अहवाल सादर केलेला आहे काय, यासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा". असा निर्णय झालेला आहे.

प्रस्तुतचे निर्णयास अनुसरुन खालील प्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे.

| अ.नं. | मा. व्यवस्थापन समितीचा मुद्दा | मा. व्यवस्थापन समितीचे मुद्याचा खुलासा. |
|---|---|---|
| १ | मा.श्री.पी.एस. परांजपे साहेब रिटायर्ड प्रिन्सीपल डिस्ट्रिक्ट जज्ज, यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणुक करतेवेळेस किती फी ठरलेली होती. | मा.श्री.पी.एस. परांजपे साहेब रिटायर्ड प्रिन्सीपल डिस्ट्रिक्ट जज्ज, यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणुक करतेवेळेस फी ठरलेली नाही.<br>मा. उच्च न्यायालयाने दि. १०/१२/२०१४ रोजीचे आदेशात मा.श्री.पी.एस. परांजपे साहेब रिटायर्ड प्रिन्सीपल डिस्ट्रिक्ट जज्ज यांचे नियुक्ती व फी बाबत खालील प्रमाणे नमुद केले आहे.<br>4] In this situation, we hereby appoint Shri P.S.Paranjape, retired Principal District Judge, to conduct inquiry in the matter. Schedule thereof be drawn by inquiry officer in consultation with the officers of Saibaba Sansthan, Shirdi, Dist.Ahmednagar, as the said judicial officer will be required to visit the office of respondent no.2 for conducting the inquiry. Needless to mention that during inquiry, petitioner and all other concerned persons may be given opportunity by such judicial officer if their assistance or evidence is found necessary.<br>5] The expenditure and charges of such inquiry shall<br>be borne by respondent no.2. |
| २ | त्यांनी काय काम केलेले आहे. | मा.श्री.पी.एस. परांजपे साहेब रिटायर्ड प्रिन्सीपल डिस्ट्रिक्ट जज्ज यांनी दि.२४/०१/२०१५,<br>दि. १४/०२/२०१५, दि. ०८/०३/२०१५,<br>दि. १२/०४/२०१५, दि. १३/०५/२०१५,<br>दि. १४/०५/२०१५, दि. १४/०६/२०१५,<br>दि. १२/०७/२०१५, दि.०२/०८/२०१५ रोजी शिर्डी येथे उपस्थीत राहून वेळोवेळी पिटीशनर व रिस्पॉन्डंट यांचे शपथपत्र घेवून दि.०२/०८/२०१५ रोजी तोंडी ऑर्ग्यूमेंट करणेस सांगीतले त्याप्रमाणे काही रिस्पॉन्डंट यांचे प्रतिनिधींनी तोंडी ऑर्ग्यूमेंट केले. |
| ३ | चौकशी पूर्ण झालेली आहे काय व त्याप्रमाणे मा अहवाल सादर यालयमध्ये न्याउच्च. केलेला आहे काय. | चौकशी दि. ०२/०८/२०१५ रोजी पूर्ण झालेली आहे. त्यांनी मा यालयमध्ये न्याउच्च.अद्याप अहवाल सादर केलेला नाही. |

उपरोक्त प्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे मुद्याचा खुलासा सादर, मा. श्री पी.एस.परांजपे, चौकशी अधिकारी यांनी मागणी केलेली चौकशीच्या कामकाजाची उर्वरीत फी रु. ६०,०००/- व यापुढे मागणी केलेली रक्कम अदायीबाबतचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१२४ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, चौकशी अधिकारी श्री.पी.एस.परांजपे साहेब यांनी चौकशीचा अहवाल मा.उच्च न्यायालयामध्ये सादर केल्यानंतर त्यांना अदा करणेच्या फी बाबत निर्णय घेण्यात यावा. तोपर्यंत सदरहू प्रस्ताव तहकूब ठेवणेत यावा.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

विषय नं.५० **सफाई कर्मचा-यांसाठी चहा बिस्कीटची व्यवस्था करणेबाबत.**

प्रस्ताव- दि.१६/०९/२०१५ रोजी दुपारी १२-०० वाजता साईनिवास (लेंडीबागे जवळील) येथे मा. श्री. विजय कुमार, सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांची सफाई कर्मचा-यांबाबत मा.कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, खाते प्रमुख, अधिक्षक व सफाई कर्मचा-यांचे उपस्थितीत सभा संपन्न झाली.

सभेमध्ये मा. श्री. विजय कुमार, यांनी कर्मचा-यासाठी युनीफॉर्म चेंजिंग रुम तयार करण्यात यावा, त्याठिकाणी चहा बिस्किटाची व्यवस्था करण्यात यावी असे सुचविले आहे.

चहा बिस्किटाची व्यवस्थेबाबत कॅन्टीन विभागाने दि. १०/११/२०१५ रोजीचे पत्राने कर्मचारी संख्येबाबत मागणी केली. त्यास अनुसरुन इकडील दि. १०/११/२०१५ ने कॅन्टीन विभागास कर्मचारी संख्येबाबत कळविण्यात आले कॅन्टीन विभागाकडून संदर्भ क्र. २ ने अ) प्रती कप रु. २.८० प्रमाणे ३१४ कप चहासाठी प्रती दिन ८७९.२० x३६५ = ३,२०,९०८/- मात्र इतका खर्च दिला आहे. तसेच ब) प्रतिदिन ३१४ बिस्किट पुड्यासाठी रु. ३.८५ प्रमाणे १२०८.९०x३६५ = ४,४१,२४८.५०/- मात्र इतका खर्च दिला आहे. एकूण ३,२०,९०८+ ४,४१,२४८.५०= ७,६२,१५६.५०/- तसेच मालाचे वाढत्या किंमतीच्या अनुषंगाने ७,६२,१५६.५०/- या रकमेत १० % वाढ धरुन ८,३८,३७२/- इतका खर्च अपेक्षित असल्याचे कळविलेले आहे.

आरोग्य विभागाकडील कायम+कंत्राटी सफाई कर्मचा-याना चहा बिस्किटाची व्यवस्था करणेसाठी वार्षिक रुपये ८,३८,३७२/- इतका खर्च येईल, त्यासाठी बजेट तरतूद करावी लागेल. उपरोक्त विषयी खरेदीबाबतची कार्यवाही चहा कॅन्टीनसाठी केलेल्या वार्षिक साहित्य खरेदीच्या मंजूर दरात करता येईल.

आरोग्य विभागाकडील कायम+कंत्राटी सफाई कर्मचा-यांना चहा बिस्किटाची व्यवस्था करणेसाठी वार्षिक रुपये ८,३८,३७२/- (अक्षरी रु. आठ लाख अडतिस हजार तिनशे बाहत्तर मात्र ) इतका खर्च येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर मा. त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१२५ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, आरोग्य विभागातील कायम व कंत्राटी सफाई कर्मचा-यांना वैद्यकिय वगैरे इतर सोयी-सुविधा संस्थानमार्फत मोफत दिल्या जात असून अशा प्रकारे व्यवस्था सुरु केल्यास संस्थानवर आर्थिक भार पडेल सबब सफाई कर्मचा-यांसाठी चहा बिस्कीटची व्यवस्था करणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव नामंजूर करणेत आला.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

विषय नं.५१ **सफाई कर्मचा-यांसाठी चांगल्या प्रतीचे हॅण्डग्लोज व आय.एस.आय. मानांकन गमबुट्स खरेदीबाबत.**

प्रस्ताव- संस्थान इमारती, परिसर व टॉयलेट-ब्लॉक साफसफाई करताना आरोग्य रक्षणासाठी सफाई कर्मचा-यांना गमबुट देण्यात येत आहेत. आरोग्य विभागाकडील एकुण सफाई कर्मचारी संख्या ३७२ इतकी आहे. या विभागाकडील शिल्लक असलेले २०० जोड गमबुटस् सफाई कर्मचा-यांना वाटप करण्यात आलेले आहेत. तसेच त्यांना देण्यात येणारे हॅण्डग्लोज जा.नं. एसएसएस/ खरेदी- आरोग्य /४७४८/२०१५ दि. २६/११/२०१५ चे आदेशाने मे. मगनलाल देवशंकर, नाशिक यांचेकडून रु. २७.५०/- प्रती जोड या दराने खरेदी केलेले आहेत. सध्या आरोग्य विभागाकडे सॅनिटरी कामासाठी वापरण्यात येणारे ३००० रबरी हॅण्डग्लोज जोड शिल्लक आहेत. सदरचे हॅण्डग्लोज सफाई कामगारांना साफसफाईचे कामासाठी देण्यात येत आहेत.

दि. १३/०१/२०१६ रोजी सकाळी ११-०० वाजता साईनिवास(लेंडीबागे जवळील) येथे मा.श्री. विजय कुमार, सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांची सफाई कर्मचा-यांबाबत अधिकारी व सफाई कर्मचा-यांचे उपस्थितीत सभा संपन्न झाली. सदर सभेत हॅण्डग्लोज घातल्यामुळे झाडू सटकतो, गमबुटामुळे पायात घाम येतो व चालता येत नाही, जखमा होतात असे सफाई कर्मचा-यांनी निदर्शनास आणून दिले. यावर आयोगाने सफाई कर्मचा-यांना देण्यात येणारे हॅण्डग्लोज, गमबुट, मास्क, रेनकोट इत्यादी साहित्य शासनाचे आय.एस.आय. मानांकन असलेले खरेदी करुन कर्मचा-यांना ४५ दिवसाचे आत उपलब्ध करुन देण्यात यावे. असे निर्देश दिलेले आहेत.

या विभागाकडील कायम व कंत्राटी सफाई कामगारांना सॅनिटरी कामासाठी वापरण्यात येत असलेले हॅण्डग्लोज देण्यात येत आहेत. श्री विजयकुमार यांचे निर्देशाप्रमाणे शासनाचे आय.एस.आय. मानांकन असलेले हॅण्डग्लोज, गमबुट कर्मचा-यांना वाटप करणेकामी खरेदी करावे लागतील. आय.एस.आय. मानांकन असलेल्या हॅण्डग्लोज व गमबुटाबाबत स्वच्छता साहित्याचे पुरवठाधारक तसेच फुटवेअर यांचेकडे संस्थानचे दुरध्वनीवरुन चौकशी केली असता त्यांनी सांगितले की, चांगल्या प्रतीचे हॅण्डग्लोज अंदाजे रु. १५०/- प्रती जोड या दराने उपलब्ध होतील. सदरचे हॅण्डग्लोजचा वापर साधारण १५ दिवस करता येईल. व त्याचे वापरामुळे कर्मचा-यांचे हाताला त्रास होणार नाही. तसेच आय.एस.आय मानांकन असलेले गमबुट अंदाजे रु. ८००/- प्रती जोड या दराने मिळतील. सदरचे गमबुटामुळे सफाई कर्मचा-यांना काम करताना सतत आठ तास पायात गमबुट घातल्यामुळे त्रास होणार नाही तसेच पायास घाम येणार नाही, अशी माहिती दिली.

मा.श्री.विजय कुमार, यांनी दिलेल्या निर्देशांप्रमाणे या विभागाकडील कायम व कंत्राटी एकुण ३७२ सफाई कामगारांसाठी चांगल्या प्रतीचे हॅण्डग्लोज व शासनाचे आय.एस.आय.मानांकन असलेले गमबुट खरेदी करावे लागतील त्यासाठी खालील प्रमाणे खर्च येईल.

**अ) हॅण्डग्लोज** - १५०० जोड X अंदाजे रु. १५०/- प्रती जोड = रु. २,२५,०००/-

**ब) गमबुट** – कर्मचारी संख्या ३७२ X अंदाजे रु. ८००/- प्रती जोड = रु. २,९७,६००/-

**एकूण रु. ५,२२,६००/-**

उपरोक्त अ+ब चे साहित्य खरेदीकामी अंदाजे रु. २,२५,००० + २,९७,६०० = रु. ५,२२,६००/- (अक्षरी रु.पाच लाख बावीस हजार सहाशे मात्र) इतका खर्च येईल. सन २०१६-२०१७ करिता स्वच्छता साहित्य खरेदीकामी बजेट तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच सदरची खरेदी ई-निवीदा पध्दतीने खरेदी विभागामार्फत करावी लागेल.

तरी उपरोक्तप्रमाणे ३७२ गमबुट जोड व १५०० हॅण्डग्लोज जोड ई-निवीदा पध्दतीने खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रुपये ५,२२,६००/- (अक्षरी रुपये पाच लाख बावीस हजार सहाशे) मात्र चे खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१२६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सफाई कर्मचा-यांसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे चांगल्या प्रतीचे हॅण्डग्लोज व आय.एस.आय. मानांकन गमबुट्स खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.५,२२,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

विषय नं.५२ **रबरी मॅटीन खरेदीबाबत.**

प्रस्ताव- शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना मंदिर परिसरात अनवाणी फिरताना ऊन्हाचा त्रास होऊ नये यासाठी ऊन्हाचे वेळी आरोग्य विभागामार्फत काथ्याचे मॅटीन टाकले जात आहे. सध्या टाकण्यात येणारे काथ्याचे मॅट देणगी मिळालेले आहेत. सदरचे मॅट लवकर खराब होत आहेत त्यामुळे साईभक्तांना भक्तांना ये-जा करताना पायात अडकून त्रास होऊ शकतो. उन्हाळयाचे दिवस सुरु होण्यापुर्वी नव्याने मॅटीन खरेदी करणे गरजेचे आहे.

मंदिर परिसरात गर्दीचे व वर्दळीचे ठिकाणी ५ फुट रुंदीचे व इतर ठिकाणी ३ फुट रुंदीचे रबरी मॅट टाकता येतील. असे मत आहे. यासाठी सोबतचे परिशिष्टात दर्शविलेल्या तपशिलाप्रमाणे रबरी मॅट खरेदी करावे लागतील.

मंदिर परिसरातील मोजमापे ही बांधकाम विभागामार्फत घेण्यात आली असून सोबत जोडलेल्या परिशिष्ठ अ मध्ये नमुद केलेप्रमाणे एकुण अंतर १९१२ रनिंग फूट आहे. त्यापैकी अ प्रमाणे ७९० x ३ फुट रुंद = २३७० स्के. फुट तसेच ब प्रमाणे ११२२ x ५ फुट रुंद = ५६१० स्के. फुट होईल. म्हणजेच ( अ + ब) एकूण ७९८० स्के. फुट होईल.

परिशिष्ठातील एकूण ७९८० स्के. फुट रबरी मॅटीन खरेदीकामी सर्वकरांसहीत अंदाजे रु. ७० प्रति स्के फूट दराने ७९८० x ७० = ५,५८,६००/- (अक्षरी रुपये पाच लाख अठ्ठावन्न हजार सहाशे) मात्र खर्च अपेक्षित आहे. सन २०१६-२०१७ करिता स्वच्छता साहित्य खरेदीकामी बजेट तरतूद करण्यात आलेली आहे. सदरचे साहित्य खरेदी विभागामार्फत ई-निवीदा पध्दतीने खरेदी करावे लागेल किंवा देणगी मिळाल्यास देणगी स्विकारता येईल.

तरी सोबतचे परिशिष्ठातील यादीप्रमाणे रबरी मॅटीन खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रुपये ५,५८,६००/- (अक्षरी रुपये पाच लाख अठ्ठावन्न हजार सहाशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळावी, ही विनंती.

निर्णय क्र.१२७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरामध्ये साईभक्तांना ऊन्हाचा त्रास होऊ नये, याकरिता रबरी ऐवजी काथ्या अथवा ज्युटचे मॅटीन खरेदी करणेत यावे. सदरहू मॅटीन देणगी स्वरुपात मिळविणेसाठी देणगीदार साईभक्तांना विचारणा करण्यात यावी. देणगी स्वरुपात न मिळाल्यास विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

विषय नं.५३ **अभिलेख कक्षाकडील जमा असलेले कागदपत्रांचे स्कॅनिंग ॲन्ड डिजिटायजेशन कामी कंत्राटी कुशल कर्मचारी मंजूरीबाबत.**

प्रस्ताव- अभिलेख कक्ष विभागाकडे असलेले अ,ब व क वर्गवारीतील महत्वाचे कागदपत्रांचे स्कॅनींग व डिजिटाईज करून ठेवणेकामी आवश्यक इलेक्ट्रॉनिक मशिन्स आयटी विभागामार्फत खरेदी करणेत येवून सदर मशिन आज दि.०६.०१.२०१६ रोजी Kairee Systems Pvt.Ltd, Pune यांचे प्रतिनिधी यांनी कार्यरत (Install) करणेचे काम सुरू केले आहे.

१) अ,ब व क वर्गवारीतील महत्वाचे कागदपत्र स्कॅनिंग करणेकामी श्री पुजारी सो Hardware Tech. IT dept. यांचेशी चर्चा केली असता, त्यांनी दि.०५.०१.२०१६ रोजी सांगितले की, दररोज तीन कुशल कामगार लागतील व त्यांना Computer basic knowledge असणे आवश्यक आहे.

२) अभिलेख कक्ष विभागाकडे २ लिपीक असून त्यात श्री तुरकणे यांनी फक्त MSCIT कोर्स केलेला आहे. सदर कोर्स बेसीक ज्ञानात मोडत नाही. तसेच श्री जगताप यांना संगणकीय काम अवगत नाही. करीता विभागाकडे संगणकीय तांत्रिक मुळ अभ्यास असलेला कर्मचारी उपलब्ध नाही.

सदर कामकाज करून घेणेसाठी सध्या अभिलेख कक्ष विभागाकडे जमा असलेले अ,ब व क वर्गवारीतील फाईल्स, रजिष्टर व व्हाऊचर फाईल्स मिळून एकूण- ९,३८,३८८ पाने स्कॅनींगकरीता उपलब्ध आहेत, व इतर विभागाकडील माहीती घेतली असता एकूण-२७,८०,८५२ पाने अशा प्रकारे एकूण-३७,१९,२४० पाने स्कॅनींग करणेकामी साधारण २ वर्षाचा कालावधी लागणार आहे, त्यात प्रथम अभिलेख कक्ष विभगाकडील जमा असेलेले कागदपत्रांचे स्कॅनींग व डिजिटाईजेशन करता येईल.

त्यासाठी खालीलप्रमाणे दैनंदिन लागणारे ३ कुशल कंत्राटी कर्मचारी ( संगणकीय ज्ञान असलेले ) लावलेस त्यावर खालीलप्रमाणे त्यांचे वेतनावर खर्च होईल.

मागणी:-

अ) एका कुशल कंत्राटी कर्मचा-यासाठी संस्थानचा सध्याचा किमान वेतन दर रू. = **३०१.५६** (४०.२८ प्रा.फंड, ४७.२५ स.चार्ज, १.७० स.चार्ज. = एकूण-**३९१.३९** प्रति कर्मचारी.)

१) किमान वेतन दर -३९१.३९ X २६ दिवस = १०,१७६.१४ एका कर्मचा-यासाठी मासिक खर्च.

२) एकूण ३ कुशल कंत्राटी कर्मचा-यासाठी मासिक खर्च रूपये - ३ X १०,१७६.१४ = **३०,५२८.४२**

३) ३ कुशल कंत्राटी कर्मचा-यांचा वर्षासाठीचा खर्च रूपये- ३०,५२८.४२ X १२ = **३,६६,३४१.०४**

**ब)** उपरोक्त संगणकीय माहीती असलेला कुशल कंत्राटी कर्मचारी एकूण-०३ आयटी विभागामार्फत मिळणेस विनंती. तसेच सदर कर्मचा-यांचे वेतन हे अभिलेख कक्षामार्फत अदा करता येईल.

**क)** सदरचे कामकाज तांत्रिक असल्याने ते पूर्ण होईपर्यंत स्कॅनींग कामाचा दैनंदिन आढावा आयटी विभागाने घेवून तसा अहवाल संबंधीत विभागाचे दोनही प्रशासकीय अधिकारी यांना सादर करावा, असे नम्र मत आहे.

**अभिप्राय:-** उपरोक्त "अ" "ब" व "क" मान्यता मिळणेस, तसेच सदरचे काम २ ते ३ वर्ष चालणार असलेने त्यावर होणा-या खर्चास मान्यता असावी. मागणी प्रमाणे प्रस्ताव मंजूर होणेस विनंती.

निर्णय क्र.१२८ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, अभिलेख कक्षाकडील जमा असलेले कागदपत्रांचे स्कॅनिंग ॲन्ड डिजिटायजेशन करणेचे काम सध्या अभिलेख कक्षामध्ये काम करत असलेल्या कर्मचा-यांकडून करुन घेण्यात यावे, त्यासाठी आवश्यकता असल्यास या कर्मचा-यांना ट्रेनिंग देण्यात यावे.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, अभिलेख कक्ष)

---

विषय नं.५४ **दैनंदिन वापराने जमा होणा-या निरुपयोगी सादिल/किरकोळ स्वरुपाचे भंगार साहित्याची सन २०१६-१७ या वित्तीय वर्षामध्ये विक्री करणेकामी सीलबंद पाकीटात निविदा मागविणेबाबत.**

प्रस्ताव- **महाराष्ट्र अधिनियम-२००४ मधीलत तरतूदी-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १४ (२) (ग) व कलम १७ (४) मधील तरतूदीस अधीन राहून कार्यवाही करण्यात येत आहे.

**प्रस्ताविक:-** महाराष्ट्र अधिनियम २००४ मधील तरतूदी तसेच महाराष्ट्र शासनाची मान्यता यांचे शिफारसीनुसार श्री साईबाबा संस्थान कडील दैनंदिन वापराने उपलब्ध होणा-या निरूपयोगी सादिल स्वरूपाचे भंगार साहित्याची वर्तमानपत्रात जाहीरात देवून भंगार साहित्य खरेदीदाराकडून दरपत्रके मागविण्यात येतात. त्यानुसार उच्चत्तम दर देणा-या व्यापा-यास वित्तीय वर्षानुसार संस्थानकडील भंगार साहित्याची खरेदी करणेबाबत आदेशित केले जाते.

श्री साईबाबा संस्थानकडे अशाप्रकारचे साहित्य साठविणेकामी बंदीस्त जागा उपलब्ध नसल्याने, तसेच त्याचे सांठवणूकीतून दुर्गंधी निर्माण होते व त्यातून सार्वजनिक आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. करीता अशा साहित्याची वेळीच विल्हेवाट लावावी लागते.

अधिनियमातील कलम १४ (२) (ग) मध्ये " समितीच्या अधिका-यांचे अधिकार व कर्तव्यास अधिन राहून अशाप्रकाच्या नाशवंत अर्पण वस्तूंची लिलावद्वारे किंवा अन्य प्रकारे विल्हेवाट लावण्याचे आणि त्याचे उत्पन्न विश्वस्त संस्थेच्या निधीमध्ये जमा करण्याचे अधिकार आहेत. त्यास अनुसरून दि.२४.०५.२००८ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती निर्णय क्र.४७६ नुसार अशा साहित्याची विल्हेवाट लावण्याचे समितीचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी सो. यांना प्रदान करण्यात आलेले आहे.

अधिनियमातील कलम १७(४) मध्ये " विश्वस्त संस्थेमध्ये निहीत केलेले पन्नास हजार रूपयांपेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहीर दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्व मंजूरी असेल , त्याखेरीज समितीकडून विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमित करण्यात येणार नाहीत." अशी तरतूद आहे.

अशाप्रकारचे भंगार/ सादिल साहित्य विक्री करणेकरीता मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे Opinion/ सल्ला घेणेसाठी संस्थानचे विधी विभागामार्फत जा.नं.एसएसएस/वशी-विधी/१७०/२०१३, दि.११.१०.२०१३ नुसार Civil Application सादर केलेले आहे. त्यास अनुसरून विधी अधिकारी यांनी दि.०१.०१.२०१६ रोजीचे पत्रात, "सन २०१३-१४ चे निरूपयोगी भंगार/ डेडस्टॉक/ मिसलेनिअस तसेच सादील स्वरूपाचे साहित्य शिल्लक आहे किंवा कसे? तसेच सदरचा सिव्हील अर्ज मा.उच्च न्यायालयातून मागे (withdraw) घेण्यात यावा किंवा कसे? याबाबत इकडील कार्यालयास कळवावे" असे म्हटले आहे. अधिनियमातील कलम १७ (४) ला अधिन राहून अभिलेख कक्षाकडील रूपये पन्नास हजाराच्या वर सादिल स्वरूपाच्या मालाची विक्री केली जात नाही.

अशाप्रकारचे संस्थानचे इतर सर्व विभागांकडे उपलब्ध होणारे नाशवंत / खराब साहित्य टाकावू स्वरूपाचे असल्याने याकामी मा.कोर्टाची मान्यता घेणे जरूरीचे नाही, असे तत्कालीन कार्यकारी अधिकारी सो यांनी मौखीक आदेशीत केले असलेने, सन-२०१५-१६ या वित्तीय वर्षात सादिल / भंगार साहित्य मंजूर दराने विक्री करण्याची कार्यवाही मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०६.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६२ (१) नुसार करणेत येत आहे.

**१)** चालू आर्थिक वर्षात सोबतचे परिशिष्ट "अ" प्रमाणे एकूण अ.नं.१ ते ५७ सादील स्वरूपाचे साहित्य विक्रीबाबत उपलब्ध होते.

२) **परिशिष्ट " अ "** मधील बरेच साहित्याची नोंद डबल / तसेच काही साहित्य, गेल्या दोन आर्थिक वर्षापासून निघणे बंद झाले असलेने व काही साहित्य अल्प प्रमाणात निघत असलेने, यादीतून कमी केलेले असून ते साहित्य अ.नं.१ ते २० **परिशिष्ट "क"** म्हणून सादर करण्यात आले आहे.

३) पुढील आर्थिक वर्ष (२०१६-१७) साठी सोबतच्या परिशिष्ट " अ " मधून परिशिष्ट " क " मधील दर्शविलेले साहित्य वगळता उर्वरीत एकूण ३७ साहित्याची प्रचलित पध्दतीनुसार विक्री करता येईल. त्यास **परिशिष्ट " ब "** म्हणून संबोधले आहे.

**मागणी**:- उपरोक्त प्रस्तावीत केलेप्रमाणे सन-२०१६-१७ करीता संस्थानमधील दैनंदिन वापराने खराब होणा-या निरूपयोगी सादील स्वरूपाचे भंगार साहित्याची विक्री/ विल्हेवाट करणेसाठी खालीलप्रमाणे प्रस्तावित आहे.

अ) जनसंपर्क विभागामार्फत अहमदनगर, नाशिक, औरंगाबाद येथून प्रकाशीत होणा-या वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्दीस देता येईल.

ब) परिशिष्ट " क " मधील अ.नं. १ ते २० हे साहित्य अत्यल्प प्रमाणात निघत असल्याने व त्यामुळे व्यापा-यांची अनामत रक्कम वर्षभर गुंतून पडते. परिणामी सदरील व्यापारी वाद घालतात, करीता चालू वर्षीचे दर मागणी पत्रकातून असे साहित्य कमी करता येईल.

क) उपरोक्त अ.नं.३ नुसार सोबतचे **परिशिष्ट " ब " मधील अ.नं.१ ते ३७** प्रकारचे साहित्याकरीता पुढील वित्तीय वर्षासाठी निविदा मागविता येईल.

**अभिप्राय**:- तरी वरील मागणीप्रमाणे " अ " " ब " व " क " प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सन-२०१६-१७ साठीचा भंगार साहित्य उच्चत्तम दराने विक्रीकरणे करीता निविदा मागणी प्रस्ताव मंजूर होणेस विनंती.

निर्णय क्र.१२९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. संस्थानचे दैनंदिन वापराने जमा होणा-या निरुपयोगी सादिल/किरकोळ स्वरुपाचे भंगार साहित्याची सन २०१६-१७ या वित्तीय वर्षामध्ये उच्चतम दराने विक्री करणेकरीता विहीत पध्दतीने ई-निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, अभिलेख कक्ष)

---

विषय नं.५५ **चिंच, लवंग व सफेद तिळ या किराणा मालाची मागणी पुर्ण झाल्याने वार्षिक मागणीच्या २५ टक्के मालाची खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थानने सन २०१५-१६ सालासाठी किराणा माल खरेदीकामी मालाचे पुरवठा आदेश दिले होते. त्यातील काही वस्तूंची वार्षिक मागणी पूर्ण झालेली आहे.

संस्थानने पुरवठा आदेश दिलेल्या किराणा मालाची वार्षिक मागणी विहित वेळेपूर्वी पूर्ण झाल्यास, संस्थानने संबंधित पुरवठाधारकांशी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती क्रमांक ८ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे. **"प्रसंगी निविदा कालावधीत व तदनंतरही नमुद केलेल्या मालापेक्षा २५% इतका जादा माल मंजुर दरानेच पुरविणे बंधनकारक राहील."**

उर्वरित कालावधीसाठी हा माल आवश्यकतेप्रमाणे खरेदी करणे गरजेचे आहे. तूर्त वार्षिक मागणीच्या २५ टक्के हा माल खरेदी करता येईल.

किराणा मालाची वार्षिक मागणी, २५ टक्के मागणी, येणारा खर्च याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | मालाचा तपशिल | वार्षिक मागणी क्विंटल | २५% जादा मागणी क्विंटल | मंजुर दर प्रती क्विंटल | २५%जादा खरेदीकामी येणारा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | चिंच | ९००. | २.२५ | ५,१००.०० | ११,४७५.०० |
| २ | लवंग | १.५० | ०.३७ | ७४,९००.०० | २७,७१३.०० |
| ३ | सफेद तीळ | ०.५० | ०.१२ | ११,९००.०० | १,४२८.०० |
| | | | | **एकुण खर्च रु.** | **४०,६१६.००** |

उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे वार्षिक मागणीपेक्षा २५% इतका जादा किराणा माल खरेदीकामी एकुण रक्कम रु.४०,६१६/- (अक्षरी रुपये चाळीस हजार सहाशे सोळा मात्र) एवढा खर्च येईल.

संस्थानने सन २०१५-१६ करीता वार्षिक किराणा माल खरेदीकामी (गावरान तुप वगळता) अंदाजे रक्कम रु.४९,२२,००,०००/- (अक्षरी रुपये एकोणपन्नास कोटी बावीस लाख मात्र) खर्चाला मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेतलेली आहे. यातून जुन-२०१५ ते डिसेंबर-२०१५ अखेर रु.२०,३४,६५,२९४/- (अक्षरी रुपये वीस कोटी चौतीस लाख पासष्ट हजार दोनशे चौ-यान्नव मात्र) खर्च झालेला आहे. यातील पुढील जानेवारी-२०१६ ते मार्च-२०१६ या कालावधीसाठी किराणामाल खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.९,००,००,००/- (अक्षरी रुपये नऊ कोटी मात्र) पर्यंत खर्च येईल. ही एकूण रक्कम रु.२९,३४,६५,२९४/- (अक्षरी रुपये एकोणतीस कोटी चौतीस लाख पासष्ट हजार दोनशे चौ-यान्नव मात्र) इतकी होत आहे. तरीही उर्वरित रक्कम रु.१९,८७,३४,७०६/- (अक्षरी रुपये एकोणावीस कोटी सत्त्याऐंशी लाख चौतीस हजार सातशे सहा मात्र) शिल्लक असल्यामुळे या रकमेतून वरील खर्च करता येईल, असे वाटते.

तरी चिंच, लवंग, व सफेद तीळ या मालाच्या एकूण वार्षिक मागणीच्या २५% इतका जादा माल करारनाम्यातील अटी-शर्तीनुसार मंजूर दराने वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे खरेदी करणेस व याकामी येणारे एकूण रक्कम रु.४०,६१६/- (अक्षरी रुपये चाळीस हजार सहाशे सोळा) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१३० **यावर सविस्तर चर्चा होऊन, चिंच, लवंग व सफेद तिळ या किराणा मालाची मागणी पुर्ण झाल्याने मालाच्या एकूण वार्षिक मागणीच्या २५% इतका जादा माल करारनाम्यातील अटी-शर्तीनुसार मंजूर दराने प्रस्तावातील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे खरेदी करणेस व याकामी येणारे एकूण रक्कम रु.४०,६१६ मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्र.अधिक्षक,खरेदी विभाग)

---

विषय नं.५६ **श्री साईप्रसादालयाचे कार्यालयातील दरवाजाकरीता एअर कर्टन खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साई प्रसादालयाचे कार्यालयामध्ये स्प्लिट ए.सी. बसवून कार्यरत आहेत. वातानुकूलीत असलेले ठिकाण हे पुर्णपणे बंदिस्त असणे आवश्यक असते. तरच त्या ठिकाणची वातानुकूलीत यंत्रणा सुस्थितीत कार्य करु शकते. अन्यथा सदर यंत्रणा लोडवर राहून वारंवार नादुस्त होत असते.

श्री साई प्रसादालयातील कार्यालयाचे दक्षिण बाजुकडील एक दरवाजा सतत उघडा ठेवावा लागत असल्याने, आतील भागात निर्माण झालेली थंड हवा दरवाज्यातून बाहेर निघून गेल्याने आतील भागातील तापमान नियंत्रित होत नाही. परिणामी कार्यालयातील ए.सी. यंत्रणेवर ताण वाढून आतील भागातील तापमान नियंत्रित करणेसाठी करणेसाठी सदर यंत्रणा सतत चालू राहते. पर्यायाने विद्युत खर्च वाढतो आणि सदर यंत्रणा सतत चालल्याने तिचा मेन्टेनंन्स खर्चही वाढतो. म्हणून दरवाजातून जाणारी थंड हवा थांबविणे व बाहेरच्या वातावरणातील गरम हवा आतमध्ये येऊ न देणे याकरीता सदर दरवाजाला एअर कर्टन (वायु विभाजक) बसविणे आवश्यक आहे. यासाठी खालील तपशीलाप्रमाणे एअर कर्टन खरेदी करावा लागणार आहे :

| अ.क्र. | एअर कर्टनचा तपशील | मागणी | अंदाजे दर रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | Air Curtain for Sai Prasadalaya capacity 1400 RPM, 230 Volt, 50HZ, Single Phase, **Size** - Height – 7 Feet, Width - 6 Feet, Depth – 1 x 1 Feet | 1 नग | 48,000/- | 48,000/- |

उपरोक्त तपशीलानुसार श्री साई प्रसादालयाचे कार्यालयातील दक्षिण बाजूचे दरवाजाला एअर कर्टन बसविणेकामी रक्कम रुपये 48000/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

तरी श्री साई प्रसादालयाचे कार्यालयातील दक्षिण बाजूचे दरवाजाला एअर कर्टन बसविणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन बोलावून खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रुपये 48,000/- (अक्षरी रु.अठ्ठेचाळीस हजार मात्र) मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीची सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.१३१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाचे कार्यालयातील दक्षिण बाजूचे दरवाजाला एअर कर्टन बसविणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये 48,000/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.५७ **साईआश्रम भक्त निवास येथील बसविलेल्या १३ लिफटचे दिनांक १/१०/२०१४ ते ३०/०९/२०१५ या संपलेल्या कालावधीतील AMC ची रक्कम अदा करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईभक्तांना अधिकाधिक सेवासुविधा उपलब्ध करुन देणेकरीता साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या इमारतीमध्ये भक्तांना तळमजला ते वरील मजल्यावर ये-जा करणेकरीता मे. जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. पुणे यांचेमार्फत ॲटोमॅटीक डोअरच्या 20 लिफ्टस् बसविण्यात आलेल्या आहेत. लिफ्ट चालू झालेनंतर मे. जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. पुणे यांनी दिनांक 01/08/2012 ते दि. 31/07/2013 या कालावधीत एक वर्ष फ्रि सर्व्हिस दिली. तसेच सदरची मुदत संपलेनंतर दिनांक 31/12/2013 पर्यंत जादा 5 महीने फ्रि सर्व्हिसींग करून दिलेली आहे. त्यानंतर मे. जॉन्सन लिफ्ट प्रा लि., पुणे यांनी दिनांक 01/01/2014 ते 31/12/2014 कालावधीसाठी रुपये 22,50,000/- रकमेचा साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा येथील 20 लिफ्टच्या वार्षिक सर्व्हिसींगसाठी प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन, मा.त्रिसदस्यीय समितीने दिनांक 12/06/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्रमाक 463 नुसार "प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणे येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व खंडपीठाने सूचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी", असे ठरविण्यात आले.

उपरोक्त निर्णयानुसार मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेबाबतची कार्यवाही सुरु करण्यात आली. या दरम्यान मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. 676 अन्वये "पुर्वीच्या व्यवस्थापन समितीचे मान्यता दिलेल्या व मा. खंडपीठाची मान्यता मिळालेल्या खर्चा व्यतिरिक्त साईभक्तांना, रुग्णांना सेवा देण्यात येत असलेल्या सोयी- सुविधा करीता आवश्यक असणाऱ्या सर्व सेवांसाठी लागणारी सर्व मशिनरी / उपकरणे व तत्सम यांत्रिक सर्व बाबी यांची AMC, CAMC व इतर दुरुस्ती यासाठी येणारा खर्च तसेच मालमत्ता कर, रेग्युलर टॅक्सेस, कार्यदेशीर जबाबदारीने भरावयाच्या रक्कमा यासारखे रक्कम रुपये 1 कोटी

पर्यंतचे खर्च मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे मान्यतेमधून वगळणेत यावेत", असे ठरले. यामुळे मा.कोर्टात प्रस्तावितकामी C.A. दाखल करण्यात आले नाही.

मा.व्यवस्थापन समितीचे वरील निर्णयानुसार मा. कोर्टात C.A. दाखल करण्यात आले नाही. या सर्व कार्यवाहीकरीता जवळजवळ नऊ महिन्याचा कालावधी लागला. परंतु मे. जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. पुणे यांचेकडून ए.एम.सी. कामी प्रपोजल दिनांक 01/01/2014 पासून दिले होते. या विलंबामुळे मे. जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. पुणे यांना दिनांक 01/01/2014 पासून कार्यादेश न देता दिनांक 01/10/2014 ते 30/09/2015 या एक वर्षाच्या कालावधीसाठी साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या इमारतीमधील 20 लिफ्टच्या ए.एम.सी.चा कार्यादेश देण्यात आला. परंतु साई धर्मशाळा येथील 7 लिफ्ट बंद असल्यामुळे, फक्त 13 लिफ्टची ए.एम.सी. सेवा त्यांचेकडून घेण्यात येत आहे. तसे त्यांना जा.नं. एसएसएसटी/मेकॅनिकल/1825/2015 दिनांक 30 जून, 2015 चे पत्रान्वये कळविण्यात आले आहे. कार्यादेशानुसार मे. जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. पुणे यानी दिनांक 01/10/2014 ते 30/09/2015 या कालावधीत साईआश्रम भक्तनिवास येथील 13 लिफ्टची सर्व्हीसींग केलेली आहे. या ए.एम.सी. चा कालावधीही संपलेला आहे.

आता, मे.जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. पुणे यांनी साईआश्रम भक्तनिवास येथील 13 लिफ्टच्या दिनांक 01/10/2014 ते 30/09/2015 या कालावधीतील ए.एम.सी. चे बील अदा करणेबाबत कळविले आहे. मे. जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. पुणे यांचे ए.एम.सी. कालावधीतील चे काम समाधानकारक आहे. त्यानुसार त्यांना खालील तपशीलाप्रमाणे रक्कम अदा करावी लागणार आहे :

| अ.नं. | लिफ्टची संख्या | प्रत्येक लिफ्टसाठी ए.एम.सी दर रुपये | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1. | 13 | 1,27,123/- | 16,52,599/- |
| | | मिटींगमध्ये दिलेली सवलत 11.50303% : | 1,90,099/- |
| | | **एकूण देय रक्कम :** | **14,62,500/-** |

तरी मे.जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. पुणे यांना साईआश्रम भक्तनिवास येथील 13 लिफ्टच्या दिनांक 01/10/2014 ते 30/09/2015 या संपलेल्या कालावधीतील ए.एम.सी. ची रक्कम रुपये 14,62,500/- (अक्षरी रुपये चौदा लाख, बासष्ट हजार, पाचशे) अदा करणेस मान्यतेकरीता मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१३२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, तरी मे.जॉन्सन लिफ्ट प्रा.लि., पुणे यांना साईआश्रम भक्तनिवास येथील 13 लिफ्टच्या दिनांक 01/10/2014 ते 30/09/2015 या संपलेल्या कालावधीतील ए.एम.सी. ची रक्कम रुपये 14,62,500/- अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.५८ **श्री साईप्रसादालयातील स्टिम कुकर्स खरेदीकामी कार्यादेश देणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साई प्रसादालयातील 10 नग स्टीम कुकर्स विहीत पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रुपये 30,00,000/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 05/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 385 व मा. मंबई उच्च न्यायालयाचे औरगाबाद खंडपीठाची दिनांक 26/09/2014 रोजीचे आदेशान्वये मान्यता मिळालेली आहे.मा. त्रिसदस्यीय समितीचे व मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार सदरहु कामांसाठी इकडील विभागामार्फत निविदा तयार करुन संस्थान संकेतस्थळावर व वर्तमानपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. परंतु एकच निविदा आलेली असल्याने फेर निविदा मागविणेस दिनांक 17/3/2015 रोजीचे टिपणीद्वारे मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांची मान्यता घेण्यात आलेली होती. त्यानुसार फेरनिविदा महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दिनांक 10/4/2015 रोजी अपलोड करण्यात आले होते. याकामी खालीलप्रमाणे निविदाधारकांनी ई-निविदा अपलोड केल्या :

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| 1. | मे. स्वराज इंडस्ट्रीज, पुणे |
| 2. | मे. पद्माटेक फुडटेक ॲन्ड प्रोसेस टेक्नोलॉजी, पुणे |
| 3. | मे. ॲडव्हेन्ट फुडटेक, पुणे |

वरील तीन प्राप्त निविदाधारकांचे टेक्नीकल व कमर्शियल बीड दिनांक 01/07/2015 रोजी प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले असून, त्यांच्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेतील दर रुपये | सिव्हिल वर्क्सचे दर | एकत्रित रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | मे. स्वराज इंडस्ट्रीज, पुणे | 17,08,000/- | 40,000/- | **17,48,000/-** |
| 2. | मे. पद्माटेक फुडटेक ॲन्ड प्रोसेस टेक्नोलॉजी, पुणे | 23,94,000/- | 10000/- | 24,04,000/- |
| **3.** | **मे. ॲडव्हेन्ट फुडटेक, पुणे** | **10,36,000/-** | **17500/-** | **10,53,000/-** |

उपरोक्त तक्तानुसार विषयांकित कामांसाठी मे. ॲडव्हेन्ट फुडटेक, पुणे यांनी देऊ केलेले दर निम्नतम आहेत. परंतु मे. ॲडव्हेन्ट फुडटेक, पुणे यांनी टेक्नीकल बीडच्या लिफाफामध्ये दिलेल्या पत्रात त्यांनी ऑन लाईनद्वारे दर टाकतेवेळी त्यांचेकडून एक झिरो टाईप करावयाचा राहून गेलेला असल्याने प्रती कुकरसाठी रु. 1,75,000/- ऐवजी

रक्कम रु. 17,500/- टाईप करण्यात आले. त्यामुळे ई निविदेत नमुद केलेल्या दर रुपये 17,500/- ऐवजी रक्कम रु. 1,75,000/- ग्राह्य धरावी अशी विनंती केलेली आहे. मे. ॲडव्हेन्ट फुडटेक, पुणे यांच्या पत्रानुसार त्यांचे दर रक्कम रुपये 26,11,000/- होत असून त्यानुसार होणा-या दरांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे:

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेतील दर रुपये |
|---|---|---|
| 1. | मे. स्वराज इंडस्ट्रीज, पुणे | **17,48,000/-** |
| 2. | मे. पद्माटेक फुडटेक ॲन्ड प्रोसेस टेक्नोलॉजी, पुणे | 24,04,000/- |
| 3. | मे. ॲडव्हेन्ट फुडटेक, पुणे | 26,11,000/- |

त्यानुसार निम्नतम दरधारक स्वराज इंडस्ट्रीज, पुणे यांचे दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेकामी मान्यतेकरीता मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावयाच्या टिपणीवर मा. मुख्य लेखाधिकारी यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

1. एकदा निविदा भरलेनंतर सदरील दरांमध्ये तांत्रिक कारण दाखवून वाढ करणे चुकीची प्रथा पडेल.
2. निविदेमधील दर तांत्रिक कारणास्तव वाढवता येत नसतात. संबंधीत L1 यांना पत्र देऊन कार्यादेश देणेबाबत विचारणा करणे. L1 तयार नसेल तर अनामत रक्कम जप्त करुन पुढील कार्यवाही करावी असे नमुद केले होते.

उपरोक्त अभिप्रयानुसार मे.ॲडव्हेन्ट फुडटेक, पुणे यांना इकडील जा.नं.एसएसएस/ वशि/ मेकॅनिकल/ 3617/2015 रोजीचे पत्रान्वये "ई-निविदामध्ये सादर केलेल्या दरांमध्ये तांत्रिक कारण सांगुन बदल करता येत नाही. त्यामुळे संदर्भिय पत्रातील दर ग्राहय धरता येणार नाही. आपण कमर्शियल बीडमध्ये सादर केलेले निम्नत्तम दरामध्ये संस्थानकरीता 10 नग स्टीम कुकर्सचा पुरवठा करणार किवा नाही याबाबत इकडील कार्यालयास 15 दिवसात कळवावे. ई निविदामध्ये सादर केलेल्या दरामध्ये आपण काम करण्यास तयार नसल्यास आपली बयाना रक्कम रु. 25000/- जप्त करणेत येऊन L2 दरधारकास विषयांकित कामी कार्यादेश देण्यात येईल" असे कळविणेत आले होते. यावर ॲडव्हेन्ट फुडटेक, पुणे यांनी दिनांक 04/10/2015 रोजीचे ई-मेलमध्ये ई टेंडर मधील दिलेल्या दरामध्ये काम करणेस नकार दिलेला आहे. त्यामुळे ई-निविदा प्रक्रियातील L2 दरधारक मे. स्वराज इंडस्ट्रीज, पुणे यांचेकडून स्टीम कुकर्स खरेदी कामी कार्यादेश देता येईल. याकरीता मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी मे. स्वराज इंडस्ट्रीज, पुणे यांना श्री साई प्रसादालयातील स्टीम कुकर्स खरेदीकरीता कार्यादेश देणेस मान्यतेकरीता प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१३३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील स्टिम कुकर्स खरेदीकामी प्रस्तावात नमुद केलेल्या कारणास्तव ई-निविदा प्रक्रियेतील व्दितीय निम्नतम दरधारक मे.स्वराज इंडस्ट्रीज, पुणे यांना कार्यादेश देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.५९ **आटा मळणी मशिन्स खरेदीबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतूद** : कलम 21(1)(घ) – **भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे**

**प्रास्ताविक**:- श्री साई प्रसादालयात दररोज सरासरी 40 हजार साईभक्त प्रसाद भोजन घेतात. प्रसाद भोजनातील पुरी व चपातीसाठी दररोज अंदाजे 50 क्विंटल आटयाची मळणी करण्यात येते. त्यासाठी चपाती व पुरीचा आटा मळणी करणेकरीता जे.के. कंपनीचे 90 किलो क्षमतेचे ॲटोमॅटीक तीन मशिन कार्यान्वित आहे. तसेच नाष्टा पाकीट विभागात सरासरी 10 हजार नाष्टा पाकीट तयार केली जात असून, यासाठी मंगल मेटल इंडस्ट्री, बेळगाव कंपनीचे सन 2005 मध्ये देणगी स्वरुपात मिळालेले दोन मशिन्स कार्यान्वित आहे.

**मागणी** :- नाष्टा पाकीट विभागात कार्यान्वित असलेले मशिन हे सिंगल स्लायडीग असून 10 वर्षापासून सततचे वापराने त्यांची सतत दुरुस्ती करावी लागते. त्याचा दुरुस्ती खर्च वाढत आहे. सदर ठिकाणी नविन 90 किलो क्षमतेचे दोन ॲटोमॅटीक मशिन्स खरेदी करणे आवश्यक आहे. त्याकरीता अंदाजे रक्कम रुपये 6,00,000/- (अक्षरी रक्कम सहा लाख ) मात्र पर्यंत खर्च अपेक्षित असून, हा खर्च अंदाजपत्रक सन 2015-2016 मधील 'नविन मशीनरी खरेदी खर्च' या शिर्षातील शिल्लक रक्कम रुपये 9,44,06,710/- या खर्चातून करता येईल. सदरच्या खर्चास मा. त्रिसदस्यीय समितीची प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत :-** तरी श्री साईप्रसादालयातील नाष्टा पाकीट करीता दोन आटा मळणी मशिन्स विहीत पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रुपये 6,00,000/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर करणेस मान्यता असावी, ही विनंती.

निर्णय क्र.१३४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील नाष्टा पाकीट करीता दोन आटा मळणी मशिन्स विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून विहीत पद्धतीने खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये 6,00,000/- पर्यतच्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.६० **साई आश्रम इमारतीतील V.R.V. ए.सी. यंत्रणेचे आऊट डोअर युनिट करीता शेड बनविणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईआश्रम भक्तनिवास येथे A,B,C या तीन इमारतीमध्ये प्रत्येकी 128 रुम एकूण 384 रुमध्ये शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत देणगीदाखल डायकीन कंपनीचे V.R.V. (Variable Refrigerant Volume) टाईप ए.सी. यंत्रणा बसूवन कार्यान्वित करुन दिलेली आहे.

सदर ए.सी. यंत्रणेचे 48 आऊटडोअर युनिट तिनही इमातरीचे मधील जागेत बसविणेत आलेले आहेत. आऊटडोअर युनिटचा फ्लो थ्रो वरील बाजूस आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पक्षी बसतात. सदर पक्षी बसल्यामुळे त्या ठिकाणी मोठया प्रमाणात घाण होत आहे. यात साधारणपणे विष्ठा, पंखांचा समावेश आहे. सदरील पक्षांची विष्ठा व पंखे आऊटडोअर युनिटचे फॅनमध्ये अडकते. त्याचप्रमाणे आतमध्येही जाते. यामुळे आऊटडोअर युनिट बंद पडून मेन्टेनन्सचा खर्च वाढत आहे. यासाठी या ठिकाणी पक्षापासून संरक्षण व्हावे म्हणून पत्रा शेडची उभारणी करणे आवश्यक आहे. सदरचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून करुन घेता येईल. याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे :

| अ.नं. | मटेरिअलचा तपशील | मागणी | अंदाजे दर रुपये | खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | M.S. Square Pipe – 50 x 50 x 3 mm | 1800 Kgs | 72/- | 1,29,600/- |
| 2 | Profile Sheet – 16' Feet | 63 Nos. | 2,100/- | 1,32,300/- |
| 3 | M.S. Plate – 150 x 150 x 6 mm | 450 Kgs. | 72/- | 32,400/- |
| 4 | Screw | Lumsum | 1,500/- | 1,500/- |
| | | | **एकूण :** | **2,95,800/-** |

उपरोक्तप्रमाणे साईआश्रम इमारतीचे V.R.V. ए.सी. यंत्रणेचे आऊट डोअर युनिटकरीता शेड बनविणेकामी अंदाजे रुपये 2,95,800/- खर्च अपेक्षित आहे.

तरी साईआश्रम इमारतीचे V.R.V. ए.सी. यंत्रणेचे आऊट डोअर युनिटकरीता शेड बनविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारक यांचेकडून निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये 2,95,800/- (अक्षरी रुपये दोन लाख, पंच्यानो हजार, आठशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१३५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम इमारतीचे V.R.V. ए.सी. यंत्रणेचे आऊट डोअर युनिटकरीता शेड बनविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारक यांचेकडून निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये 2,95,800/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.६१ **श्री साईबाबा हॉस्पीटलचे आयसोलेशन रुमसाठी नविन २ नग स्प्लिट ए.सी.खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा रुग्णालयामध्ये असलेल्या टी.एस.आर. वार्ड मधील रुम नं 7 व 8 हे आयसोलेशन रुम म्हणून नव्याने बनविण्यात आले असून, सदर रुमध्ये स्वाईन फ्लु सारखे पेशंट व आवश्यक मशीनरी स्वतंत्र ठेवणे गरजेचे असल्यामुळे दोन्ही रुममध्ये दोन स्प्लिट ए.सी. मेकॅनिकल विभागामार्फत बसविण्यास दिनांक 23/11/2015 चे टिपणीस मान्यता देण्यात आली आहे.

इकडील विभागामार्फत आयसोलेशन रुमची प्रत्यक्ष पहाणी केली असता, तेथे 1.5 टनाचे प्रत्येकी एक याप्रमाणे दोन रुमकरीता 2 स्प्लिट ए.सी. ची आवश्यक असून, सदरील ए.सी. इकडील विभागाकडे शिल्लक नसल्याने विहीत पध्दतीने पुरवठाधारकांकडून दरपत्रक मागवून खरेदी करावे लागणार आहेत. यासाठी खालील तपशीलाप्रमाणे नविन 2 ए.सी. खरेदीकामी खर्च अपेक्षित आहे :

| अ.नं. | स्प्लिट ए.सी. तपशील | मागणी | अंदाजे दर रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | Split Type Wall Mounted Air Conditioner Capacity – 15. Ton, Five Star, Single Phase, Rotary Compressor, Copper Condenser, & Copper Piping With Outdoor Unit, Extra M.S. Stand<br>Company – Voltas, Blue Star, Onida, LG | 2 नग | 48,000/- | 96,000/- |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटलचे आयसोलेशन रुमसाठी 1.5 टन क्षमतेचे 2 नग स्प्लिट ए.सी. खरेदी करणेकामी अंदाजे रुपये 96,000/- खर्च अपेक्षित आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पीटलकडील आयसोलेशन रुमसाठी नविन 1.5 टन क्षमतेचे 2 नग स्प्लिट ए.सी. खरेदी करणेकामी कंपनीचे अधिकृत पुरवठादार यांचेकडून दरपत्रके मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये 96,000/- मात्रच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१३६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटलकडील आयसोलेशन रुमसाठी नविन 1.5 टन क्षमतेचे 2 नग स्प्लिट ए.सी. खरेदी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करण्यास व याकामी येणा-या अंदाजे रुपये 96,000/- मात्रच्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.६२ **श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकरीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया संयंत्र (STP) करीता वार्षिक दुरुस्ती देखभाल करार (AMC) करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम 2004 मधील तरतूद:** अधिनियम कलम 21(1) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

प्रस्तावना: श्री साईबाबा हॉस्पीटल (STP क्षमता 200 Cum/Day) व श्री साईनाथ रुग्णालय (STP क्षमता 200 Cum/Day) परिसरामध्ये ठेकेदार डेक्कन एन्व्हायरोमेंट कन्सलटंटस् प्रा. लि., पुणे यांचेमार्फत रुग्णालयाचे सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया बांधकाम-विभागामार्फत संयत्र उभारणेत आलेले असून, त्यासांठी अनुक्रमे रुपये 18,99,040/- व रुपये 18,08,624/- मात्र इतका खर्च आलेला आहे. ठेकेदार डेक्कन एनव्हायरो कंन्सलटंट, पुणे यांचेमार्फत एक वर्षाच्या दोषदायीत्व कालावधीत सदर प्लॅन्ट व मशीनरीची देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत. सदरहु दोषदायीत्व कालावधी दिनांक 30/04/2010 रोजी संपुष्टांत आलेनंतर, तद्नंतर 3 वर्षाकरीता सदर प्रकल्पाचे वार्षिक देखभाल दुरुस्तीचे काम ठेकेदार डेक्कन एनव्हायरो सर्व्हीस, पुणे यांना देणेत आले होते.

तद्नंतर मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 30/01/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 3(3) अन्वये सदर प्रकल्पाचे वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेचे काम ठेकेदार मे. यश एन्व्हायरो टेक्नॉलॉजीस, पुणे यांना एक वर्षासाठी रुपये 7,80,000/- मात्रचे रकमेत (दोन्ही प्लॅंट रुपये 65,000/- प्रती महिना) दिनांक 01/04/2015 ते दिनांक 31/03/2016 या कालावधीसाठी देणेत आलेले आहे.

सदरचा कालावधी हा 31/03/2016 रोजी संपुष्टात येणार आहे. तद्नंतर याकामी AMC कामी ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार असून, त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे :

| अ.नं. | कामाचा तपशील | अंदाजे प्रतीमाह एकूण खर्च रुपये | अंदाजित प्रती वर्ष खर्च रुपये |
|---|---|---|---|
| 1 | श्री साईबाबा हॉस्पीटल (STP क्षमता 200 Cum/Day) व श्री साईनाथ रुग्णालय (STP क्षमता 200 Cum/Day) येथील सांडपाणी सयंत्र वार्षिक AMC/Operation & Maintenance करणे. | 75,000/- | 9,00,000/- |
| | **एकूण अपेक्षित खर्च (एका वर्षाकरीता):** | | **9,00,000/-** |

सदर प्रकल्प चालविणेसाठी संस्थानमार्फत विद्युत व पाणी पुरवठा व्यवस्था यापुर्वीप्रमाणेच विनामुल्य उपलब्ध करावी लागेल. तसेच सेप्टीक टॅंक संस्थानचे आरोग्य विभागामार्फत स्वच्छ करावे लागेल.

तरी श्री साईबाबा हॉस्पीटल (STP क्षमता 200 Cum/Day) व श्री साईनाथ रुग्णालय (STP क्षमता 200 Cum/Day) येथील बांधकाम विभागामार्फत उभारणेत आलेल्या सांडपाणी सयंत्राचे दिनांक 01/04/2016 ते 31/03/2017 या कालावधीसाठी वार्षिक AMC/Operation & Maintenance देणेकरीता अंदाजे येणा-या रुपये 9,00,000/- खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहीरात देऊन ई-निविदा मागविणेकामी सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१३७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय उभारणेत आलेल्या सांडपाणी सयंत्राचे दिनांक 01/04/2016 ते 31/03/2017 या कालावधीसाठी वार्षिक AMC/Operation & Maintenance देणेकरीता विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेत याव्यात. याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये 9,00,000/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.६३ **व्दारकामाई मंदिराचे छतावरील पावसाचे पाणी वाहून जाणेसाठी असलेली उत्तर बाजुकडील पन्हाळीचे दुरुस्ती करणेबाबत.**

प्रस्ताव- बांधकाम विभागाचे दिनांक 13/01/2016 चे मान्य टिपणीनुसार श्री व्दारकामाई मंदिराचे छतावरील जी.आय. पत्रे बसवून त्यावर कौले बसविलेली असून, छतावरील पावसाचे पाणी वाहुन जाणेसाठी व्दारकामाईचे उत्तर बाजुकडील भागात पूर्व पश्चिम अशी जी.आय. पत्र्यांची पन्हाळी बसविलेली आहे. सदरहु पन्हाळीचे बाहेरील बाजुस एम.एस. स्क्वेअर पाईपचे फ्रेमवर्क तयार करुन त्यावर बायसन पॅनल शिट बसवून पन्हाळी बंदीस्त केलेली आहे. सदर बायसन पॅनल व सपोर्टसाठी तयार केलेले फ्रेमवर्क व पन्हाळीचा पत्रा खराब झालेला असून, त्यामधून पाण्याची गळती होत आहे. यासाठी इकडील विभागामार्फत एम.एस. स्क्वेअर पाईपचे फ्रेमवर्क व प्लेन जी.आय. शिटची पन्हाळी तयार करुन मिळणेबाबत कळविण्यात आले आहे.

उपरोक्त ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असता, श्री व्दारकामाई मंदिराचे ठिकाणी करावयाची कामे करणेकरीता आवश्यक मटेरिअल इकडील विभागाकडे तसेच भांडार विभागाकडे नसल्याने बाहेरील पुरवठाधारक यांचेकडून दरपत्रके मागवून खरेदी करावे लागणार आहे. मटेरिअल प्राप्त झालेनंतर सदरची कामे विभागांअतर्गत करण्यात येतील. मटेरिअल खरेदीकामी खालील तपशीलांप्रमाणे खर्च अपेक्षित आहे :

| अ.नं. | मटेरिअलचा तपशील | मागणी | अंदाजे दर रुपये | खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | G.I. Plain Shee – Size – 8' x 4' – 16 Guage Jindal / Tata Make | 6 नग | 2,600/- | 15,600/- |
| 2 | M.S. Rectangle Pipe Size – 90 x 50 x 3 mm | 460 Ft. | 100/- | 46,000/- |
| | | | एकूण : | **61,600/-** |

उपरोक्तप्रमाणे विषयाकिंतकामी आवश्यक मटेरिअल खरेदी करणेसाठी अंदाजे रु.61,600/- खर्च अपेक्षित आहे.

तरी व्दारकामाई मंदिराचे छतावरील पावसाचे पाणी वाहुन जाणेसाठी असलेली उत्तर बाजुकडील पन्हाळीचे दुरुस्तीसाठी लागणारे मटेरिअल खरेदी करणेकामी बाहेरील पुरवठादार यांचेकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये 61,600/- (अक्षरी रुपये एकसष्ट हजार, सहाशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१३८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारकामाई मंदिराचे छतावरील पावसाचे पाणी वाहुन जाणेसाठी असलेली उत्तर बाजुकडील पन्हाळीचे दुरुस्तीसाठी लागणारे मटेरिअल विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करण्यास खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये 61,600/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मॅकेनिकल विभागप्रमुख )

---

विषय नं.६४ **स्टीम बॉयलरकरीता गॅस रेग्युलेटर खरेदीस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.** 14 (भाग 4) मध्ये 14 (2-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रस्ताविक:**- श्री साई प्रसादालयातील दैनंदिन प्रसाद भोजन तयार करणेसाठी लागणा-या वाफेची निर्मिती थरमॅक्स कंपनीचे RXD- 850 व RXG-400 स्टीम बॉयलर कार्यान्वित आहे. दिनांक 07.01.2016 रोजी RXG-400 स्टीम बॉयलर गॅस रेग्युलेटर खराब झालेमुळे बंद झालेला आहे. थरमॅक्स कंपनीचे अधिकृत डिलर मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना स्टीम बॉयलरचे वार्षिक सर्व्हिसींगचे कॉन्ट्रक्ट दिलेले असल्याने दिनांक13.01.2016 रोजी त्यांचा टेक्नीशियन शिर्डी येथे येऊन सदर रेग्युलेटर दुरुस्तीकरण्याचा प्रयत्न केला. परंतु सदरचे रेग्युलेटर दुरुस्ती होत नसल्याने नविन खरेदी करावे लागणार आहे.

सदरचे रेग्युलेटर कंपनीचे अधिकृत डिलर यांचे व्यतिरिक्त मार्केटमध्ये इतरत्र मिळत नाही. त्यामुळे मे. मॅक्झाथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आलेले असून खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | मालाचा तपशिल | संख्या | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | रेग्युलेटर K.SCH-VGBF25 R40 | 1 | 54,650.00 | 54,650.00 |
| | | | व्हॅट 12.5% | 6,831.25 |
| | | | पॅकींग व फॉरवडींग 3% | 1,639.50 |
| | | | एकुण | 63,120.75 |
| | | | एकुण पुर्णांकित रक्कम | **63,121.00** |

अक्षरी रक्कम **रुपये त्रेसष्ट हजार एकशे एकवीस** मात्र.

श्री साईप्रसादालयातील प्रसाद भोजन बनविणेकामी RXG-400 स्टीम बॉयलर कार्यान्वित असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे तातडीने मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून गॅस रेग्यूलेटर खरेदी करावे लागणार आहे. सदर एल. पी. गॅस रेग्युलेटर मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचे स्टॉकमध्ये उपलब्ध नसल्याने ऑर्डर दिलेनंतर २० ते २५ दिवसांनी मिळेल असे दुरध्वनीद्वारे त्यांनी कळविलेले आहे.

श्री साईप्रसादालयातील प्रसाद भोजन तयार करणेस अडचण येऊ नाही म्हणून स्टीम बॉयलर कार्यान्वित असणे आवश्यक असलेले मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना गॅस रेग्युलेटरचा पुरवठा करणेकामी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

तरी श्री साई प्रसादालयातील RXG-400 स्टीम बॉयलर करीता मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून एल.पी.गॅस रेग्युलेटर खरेदी करणेकामी आलेल्या रक्कम रु.63,121/- मात्रच्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.१३९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील** RXG-400 **स्टीम बॉयलर करीता मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून एल.पी.गॅस रेग्युलेटर खरेदी करणेकामी आलेल्या रक्कम रु.63,121/- मात्रच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मॅकेनिकल विभागप्रमुख )

---

**विषय नं.६५** **साई आश्रम भक्तनिवास येथे बसविण्यात आलेल्या १३ लिफ्टचे दि.०१/०२/२०१६ ते दि.३१/०१/२०१७ कालावधीसाठी वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेबाबत.**

प्रस्ताव- साईभक्तांना अधिकाधिक सेवा सुविधा उपलब्ध करुन देणेकरीता साई आश्रम भक्तनिवास येथील इमारतीमध्ये साईभक्तांना वरील मजल्यावर ये-जा करणेकरीता मे. जॉनसन लिफ्टस प्रा. लि., पुणे यांचेमार्फत स्टेनलेस स्टील ऑटोमॅटीक डोअर्सच्या 13 (तेरा) लिफ्टस बसवून घेण्यात आलेल्या आहेत.

दिनांक 20/05/2007 रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. 386 अन्वये दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरीचे (उदा. साई प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागाकडील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, एअर कंडीशनर, वायुवीजन यंत्रणा वगैरे) वार्षिक मेन्टेनन्स् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हीस डिलरला देण्यात यावे, असे ठरले.

उपरोक्त निर्णयानुसार प्रत्येक वर्षी आपण लिफ्ट बसविलेल्या कंपनीलाच वर्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देत असतो. मागील वर्षी मे. जॉनसन लिफ्टस प्रा. लि., पुणे यांना 13 लिफ्टसाठी दिनांक 01/10/2014 ते 30/09/2015 या कालावधीसाठी देण्यात आले होते. त्याची मुदत दिनांक 30/09/2015 रोजी संपलेला असल्याने लिफ्टची उत्पादक कंपनी मे. जॉनसन लिफ्टस प्रा. लि., पुणे यांनी दिनांक 01/10/2015 ते 30/09/2016 या कालावधी (वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट) करीता खालीलप्रमाणे रकमेचा खर्च कळविलेला होता.

| अ.नं. | लिफ्ट संख्या | या वर्षी दि. 01/10/2015 ते 30/09/2016 या कालावधीसाठी कळविण्यात आलेली AMC रक्कम | |
|---|---|---|---|
| | | **Silver Plan** | **Platinum Plan** |
| 1. | 13 | Rs. 5,80,515/- | Rs. 9,79,992/- |

उपरोक्तप्रमाणे साईआश्रम भक्तनिवास येथील 13 लिफ्टचे AMC साठी मे. जॉनसन लिफ्टस प्रा. लि. यांनी सिल्व्हर प्लॅनकरीता वार्षिक दर रुपये 44,655/- प्रती लिफ्ट नुसार 13 लिफ्टकरीता रुपये 5,80,515/- मात्र खर्च कळविलेला असून, सदर प्लॅनमध्ये ब्रेकडाऊन अॅन्टेड करणे, मासिक सर्व्हीसिंग करणे याचा समावेश आहे. लिफ्ट दुरुस्तीकरीता स्पेअरपार्टची आवश्यकता भासल्यास त्याचे पैसे अतिरीक्त अदा करावे लागणार आहे.

तसेच प्लॅटीनम प्लॅनकरीता वार्षिक दर रुपये 75,384/- प्रती लिफ्टनुसार 13 लिफ्टकरीता रुपये 9,79,992/- मात्र खर्च कळविला असून, सदर प्लॅनमध्ये ब्रेकडाऊन् अॅन्टेड करणे (स्पेअरपार्टसह), मासिक सर्व्हीसिंग करणे याचा समावेश आहे.

मागील AMC कालावधीत (दि. 01/10/2014 ते 30/09/2015) शेवटचे महिन्यात लिफ्टचे काही पार्ट खराब झाल्याने ते बदलणे बाकी असल्याकारणांने मे. जॉनसन लिफ्टस प्रा. लि., पुणे यांनी दिलेला प्रस्ताव मान्यतेसाठी मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला नव्हता. आता मे. जॉनसन लिफ्टस प्रा. लि., पुणे यांनी सर्व लिफ्टचे बाकी असलेले दुरुस्तीकाम पुर्ण करुन दिलेले असल्याने, त्यांना दिनांक 01/02/2016 ते 31/01/2017 या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हीसींग कॉन्ट्रॅक्ट दयावे लागणार आहे.

मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद समोर C.A. No. 9216 of 2014 in PIL No. 18 of 2011 दिनांक 26/09/2014 अन्वये झालेल्या सुनावणीत "वार्षिक मेन्टेनंन्स सर्व्हीस कॉन्टॅक्ट तसेच रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हीस कॉन्टॅक्ट हे त्या-त्या मशीनरीचे उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीचे उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांचे अधिकृत सर्व्हीस डिलरला पुर्वीच्या अटी व शर्तीवर देण्यात यावे " असा आदेश दिलेला आहे.

**विभागाचा अभिप्राय:** साईआश्रम भक्तनिवास येथे बसविण्यात आलेल्या 13 लिफ्टकरीता मागील AMC कालावधीत मेजर ब्रेक डाऊन झालेला नाही त्यामुळे सदर लिफ्टचे पुढील सिल्व्हर प्लॅननुसार उत्पादक कंपनी मे. जॉनसन लिफ्टस प्रा. लि., पुणे यांना दिनांक 01/02/2016 ते 31/01/2017 या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देता येईल तसेच दुरुस्तीकामी स्पेअरपार्टची आवश्यकता भासल्यास त्याची रक्कम स्वतंत्र अदा करता येईल.

तरी साईआश्रम भक्तनिवास येथे बसविण्यात आलेल्या 13 लिफ्टची उत्पादक कंपनी मे. जॉनसन लिफ्टस प्रा. लि., पुणे यांना दिनांक 01/01/2016 ते दिनांक 31/01/2017 या कालावधीकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेस व याकामी त्यांनी कळविलेली एकत्रीत रक्कम रुपये 5,80,515/- (अक्षरी रुपये पाच लाख, ऐंशी हजार, पाचशे पंधरा) मात्र अदा करावयाच्या खर्चास तसेच दुरुस्तीकामी स्पेअरपार्टची आवश्यकता भासल्यास त्याची रक्कम अदा करणेस मा.त्रिसदस्यीय समितीची प्रशासकीय मान्यता घेणेकामी प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१४० **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास येथे बसविण्यात आलेल्या 13 लिफ्टची उत्पादक कंपनी मे.जॉनसन लिफ्टस प्रा.लि., पुणे यांना दिनांक ०१/०२/२०१६ ते दिनांक ३१/०१/२०१७ या कालावधीकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेस व याकामी त्यांनी Silver Plan नुसार कळविलेली एकत्रीत रुपये 5,80,515/- मात्र रक्कम अदा करावयाच्या खर्चास तसेच दुरुस्तीकामी स्पेअरपार्टची आवश्यकता भासल्यास त्यांची रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-मॅकेनिकल विभागप्रमुख)

| | |
|---|---|
| विषय नं.६६ | **साईआश्रम भक्तनिवास येथील ए.सी.सिस्टम कॉपर पाईपवर लोखंडी जाळीचे टप्पा तयार करुन बसविणेबाबत.** |

प्रस्ताव- साईआश्रम भक्तनिवास येथे A,B,C या तीन इमारतीमध्ये प्रत्येकी 128 रुम याप्रमाणे एकूण 384 रुममध्ये डायकीन कंपनीचे V.R.V. (Variable Refrigerant Volumes) टाईप ए.सी. यंत्रणा बसवून कार्यान्वित करुन दिलेली आहे.

उपरोक्त ए.सी. यंत्रणेचे 48 आऊटडोअर युनिट तिन्ही इमारतीमधील जागेत बसविण्यात आलेले आहेत. या डक्टमध्ये सफाई कामगारांना चेंबर साफ करणेकरीता उतरावे लागते. डक्टमध्ये उतरतेवेळी कर्मचा-यांचा पाय कॉपर पाईपवर पडत असलेने पाईप क्रॅक होऊन गॅस लिकेज होतो. परिणामी सदर पाईप लाईनवर जोडलेला रुममधील ए.सी. कुलींग होत नाही. सदर प्रकार वारंवार होत असलेने कॉपर पाईपवर सुरक्षिततेसाठी लोखंडी जाळीचा टप्पा करणे आवश्यक आहे. लोखंडी जाळीचा टप्पा तया करणेकामी आवश्यक मटेरिअल इकडील विभागाकडे तसेच भांडार विभागाकडे शिल्लक नसल्याने, सदर काम बाहेरच्या वर्कशॉपधारक/ फॅब्रिकेटर्स यांचेकडून करुन घ्यावे लागणार आहे. याकामी खालील तपशीलाप्रमाणे खर्च अपेक्षित आहे :

| अ.नं. | तपशील / साईज | मागणी | अंदाजे दर रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | **M.S. Angle**<br>Size – 35 x 35 x 5 mm | 1584 किलो | 50/- | 79,200/- |
| 2. | **M.S. Flat**<br>Size – 25 x 5 mm | 610 किलो | 50/- | 30,500/- |
| | | | **एकूण :** | **1,09,700/-** |

साईआश्रम भक्तनिवास येथील ए.सी. सिस्टम कॉपर पाईपवर लोखंडी जाळीचे टप्पा तयार करुन बसविणेकामी बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारक यांचेकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये 1,09,700/- (अक्षरी रुपये एक लाख, नऊ हजार, सातशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१४१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास येथील ए.सी.सिस्टम कॉपर पाईपवर लोखंडी जाळीचे टप्पा तयार करुन बसविणेकामी आवश्यक असणारे मटेरिअल विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करुन मॅकेनिकल विभागांतर्गत काम करुन घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही-मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

| | |
|---|---|
| विषय नं.६७ | **गुरुस्थान मंदिर ओटा तसेच म्युझियम समोरील झाडाभोवती असलेल्या रेलींगला जाळी बसविणेबाबत.** |

प्रस्ताव- **विषयाची पार्श्वभूमी** - दिनांक 8 डिसेंबर, 2015 रोजीचे पत्रान्वये मंदिर विभागाने म्युझियम हॉलचे समोर निंबवृक्ष तसेच पिंपळाचे झाड आहे. या झाडांचे बाजुचे ग्रीलमधून कुत्रे आत जाऊन बसतात व शौच करतात. याबाबत साईभक्तांनी तोंडी तक्रारी केलेल्या आहेत. याकरीता ग्रीलला बारीक आकाराची जाळी बसवून मिळणेबाबत कळविण्यत आले आहे. तसेच दिनांक 11 डिसेंबर, 2015 रोजीचे पत्रान्वये गुरुस्थान मंदिर येथे असलेल्या निंबाचे झाडाचे बाजूने ओटा बसविण्यात आलेला आहे. या ओट्यावर निंबाची पाने पडतात, ती घेणेकरीता साईभक्त ओटयाचे रेलींगमध्ये ओढणी, रुमाल तसेच इतर वस्त्राव्दारे पाने मिळविण्यासाठी धावपळ करतात. त्यामुळे दर्शनासाठी येणा-या इतर साईभक्तांना अडचणी येतात. त्याकरीता ओटयाभोवती असलेल्या रेलींगला जाळी बसवून मिळणेबाबत कळविण्यात आले आहे.

उपरोक्त मागणीप्रमाणे दोन्ही ठिकाणी इकडील विभागामार्फत प्रत्यक्ष पहाणी केली असता, सदर ठिकाणी 1 x 1 इंच आकाराची जाळी बसविण्याची आवश्यकता आहे. सदरची कामे करणेकरीता आवश्यक मटेरिअल संस्थानचे भांडार विभागामध्ये तसेच इकडील विभागाकडे नसल्याने ते बाहेरील पुरवठादारांकडून खरेदी करावे लागणार आहे. यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे:

| अ.नं. | तपशील | दर रुपये | मागणी | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | SS 304 – Jali (Weldmesh)<br>Size – 25mm x 25mm x 5mm<br>Height – 4 Feet | 250 Sq. Ft. | 800 Sq. Ft. | 2,00,000/- |

उपरोक्तप्रमाणे गुरुस्थान मंदिर ओटा तसेच म्युझियम समोरील झाडाभोवती असलेल्या रेलींगला स्टेनलेस स्टीलची जाळी बसविणेकामी अंदाजे रुपये 2,00,000/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

**आवश्यक मान्यता** : प्रशासकीय

**शासनाची/ मा. उच्च न्यायालयाची मान्यतेची आवश्यकता** : नाही

**विभागाचे स्पष्ट मत:** गुरुस्थान मंदिर ओटा तसेच म्युझियम समोरील झाडाभोवती असलेल्या रेलींगला स्टेनलेस स्टीलची जाळी बसविणेकामी आवश्यक मटेरिअल खरेदी करणेकामी बाहेरील पुरवठादार यांचेकडून कोटेशन बोलाविण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये 2,00,000/- (अक्षरी रुपये दोन लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१४२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, गुरुस्थान मंदिर ओटा तसेच म्युझियम समोरील झाडाभोवती असलेल्या रेलींगला स्टेनलेस स्टीलची जाळी बसविणेकामी आवश्यक असणारे मटेरिअल विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करुन मॅकेनिकल विभागांतर्गत काम करुन घेण्यात यावे. याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये 2,00,000/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.६८ **व्दारावती भक्तनिवास येथील साईभक्तांना स्नानासाठी गरम पाणी मिळणेकरीता बॉयलर बसविणेबाबत.**

प्रस्ताव- व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये नॉन ए.सी. 236 व ए.सी. 80 अशा एकूण 316 खोल्याव्दारे साईभक्तांचे निवासाची व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सर्व खोल्या दैनंदिन भरलेल्या असतात.

व्दारावती भक्तनिवास इमारतीत साईभक्तांना स्नानाकरीता गरम पाण्याची सुविधा उपलब्ध व्हावी, याकरीता सोलर हिटर वॉटर यंत्रणा बसविणेत आलेली आहे. मात्र पावसाळ्यात ढगाळ वातावरणामुळे पाणी गरम होत नाही. त्यामुळे साईभक्त नाराजी व्यक्त करत आहेत. यासाठी तेथे पावसाळ्यातील ढगाळ वातावरणात गरम पाणी उपलब्ध करणेकरीता श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांचेमार्फत बॉयलर (गरम पाणी बंब) बसविण्यात आला होता, त्यातुन साईभक्तांसाठी गरम पाणी पुरविणेत येत होते. मात्र त्यांनी माहे जुन 2015 मध्ये सदरचा बॉयलर साईप्रसाद निवासस्थान परिसरात स्थलांतरीत केलेला असल्यामुळे, साईभभक्तांना गरम पाणी मिळणेकरीता अधिक्षक, व्दारावती भक्तनिवास यांनी दिनांक 26/12/2015 रोजीचे पत्रान्वये व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये बॉयलर बसवून मिळणेबाबत कळविलेले आहे. त्यांचे मागणीनुसार इकडील विभागाने प्रत्यक्ष पहाणी केली असून, त्याठिकाणी बॉयलर बसविणेकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे :

| अ.नं. | तपशील | नग | अंदाजे दर रुपये | अंदाजे एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | Designing Manufacture, Erection & Commissioning of 1500 Ltrs. Capacity Water heater (Boiler) with Temperature Cause. | 1 | 1,80,000/- | 1,80,000/- |

उपरोक्तप्रमाणे व्दारावती भक्तनिवास येथे 1,500 लिटर क्षमतेचा बॉयलर बसविणेकामी अंदाजे रक्कम रुपये 1,80,000/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदर बॉयलर बाहेरील पुरवठाधारक / फॅब्रिकेटर्स यांचेकडून कोटेशन मागवून खरेदी करता येईल.

तरी व्दारावती भक्तनिवास इमारतीत साईभक्तांना पावसाळ्यातील ढगाळ वातावरणात स्नानाकरीता गरम पाण्याची सुविधा उपलब्ध करणेकामी बाहेरील पुरवठादार / फॅब्रिकेटर्स यांचेकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये 1,80,000/- (अक्षरी रुपये एक लाख, ऐंशी हजार) मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१४३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवास येथील साईभक्तांना स्नानासाठी गरम पाणी मिळणेकरीता बॉयलर बसविणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

(कार्यवाही-मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.६९ **श्री साईप्रसादालय येथील बॉयोगॅस प्लॅंटच्या बाजूने व मा.कार्यकारी अधिकारी निवासस्थानचे आतील परिसरात नविन लॉन बसविणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईप्रसादलय परिसरात नव्याने बायोगॅस प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आलेला आहे. सदर बायोगॅस प्रकल्पाचे दि.2 ऑक्टोंबर 2015 रोजी के. व्ही. रमणी यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आलेले आहे. त्यानंतर मा. उपकार्यकारी अधिकारी यांनी सदर बायोगॅस प्लॅन्टच्या चारही बाजुंनी लॉन बसवुन, शोभेची झाडे/फुलझाडे लावुन परिसर सुशोभीत करणेत यावा असे सुचविलेले आहे. तसेच मेकॅनिकल विभागामार्फत दि. 05/12/2015 रोजीच्या डिपी नं.11412 अन्वये, श्री साईप्रसादलय परिसरात कार्यान्वीत करण्यात आलेल्या बायोगॅस प्लॅन्टच्या बाजुला लॉन बसविणेकामी कळविणेत आलेले आहे.

तसेच नविन भक्तनिवास शेजारी मा. कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानच्या आतील परिसरात सन 1999 मध्ये बगीचा विभागामार्फत 2,777 स्के. फुट लॉन बसविणेत आलेली होती. सदर परिसरातील लॉनला पाणी देणे, लॉनची/ झाडांची कटींग करणे, संगोपन बगीचा विभागामार्फत करण्यात येते. कार्यकारी अधिकारी निवासस्थानच्या आतील परिसरात असणारी लॉन मध्ये चिल, उंदीरकामी व गावरान गवत मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे लॉन खराब झालेली आहे.

श्री साईप्रसादलय परिसरातील बायोगॅस प्लॅन्टच्या बाजुने व मा. कार्यकारी अधिकारी निवासस्थानच्या आतील परिसरात नविन लॉन बसवुन शोभेच्या झाडांची/ फुलझाडांची लागवड करता येईल.

श्री साईप्रसादलय परिसरातील बायोगॅस प्लॅनटच्या बाजुने लॉन व शोभेची रोपांची लागवड करण्यासाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| तपशिल | | रक्कम |
|---|---|---|
| लॉन आणुन लेव्हल मध्ये लावणे | 2600 स्क्वे. फुट x रु.20 | 52,000 |
| पोयटा वाहतुक करुन लेव्हल करणे | 26 ब्रास x रु.2000 प्रती ब्रास | 52,000 |
| लॉनच्या कडेने शोभेची रोपे आणुन लागवड करणे | विविध प्रकारची रोपे | 55,000 |
| खते, औषधे | सुपर फॉस्फेट, निंबोळी पेंन्ड, थायमेट | 8,000 |
| | अ | **1,67,000** |

मा.कार्यकारी अधिकारी निवास्थानच्या आतील परिसरात लॉन व शोभेची रोपांची लागवड करण्यासाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| तपशिल | | रक्कम |
|---|---|---|
| लॉन आणुन लेव्हल मध्ये लावणे | 2700 स्क्वे. फुट x रु.20 | 54,000 |
| पोयटा वाहतुक करुन लेव्हल करणे | 27 ब्रास x रु.2000 प्रती ब्रास | 54,000 |
| लॉनच्या कडेने शोभेची रोपे आणुन लागवड करणे | विविध प्रकारची रोपे | 40,000 |
| खते ,औषधे | - | 10,000 |
| | ब | **1,58,000** |
| एकुण | अ + ब | **3,25,000** |

तरी श्री साईप्रसादलय परिसरातील बायोगॅस प्लॅन्टच्या बाजुने व मा. कार्यकारी अधिकारी निवास्थानच्या आतील परिसरात नव्याने लॉन व फुलझाडे बसविणेकामी रु.3,25,000/- (रु. तिन लाख पंचविस हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी सदर कामाच्या निवीदा बोलावुन काम करुन घेता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१४४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय येथील बॉयोगॅस प्लॅटच्या शेजारी आणखी एक बायोगॅस प्लॅन्ट प्रस्तावित असल्याने या ठिकाणी लॉन बसविण्यात येऊ नये, असे ठरले. तसेच मा.कार्यकारी अधिकारी निवासस्थानचे आतील परिसरात नविन लॉन बसवविणेकामी विहित पध्दतीने कोटेशन्स मागवून काम करुन घेण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

विषय नं.७० **धर्मशाळा परिसरातील व्दारावती इमारत समोरील बागेत संगीत कारंजा तयार करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री.अनिल कवडे साहेब जिल्हाधिकारी तथा सदस्य श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांनी धर्मशाळा परिसरात द्वारावती इमारत समोरील बागेत राऊंड घेऊन पाहणी केली असता त्यांनी सदर बागेत असणारा साधा कारंजा काढुन त्या ठिकाणी नविन संगीत कारंजा बसविणेत यावा असे सुचविलेले आहेत. त्यानुसार धर्मशाळा परिसरातील द्वारावती इमारत समोरील बागेत नविन संगीत कारंजा तयार करणेसाठी अंदाजे रु.60,00,000/- (साठ लाख) मात्र खर्च अपेक्षीत आहे.

धर्मशाळा परिसरातील द्वारावती इमारत समोरील बागेत नविन संगीत कारंजा तयार करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. 60,00,000/- (साठ लाख) मात्र खर्चास मान्यता मिळणेकामी दि.25/11/2015 रोजी टिपणी सादर केलेली होती. सदर टिपणीबाबत मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी धर्मशाळा परिसरातील द्वारावती इमारत समोरील बागेत नविन संगीत कारंजा तयार करणेकामी प्रथम Consultant appoint करावा व त्याच्या मार्गदर्शनानुसार पुढील कार्यवाही करावी त्यासाठी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेकामी निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार द्वारावती इमारत समोरील बागेत नविन संगीत कारंजा तयार करणेकामी Consultant ची नेमणुक करावी लागणार आहे. श्रीमती शोभा भोपटकर यांनी सन 2013-2014 मध्ये साई आश्रम भक्तनिवास येथील लॅण्डस्केपींगचे, कारंजाचे काम केलेले आहे. तरी संगीत कारंजा तयार करणेकामी वर्तमान पत्रात जाहीरात देऊन Consultant ची नेमणुक करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१४५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, धर्मशाळा परिसरातील व्दारावती इमारती समोरील बागेत संगीत कारंजा तयार करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. 60,00,000/- (साठ लाख) मात्र खर्चास मान्यता देण्यात आली. सदरचा संगीत कारंजा तयार करणेकामी वर्तमान पत्रात जाहीरात देऊन Consultant ची नेमणुक करण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख )

---

विषय नं.७१ **कनकुरी साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणी देणेसाठी नविन पाईप लाईन व ड्रिप नळया टाकणेबाबत.**

प्रस्ताव- बगीचा विभागामार्फत कनकुरी साठवण तलावाच्या भराव्यावर चारही बाजुने व लगतच्या क्षेत्रात आंबा-नारळाची झाडे लावून परिसर सुशोभीत करण्यात आलेला आहे. त्यामुळे बरेच साईभक्त, गावकरी हे फिरण्यासाठी येऊन साठवण तलावास भेट देतात. सध्या साठवण तलाव परिसरातील नारळ झाडांना नव्याने फळे लागण्यास सुरवात झालेली आहे.

साठवण तलावाच्या पाण्याचा पाझर होत असताना परिसरातील व भराव्यावरील झाडांना/ झाडांच्या मुळयांना पाणी मिळत असल्याने तेथील झाडे हिरवीगार राहुन परिसर सुशोभीत दिसत होता. सध्या दुष्काळजन्य परिस्थीतीमुळे पाण्याची बचत होणेसाठी व कनकुरी साठवण तलावातील पाण्याचा पाझर कमी होणेकरीता तलावात कागद टाकणेचे काम चालु आहे. त्यामुळे तलावात कागद टाकला असता पाण्याचा पाझर पुर्णत: बंद होणार असल्यामुळे परिसरातील/भराव्यावरील नारळ झाडांच्या मुळयांना पाणी मिळणार नाही. त्यामुळे नारळ आंबा व नारळ झाडे दगावण्याची शक्यता नाकारता येत नाही.

साठवण तलाव परिसरातील झाडांसाठी असणारी पाण्याची ड्रिपच्या नळया व पाईप लाईन बऱ्याच वर्षापुर्वीची असल्याने ती पुर्णत: खराब झालेली असुन तलावात कागद टाकण्याचे काम चालु असल्याने तलावाच्या भराव्यावरुन ट्रॅक्टर, डंपर, जे.सी.बी. यांची ये-जा मोठ्या प्रमाणात होत असल्याने भराव्यावरील पाईप लाईन व ड्रिपच्या नळया तुटुन खराब होत आहेत. त्यामुळे सदर परिसरातील झाडांना पाणी देणेकामी नविन पाईप लाईन व ड्रिपच्या नळया टाकणे आवश्यक आहे. जेणेकरुन भराव्यावरील नारळ झाडांना पाणी देणे सायीचे होईल व दुष्काळ जन्य परिस्थीतीतही झाडे जगवता येईल.

तरी कनकुरी साठवण तलावाच्या भराव्यावरील आंबा व नारळ झाडांना पाणी देणेकामी इंजीनीयर्सकडुन मोजमाप करुन दर मागविले असता याकामी त्यांनी नविन पाईप लाईन व ड्रिपच्या नळया टाकणेसाठी अंदाजे रु.2,95,000/- (दोन लाख पंच्यान्नव हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी विविध ठिबक सिंचन कंपनी कडुन कोटेशन घेऊन न्युनत्तम दराने काम करुन घेता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१४६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणी देणेसाठी नामांकीत ठिबक सिंचन कंपन्यांकडून विहित पध्दतीने कोटेशन्स मागवून नविन पाईप लाईन व ड्रिप नळया खरेदी करण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

विषय नं.७२ **कनकुरी साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणीदेणेकामी नविन पाईप लाईन टाकणेसाठी खोदाई करणेबाबत.**

प्रस्ताव- बगीचा विभागामार्फत कनकुरी साठवण तलावाच्या भराव्यावर चारही बाजुने व लगतच्या क्षेत्रात आंबा-नारळाची झाडे लावून परिसर सुशोभीत करण्यात आलेला आहे. त्यामुळे बरेच साईभक्त, गावकरी हे फिरण्यासाठी येऊन साठवण तलावास भेट देतात. सध्या साठवण तलाव परिसरातील नारळ झाडांना नव्याने फळे लागण्यास सुरवात झालेली आहे.

साठवण तलावाच्या पाण्याचा पाझर होत असताना परिसरातील व भराव्यावरील झाडांना पाणी मिळत असल्याने तेथील झाडे हिरवीगार दिसत होती. सध्या दुष्काळजन्य परिस्थीतीत साठवण तलावाच्या पाण्याचा पाझर कमी होणेसाठी व पाण्याची बचत होणेसाठी तलावात कागद टाकणेचे काम चालु आहे. तरी तलावात कागद टाकला असता भराव्यावरील झाडांना पाणी मिळणार नाही. त्यामुळे झाडे दगावण्याची शक्यता असल्याने साठवण तलावाच्या भराव्यावरील नारळ व आंबा झाडांना पाणी देणेकामी नविन पाईप लाईन व ड्रिपच्या नळया टाकावयाच्या आहेत.

कनकुरी साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणी देणेकामी नविन पाण्याची पाईप लाईन टाकणेसाठी खोदाई करुन नाली तयार करणे आवश्यक आहे. तरी सदरचे काम परिसरातील/ स्थानीक शेतमजुर यांचेकडुन उक्ते स्वरुपात करुन घेता येईल. शेतमजुरांमार्फत 1 x 1.5 फुट खोदाई करुन नाली तयार करणेकामी अंदाजे रु.17/- प्रति स्के.फुट याप्रमाणे एकुण 5700/- स्के. फुट खोदाई करुन पाईप लाईन टाकणेसाठी रु. 96,900/- (शहान्व हजार नऊशे) मात्र याप्रमाणे अंदाजे खर्च धरण्यात आला आहे. साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांसाठी नविन पाईप लाईन टाकणेकामी खोदाई करुन नाली तयार करणेसाठी परिसरातील/स्थानीक शेतमजुर यांचेकडुन विहीत पध्दतीने दरपत्रके मागवुन न्युनत्तम दराने काम करुन घेता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१४७ **कनकुरी साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणीदेणेकामी नविन पाईप लाईन टाकणेसाठी स्थानिक मजूरांकडून खोदाईकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून काम करुन घेण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ९६,९००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

विषय नं.७३ **शिर्डी नगरपंचायतीस शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्र.२९ व ३० जवळील १२ मिटर रुंदीच्या रस्त्याचे भूसंपादनाकरीता निधी मंजूर करणेबाबत.**

प्रस्ताव- मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत यांनी त्यांचे जा.क्र.नप.टेक्र ८/२९९०/२०१५ ,दि.०२.११.२०१५ चे पत्रात खालील प्रमाणे नमुद केले आहे.

"शिर्डी शहराची विकास योजना मा.संचालक,नगररचना महाराष्ट्र राज्य पुणे यांनी त्यांचेकडील अधिसुचना क्र.डी.पी./ शिर्डी/टीपीव्ही– ०४/७३३४ दि.१५.१२.२०१५ अन्वये मंजुर केलेली असून दि.२५.०२.१९९३ पासुन अंमलात आलेली आहे. शिर्डी मंजुर विकास योजनेत आरक्षण क्र.२९ व ३० जवळील १२ मिटर रुंद रस्त्यासाठी आरक्षीत असुन आरक्षणाखालील एकुण क्षेत्र ४२ आर इतके आहे. सदर आरक्षणाची भुसंपादन यंत्राणा शिर्डी नगरपंचायत आहे. श्री साईबाबा संस्थानकडे निधीसाठी प्रस्ताव सादर करणेसाठी नगरपंचायत ठराव क्र.१७ अन्वये

मंजुरी मिळालेली आहे. आरक्षणाखालील जमीनीची अंदाजीत किंमत रेडी रेकनर २०१५ नुसार रु.९.११ कोटी इतकी आहे. नगरपंचायतीकडे इतकी मोठी रक्कम उपलब्ध नाही. तरी भुसंपादनाकरीता रु.९ कोटी ११ लाख निधी मंजुर करण्यात यावा." असे त्यांचे पत्रात नमुद केले आहे.

**संस्थानमार्फत अनुदान देण्याबाबत संस्थान अधिनियमात खालीलप्रमाणे तरतुद आहे :-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम २१ (२) पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईलः-

श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ चे कलम २१ मधील (२) (दोन) नुसार, छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्यशासनाच्या पुर्व मंजूरीने, स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांचेमध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी परिणामी संस्थानांच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्याची तरतूद आहे.
तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद पीआयएल क्र.१८/२०११ दि.१६/११/२०१२ मध्ये अ.नं. 6 मधील (C) Shall not take any major financial decision of whatsoever nature. असे नमुद केलेले आहे. त्यास अनुसरुन मा.व्य.स. निर्णय क्र.८६२/ दि.०८.११.२०१२ अन्वये रु.१० लाख किंवा त्यापुढील खर्चासाठी मा.व्य.स. च्या पूर्व मान्यतेने मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन, त्यानंतरच बीले पारीत करणेत यावीत, असा ठराव संमत झाला आहे.

तरी उपरोक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ मधील तरतुदी, पीआयएल क्र.१८/२०११ दि.१६.११.२०१२ व रु.१० लाखांचे पुढील खर्चाबाबत मा.व्य.स.चा, निर्णय यास अनुसरुन मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांचा भुसंपादन आरक्षण क्र.२९ व ३० जवळील १२ मिटर रुंद रस्त्यासाठी एकुण क्षेत्र ४२ आर भुसंपादनासाठी रु.९.११ कोटी इतका निधी मिळण्याच्या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळाल्यास सदर प्रस्ताव मंजुरीसाठी, विहीत पध्दतीने मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद व मा.विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे पाठविता येईल.

तरी सदर प्रस्ताव मा.त्रिसदसिय समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१४८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायतीस शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्र.२९ व ३० जवळील १२ मिटर रुंद रस्त्यासाठी एकुण क्षेत्र ४२ आर भुसंपादनासाठी रु.९.११ कोटी इतका निधी देण्यास मान्यता देण्यात आली. याकामी विहीत पध्दतीने मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद व मा.विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

विषय नं.७४ **गोंदीया शहरातील व ग्रामीण भागातील अपंगाकरीता १०० नग तीनचाकी सायकली देणेबाबत.**

प्रस्ताव- मा.नामदार श्री.राजकुमार बडोले, मंत्री सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य,महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचे जा.क्र.२७८/१५, दि.०२.१०.२०१५ चे पत्रात " माझा पालकत्व जिल्हा गोंदीया येथे शहरी भागात व ग्रामीण भागात बरेचशे आभार्थी अपंग आहेत. तरी त्यांना तीन चाकी सायकल वाटप करणेसाठी 100 तीन चाकी सायकली पुरविण्याची विनंती केलेली आहे."

**संस्थानमार्फत अनुदान देण्याबाबत संस्थान अधिनियमात खालीलप्रमाणे तरतुद आहे :-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणाऱ्या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

अधिनियम २००४ कलम २१ (२) पोट कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईलः-

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तीसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे."

परंतु, राज्य शासन, या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ मुंबई उच्च न्यायालयाच्या पुर्वमान्यतेने नियुक्त केलेल्या मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश हे अध्यक्ष म्हणुन व समितीचे दोन सदस्य असे तीन सदस्यांची मिळून स्थापन केलेल्या छाननी समितीने आर्थिक अनुदान मागणी करीता आलेल्या अर्जांबाबत केलेल्या शिफारसीनुसार व राज्य शासनाचे पुर्व मान्यतेने अनुदान देण्याची तरतुद आहे. तथापी सध्या शासनाकडून मा.छाननी समितीची स्थापना झालेली नाही.

तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांनी Civil Application No. 12056/2012 In PIL No.18/2011, date 16 Oct.2012 Sr.No.6 (C) Shall not take any major financial decision of whatsever nature, असे निर्देश दिलेले आहेत.

तरी उपरोक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदी, पीआयएल क्र.१८/२०११ दि.१६.१०.२०१२ यास अनुसरुन मा.नामदार श्री.राजकुमार बडोले, मंत्री सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य, मंत्रालय मुंबई यांचा, अपंगांना १०० तीन चाकी सायकली मागणीच्या प्रस्तावास मान्यता मिळाल्यास, विहीत पध्दतीने सदर प्रस्तावास मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद व मा.विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांची मान्यता घ्यावी लागेल.

सदर प्रस्ताव मा.त्रिसदसिय समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१४९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.नामदार श्री.राजकुमार बडोले, मंत्री सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य,महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी गोंदीया शहरातील व ग्रामीण भागातील अपंगाकरीता १०० नग तीनचाकी सायकली मिळणेबाबतची विनंती अमान्य करण्यात आली.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

विषय नं.७५ **अपघातील निधन झालेल्या संस्थानमधील कंत्राटी कर्मचा-यांच्या कुटूंबीयांना आर्थिक मदत देणेबाबत.**

प्रस्ताव- मा.श्री.सदाशिव लोखंडे, लोकसभा सदस्य, शिर्डी मतदार संघ, यांनी त्यांचे जा.क्र.सा.सं./शिर्डी/२९८/२०१५, दि.०१.१२.२०१५ चे पत्रात, "संस्थानमध्ये नोकरी वर असणारे सोमण ताम्हणे व पोपट वारे, रा. बेलापूर, ता.श्रीरामपुर जि.अ.नगर हे शिर्डी येथे कामावर जात असतांना दि.०३.१२.२०१५ रोजी अपघातात मृत्युमुखी पडले. सदर युवकांच्या घरची परीस्थिती अत्यंत हालाखीची आहे. ते कुटूंबातील कर्ते असल्याने दोन्ही कुटूंबावर उपासमारीची वेळ आलेली आहे. तरी सोमण ताम्हणे व पोपट वारे, यांच्या कुटूंबास साई संस्थानकडून प्रत्येकी रु.१० लाखाची आर्थिक मदत व वारसास संस्थानमध्ये नोकरी देण्यात यावी," असे त्यांचे पत्रात नमुद केलेले आहे.

अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान असंघटीत कंत्राटी कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी दि.१०.१२.२०१५ चे पत्रात, "संस्थान सेवेत असलेले कंत्राटी सुरक्षा रक्षक श्री.सोमण ताम्हणे व श्री.पोपट वारे, रा. बेलापूर, ता.श्रीरामपुर जि.अ.नगर यांचे गरुवार दि.०३.१२.२०१५ रोजी पहाटे ४ वाजता डयुटीवर येत असतांना अपघातात निधन झाले. सदर युवकांच्या घरची परीस्थिती अत्यंत हालाखीची आहे. ते कुटूंबातील कमविणारे व्यक्ती होते. दोन्ही सुरक्षा रक्षकांच्या कुटूंबास संस्थानकडून प्रत्येकी रु.५ लाखाची आर्थिक मदत द्यावी. तसेच संस्थान आस्थापनेवरील सर्व कंत्राटी कर्मचा-यांचे नैसर्गिक व अपघाती विमा उतरविणेत यावा, ही विनंती." असे त्यांचे पत्रात नमुद केलेले आहे.

**संस्थानमार्फत अनुदान देण्याबाबत संस्थान अधिनियमात खालीलप्रमाणे तरतुद आहे:-**

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ कलम २१ (२) पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल:-

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे."

तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद पीआयएल क्र.१८/२०११ दि.१६/११/२०१२ मध्ये अ.नं. 6 मधील (C) Shall not take any major financial decision of whatsoever nature. असे नमुद केलेले आहे. त्यास अनुसरुन मा.व्य.स. निर्णय क्र.८६२/ दि.०८.११.२०१२ अन्वये रु.१० लाख किंवा त्यापुढील खर्चासाठी मा.व्य.स. च्या पूर्व मान्यतेने मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन, त्यांनंतरच बीले पारीत करणेत यावीत, असा ठराव संमत झाला आहे.

श्री.सोमण ताम्हणे व श्री.पोपट वारे हे मयत कर्मचारी संस्थानला लेबर पुरविणारी, जय भवानी एन्टरप्राईजेस या एजन्सीकडे सुरक्षा रक्षक म्हणून कामावर होते. त्यांच्या वारसास संस्थान सेवेत घेण्याबाबतचा विषय सामान्य प्रशासन विभागासंदर्भात असल्यामुळे त्याबाबतची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात यईल. तसेच श्री.सोमण ताम्हणे व श्री.पोपट वारे हे मयत कर्मचारी कॉन्ट्रॅक्टर कडे कामाला होते. यापुर्वीही कॉन्ट्रक्टरकडील तसेच संस्थान कर्मचारी अपघातात मयत झालेले आहेत. त्यांना संस्थानकडून आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.

तरी उपरोक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदी, पीआयएल क्र.१८/२०११ दि.१६.११.२०१२ व रुपये १० लाखांचे पुढील खर्चाबाबत मा.व्य.स.चा निर्णय यास अनुसरुन मा.श्री.सदाशिव लोखंडे, लोकसभा सदस्य यांचा, श्री.सोमण ताम्हणे व श्री.पोपट वारे, मयत कंत्राटी कर्मचारी यांच्या

कुटूंबास संस्थानकडून प्रत्येकी रु.१० लाखाची आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव तसेच कंत्राटी कर्मचा-यांचा विमा उतरविणेचा प्रस्ताव धोरणात्मक असल्याने, सदर प्रस्तावास मा.व्य.स.ची मान्यता मिळाल्यास, विहीत पध्दतीने सदर प्रस्तावास मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद व मा.विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांची मान्यता घेण्यात येईल.

सदर प्रस्ताव मा.त्रिसदसिय समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१५० **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या संस्थानचे कामकाज पहात असलेली समिती अस्थायी असल्यामुळे व हा धोरणात्मक निर्णय असल्याने अपघातामध्ये निधन झालेल्या संस्थानमधील कंत्राटी कर्मचा-यांच्या कुटूंबीयांना आर्थिक मदत देण्याबाबतची विनंती मान्य करु शकत नाही, असे ठरले.**

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

विषय नं.७६ **जलयुक्त शिवार अभियानातंर्गत महाराष्ट्रातील ३४ जिल्हयाकरीता प्रत्येकी रु.२ कोटी याप्रमाणे रु.६८ कोटी इतका निधी अर्थसहाय म्हणून उपलब्ध करुन देणेबाबत.**

प्रस्ताव- महाराष्ट्र राज्यात पिकांच्या ऐन वाढीच्या काळात पावसाची अनियमितता व पावसातील खंड यामुळे सातत्याने टंचाई सदृष्य परिस्थिती निर्माण होऊन पिण्याचे पाण्याचे स्त्रोत व पिक उत्पादनावर मोठया परिणाम होत आहे. यासाठी शाश्वत शेती व पिण्याच्या पाण्यासाठी जलयुक्त शिवार अभियानांतर्गत योजना हाती घेण्यात आलेली आहे. यासाठी महाराष्ट्रातील ३४ जिल्यांना प्रत्येकी रु.१ कोटी याप्रमाणे ३४ कोटी निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेकडून मिळावा, अशी मागणी केलेली होती.

मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद सिव्हिल ॲप्लिकेशन ४७५५/२०१५, दि.०६ मे २०१५ अन्वये, मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकिर्ण २०१५/८२/प्र.क्र.२५/का.१६, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई, दि.७ मे २०१५ चे मान्यतेने महाराष्ट्रातील जिल्हे १) ठाणे २) पालघर ३) रायगड ४) रत्नागिरी ५) सिंधुदूर्ग ६) नाशिक ७) धुळे ८) नंदुरबार ९) जळगांव १०) अहमदनगर ११) पुणे १२) सातारा १३) सांगली १४) कोल्हापूर १५)सोलापूर १६)औरंगाबाद १७) जालना १८) परभणी १९) हिंगोली २०) बीड २१) नांदेड २२) उस्मानाबाद २३) लातूर २४) अमरावती २५) बुलढाणा २६) अकोला २७) वाशिम २८) यवतमाळ २९) नागपूर ३०) वर्धा ३१) भंडारा ३२) गोंदिया ३३) चंद्रपूर ३४) गडचिराली. या ३४ जिल्हयांना जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-काअ/८९७/२०१५, दि.१५.०५.२०१५ अन्वये प्रत्येकी रु.१ कोटी याप्रमाणे रु.३४ कोटी निधी देण्यात आलेला आहे.

आता महाराष्ट्र शासन पत्र क्र. शिकाना-२०१५/आनौस-३५/का-१६, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई, दि.२२ १२.२०१५.अन्वये, विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांनी जलयुक्त शिवार अभियानांतर्गत हाती घेण्यात आलेले कामे पुर्ण करण्यासाठी निधीची आवश्यकता असल्याने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांच्या तर्फे प्रत्येक जिल्हयाकरीता रु. २ कोटी याप्रमाणे रु. ६८ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती ग्रामविकास व जलसंधारण विभागामार्फत करण्यात आली आहे. सदर योजना विनंती अनुषंगाने संस्थानचे अथिप्राय उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

**<u>अधिनियमातील तरतुद :-</u>** १) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ चा कलम १७ (२) (ण) मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय करण्या-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल अशी तरतुद आहे.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम २१ (१) (१क) "भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वेस्थानक, व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यांसारख्या पायांभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडाळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल

अधिनियम २००४ कलम २१ (२) पोट कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल:-

**<u>विभागाचा अभिप्राय:-</u>** महाराष्ट्र राज्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत योजना राबविणेकरीता इकडील जा.नं.एसएसएस/वशी-काअ/८९७/२०१५, दि.१५.०५.२०१५ अन्वये प्रत्येक जिल्हयाला रु.१ कोटी याप्रमाणे ३४ जिल्हयांना रु.३४ कोटी निधी देण्यात आलेला आहे.

आता हाती घेतलेले कामे पुर्ण करण्यासाठी निधीची आवश्यकता असल्याने त्याच ३४ जिल्हयांना प्रत्येकी रु.२ कोटी याप्रमाणे रु.६८ कोटी निधी मागणी केलेली आहे.

अधिनियम २१ (२) नुसार, संस्थानच्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, शिल्लक निधी रु.१,९८,७०,९५,३९०/- आहे. सन २०१५-१६ मध्ये खर्च करणेसाठी शिल्लक निधीच्या ३०% निधी रु.५९,६१,२८,११७/- इतका होतो.

<u>एप्रील-२०१५ ते आज अखेर खर्च झालेला निधी रु.४२,८१,२८,४०२/- असून</u> प्रस्तावीत खर्च १) शिर्डी नगरपंचायतीस सुवर्ण जयंती योजनेअंतर्गत पथदिवे व रस्ते विकास कामासाठी रु.९,८५,७५,०००/ अनुदान देणे, २)

शिर्डी नगरपंचायतीस तळयात कागद टाकणेसाठी रु.४,००,००,०००/- ३) काकडी विमानतळासाठी रु.५,००,००,०००/- अनुदान देणे. असे एकुण रु.१८,८५,७५,०००/- रक्कमेचे प्रस्ताव शासनाकडे व मा.उच्च न्यायालय औरंगाबाद येथे दाखल केलेले आहे. म्हणजे अनुदानाची एकुण रक्कम रु.६१,६७,०३,४०२/- ही रक्कम, शिल्लक निधीच्या ३०% पेक्षा जास्त होत असल्याने अधिनियम २१ (२) च्या तरतुदीनुसार सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात अनुदानाचे प्रस्ताव मंजुर करता येणार नाही.

तरी सदर प्रस्ताव निर्णयासाठी सविनय सादर.

निर्णय क्र.१५१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, जलयुक्त शिवार अभियानातंर्गत महाराष्ट्रातील ३४ जिल्हयाकरीता प्रत्येकी रु.२ कोटी याप्रमाणे रु.६८ कोटी इतका निधी अर्थसहाय म्हणून उपलब्ध करुन देणेबाबत अनुदानाची एकूण रक्कम रु.६१,६७,०३,४०२/- ही रक्कम, शिल्लक निधीच्या ३०% पेक्षा जास्त होत असल्याने अधिनियम २१ (२) च्या तरतुदीनुसार सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात अनुदानाचे प्रस्ताव मंजुर करता येणार नसलेबाबत, समिती अध्यक्ष व समिती सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली आहे. त्याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

विषय नं.७७ **जनरेटरसेट करीता बॅट-या खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवात्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

शासन निर्णय परिच्छेद क्र. ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तुच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साईबाबा संस्थानने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून उच्च दाबाची वीज घेऊन तिचे कमी दाबात रुपांतर करण्यासाठी प्रत्येक झोनमध्ये सबस्टेशनची उभारणी केलेली आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा सप्लाय खंडीत झाल्यानंतर पर्यायी वीजपुरवठयासाठी सबस्टेशनमध्ये जनरेटरसेट बसविलेले आहे. यामध्ये साईनगर (श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता) येथील १०१० केव्हीए, साईआश्रम-०१ येथील (ए.सी.युनिटकरीता) ३२० केव्हीए क्षमतेचे दोन, शांतीनिवास येथील १५ केव्हीए, ज्युनिअर कॉलेजचे १५ केव्हीए, रथपालखी लाईट व्यवस्थेकरीता १५ केव्हीए जनरेटर हे जनरेटर चालू करण्यासाठी बॅट-या वापरण्यात आल्या आहे. या बॅट-याची कार्यक्षमता २४ महिन्याची असते. त्यानंतर त्यांची कार्यक्षमता कमी होऊन जनरेटर चालू होण्यास अडथळे निर्माण होऊन जनरेटर काही वेळेस चालू होत नाही. त्यामुळे महत्त्वाचे ठिकाणी अंधार राहू शकतो यासर्व ठिकाणच्या बॅट-या वापरुन त्यांचा कालावधी दोन वर्षापेक्षा जास्त झालेला आहे. त्याकरीता खालीलप्रमाणे नवीन बॅट-या खरेदी कराव्या लागतील.

जनरेटरसेटकरीता बॅट-या खरेदी करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशील | ठिकाण | मागणी | दर (अंदाजे) | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | S.F.Sonic बॅटरी, १२ व्होल्ट डि.सी. १८० Ah. | मंदिर, परीसर, श्री साई प्रसादालय, साईनगर, भक्तनिवासस्थान (५०० रुम), साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा | १२ नग | रु. १५,२००/- | रु. १,८२,४००/- |
| | | | **एकुण रक्कम :-** | | रु. १,८२,४००/- |

उपरोक्तप्रमाणे संस्थानचे जनरेटरसेटकरीता बॅट-या खरेदी करणेकामी येणा-या रक्कम रुपये १,८२,४००/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस तसेच सदरची खरेदी करणेकरीता शासन निर्णयानुसार बाहेरील पुरवठाधारक यांना पत्र पाठवून कोटेशन मागविणेस मान्यता मिळावी, ही विनंती

निर्णय क्र.१५२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे जनरेटरसेटकरीता आवश्यक असणा-या १२ नग बॅट-या विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रुपये १,८२,४००/- मात्रे चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही –विद्यूत विभागप्रमुख)

---

विषय नं.७८ **साईगार्डन येथील बोअरवेल (कुपनलिका) करीता विज जोडणी करुन घेणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१(क)नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

पाणीपुरवठा विभागामार्फत साई धर्मशाळा या इमारतीला पाणीपुरवठा करणेकरीता साईगार्डन सर्व्हे नं.१९८, १९९, २०० व २०१ मध्ये दोन बोअरवेल (कुपनलिका) घेण्यात आलेल्या आहेत. या बोअरवेलचे पाणी साईधर्मशाळा इमारतीकरीता वापरण्यात येणार आहे. सदर साईगार्डन मध्ये साधारण ५०० मीटर अंतरावर संस्थानचे

वीज कनेक्शन आहे. सदर ठिकाणांहुन यापुर्वी बोअरवेल करीता ओव्हरहेड केबल (किंमत रु. ८९,२५०/-) टाकुण सप्लाय देण्यात आला होता. सदरील साईगार्डन परिसर मोठा व निर्जन असल्याने व त्याठिकाणी सुरक्षा रक्षक नसल्याने दि.२०-०९-२०१५ रोजी सदरील ओव्हरहेड केबल चोरी झाल्याने विद्युतपुरवठा खंडीत झाला आहे. सदर ठिकाणी केबल चोरीचे प्रकार होत असल्याने पुन्हा ओव्हरहेड केबल टाकणे योग्य होणार नाही. तसेच भुमिगत केबल टाकावयाची झाल्यास त्याठिकाणी ३ मीटर उंचीचे मातीचे ढिगारे असुन त्याठिकाणी बाभळीची दाट झाडे उगवलेली आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी भुमिगत केबल टाकणे अवघड स्वरुपाचे आहे.

याकरीता सदर दोन्ही बोअरवेलसाठी स्वतंत्र वीज कनेक्शन घ्यावे लागणार आहेत. वीज कनेक्शन घेणेकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या ट्रान्सफॉर्मर पासुन पोल (साधारण ६ पोल) उभे करणे, ओव्हरहेड कंडक्टर ओढणे, सर्व्हीस लाईन ओढणे इ.कामे विद्युत ठेकेदार यांचेकडुन करुन घ्यावी लागणार आहेत. याकामास व महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे वीज कनेक्शन घेणे या दोन्ही कामास मिळून साधारण २,५०,०००/- इतका खर्च येणे अपेक्षित आहे.

उपरोक्तप्रमाणे भविष्यात केबल चोरी होऊन वीज पुरवठयात खंड पडू नये म्हणून साईगार्डन सर्व्हे नं. १९८, १९९, २०० व २०१ या सर्व्हे नंबरमधील जागेमध्ये बोअरवेल करीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडुन विद्युतपुरवठा जोडुन घेणे व संबंधीत कराव्या लागणा-या कामास, येणा-या अंदाजे रक्कम रुपये २,५०,०००/- इतक्या खर्चास तसेच प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१५३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईगार्डन सर्व्हे नं. १९८, १९९, २०० व २०१ या सर्व्हे नंबरमधील जागेमध्ये बोअरवेल करीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडुन विद्युतपुरवठा जोडुन घेणे व संबंधीत कराव्या लागणा-या कामास, येणा-या अंदाजे रक्कम रुपये २,५०,०००/- इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

विषय नं.७९ **श्री साईनाथ रुग्णालयाच्या जनरल ऑपरेशन थिएटरकरीता ७० स्केअर एम.एम.आर्मड केबल खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवात्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

शासन निर्णय परिच्छेद क्र. ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तुच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साईनाथ रुग्णालयाच्या जनरल ऑपरेशन थिएटरकरीता सदच्या विभागातील दोन जुने ९ केडब्ल्यु चे ऑटोक्लेव्ह मशिन्स बायबॅक करुन नविन दोन प्रत्येकी १८ केडब्ल्यु चे आटोक्लेव्ह मशिन्स खरेदी करावयाचे आहे. तरी वरीलप्रमाणे जनरल ऑपरेशन थिएटर विभागात प्रत्येक ऑटोक्लेव्ह करीता १८ केडब्ल्यु इलेक्ट्रीकल पॉवर सप्लाय असे एकुण ०२ नग मशिनसाठी ३६ केडब्ल्यु इलेक्ट्रीकल पॉवर सप्लाय होतो व स्टार्टींग पीक लोड ९ केडब्ल्यु असा मिळुन एकुण ४५ केडब्ल्यु लोड होतो. त्यास इलेक्ट्रीक पॉवर सप्लाय पुरविण्यासाठी पुर्वीची केबल लोड घेऊ शकणार नाही. त्यामुळे एकुण ४५ केडब्ल्यु इलेक्ट्रीकल पॉवर सप्लाय साठी ७० स्क्वेअर एम.एम.पीव्हीसी आर्मड केबल खरेदी करावी लागणार आहे. तसेच सध्या असणारे २५० केव्हीए क्षमतेचे जनरेटर सुद्धा नविन ३६ केडब्ल्यु अॅटोक्लोव्ह मशिनचा लोड घेणार नाहीत. त्यामुळे फक्त महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या सप्लायला केबल जोडुन विद्युतपुरवठा करावा लागेल. त्यामुळे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा सप्लाय गेल्यानंतर अॅटोक्लोव्ह मशिनचा विद्युतपुरवठा बंद राहील.

वरीलप्रमाणे केबल खरेदी करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | मटेरीअलचे नांव | नग | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | पी.व्ही.सी.आर्मड केबल,<br>साईज :- ७० स्क्वेअर एम.एम.कंपनी :- पॉलीकॅब | २५० मीटर | रु. ५००/-<br>( प्रति मी.) | रु. १,२५,०००/- |
| २) | केबल ग्लॅन्ड, पितळी फ्लँझ टाईप,<br>कंपनी :- एचएमआय / जॉनसन | ०६ नग | रु १२०/-<br>(प्रति नग) | रु. ०,००,७२०/- |
| ३) | अॅल्युमिनिअम लग्ज, कंपनी :- डॉवेल्स<br>साईज :- ७० स्क्वेअर एम.एम. | २५ नग | रु. ५०/-<br>(प्रति नग) | रु. ०,०१,२५०/- |
| | | | **एकुण :-** | **रु. १,२६,९७०/-** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाच्या जनरल ऑपरेशन थिएटरकरीता ७० स्क्वेअर एम.एम.आर्मड केबल खरेदी करणेकामी येणा-या रक्कम रुपये १,२६,९७०/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस तसेच सदरची खरेदी करणेकरीता शासन निर्णयानुसार बाहेरील विद्युत ठेकेदार यांना पत्र पाठवून कोटेशन मागविणेस मान्यता मिळावी, ही विनंती

निर्णय क्र.१५४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाच्या जनरल ऑपरेशन थिएटरकरीता ७० स्क्वेअर एम.एम.आर्मड केबल खरेदी कामी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रुपये १,२६,९७०/- इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

विषय नं.८० **श्री साईबाबा मंदिराकरीता १६ मी.उंचीचा हायमास्ट पोल देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत.**

प्रस्ताव- देणगीदार साईभक्त श्री.अनुप कुमार, मलुर, कर्नाटक राज्य यांनी त्यांचे दि.०९-१२-२०१५ रोजीचे मेल तसेच पत्रानुसार श्री साईबाबा मदिराकरीता १६ मीटर उंचीचा हायमास्ट पोल देणगी स्वरुपात देत असल्याचे कळविलेले आहे.

देणगीदार साईभक्त श्री.अनुप कुमार, मलुर, कर्नाटक राज्य यांनी पाठविलेल्या पत्रातील माहितीनुसार त्यांची कंपनी यार्ड लाईटींग तसेच सोडीअम लाईटींगचे काम दक्षिण भारतात सन २००७ पासुन करत असल्याचे तसेच त्यांनी कुक्के सुब्रम्हण्यम मंदिर, विश्वनाथेश्वर स्वामी मंदिर, येल्लुर तसेच अण्णपुर्णेश्वरी मंदिर, होर्नाडू येथे काम केले असल्याचे कळविले आहे.

देणगीदार साईभक्त श्री.अनुप कुमार, मलुर, कर्नाटक राज्य यांची साईबाबांवर श्रद्धा असल्याने साईबाबांकरीता देणगी देण्याची इच्छा असल्याचे कळविलेले आहे. त्यानुसार एक साईभक्त म्हणुन श्री.अनुप कुमार हे श्री साईबाबा मंदिराकरीता १६ मीटर उंचीचा हायमास्ट पोल LED फिटींग तसेच पॅनलसहीत देणगी स्वरुपात बसवुन देण्यास इच्छुक असल्याचे त्यांनी विनंती केलेली असुन त्यांची विनंती मान्य करण्याबाबत उपरोक्त पत्रानुसार कळविलेले आहे. देणगीदार साईभक्त श्री.अनुप कुमार, मलुर, कर्नाटक राज्य यांचे मार्फत देण्यात येणा-या या १६ मीटर उंचीचा हायमास्ट पोलची LED फिटींगची तसेच पॅनेलची किंमत कळविलेली नाही. परंतु सदरच्या हायमास्ट पोलची किंमत शासनाचे सन २०१३-२०१४ चे सी.एस.आर.नुसार रक्कम रुपये ३,५०,०००/- इतकी किंमत आहे. देणगीदार साईभक्त श्री.अनुप कुमार, मलुर, कर्नाटक राज्य यांचेमार्फत देणगी स्वरुपात सदरचा हायमास्ट पोल देण्यात आल्यानंतर या हायमास्ट पोलकरीता फाऊंडेशन करणे, सप्लाय देणेकरीता पॅनेल रुमपासुन केबल टाकणे, हायमास्ट तसेच पॅनेलकरीत अर्थिंग इत्यादि अनुषंगिक कामे संस्थानला करावे लागणार आहे. याकामाकरीता अंदाजे रक्कम रुपये १,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तसेच देणगीदार साईभक्त श्री.अनुप कुमार, मलुर, कर्नाटक राज्य यांनी दिनांक १२-१२-२०१५ रोजी शिर्डी येथे येवुन मा.प्रशासकीय अधिकारी श्री.औटी साहेब व मा.कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक श्री.तांबे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा केली. त्यावेळी उप कार्यकारी अभियंता (विद्युत) उपस्थित होते. सदरचा हायमास्ट पोल उभा करणेकरीता मंदिर परीसर, साईआश्रम भाग-०१ तसेच साई धर्मशाळा येथे जाऊन जागेची पाहणी केली.

तरी सदरचा १६ मीटर उंचीचा हायमास्ट पोल LED फिटींग तसेच पॅनेलसहीत देणगी स्वरुपात बसविणेस तसेच हायमास्ट पोल बसविल्यानंतर त्यांनी कळविलेल्या किंमतीची देणगी पावती त्यांना देणेकरीता तसेच संस्थानमार्फत कराव्या लागणा-या अनुषंगिक कामाचे रक्कम रु. १,५०,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

सदर प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१५५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, देणगीदार साईभक्त श्री.अनुप कुमार, मलुर, कर्नाटक राज्य यांनी श्री साईबाबा मदिराकरीता देणगी स्वरुपात देऊ केलेला १६ मीटर उंचीचा हायमास्ट पोल LED फिटींग तसेच पॅनेलसहीत देणगी स्वरुपात स्वीकारण्यात यावा. हायमास्ट पोल बसविल्यानंतर त्यांनी कळविलेल्या किंमतीची देणगी पावती त्यांना देणेस तसेच संस्थानमार्फत कराव्या लागणा-या अनुषंगिक कामाचे रक्कम रु. १,५०,०००/- इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

विषय नं.८१ **व्दारकामाई तसेच श्री साई समाधी मंदिराच्या पहिल्या मजल्यावर प्रकाश योजनेसाठी LED टयुबलाईट फिटींग देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत.**

प्रस्ताव- देणगीदार साईभक्त श्री.विनित अग्रवाल, पार्टनर, टेक्नो पॉवर टेक, अंधेरी, मुंबई यांचे दि.१०-१२-२०१५ रोजीचे पत्रानुसार व्दारकामाई तसेच श्री साई समाधी मंदिराच्या पहिल्या मजल्यावर प्रकाश योजनेकरीता सध्या बसविण्यात आलेल्या रेग्युलर लाईटींगऐवजी नवीन पध्दतीची LED टयुब लाईट फिटींग देणगी स्वरुपात बसवुन देण्याबाबत विनंती केलेली आहे.

देणगीदार साईभक्त श्री.विनित अग्रवाल, पार्टनर, टेक्नो पॉवर टेक, अंधेरी, मुंबई यांनी पाठविलेल्या सदर पत्रातील माहितीनुसार त्यांची कंपनी विविध प्रकारच्या टयुबलाईट फिटींग, बल्ब, स्ट्रीट लाईट फिटींग तसेच फ्लड लाईट फिटींग तयार करत असुन या सर्व प्रकारच्या फिटींग ह्या अत्याधुनिक पध्दतीच्या असुन त्यामुळे विजेची बचत होण्यास मदत होते.

आता एक साईभक्त म्हणुन श्री.विनित अग्रवाल हे व्दारकामाई तसेच श्री साई समाधी मंदिराच्या पहिल्या मजल्यावर प्रकाश योजनेकरीता सध्या बसविण्यात आलेल्या रेग्युलर लाईटींगऐवजी नविन पध्दतीची LED टयुब

लाईट फिटींग देणगी स्वरुपात बसवुन देण्यास इच्छुक असल्याचे त्यांनी विनंती केलेली असुन त्यांची विनंती मान्य करण्याबाबत उपरोक्त पत्रानुसार कळविलेले आहे. देणगीदार साईभक्त श्री.विनित अग्रवाल, पार्टनर, टेक्नो पॉवर टेक, अंधेरी, मुंबई यांचमार्फत व्दारकामाई येथे २७ नग तसेच श्रीं समाधी मंदिराच्या पहिला मजल्यावर १४ नग LED ट्युब लाईट फिटींग बसविण्यात येणार असुन त्यांची अंदाजे किंमत रक्कम रु. २,१०,०००/- इतकी आहे.

तरी सदरची नवीन पध्दतीची LED ट्युब लाईट फिटींग देणगीदार साईभक्त श्री.विनित अग्रवाल, पार्टनर, टेक्नो पॉवर टेक, अंधेरी, मुंबई यांचेकडुन देणगी स्वरुपात बसवून घेणेस तसेच रुपये २,१०,०००/- ची देणगी पावती त्यांना देणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

सदर प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१५६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारकामाई तसेच श्री साई समाधी मंदिराच्या पहिल्या मजल्यावर प्रकाश योजनेसाठी LED टयुबलाईट फिटींग देणगीदार साईभक्त श्री.विनित अग्रवाल, पार्टनर, टेक्नो पॉवर टेक, अंधेरी, मुंबई यांचेकडुन देणगी स्वरुपात बसवून घेणेस तसेच सदरचे LED टयुबलाईट फिटींगची रुपये २,१०,०००/- ची देणगी पावती त्यांना देणेसाठी मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

विषय नं.८२ **साईआश्रम भक्तनिवास व धर्मशाळा परिसरातील इमारतींच्या खोल्यामधील टॉयलेट, बाथरुम, नाईट लॅम्प तसेच बेसीन वरील आरश्यांवर बल्ब हेडसहित सीएफएल लॅम्प खरेदी करुन बसविणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१(क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

साईआश्रम भक्तनिवास श्री साईभक्तांचे निवासासाठी चालू होऊन अंदाजे तीन वर्षे होत आलेले आहे. या परीसरातील इमारतींच्या खोल्यांमधील टॉयलेट, बाथरुम, बेसीनवरील आरशावर तसेच नाईट लॅम्पकरीता मिळून प्रत्येक खोलीत ४ पी.एल. टयुब फिटींग्ज या बिल्डींगचे काम होतेवेळी देणगीदार, श्री.रमणीसर यांचेमार्फत देणगी स्वरुपात बसविण्यात आलेले होते. हे काम मे.पार्श्वनाथ बिल्डर्स यांनी केले होते.

या प्रत्येक रुममध्ये बसविण्यात आलेल्या पीएल टयूब फिटींग्ज या लोकल दिल्ली मेकच्या लावण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे तसेच त्यांचे सततच्या वापरामुळे ब-याच खोल्यांमधील पी.एल.टयूब फिटींग्ज वारंवार बंद पडलेल्या आहेत. शिवाय मेन्टेनन्स साठी बाजारात या पी.एल.टयुब फिटींगकरीता आवश्यक असलेले पी.एल.लॅम्प व चोकस् सहजासहजी उपलब्ध होत नाही. शिवाय लो व्होल्टेजला या पी.एल.लॅम्प बंद पडतात. शिर्डीचा वीजपुरवठा ग्रामीण भागात मोडत असल्याने बहुसंख्य वेळा आपणाला लो व्होल्टेज मिळते.

या ऐवजी जर त्याठिकाणी बल्कहेड फिटींग्जसहित सी.एफ.एल.लॅम्प बसविण्यात आल्या तर वीज खर्चात बचत होऊन तसेच मेन्टेनन्ससाठी सी.एफ.एल.लॅम्प बाजारात सहजासहजी उपलब्ध होत असल्याने मेन्टेनन्समध्येही अडचणी येणार नाहीत. फक्त जर नुसत्या होल्डरवर सी.एफ.एल.लॅम्प लावल्या तर त्या चोरी जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरीता सी.एफ.एल.लॅम्प बल्कहेड फिटींगमध्ये बसविले तर सी.एफ.एल.लॅम्प चोरी जाणार नाही व लॅम्प सुरक्षित राहतील.

यापुर्वी साईआश्रम भक्तनिवास परिसरातील क्र.A,B,C या इमारतींमधील ३८४ खोल्यांमध्ये पुर्वीच्या असलेल्या पी.एल. फिटींग काढून त्याठिकाणी बल्कहेड फिटींगसहीत सीएफएल लॅम्प करीता मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१२-०३-२०१५ चे सभेमध्ये विषय नं.०२ निर्णय क्र.७४ (०६) प्रमाणे मान्यता मिळून एकुण १५३६ नग बसविण्यात आलेले आहे. त्यासाठी एकुण रक्कम रुपये ४,४३,८२२/- इतका खर्च आलेला आहे. या सीएफएल लॅम्पच्या वापरामुळे वीजेची बचत दरवर्षी अंदाजे १,२०,०००/- पर्यंत होत आहे. तसेच मेन्टेनन्सही अत्यंत कमी झाले आहे.

त्यानुसार आता साईआश्रम भक्तनिवास येथील उर्वरीत इमारतींमध्ये तसेच साईधर्मशाळा येथील इमारतींमध्ये बल्कहेड फिटींग बसविणे आहे.

साईआश्रम भक्तनिवास येथील एकुण १२ इमारतींमध्ये प्रत्येकी १२८ प्रमाणे एकुण १५३६ खोल्या असून त्यापैकी उर्वरीत ०९ इमारतींच्या ११५२ खोल्यांमध्ये प्रत्येकी ०४ नग याप्रमाणे ४५०८ नग बल्कहेड फिटींग बसविणे बाकी आहे. तसेच साईधर्मशाळा येथील एका इमारतीमध्ये १६ याप्रमाणे सहा इमारतींच्या ९६ लेडीज जेन्टस टॉयलेट बाथरुमच्या सेक्शनमध्ये तसेच १९२ जनरल हॉलमध्ये सर्व मिळून २२०० नग बल्कहेड फिटींग बसविणे आहे. सदरच्या बल्कहेड फिटींगसहीत सी.एफ.एल.फिटींग बसविणेचे कामाच्या खर्चाचा तपशील शासनमान्य सी.एस.आर.सन २०१३-२०१४ नुसार खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | C.S.R.No. | Description | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 2-3-10 | Supplying and erecting bulkhead fitting suitable for integral CFL upto 11 W fixed on wall. As per specification no. FG-IDF/BHF (Make- Havells/ Wipro/ Charmex / Klite) | 6708 Nos. | Rs. 187.95 | Rs. 12,60,768.60 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 02) | 2-1-20 | Supplying and erecting CFL 5 W with ceramic adopter p.f.more than 0.9 (Make-Havells / Wipro / Oreva) | 1536 Nos. | Rs.148.05 | Rs. 2,27,404.80 |
| 03) | 2-1-21 | Supplying and erecting CFL 11 W with ceramic adopter p.f.more than 0.9 (Make-Havells / Wipro / Oreva) | 5172 Nos. | Rs. 153.30 | Rs. 7,92,867.60 |
| | | | | **Total** | **Rs. 22,81,041.00** |

साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा परीसरातील इमारतींच्या खोल्यांमधील टॉयलेट, बाथरुम, नाईट लॅम्प तसेच बेसीनवरील आरशावर बल्कहेडसहीत सी.एफ.एल.लॅम्प खरेदी करुन बसविणेकामी महाराष्ट्र शासनाच्या सी.एस.आर. सन-२०१३-२०१४ नुसार रु.२२,८१,०४१/- इतका खर्च अपेक्षित आहे. वरीलप्रमाणे बल्कहेड व सी.एफ.एल.लॅम्प बसविल्याळे साधारणत: रु. ५,२५,०००/- इतकी वर्षाला वीज बीलात बचत होऊ शकते. ही अपेक्षित खर्चाची रक्कम ही महाराष्ट्र शासनाच्या सी.एस.आर.सन-२०१३-२०१४ नुसार असून प्रत्यक्षात मार्केटमधील दर हे त्यापेक्षाही जास्त असल्याने प्रत्यक्षात प्राप्त होणारे टेंडरमधील दर हे महाराष्ट्र शासनाच्या सी.एस.आर.मधील दरापेक्षा जास्त येऊ शकतात. तरी प्रत्यक्षात येणा-या / होणा-या खर्चास मान्यता मिळणेस व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन व संस्थानचे वेबसाईटवर ही जाहिरात अपलोड करुन ई-टेंडर बोलविणेसाठी तसेच सदरहु खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१५७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास व धर्मशाळा परिसरातील इमारतींच्या खोल्यामधील टॉयलेट, बाथरुम, नाईट लॅम्प तसेच बेसीन वरील आरश्यांवर बल्ब हेडसहित सीएफएल लॅम्प ऐवजी एल.ई.डी बल्ब बसविल्यास वीजबीलात बचत होईल.**

**याकरीता साईआश्रम भक्तनिवास व धर्मशाळा परिसरातील इमारतींच्या खोल्यामधील टॉयलेट, बाथरुम, नाईट लॅम्प तसेच बेसीन वरील आरश्यांवर बल्ब हेडसहित सीएफएल लॅम्प ऐवजी एल.ई.डी बल्ब बसविणेबाबत सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे फेरसादर करावा, असे ठरले.**

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

विषय नं.८३ **संस्थानचे विविध विभागात कार्यरत असलेल्या संगणक संचासाठी MS Office Software चे लायसन्स ई-निविदा प्रक्रियेव्दारे खरेदी करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:** मा.व्यवस्थापन समितीचे दि. 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 799.

**प्रस्ताविक:** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 799 नुसार साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली असून, सदर कार्यवाहीसाठी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. करारनाम्यातील अटी शर्तीनुसार संस्थानचे सर्व विभागांमध्ये संगणके बसविण्यात आलेले आहे. त्यात करारनाम्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी संस्थानला दिलेले, तद्नंतर आवश्यकतेनुसार विभागामार्फत व इतर विभागांनी खरेदी केलेले संगणक संचाचा तपशिल खालीलप्रमाणे. (संस्थान शैक्षणीक संकुल व श्री साईबाबा संस्थान रुग्णालये विभाग वगळता.)

विविध विभागात कार्यरत असलेल्या संगणकावर दैंनदिन कामकाज करतांना पत्रलेखन अक्षर जुळणी, प्रेझेंटेशन इत्यादी कामासाठी Microsoft कंपनीचे MS Office software ची गरजेनुसार आवश्यकता असते.

| अ.नं. | तपशिल | संगणक संख्या | लाईसन्स असलेले संगणक संख्या | लाईसन्स नसलेले संगणक संख्या |
|---|---|---|---|---|
| 01 | संस्थान | 100 | 20 | 80 |
| 02. | साईटेक प्रकल्प | 165 | 90 | 75 |
| 03. | इतर विभाग | 30 | - | 30 |
| | **एकुण** | **295** | **110** | **185** |

उपरोक्त तक्यात नमुद केलेले एकुण 185 संगणकावर Microsoft कंपनीचे MS Office software ची अधिकृत प्रत टाकलेली नाही. Microsoft कंपनीने दि. 07/10/2015 रोजीचे ई-मेलव्दारे त्यांनी संस्थानमध्ये वापरात असलेल्या संगणकाची चौकशी केलेली असुन चर्चेअंती त्यांनी ज्या संगणकावर Microsoft कंपनीचे MS Office software टाकलेले नसेल ते टाकुण घेणेबाबत सुचविले आहे. त्यानुसार दि. 31/10/2015रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व संबधीत विभागांना याबाबत कळविण्यात आले आहे.

भविष्यात Microsoft कंपनीने Piracy Act नुसार कार्यवाही करु नये यासाठी संस्थानमध्ये कार्यरत असलेले उपरोक्त तपशिलातील एकुण 185 संचापैकी 85 नग संगणक संच विविध काऊंटरवर चालु असल्याने सदर

संगणक संचास MS Office software चे Licenses टाकण्याची आवश्यकता नाही. उर्वरित 100 नग संगणक संच विविध विभागांचे कार्यालयीन वापरात असुन 25 नग संगणक संचाची खरेदी ई-निविदा प्रक्रियेव्दारे माहितीं तंत्रज्ञान विभागामार्फत सुरु आहे.

तरी, एकुण 125 नग संगणक संचासाठी MS Office software चे Licenses खालील तपशिलाप्रमाणे संस्थानचे विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रियेव्दारे अधिकृत पुरवठाधारकांकडुन खरेदी करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | तपशिल | नग | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 01 | MS OFFICE PROFESSIONAL-2016 | 50 | 4,500/- | 2,25,000/- |
| 02 | MS OFFICE STANDARD -2016 | 75 | 3,500/- | 2,62,500/- |
| | | | **अंदाजे एकुण रक्कम** | **4,87,500/- + टॅक्स** |

तरी, उपरोक्त तपशिलातील नमुद Microsoft कंपनीचे MS Office software चे Licenses संस्थानचे विहित पध्दतीने विविध अधिकृत पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन, वर्तमानपत्रात जनसंपर्क विभागामार्फत तसेच संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 4,87,500/- + टॅक्सचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल.

**मागणी:** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे Microsoft कंपनीचे MS Office software चे Licenses संस्थानचे विहित पध्दतीने विविध अधिकृत पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन, वर्तमानपत्रात जनसंपर्क विभागामार्फत तसेच संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 4,87,500/- + टॅक्सचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छानणी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छानणी करुन अनुमान:** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** प्रस्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे Microsoft कंपनीचे MS Office software चे Licenses संस्थानचे विहित पध्दतीने विविध अधिकृत पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन, वर्तमानपत्रात जनसंपर्क विभागामार्फत तसेच संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 4,87,500/- + टॅक्सचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.१५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागात कार्यरत असलेल्या संगणक संचासाठी प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे MS Office Software चे लायसन्स ई-निविदा प्रक्रियेव्दारे खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 4,87,500/- + टॅक्सचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.८४** **साईटेक प्रकल्पातंर्गत ऑनलाईन सर्व्हिसेसचे कोटयातील शिल्लक आरती व दर्शन पास करीता वितरण काऊंटरर्स संस्थानचे भक्तनिवास व प्रसादालय येथे सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईटेक प्रकल्पाअंतर्गत श्री साईभक्तांसाठी शिर्डी येथे येण्याचे अगोदर श्रींचे आरती व दर्शन पासचे आगाऊ बुकींग करता यावे, याकरिता ऑनलाईन सर्व्हिसेस हि कार्यप्रणाली विकसीत करुन दि.१४/०७/२०११ पासून कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. सदर कार्यप्रणालीस श्री साईभक्तांचा लक्षणिय प्रतिसाद मिळत असून आज पावेतो कार्यप्रणालीद्वारे २०,४९,७१९ श्री साईभक्तांनी आरती व दर्शन पासचे आगाऊ बुकींग केलेले आहे. कार्यप्रणालीद्वारे सुरवातीचे काळात किमान दोन दिवस अगोदर आरती व दर्शन पासचे आगाऊ बुकींग करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. परंतु, मध्यंतरीचे काळात श्री साईभक्तांचे सोईचे दृष्टीने ऑनलाईन आरती व दर्शन पासचे कोट्यातील पास शिल्लक असल्यास ठरवुन दिलेल्या वेळेच्या दोन तास अगोदरपर्यंत पास बुकींगची सुविधा कार्यप्रणालीद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. तथापी, वारंवार संरक्षण विभाग व श्री साईभक्तांकडून होणा-या तक्रारींमुळे शिर्डीतील एजंटांकडून सदर सुविधेचा गैर उपयोग होत असल्याचे निदर्शनास आले. सबब, इकडील विभागाच्या विभागाची दि. २४/०८/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये पास बुकींगची मुदत पुर्वीप्रमाणेच म्हणजेच किमान दोन दिवस अगोदर कार्यान्वीत करण्यात आलेली आहे.

सदयस्थितीत ऑनलाईन आरती व दर्शन पास बुकींग किमान दोन दिवस अगोदर करावे लागत असल्याने, ऑनलाईनचा कोटा शिल्लक असूनही काही श्री साईभक्तांची गैरसोय होत आहे. सदर विषयी तत्कालीन आयटी कमिटी अध्यक्ष मा.श्री.के.व्ही.रमणी सो यांनी संस्थानने भक्तनिवासस्थान व प्रसादालयामध्ये अतिरीक्त काऊंटर सुरु करुन शिल्लक असलेल्या ऑनलाईन कोट्यातील पासेस श्री साईभक्तांना वितरीत केल्यास श्री साईभक्तांची गैरसोय दुर होईल, असे सुचविले होते. सद्यस्थितीत ऑनलाईन सर्व्हिसेस कार्यप्रणालीमध्ये प्रत्येक आरतीसाठी १५० श्री साईभक्त व दर्शनासाठी दिवसभरासाठी ३०० श्री साईभक्त प्रत्येकी स्लॉट ( प्रती तासाला, आरतीची वेळ वगळता ) याप्रमाणे एकुण ११ स्लॉटमध्ये ३३०० श्री साईभक्तांसाठी कोटा निर्धारीत करण्यात आलेला आहे. ऑनलाईन आरती व दर्शन पास संदर्भातील गैरवापर बंद होणेच्या दृष्टीने सदरचे पास बुकींगसाठी पुर्वीप्रमाणे दोन दिवसाची किमान मर्यादा कार्यप्रणालीत कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. सदर बाबीमुळे असे निदर्शनास येते की, ऐनवेळी शिर्डीस श्री

साईबाबांचे दर्शनास येणा-या श्री साईभक्तांस ऑनलाईन कोटा शिल्लक असतानाही आरती किंवा दर्शन पासचे बुकींग करता येत नाही.

तत्कालीन आयटी कमिटी अध्यक्ष मा.श्री.के.व्ही रमणी सो. यांनी त्यांचे दि. १८/११/२०१५ रोजीचे ई-मेलद्वारे ऑनलाईन सर्व्हिसेस कार्यप्रणालीतील शिल्लक कोटयातून शिर्डी येथे आलेल्या श्रीसाईभक्तांना आरती व दर्शन पास घेण्यासाठी संस्थानचे परिसरात २० पास काऊंटर चालू करावेत, असे सुचविलेले आहे. सदरकामी त्यांनी सुरवातीस प्रायोगिक तत्वावर संस्थानचे विविध निवासस्थानांच्या एकुण ५ ठिकाणी काऊंटर सुरु करावेत व त्यास मिळणारा प्रतिसाद पाहुन पुढील निर्णय घेण्यात यावा, असेही सुचित केलेले आहे. सर्वप्रथम प्रायोगिक तत्वावर ५ ठिकाणी काऊंटर सुरु करणेसाठी आवश्यक संगणक साहित्य संस्थानने परवानगी दिल्यास, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत देणगी स्वरुपात देण्याची तयारी त्यांनी दि. १८/११/२०१५ रोजीचे ई-मेलद्वारे दर्शविलेली आहे.सदरकामी एकुण ५ काऊंटर सुरु करण्यासाठी लागणारे संगणक व संगणकीय साहीत्याची किमत व तपशिल त्यांनी ई-मेल मध्ये नमुद केलेला असुन सदर साहित्यापोटीचा एकुण खर्च रक्कम रु.७,०६,७५१/-मात्र इतका आहे. सदर ऑनलाईन कोटयातील शिल्लक आरती व दर्शन पास निर्धारीत वेळेच्या अगोदरपर्यंत वितरीत करावयाचे झाल्यास, श्री साईबाबा भक्तनिवास, द्वारावती, साई प्रसादालय, साई आश्रम १ व २ या ५ ठिकाणी काऊंटर सुरु करावीत ,असेही त्यांनी सुचित केले आहे.

सद्यस्थितीत जनसंपर्क कार्यालयातून शिफारशीनुसार श्री साईभक्तांना पेड आरती व दर्शन पासेस देण्यात येतात. जनसंपर्क कार्यालयात अनेक वेळेस शिफारस नसलेले श्री साईभक्त पाससाठी आग्रह धरत असतात, परंतु, पास न मिळाल्यामुळे ते बाहेर येऊन शिफारस मिळावण्याचा प्रयत्न करतात, अशा वेळेस श्री साईभक्तांची फसवणुक झाल्याचे अनेक वेळेस निदर्शनास आलेले आहे. उपरोक्तप्रमाणे काऊंटर सुरु केल्यास जनसंपर्क कार्यालयात शिफारशीशिवाय आलेल्या श्री साईभक्तांना सदरच्या काऊंटरचा पर्याय योग्य ठरु शकतो.

ऑनलाईन कोटयातील शिल्लक पास शिर्डी येथे आलेल्या श्री साईभक्तांना वितरीत करणेसाठी काऊंटर सुरु करावयाची झाल्यास पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी लागेल, असे नम्र मत आहे.

१. श्री साईबाबा भक्तनिवास, द्वारावती, श्री साई प्रसादालय, साई आश्रम १ व २ या ठिकाणी रुम बुकींग काऊंटवर तसेच श्री साई प्रसादालयात तिकीट विक्री काऊंटरवर प्रत्येकी एक संगणक जोडून त्यावर कार्यप्रणाली कार्यान्वीत करावी लागेल.
२. सुरवातीचे काळात सदर काऊंटरवर काम करणा-या कर्मचा-यांना कार्यप्रणालीचे प्रशिक्षण देऊन श्री साईभक्तांना पास वितरीत करण्याची जबाबदारी सोपविता येईल, प्रतिसाद पाहुन भविष्यात स्वतंत्र कर्मचारी नेमण्याबाबत निर्णय घेता येईल.
३. सदर काऊंटरवर आरती व दर्शनाचे निर्धारीत वेळेच्या दोन तास अगोदरपर्यंत पास देण्याची सुविधा उपलब्ध करुन देता येईल.
४. पास वितरीत करताना साईभक्तांचे फोटो घेण्यात येतील तसेच पास घेणा-या साईभक्तांबरोबर असलेल्या इतर साईभक्तांचे नावे व वय नोंदविण्यात येतील, जेणेकरुन पासचा गैरवापर होण्यास मज्जाव होईल.
५. पासवर दर्शनाची वेळ, प्रवेशद्वार, साईभक्ताचा फोटो व सहका-यांची नावे व वय प्रिंट केली जातील.
६. साईभक्त निर्धारीत वेळेत पास घेऊन ठरवुन दिलेल्या प्रवेशद्वारावरती उपस्थित होतील, तेथील दिवटीवरील कर्मचारी पासची तपासणी करुन साईभक्तांना दर्शनासाठी प्रवेश देतील.

तरी, ऑनलाईन कोटयातील आरती व दर्शनाचे शिल्लक पासेसचे वितरण करणे कामी संस्थानचे निवासस्थान व प्रसादालयामध्ये प्रायोगिक तत्वावर ५ ठिकाणी काऊंटर सुरु करणेस व त्याकामी आवश्यक संगणक व संगणकीय साहीत्य देणगी स्वरुपात शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेकडून स्वीकारणेकामी, सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

निर्णय क्र.१५९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पातंर्गत ऑनलाईन सर्व्हिसेसचे कोटयातील शिल्लक आरती व दर्शन पास करीता वितरण काऊंटरर्स संस्थानचे भक्तनिवास व प्रसादालयामध्ये प्रायोगिक तत्वावर ५ ठिकाणी काऊंटर सुरु करणेस व त्याकामी आवश्यक संगणक व संगणकीय साहीत्य देणगी स्वरुपात शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेकडून स्वीकारणेत यावे, असे ठरले. सदरचे आरती व दर्शन पास भक्तनिवासस्थान येथे निवासस्थान घेणा-या साईभक्तास तसेच प्रसादालयात व्ही.आय.पी कक्षात भोजनप्रसाद घेणा-या साईभक्तासच देण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख/मुख्य लेखाधिकारी /जनसंपर्क अधिकारी)

---

विषय नं.८५ **संस्थानची www.sai.org.in ही वेबसाईट अद्ययावत झाले बाबत तसेच सदर वेबसाईट अधिकाधिक गतिमान होणेकामी लागणा-या तांत्रिक साहित्य खरेदी व त्याची AMC बाबतची कार्यवाही ई-निविदा प्रक्रियेव्दारे खरेदी करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतुद :** 17 (1) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 09/10/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 909.

**प्रास्ताविक:** संस्थानची www.shrisaibabasansthan.org ही अधिकृत वेबसाईट माहे 1999 पासून सुरु करण्यात आली आहे. वेबसाईटमध्ये वेळोवळी बदल करुन ती सध्या इंग्रजी, मराठी व हिंदी अशा मुख्य तीन

भाषेमधून प्रसारित करण्यात येत आहे. संस्थान प्रकाशीत सर्व भाषेतील पुस्तकांचे डिजीटलायझेशन करुन ते वेबसाईटवर प्रकाशीत करण्यात आले आहेत. संस्थानचे प्रकाशीत होणारे सर्व साईलीला अंक वेबसाईटवर प्रकाशीत केले जातात. त्याचप्रमाणे संस्थानचे माहे -जून, सन 1923 पासूनचे साईलीला अंक वेबसाईटवर प्रकाशीत केली आहे. संस्थानच्या विविध उपक्रमांची अद्यावत माहिती वेबसाईटवर देण्यात आलेली आहे. श्रींचे मुळ छायाचित्रांसहीत विविध प्रासंगीक छायाचित्रे प्रसारित करण्यात येत आहेत. तसेच संस्थानचे विविध विभागांच्या निविदा, सांख्याकी माहितीही उपलब्ध करण्यात आलेली आहे.

सदरहु कारणास्तव संस्थानचे वेबसाईटवर नियमीत भेट देणाऱ्या श्री साईभक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे निदर्शनास आल्याने संस्थानची www.sai.org.in ही वेबसाईट अधिकाधिक आकर्षित व परिपूर्ण करुन श्रीसाईभक्तांना विविध सेवा व सुविधांचा लाभ वेबसाईटवर घेता यावा, यासाठी वेबसाईटचे आधुनिकीकरण करणे आवश्यक होते. ज्यामुळे बाबांच्या जीवनावरील संस्थानची वेबसाईट अधिकाधिक भक्तांमध्ये लोकप्रिय होईल.

सदरकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.09/10/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 909 अन्वये संस्थानची वेबसाईट अद्यावत करणेत यावी, असे सुचविले होते. त्यानुसार सदरकामी निविदा मसुदा तयार करणेत आला असुन, सदरचा मसुदा श्री के.व्ही. रमणी यांनी तपासला असुन त्यांनी याबाबत महाराष्ट्र शासनाचे अभिप्राय घेणेकामी सुचित केले होते.

त्यानुसार संबधित प्रस्ताव दि. 15/12/2014 रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्र शासनास पाठविण्यात आला आहे. परंतु, सदर प्रस्तावास विलंब लागण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आल्याने व नाशिक येथे होणाऱ्या महाकुंभ पर्वावरती देश-विदेशातील श्री साईभक्त शिरडीस भेट देण्याची शक्यता असल्याने श्री संस्थानची वेबसाईट अद्यावत असणे अत्यावश्यक होते.

त्यानुसार विषयाकींत प्रकरणी दि. 12/12/2014 रोजी तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी संस्थानची वेबसाईट अद्यावत करणेबाबतची कार्यवाही तातडीने हाती घेण्यात यावी, असे निर्देश दिले होते. त्यानुसार इतर धार्मीक संस्थानचे वेबसाईटचा तांत्रिक दृष्टया अभ्यास करुन याकामी संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडु सो., यांचे मार्गदर्शनाखाली पुणे येथील सॉफटवेअर सल्लागार श्री अमोलकुमार सुपे यांनी दि. 05/02/2015 रोजी आयटी विभागातील कर्मचाऱ्यांना संस्थानची वेबसाईट कशी असावी, वेबसाईट गतीमान तसेच अद्यावत करणेकामी कशा प्रकारे सुधारणा करता येतील याबाबतचे प्रात्यक्षीक त्यांनी सेवाभावी स्वरुपात दिले असुन त्यानुसार त्यांचे मार्गदर्शनानुसार सद्यस्थितीतील वेबसाईट मध्ये खालीलप्रमाणे अद्यावत बदल करण्यात आलेले आहे. सदरहु काम दि. 06/02/2015 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये पुणे येथील सॉफटवेअर सल्लागार श्री अमोलकुमार सुपे यांनी विनामोबदला करुन दिलेले आहे.

संस्थानची वेबसाईट अद्यावत झालेबाबत केलेल्या उल्लेखनीय कामकाजाबाबत तत्कालीन आयटी कमीटी अध्यक्ष श्री के.व्ही. रमणी, श्री विजय नायडु, तांत्रिक सल्लागार तसेच महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभागाचे प्रतिनिधी श्री मुकेश सोमकुंवर यांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच अद्यावत केलेल्या वेबसाईटमध्ये खालील नमुद मुद्यानुसार आवश्यकतेनुसार बदल करण्यात आलेले आहे.

1. **New Functionality Added to Sai Portal:-** System Requirement, Security, Support, Ease of Use, Management, Flexibility, Built-in Application, Identifiers, Building Confidence.
2. **Scope of Content: Primary Content:-** About us, Services, Forms, Acts, Documents, Circulars and Recruitment, Tenders and Recruitment, News and Press Release, Contact Us, Scope of Content : Secondary Content, Scope of Content : Tertiary Content, Quality of Content, Design, Development, Website Promotion, Website Management.

तसेच Future Scope of work मध्ये वेबसाईटमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा/बदल करणे आवश्यक असल्याचे मत श्री अमोलकुमार सुपे यांनी व्यक्त केले आहे.

| Sr.No | Item | Descriptions |
|---|---|---|
| 1 | **Future Scope of Work** | |
| | 1. | Scale System to Capable of 1,000 Lakhs Visitors Monthly |
| | 2. | Flip Book For al PDF & Documents So All Document's accessible on Mobile & Desktop seamlessly |
| | 3. | Implement Flip Book for Sai Leela Magazine |
| | 4. | Implement Live Updates about Transport Facility at Shirdi (AIR/Train/BUS) |
| | 5. | Update all Frequently Asked Questions & Knowledge Base Sections for Self Help Devotees |
| | 6. | Online Ticket Tracking System With Semi Auto Email Support for Quick Response to Devotees |

उपरोक्तप्रमाणे संस्थानचे अद्यावत करण्यात आलेल्या वेबसाईटवर दि. 01/10/2015 अखेर 1,00,00,000 तसेच गुरुपौर्णिमा उत्सव काळात 44,64,259 इतक्याश्री साईभक्तांनी अद्यावत करण्यात आलेल्या नविन वेबसाईटला भेट दिलेली आहे.

तसेच श्री साईभक्तांचा दिवसें-दिवस वेबसाईटला भेट देणेचा वाढता प्रतिसाद विचारात घेता, खालील तपशिलातील तांत्रिक साहित्य खरेदीकरीता, तसेच सदर साहित्याची एक वर्षाची AMC व आयटी विभागातील संबधीत कर्मचाऱ्यांना Regular Web Architecture Training कामी खालील तपशिलात नमुद केलेप्रमाणे (A+B+C) नुसार अंदाजे रक्कम रुपये 9,91,022/- (सर्व करांसहित) खर्च अपेक्षित असल्याचे मत पुणे येथील सॉफटवेअर सल्लागार श्री अमोलकुमार सुपे यांनी दि. 02/12/2015 रोजीचे ई-मेलव्दारे कळविले आहे.

**A] New Web Portal Requirements**

| Sr. No. | Particular | Make | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Akismet Spam Protection System | Automattic - Akismet | 1 | 42,600.00 | 42,600.00 |
| 2 | Digital Vault Automattic Photon | Automattic - Wordpress | 1 | 7,200.00 | 7,200.00 |
| 3 | Akamai Dynamic Site Accelerator | Akamai Technologies | 1 | 69,850.00 | 69,850.00 |
| 4 | Cloud Flare Enterprise Subscription | Cloud Fare Inc. | 1 | 1,72,800.00 | 1,72,800.00 |
| 5 | Amazon Web Services AWS & Emergency Secondary Backup On RackSpace | Amazon & Rackspace | 1 | 1,51,572.00 | 1,51,572.00 |
| | | | | **Total-** | **4,44,022.00** |

**B] Hardware Requirements**

| Sr. No. | Particular | Make | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | NGIX Web Server(@Shirdi DC) DELL 766342-B21 DL380R09 E5-2609V3 | DELL | 1 | 1,62,000.00 | 1,62,000.00 |
| **Total** | | | | | **1,62,000.00** |

**C] AMC / Support-**

| Sr. No. | Particular | Rate | Amount |
|---|---|---|---|
| 1 | NGIX Web Server Installation, Configuration & Migration from existing Architecture | 25,000.00 | 25,000.00 |
| 2 | Server Support & Maintenance - as per scope of work for 12 Months. | 25,000.00 | 3,00,000.00 |
| 3 | Regular Web Architecture Training at Shirdi IT Cell (Approx 12 Training Sessions) | 5,000.00 | 60,000.00 |
| | | **Total** | **3,85,000.00** |

| | | |
|---|---|---|
| A] | úNew Web Portal Requirements | **4,44,022.00** |
| B] | Hardware Requirements | **1,62,000.00** |
| C] | AMC / Support | **3,85,000.00** |
| **[A],[B] ¾Ö [C] प्रमाणे एकुण रक्कम** | | **9,91,022/- (सर्व करांसहित)** |

तरी, दिवसें-दिवस श्री साईभक्तांचा वाढता प्रतिसाद विचारात घेता, उपरोक्त तपशिलातील (A+B+C) नुसार तांत्रिक साहित्य खरेदीकरीता, तसेच सदर साहित्याची एक वर्षाची AMC व आयटी विभागातील संबधीत कर्मचाऱ्यांना Regular Web Architecture Training कामी संस्थानचे विहित पध्दतीने ई-निविदा मागवुन, वर्तमानपत्रात जनसंपर्क विभागामार्फत तसेच संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 9,92,000/- (सर्व करांसहित) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी व उपरोक्त नमुद तपशिलाप्रमाणे वेबसाईटमध्ये केलेल्या अद्यावत बदलाची नोंद तसेच Future Scope of work मध्ये समाविष्ट केलेल्या बाबीनुसार वेबसाईटमध्ये सुधारणा/बदल करणेचे मान्यतेस्तव प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

**मागणी:** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय.इ. छाननी करुन अनुमान :** तांत्रिक व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थानची अद्यावत वेबसाईट बाबत केलेल्या उल्लेखनीय कामकाजाबाबत तत्कालीन आयटी कमीटी अध्यक्ष श्री के.व्ही. रमणी, श्री विजय नायडु, तांत्रिक सल्लागार तसेच महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभागाचे प्रतिनिधी श्री मुकेश सोमकुंवर यांनी समाधान व्यक्त केले आहे.

तरी, दिवसें-दिवस श्री साईभक्तांचा वाढता प्रतिसाद विचारात घेता, उपरोक्त तपशिलातील (A+B+C) नुसार तांत्रिक साहित्य खरेदीकरीता, तसेच सदर साहित्याची एक वर्षाची AMC व आयटी विभागातील संबधीत कर्मचाऱ्यांना Regular Web Architecture Training कामी संस्थानचे विहित पध्दतीने ई-निविदा मागवुन, वर्तमानपत्रात जनसंपर्क विभागामार्फत तसेच संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 9,92,000/- (सर्व करांसहित) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी व उपरोक्त नमुद तपशिलाप्रमाणे वेबसाईटमध्ये केलेल्या अद्यावत बदलाची नोंद तसेच Future Scope of work मध्ये समाविष्ट केलेल्या बाबीनुसार वेबसाईटमध्ये सुधारणा/बदल करणेचे मान्यतेस्तव प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.१६० **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानची www.sai.org.in ही वेबसाईट अद्ययावत झाल्याने वेबसाईट अधिकाधिक गतिमान होणेकामी प्रस्तावात (A+B+C) नुसार नमूद केलेले तांत्रिक साहित्य खरेदीकरीता तसेच सदर साहित्याची एक वर्षाची AMC व आयटी विभागातील संबधीत कर्मचाऱ्यांना Regular Web Architecture Training देणेकामी संस्थानचे विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस तसेच संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 9,92,000/- (सर्व करांसहित) मात्रचे खर्चास व उपरोक्त नमुद तपशिलाप्रमाणे वेबसाईटमध्ये केलेल्या अद्यावत बदलाची नोंद तसेच Future Scope of work मध्ये समाविष्ट केलेल्या बाबीनुसार वेबसाईटमध्ये सुधारणा/बदल करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

विषय नं.८६ **Unicell Technologies Pvt.Ltd.Banglore या कंपनीकडून घेण्यात येत असलेल्या SMS Services बाबत.**

प्रस्ताव- **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.: ८३५/ दि.१९/११/२०१२**

**प्रास्ताविक:** साईटेक प्रकल्पाअंतर्गत श्री साईभक्तांना त्यांनी दिलेल्या देणगी संदर्भातील निरोप, विविध सुविधांसंदर्भात सुचना तसेच संस्थानचे वतीने साजरे करण्यात येणारे उत्सवांचे निमंत्रण व तत्सम माहिती एसएमएस सर्व्हिसेस द्वारे देण्यात येत आहे. सदरची सेवा पुरविणेसाठी संस्थानचे प्रचलीत पद्धतीनुसार Unicell Technologies Pvt.Ltd., Banglore या कंपनीची निवड करून त्यांना त्यासंदर्भात उपरोक्त संदर्भ क्रं. २ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदरच्या सुविधेसंदर्भातील करारनाम्यावर दि. ३०/०५/२०१३ रोजी स्वाक्षरी होऊन प्रत्यक्षात सेवेस दि. ०१/०६/२०१३ पासून सुरुवात झालेली आहे.

करारनाम्यानुसार Unicell Technologies Pvt.Ltd., Banglore यांना सदरची सेवा सुरु झालेनंतर पुढील २४ महिन्यांसाठी सेवा पुरविणे बंधनकारक होते. सेवेस प्रत्यक्ष ०१/०६/२०१३ पासून सुरुवात झालेली असल्याने, त्यांची सुरवातीची २४ महिन्यांची मुदत दि. ३१/०५/२०१५ रोजी संपुष्टात आलेली आहे. परंतु आजअखेर Unicell Technologies Pvt.Ltd., Banglore यांचेकडून सदरची सेवा चालू असून, त्यांना यापुर्वी देण्यात आलेल्या कार्यदेशातील दराप्रमाणे त्यांची बीले अदा करण्यात येत आहेत.

आजमितीस Unicell Technologies Pvt.Ltd., Banglore यांचेसारख्या अनेक कंपन्या सदरची सेवा पुरवित आहेत. सबब, Unicell Technologies Pvt.Ltd., Banglore यांचे बरोबरच्या करारनाम्याचे नुतनीकरण करणेऐवजी सदरकामी संस्थानचे प्रचिलीत पद्धतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबवून या क्षेत्रातील नामवंत कंपन्यांकडून सदर सेवेचे दर मागविण्यात येऊन, त्यातील न्युनतम दरधारकास SMS सेवा पुरविणेसंदर्भातील कार्यादेश देता येईल.

**मागणी:** प्रास्ताविकेत नमूद केलेप्रमाणे अत्यावश्यक सेवेचा विचार करता, UnicellTechnologies Pvt.Ltd., Banglore यांचेबरोबर करण्यात आलेल्या SMS Services साठीच्या करारनाम्याचे नूतनीकरण करणेऐवजी संस्थानचे प्रचिलीत पद्धतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबवुन या क्षेत्रातील सेवा पुविणा-या पुरवठाधारकापैकी न्युनतम दरधारकास कार्यादेश देणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

तसेच निविदा प्रक्रिया राबवुन नविन पुरवठाधारकास कार्यादेश देईपर्यंत Unicell Technologies Pvt.Ltd., Banglore यांचेकडून आहे त्या दराने सेवा चालू ठेवण्यात येऊन त्यांचे कार्यदेशातील दराप्रमाणे बीले अदा करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान :** आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:** उपरोक्तप्रमाणे श्री साईभक्तांना विविध कारणांसाठी SMS पाठविणेकामी संस्थानचे प्रचिलीत पद्धतीनुसार ई-निविदाप्रक्रिया राबवुन निविदाधारकाची नेमणुक करण्याच्या व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. २,००,०००/- (One time setup & integration cost), प्रतीमाह भाडे अंदाजे ७,०००/- रु व दरपत्रकाप्रमाणे प्रत्यक्ष SMS संख्येनुसार होणारी रक्कम इ. खर्चाच्या मान्यतेस्तव व नविन

निविदाधारकाची नेमणुक होईपर्यंत Unicell Technologies Pvt.Ltd., Banglore यांचेकडून आहे त्या दराने सेवा चालू ठेवण्याच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

निर्णय क्र.१६१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, Unicell Technologies Pvt.Ltd., Banglore यांचेबरोबर करण्यात आलेल्या SMS Services साठीच्या करारनाम्याचे नूतनीकरण करणेऐवजी संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबवुन या क्षेत्रातील सेवा पुरविणा-या पुरवठाधारकांपैकी न्युनतम दरधारकाची नेमणूक करण्यात यावी. तसेच त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,००,०००/- (One time setup & integration cost), प्रतीमाह भाडे अंदाजे रु.७,०००/- व दरपत्रकांप्रमाणे प्रत्यक्ष SMS संख्येनुसार होणारी रक्कम इ. खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच नविन पुरवठाधारकास कार्यादेश देईपर्यंत Unicell Technologies Pvt.Ltd., Banglore यांचेकडून आहे त्या दराने सेवा चालू ठेवण्यात येऊन त्यांचे कार्यादेशातील दराप्रमाणे बीले त्यांना अदा करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

विषय नं.८७ **संस्थान कर्मचारी आगमन-निर्गमन वेळेची नोंदीसाठी वापरावया च्या बायोमेट्रीक कार्यप्रणालीबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**प्रास्ताविक:** दि. 14/04/2015 रोजीचे टिपणी अन्वये संस्थानचे सर्व कायम व कंत्राटी कर्मचारी यांचेकरीता Aadhar Based Attendance System कार्यान्वीत करणेबाबत तसेच याकामी लागणारे सर्व तांत्रिक साहित्य, साहित्याची देखभाल व दुरुस्तीबाबत केंद्र शासनाने निश्चित केलेल्या NICSI च्या दर करारातील पुरवठाधारकांकडुन घेणेकामीचा प्रस्ताव UIDAI कार्यालयाचे दि.16/04/2015 रोजीचे ई-मेल सोबत प्राप्त झालेले फॉर्म व सर्व आवश्यक त्या माहितीसह संस्थानने भरुन तो दिल्ली येथील NIC कार्यालयाकडे रजिस्ट्रेशन करणेकामी UIDAI चे क्षेत्रिय कार्यालय, मुंबई येथे पाठविण्यात आलेला आहे. तसेच याबाबत UIDAI कार्यालयाचे प्रतिनिधींशी उपरोक्त दि. 13/05/2015 व दि. 08/08/2015 रोजीचे पत्रान्वये व दुरध्वनीव्दारे वेळोवेळी पाठपुरावा देखील करण्यात आलेला असुन संबधीत प्रतिनिधींनी संस्थानमध्ये याकामी वेळोवेळी भेट देऊंन वरिष्ठांशी चर्चा देखील केलेले आहे. परंतु, सद्यस्थितीत आज अखेर याबाबत महाराष्ट्र शासनाकडुन कुठलाही अभिप्राय इकडील विभागास प्राप्त झालेला नाही व केव्हा होईल याची देखील शाश्वती संबधीत विभागाकडुन अधिकृतरित्या मिळत नाही.

त्यानुसार विषयांकीत प्रकरणी खालील नमुद "अ" किंवा "ब" प्रमाणे निर्णयार्थ तथा मान्यतेस्तव प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

**अ] Aadhar Based Attendance System:-**

श्री साईबाबा संस्थानचे Aadhar based attendance system चे NIC दिल्ली येथे रजिस्ट्रेशन झालेनंतर दि. 17/04/2015 रोजीचे ई-मेलमध्ये नमुद केलेल्या संकेतस्थळावर जाऊन संस्थानचे कामगार विभागास सर्व कर्मचा-यांची माहिती ऑनलाईन भरावी लागणार आहे, त्यास मान्यता असावी.

आधार वर आधारीत कर्मचारी आगमन-निर्गमन कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेसाठी Aadhar Based Biometrix हे उपकरण घ्यावे लागणार आहे. सदर उपकरणाची प्रती नग किंमत केंद्र शासनाने अधिकृत केलेल्या पुरवठाधारकाकडे चौकशी केली असता, ती अंदाजे 20,000/- + टॅक्स इतकी असुन, सदर उपकरण कार्यान्वीत करावयाचे प्रत्येक ठिकाणी नेटवर्क कनेक्टीव्हीटी व इंटरनेट सुविधा असणे अत्या-आवश्यक आहे. तसेच याबाबतचा रिपोर्टस् हा फक्त NIC यांचे सर्व्हर वरुनच मिळु शकेल. शिवाय, त्यावर सर्व प्रकारचे तांत्रिक नियंत्रण हे केंद्र शासनाचे असणार आहे. तसेच Aadhar based attendance system कार्यप्रणालीचे UIDAI चे क्षेत्रिय कार्यालय, मुंबई येथे प्रत्यक्ष पाहणी केली असता, प्रशिक्षीत कर्मचाऱ्यास Attendance करणेकामी साधारणत: 45 ते 50 सेकंद इतका वेळ लागतो. सदर कार्यप्रणाली संस्थानमध्ये कार्यान्वीत करावयाची झाल्यास प्रथम प्रायोगीक तत्वावर श्री साईप्रसादालय विभाग येथे एक मशीन केंद्र शासनाचे NICSI यांनी निर्धारीत केलेल्या पुरवठाधारकाकडुन खरेदी करुन त्यांचेमार्फत कार्यान्वीत करुन घेता येईल. तसेच सर्व रिपोर्टस् हे संस्थानचे दैनंदिन कामकाजाचे आधारे उपलब्ध झाल्याची खात्री कामगार विभागाने केल्यानंतर कामगार विभागाचा अभिप्राय इकडील विभागास प्राप्त झालेनंतर उर्वरीत सर्व ठिकाणी केंद्र शासनाचे NICSI यांनी निर्धारीत केलेल्या पुरवठाधारकाकडुन मशीन खरेदी करुन कार्यान्वीत करता येईल. तसेच संबधीत पुरवठाधारकाशी करावयाचा करारनामा UIDAI चे क्षेत्रिय कार्यालय, मुंबई यांचे मार्गदर्शनानुसार करता येईल. तसेच श्री साईभक्तांसाठी आधार निगडीत प्रणाली वापरुन "भाविकांची रांग व्यवस्थापनाबाबत" संबधीत प्रतिनिधिंनी संस्थानशी पत्रव्यवहार करुन वेळोवेळी वरिष्ठांशी चर्चा देखील केलेली आहे.

**ब] Biometrix Attendeance System:-**

सध्या संस्थान कर्मचाऱ्यांसाठी M/s. Alacrity Techonology Pvt.Ltd., यांच्या मार्फत Biometrix Attendeance Systems सन 2006 पासुन कार्यान्वीत आहे. सदरकामी कामगार विभागामार्फत संबधीत कंपनीस मशिनरीची वार्षिक दुरुस्ती-देखभाली कामी माहे-आक्टोबर 2009 पासुन प्रती वर्षी रक्कम रुपये 1,40,000/- मात्र अदा केले जात आहे. तसेच सदर कंपनीस दि. 14/09/2015 रोजीचे पत्रान्वये कामगार विभागामार्फत कार्यादेश देण्यात येऊन, सदर कार्यादेशाची मुदत दि. 30/09/2016 रोजी संपुष्टात येत आहे. संबंधीत कंपनीमार्फत संस्थानमध्ये एकुण 12 मशिन कार्यान्वीतअसुन सदरची मशिनरी व सॉफटवेअर हे तांत्रिक दृष्टया कालबाहय झालेले आहे.

सदरकामी कामगार विभागाची दि. 22/06/2015 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये याबाबतची पुढील कार्यवाही माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत करणेबाबत कळविण्यात आले आहे.

परंतु, विषयांकीत प्रकरणी उपरोक्त "अ" प्रमाणे प्रस्ताव महाराष्ट्र शासनाचे/UIDAI चे क्षेत्रिय कार्यालय, मुंबई यांचेकडे प्रलंबीत असुन, याबाबत संबधीत प्रतिनिधींनी संस्थानशी याकामी वेळोवेळी कार्यालयीन पत्रव्यवहार करुन संबधीत विषयी वरिष्ठांशी समक्ष चर्चा देखील केलेली आहे. परंतु, आज अखेर त्यांचेकडुन कुठलाही अभिप्राय इकडील विभागास प्राप्त झालेला नाही व केव्हा होईल याची देखील शाश्वती महाराष्ट्र शासनाचे/UIDAI चे क्षेत्रिय कार्यालय, मुंबई यांचेकडुन मिळत नाही.

उपरोक्त "ब" प्रमाणे कार्यवाही करावयाची झाल्यास खालील नमुद तपशिलानुसार

| अ.नं. | तपशिल | नग | अंदाजे किंमत | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | Nitgen NAC 5000 Face with RF Option. Max 25,000 Users Fingers & 3000 Face ditection with 3 years onsite warrantty | 13 | 68,000/- | 8,84,000/- |
| 2. | Web base Attendeance Software with all Licences | 01 | 1,00,000/- | 1,10,000/- |
| | | | एकुण रक्कम रुपये- | **9,94,000/- (सर्व करांसहित)** |

कार्यवाही संस्थानचे विहित पध्दतीने संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रियेव्दारे तसेच वर्तमान पत्रात जनसंपर्क विभागामार्फत जाहिरात प्रसिध्द करुन याकामी विविध पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन खरेदी करणेस तसेच याकामी AMC करीता येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 9,94,000/- (सर्व करांसहित) मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी, उपरोक्त "अ" प्रमाणे महाराष्ट्र शासन/UIDAI चे क्षेत्रिय कार्यालय, मुंबई यांचेकडुन सदरकामी कुठलाही अभिप्राय प्राप्त होत नसल्याने "ब" प्रमाणे कार्यवाही करावी किंवा कसे याबाबत निर्णयार्थ तथा मान्यतेस्तव प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

**मागणी**: उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे "अ" व "ब" प्रमाणे निर्णयार्थ तथा मान्यतेस्तव प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये "अ" मध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थान कर्मचाऱ्यांसाठी आगमन-निर्गमन वेळेची नोंदीसाठी Aadhar Based Attendance System कार्यप्रणालीबाबत महाराष्ट्र शासन/ UIDAI चे क्षेत्रिय कार्यालय, मुंबई यांचे संबधीत प्रतिनिधींनी संस्थानशी याकामी वेळोवेळी कार्यालयीन पत्रव्यवहार करुन संबधीत विषयी वरिष्ठांशी समक्ष चर्चा देखील केलेली आहे. परंतु, आज अखेर त्यांचेकडुन कुठलाही अभिप्राय इकडील विभागास प्राप्त झालेला नाही व केव्हा होईल याची देखील शाश्वती महाराष्ट्र शासनाचे/ UIDAI चे क्षेत्रिय कार्यालय, मुंबई यांचेकडुन मिळत नसल्याने संस्थान कर्मचाऱ्यांकरीता शासनाकडुन अभिप्राय प्राप्त झालेनंतर UIDAI चे क्षेत्रिय कार्यालय, मुंबई यांचे मार्गदर्शनानुसार Aadhar Based Attendance System तसेच श्री साईभक्तांसाठी आधार निगडीत प्रणाली वापरुन "भाविकांची रांग व्यवस्थापनाबाबत" कार्यान्वीत करावी.

**किंवा**

उपरोक्त "ब" मध्ये नमुद केलेल्या तपशिलाप्रमाणे Biometrix Attendance System खरेदी बाबतची कार्यवाही संस्थानचे विहित पध्दतीने संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रियेव्दारे तसेच वर्तमानपत्रात जनसंपर्क विभागामार्फत जाहिरात प्रसिध्द करुन विविध पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन खरेदी करणेस तसेच याकामी AMC करीता अंदाजे रक्कम रुपये 9,94,000/- (सर्व करांसहित) मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी, उपरोक्त "अ" किंवा "ब" प्रमाणे निर्णयार्थ तथा मान्यतेस्तव प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.१६२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनामध्ये मनुष्यबळ व्यवस्थापनाचे जे कोणी काम करतात त्यांचेशी संपर्क साधून सविस्तर माहिती घेऊन, केंद्रशासनाच्या कार्यालयांकरिता ज्या कंपन्या काम करतात त्यांचेशी संपर्क साधुन, माहिती संकलित करुन संस्थान कर्मचारी आगमन-निर्गमन वेळेची नोंदीसाठी वापरावयाच्या बायोमेट्रीक वा अन्य कार्यप्रणालीबाबत प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे फेर सादर करावा असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

विषय नं.८८ **मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार साईटेक प्रकल्पाचे ऑनलाईन सेवेसाठी Primary 10 Mbps Internet Link सुविधेकामीचे येणा-या अंदाजे प्रस्तावीत खर्चाबाबतचे विवरणाबाबत फेरप्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतुद:** 17 (1) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:** 1) मा.व्यवस्थापन समितीचे दि. 28/11/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 520-1 2) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 15/12/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 601.

**प्रास्ताविक :** साईटेक प्रकल्पाअंतर्गत श्री साईभक्तांना ऑनलाईन रुम बुकिंग, दर्शनपास व देणगी इत्यादी सेवा-सुविधा श्री साईभक्तांसाठी online.sai.org.in या संकेतस्थळावर सुरु करण्यात आलेल्या आहेत. देश- विदेशातील श्री साईभक्तांना सदर सेवेचा लाभ घेणेसाठी संस्थानचे शिरडी येथील ऑनलाईन वेबसाईट सर्व्हरला बीएसएनएल यांचे इंटरनेट लिंकव्दारे कनेक्ट व्हावे लागते.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 08/01/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 47 नुसार बीएसएनएल, शिरडी यांचेकडुन Primary 10 Mbps इंटरनेट सेवा OFC व्दारे घेण्यात येऊन, त्यांना दि. 28/07/2015 रोजीचे पत्रान्वये कार्यादेश देण्यात आला होता. सदर कार्यादेशाची मुदत दि.12/02/2016 रोजी संपुष्टात येत असल्याने, साईटेक प्रकल्पाअंतर्गत श्री साईभक्तांसाठी कार्यरत असलेल्या ऑनलाईन सेवेसाठी नव्याने Primary 10 Mbps Internet Link OFC/RF व्दारे पुढील दोन वर्षाकरीता घेणेकामी संस्थानचे विहित पध्दतीने Class-A-ISP पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागविणेस उपरोक्त दि. 20/11/2015 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि. 15/12/2015 रोजीचे सभेपुढे प्रस्तावितकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 9,95,000/- (सर्व करांसहीत) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सादर करण्यात आला होता.

परंतु, इकडील विभागास दि. 18/01/2015 रोजी विषयांकीत प्रकरणी मा. व्यवस्थापन समितीचे ठरावाची अधिकृत प्रत प्राप्त झाल्याने, मा.व्यवस्थापन समितीचे दि. 15/12/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 601 नुसार सदर प्रस्तावावर "सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पाचे ऑनलाईन सेवेसाठी Primary 10 Mbps Internet Link सुविधा घेणेकामी येणारा अंदाजे रु. 9,95,000/- मात्र खर्च कशाच्या आधारावर निश्चित केला, याच्या तपशिलासह सविस्तर फेरप्रस्ताव त्वरीत सादर करणेत यावा, असे ठरले."

इकडील विभागामार्फत यापुर्वी Secondary 10 Mbps Internet Link कार्यान्वीत करणेसाठी Class-B ISP पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन कार्यवाही अंतिम करण्यात आलेली आहे. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि. 15/12/2015 रोजीचे सभेतील निर्णयानुसार प्रस्तावित कामी येणारा अंदाजे रक्कम रु. 9,95,000/- मात्र खर्चाचा सविस्तर तपशिलातील विवरणाबाबत Bharti Airtel Limited व Tata Teleservices यांचेशी संपर्क साधला असता, त्यांनी उपरोक्त दि. 19/01/2016 रोजीचे ई-मेलअन्वये खालीलप्रमाणे दर कळविलेले आहे.

**Proposal of Bharti Airtel Limited (Contract for Two years)**

| **Sr. no.** | **Item Description** | **Amount** |
|---|---|---|
| 1 | One time charges | 30,000/- |
| 2 | Recurring Charges for 10 Mbps ILL (Media-RF) | 9,65,000/- |
| **Total Amount** | | **9,95,000/-** |
| **(Above commercials include 14.5% of service taxes. Commercials may vary with increase/decrease in service taxes.)** | | |

**Proposal of Tata Teleservices (Contract for Two years)**

| **Sr. No** | **Item Description** | **Amount** |
|---|---|---|
| 1 | **One time charges** | 25,000.00 |
| 1.1 | Project Management Charges | NA |
| **Total One time charges** | | |
| 2.1 | **Recurring charges for 10 Mbps 1:1,** | 4,03,000.00 |
| 2.2 | Managed service rental for (Modem / MUX / Router | - |
| 2.3 | Last mile Connectivity - Customer premises and TTSL POP location (At actual) | - |
| 2.4 | Charges for additional (8 / 16 / 32 / 64 / 128 / 256) IP addresses | - |
| **Total Annual recurring charges (2.1 + 2.2 + 2.3 + 2.4) With S.T. 2 YEAR (24 Months)** | | **9,51,495.00** |

तसेच उपरोक्त Bharti Airtel Limited व Tata Teleservices यांचे दरांचा व यापुर्वी Secondary 10 Mbps Internet Link कार्यान्वीत करणेसाठी Class-B ISP पुरवठाधारकांचे उपरोक्त दि. 05/12/2015 रोजीचे तुलनात्मक तक्त्यातील दरांचे अवलोकन करता, श्री साईभक्तांना ऑनलाईन सेवा-सुविधा तत्परतेणे विनाखंडीत मिळावी व दिवसें-दिवस Internet Bandwidth मधील ISP पुरवठाधारकांची स्पर्धा विचारात घेता, Internet सुविधेचे दर हे कमी होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

तरी, श्री साईभक्तांना पुरविण्यात येणाऱ्या ऑनलाईन सेवा-सुविधांचा विचार करता, Primary Link ही Class-A ISP पुरवठाधारकाची असणे अत्यावश्यक असुन,उपरोक्त सर्व बाबींचा सारासार विचार करता मा.व्यवस्थापन समितीचे दि. 15/12/2015 रोजीचे सभेतील निर्णयानुसार साईटेक प्रकल्पाचे ऑनलाईन सेवेसाठी Primary 10 Mbps Internet Link कामी उपरोक्त तपशिलानुसार पुढील दोन वर्षाकरीता अंदाजे रक्कम रु. 9,95,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी फेरप्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे दि. 20/01/2016 रोजीचे टिपणी अन्वये फेरप्रस्ताव सादर केला असता, सदर प्रस्तावावर मा. उपकार्यकारी अधिकारी सो., यांनी **"एक वर्षासाठी किती खर्च येतो तपासुन फेरसादर करावे"** असे निर्देशित केले आहे.

त्यानुसार यापुर्वी Secondary 10 Mbps Internet Link कार्यान्वीत करणेसाठी Class-A/B ISP पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन कार्यवाही दि. 05/12/2015 रोजीचे तुलनात्मक तक्त्यानुसार एक वर्षाचे कालावधिसाठी अंतिम करण्यात आलेली आहे. त्याबाबतचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | निविदाधारक कंपनीचे नाव | ISP-Class | एका वर्षासाठी दिलेले दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | Gazon communication India Ltd. | Class-B | 2,40,200/- | निम्मत्तम दर |
| 2 | JPR Digital Pvt. Ltd. Mumbai | Class-B | 14,82,000/- | उच्चत्तम दर |
| 3 | Tata Teleservices (Maharastra) Limited | Class-A | 6,21,300/- | उच्चत्तम दर |
| 4 | Railtel Corporation of India Ltd. | Class-A | 6,37,830/- | उच्चत्तम दर |

मा.व्यवस्थापन समितीचे दि. 28/11/2015 रोजीचे सभेतील निर्णयानुसार साईटेक प्रकल्पाचे ऑनलाईन सेवेसाठी Secondary 10 Mbps Internet Link सुविधा घेणेसाठी Class-B ISP पुरवठाधारक Gazon Communication India Ltd. यांचे एक वर्ष कालावधीसाठी रुपये 2,40,200/- मात्र निम्मत्तम दर स्विकारणेत येऊन, त्यांना सदरहु कामी दि. 01/01/2016 ते दि. 31/12/2016 या कालावधीसाठी दि. 20/01/2016 रोजीचे पत्रान्वये कार्यादेश देण्यात आलेला असुन सदरची Secondary 10 Mbps Internet Link ची सेवा कार्यान्वीत करण्यात आलेली आहे.

परंतु श्री साईभक्तांचे सेवेसाठी Primary Link ही Class-A ISP पुरवठाधारकाची असणे अत्यावश्यक असल्याने उपरोक्त तुलनात्मक तक्त्यात Class-A ISP Tata Teleservices (Maharashtra) Limited व Railtel Corporation of India Ltd. या दोन कंपन्यांचे एक वर्षाकरीता अनुक्रमे 6,21,300/- व 6,37,830/- मात्र दर प्राप्त झालेले आहे. सदरची Primary Link ही आपण दोन वर्षाकरीता घेत असल्याने Bharti Airtel Limited व Tata Teleservices (Maharashtra) Limited यांनी सदरकामी उपरोक्त प्रस्ताविकेत नमुद केलेप्रमाणे दि. 19/01/2016 रोजीचे ई-मेल अन्वये त्यांचे दरपत्रक अनुक्रमे अंदाजे रक्कम रुपये 9,95,000/- मात्र व रक्कम रुपये 9,51,495.00/- मात्र खर्च कळविला असुन प्रस्तावितकामी पुढील दोन वर्षाकरीता अंदाजे रक्कम रु. 9,95,000/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेकामी प्रस्ताव दि. 22/01/2016 रोजीचे टिपणी अन्वये सादर करण्यात आला होता. परंतु, सदरहु प्रस्तावावर मा. प्रशासकीय अधिकारी सो., यांनी **"भारती एअरटेल लि,चे एक वर्षाचे रेट घेऊन सादर करा"** असे निर्देश दिलेले आहे. त्यानुसार Bharti Airtel Limited यांचेशी दि. 23/01/2015 रोजीचे ई-मेलव्दारे संपर्क साधला असता त्यांनी दि. 25/01/2016 ई-मेलव्दारे एक वर्षासाठी खालील तपशिलानुसार दर कळविले आहे.

**Bharti Airtel Limited**

| Sr. No | Item Description | Amount |
|---|---|---|
| 1 | One time charges | 30,000.00 |
| 2 | Recurring Charges for 10 Mbps ILL (Media-RF) | 5,70,000 |
| | **Total Amount** | **6,00,000/-** |
| **(Above commercials include 14.5% of service taxes. Commercials may vary with increase/decrease in service taxes.)** | | |

उपरोक्त एक वर्षाचे व दोन वर्षाचे Bharti Airtel Limited यांनी देऊ केलेल्या दराचे अवलोकन करता सदर लिंक ही दोन वर्षाकरीता घेणे हितावह ठरेल. तसेच बीएसएनएल यांची लिंक चा कालावधी दि. 12/02/2016 रोजी संपुष्टात येत असल्याने विभागामार्फत संस्थानचे विहीत पध्दतीने नविन लिंक खरेदी करणेबाबतची कार्यवाही दि. 20/11/2015 रोजी सुरु करण्यात आलेली आहे. परंतु सद्यस्थितीचा व परिस्थितीचा अभ्यास करता सदर कार्यवाही संस्थानचे विहीत पध्दतीने म्हणजे दि. 12/02/2016 पुर्वी अंतिम होईल असे दिसुन येत नसल्याने, विषयांकीत प्रकरणी कार्यवाही अंतिम होईपर्यंत श्री साईभक्तांचे ऑनलाईन सेवेसाठी सद्यस्थितीत कार्यरत असलेली बीएसएनएल यांची Primary 10 Mbps Internet Link सुरु ठेवणेस तसेच त्यांचे याकामी येणारे बील बीएसएनएल यांना अदा करणेस मान्यता असावी.

**मागणी:** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेल्या तपशिलानुसार साईटेक प्रकल्पाचे ऑनलाईन सेवेसाठी Primary 10 Mbps Internet Link कामी पुढील दोन वर्षाकरीता अंदाजे रक्कम रु. 9,95,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी फेरप्रस्ताव तसेच विषयांकीत प्रकरणी कार्यवाही अंतिम होईपर्यंत श्री साईभक्तांचे ऑनलाईन सेवेसाठी सद्यस्थितीत कार्यरत असलेली बीएसएनएल यांची Primary 10 Mbps Internet Link सुरु ठेवणेस तसेच त्यांचे याकामी येणारे बील बीएसएनएल यांना अदा करणेस प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेल्या तपशिलाप्रमाणे व मागणीनुसार साईटेक प्रकल्पाचे ऑनलाईन सेवेसाठी Primary 10 Mbps Internet Link सुविधा कार्यान्वीत करणेकामी उपरोक्त Bharti Airtel Limited व Tata Teleservices यांचे दरांचा व यापुर्वी Secondary 10 Mbps Internet Link कार्यान्वीत करणेसाठी Class-B ISP पुरवठाधारकांचे उपरोक्त दि. 05/12/2015 रोजीचे तुलनात्मक तक्त्यातील दरांचे तसेच Bharti Airtel Limited यांचे एक वर्षाचे दरांचे अवलोकन करता, श्री साईभक्तांना ऑनलाईन सेवा-सुविधा तत्परतेणे विनाखंडीत मिळावी व दिवसें-दिवस Internet Bandwidth मधील ISP पुरवठाधारकांची स्पर्धा विचारात घेता, Internet सुविधेचे दर हे कमी होत असुन विषयांकीत Primary 10 Mbps Internet Link ही पुढील दोन वर्षाकरीता घेणे हितावह ठरेल.

तरी, श्री साईभक्तांना पुरविण्यात येणाऱ्या ऑनलाईन सेवा-सुविधांचा विचार करता, Primary Link ही Class-A ISP पुरवठाधारकाची असणे अत्यावश्यक असुन, उपरोक्त सर्व बाबींचा सारासार विचार करता मा.व्यवस्थापन समितीचे दि. 15/12/2015 रोजीचे सभेतील निर्णयानुसार साईटेक प्रकल्पाचे ऑनलाईन सेवेसाठी Primary 10 Mbps Internet Link, सुविधेकामीचे येणाऱ्या पुढील दोन वर्षाकरीता अंदाजे रक्कम रु. 9,95,000/- सर्व करांसहित मात्रचे खर्चास तसेच विषयांकीत प्रकरणी कार्यवाही अंतिम होईपर्यंत श्री साईभक्तांचे ऑनलाईन सेवेसाठी सद्यस्थितीत कार्यरत असलेली बीएसएनएल यांची Primary 10 Mbps Internet Link सुरु ठेवणेस तसेच त्यांचे याकामी येणारे बील बीएसएनएल यांना अदा करणेस मान्यता मिळणेकामी फेरप्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.१६३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पाचे ऑनलाईन सेवेसाठी Primary 10 Mbps Internet Link, सुविधेकामीचे लिंक OFC/RF व्दारे पूढील दोन वर्षासाठी घेणेकामी संस्थानचे विहित पध्दतीने Class-A-ISP पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.9,95,000/- (सर्व करांसहीत) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच निविदा प्रक्रियेची कार्यवाही अंतिम होईपर्यंत श्री साईभक्तांचे ऑनलाईन सेवेसाठी सद्यस्थितीत कार्यरत असलेली बीएसएनएल यांची Primary 10 Mbps Internet Link सुरु ठेवणेत व याकामी येणारे बील बीएसएनएल यांना अदा करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

विषय नं.८९ **श्री.सतिष गोविंद कासार यांचे जादा वैद्यकीय बिलांबाबत.**

प्रस्ताव- श्री.सतीश गोविंद कासार हे बाहेरगावी नाशिक येथे गेले असता त्यांच्या पत्नी सौ.संगिता सतिश कासार यांना अचानक उल्टी होऊन पोटाचा त्रास सुरु झाल्याने त्यांनी लगेच तातडीने तेथील स्थानिक डॉ.कासलीवाल यांना दाखविले असता तेथे त्यांनी प्रथमोपचार करुन त्यांना तातडीने सुयोग हॉस्पिटल, नाशिक येथे दाखल करणेस सांगितले. परंतू तेथे त्रास कमी न झाल्याने व तज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याने तसेच संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये उपचार होऊ शकत नसल्यामुळे तातडीची गरज म्हणून त्यांनी नाशिक येथील डॉ.जयंत वाघ यांच्या भगवती हॉस्पीटल, नाशिक मध्ये दाखल करणेत आले. तसेच तेथील काही उपचारासाठी त्यांना श्री साईबाबा हर्ट इन्स्टीटयुट ॲण्ड रिचर्स सेंटर, नाशिक येथे उपचार करुन पुन्हा भगवती हॉस्टिलमध्ये पुढील उपचार घेतले आहे. तसेच ते दि. १२/०७/२०१५ ते १४/०७/२०१५ पर्यंत अंतरुग्ण म्हणून उपचार घेतले आहे.

श्री.कासार यांनी वैद्यकीय बीलाचा परतावा मिळणेकामी बीले सादर केलेली आहे. तसेच सदर आजाराचे स्वरुप बघता व रुग्ण बाहेरगावी असतांना (Severe Intra – Abdominal Bleed Due to Bleeding from Left Lobe of Liver + Left Pleural effusion) तसेच संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये नियम क्रमांक १३ नुसार आकस्मिक निकडीच्या प्रसंगी पत्रक नं.०२ च्या एकुण २३ आजारामधील अ.नं.०८ (जोरदार रक्तस्त्राव) नुसार श्री.सतीश गोविंद कासार यांनी सादर केलेल्या वैद्यकीय बीलाचा परतावा मिळणेकामी रु.४७५७१७/- पैकी खाट भाडे वजा जाता ८०% रक्कम रु.३४१०२६/- (अक्षरी रु.तीन लाख एकेचाळीस हजार सव्वीस) मात्र इतकी देता येईल असे मत आहे.

उपरोक्त प्रस्ताव मान्यता असावी.

निर्णय क्र.१६४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.सतिष गोविंद कासार यांना वैद्यकिय बीलाचा परतावा करणेसाठी, त्यांनी सादर केलेल्या बीलांसह औषधोपचार करणा-या वैद्यकिय अधिका-यांना लेखी पत्र देण्यात येऊन, करण्यात आलेल्या वैद्यकिय औषधोपचाराची खात्री करुन घेण्यात यावी व त्यांच्या अभिप्रायासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.९० डॉ.दादासाहेब लु.कांबळे, वैद्यकीय अधिकारी (त्वचारोग) कामावर हजर झालेचे तारखेपासून वेतनश्रेणी देणेबाबत.**

प्रस्ताव- डॉ.दादासाहेब लुमा कांबळे, वैद्यकीय अधिकारी (त्वचारोग) श्री साईनाथ रुग्णालय यांनी रुजू झालेल्या तारखेपासून वेतनश्रेणी लागू करणेबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर रिट पिटीशन नं. १०७०८/२०१४ दाखल केले आहे.

उपरोक्त रिट पिटीशन बाबत संस्थान ॲडव्होकेट मा. श्री. संजय चौकीदार यांनी दि. ०८/१२/२०१५ चे पत्रान्वये मा.उच्च न्यायालयाने दि. ०८/१२/२०१५ दिलेल्या आदेशास अनुसरुन त्यांचे मागणीनुसार लाभ द्यावा किंवा मा.त्रिसदस्य समितीचा निर्णय क्र. ९६८ ची फेरपडताळणी करणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीसमोर तात्काळ सादर करावा" असे कळविले आहे.

सदरहु विषयाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

मा.महाराष्ट्र शासनाची आकृतीबंधास मान्यता नसलेने डॉ. कांबळे यांची जा.नं. एसएसएस/ वशी-०१/ १०९७०/२००५ दि. ०१/१०/२००५ अन्वये वैद्यकीय अधिकारी या पदावर शासनाच्या मान्यतेस अधीन राहून दरमहा रु.२१,०००/- मानधनावर नेमणूक करण्यात आली. सदर नेमणूक पत्रात Salary will be confirmed after definite directives from the State Government असे नमुद केलेले आहे. त्यास अनुसरुन ते दि.१४/१०/२००५ रोजी संस्थान सेवेत रुजू झाले.

त्यानंतर दि. ०५/११/२००५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ६६७ अन्वये कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळालेनंतर डॉ. दादासाहेब लु. कांबळे व इतर यांना हजर तारखेपासून वेतनश्रेणी वर नेमणूक देण्यास व देय होणारी फरकाची रक्कम आदा करण्यास मान्यता देण्यात आलेली होती. त्याप्रमाणे जा.नं. एसएसएस/ वशी०१/ ७५/२००५ दि. ०७/०१/२००६ अन्वये आदेश पारित करणेत आला आहे.

त्यानंतर दि.०१/१०/२००६ पासून त्यांचे मासिक मानधन रु. २१,०००/- वरुन वाढ करुन रु. ३०,०००/- करण्यात आले. आकृतीबंधास महाराष्ट्र शासनाचे निर्णय क्र. सासंवि-२००९-४३३/(३७/०९) का सोळा दि. ०७/०८/२००९ अन्वये मान्यता मिळाली. त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार जा.नं. एसएसएस/ वशी०१/ १२०५/२०१० दि. १०/०४/२०१० अन्वये डॉ. कांबळे यांना दि. ०१/०४/२०१० पासून वेतनबॅंड रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु.६६००/- मध्ये वेतन अदा केले जात आहे. त्यानुसार दरवर्षी वार्षिक वेतनवाढ देण्यात आली आहे.

तथापि, रुग्णालयाचे आकृतीबंधास शासनाची सन २००७ व २००९ साली मान्यता मिळाल्याने उपरोक्त नमुद केलेल्या दि. ०५/११/२००५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेसमोरील निर्णय क्र. ६६७ ची अंमलबजावणी त्यावेळी करणेत आली नाही असे दिसते.

यापूर्वी डॉ. दादासाहेब लुमा कांबळे असो. कन्सल्टंट श्री साईनाथ रुग्णालय यांनी रुजू झालेल्या तारखेपासून वेतनश्रेणी लागू करणेबाबत मा. उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर रिट पिटीशन नं. ८९११/२०१३ दाखल केले आहे. त्यावर मा. न्यायालयाने दि. १९ मार्च २०१४ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले होते.

In that view of the matter, writ petition is disposed off with direction to respondent to decide the representations dated 09.09.2012 and 23.02.2013 made by the petitioner, if already not decided, as expeditiously as possible, however, within two months from today.

मा.न्यायालयाचे आदेशानुसार सदरच्या विषयावर निर्णय घेणेसाठी दि.०३/०८/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आला.

दि. १३/०६/२००७ रोजीच्या मंजूर आकृतीबंधात त्वचारोग तज्ञ पदास मंजूरी नसलेने डॉ. कांबळे यांची नेमणूक मानधनावर केलेली होती ती त्यांनी त्यावेळेस स्वीकारलेली आहे दि. ०७/०८/२००९ रोजीच्या आकृतीबंधात पदाचा समावेश असल्याने त्यांना दि. ०१/०४/२०१० पासून वेतनश्रेणी देणेत आलेली आहे त्यांचे मागणीप्रमाणे त्यांना सुरुवातीचे नेमणूकीपासून वेतनश्रेणी वा वार्षिक वेतनवाढ देता येणार नाही.

यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०३/०८/२०१४ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र. ६५१ खालीलप्रमाणे झाला.

डॉ.दादासाहेब लुमा कांबळे, असो. कन्सल्टंट (त्वचारोग तज्ञ) श्री साईनाथ रुग्णालय यांनी दि.०९/०९/२०१२ व दि. २३/०२/२०१३ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्या नेमणूकीचे सुरुवातीपासून वार्षिक वेतनवाढ व वेतनश्रेणी मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करणेत आली.

अशाचप्रकारे डॉ. सुभाष शामकुवर व इतर ३ यांनी रुजू झालेल्या तारखेपासून वेतनश्रेणी लागू करणेबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर वेगवेगळे रिट पिटीशन्स दाखल केले होते. त्यामध्ये मा. न्यायालयाने दि. ३०.०६.२०१४ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिला.

Respondent no. 2 shall be decide the representation given by the petitioners with regard to pay scale, expeditiously and on its merits, within a period of 4 months from today.

मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सदरच्या विषयावर निर्णय घेणेसाठी दि.०६/११/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आला.

महाराष्ट्र शासनाची आकृतीबंधास मंजूरी नसल्याने अर्जदार यांना वेतनश्रेणीत पगार न देता सुरुवातीस मानधन अदा करण्यात आलेले आहे ते आदेश त्यांनी विनातक्रार स्विकारलेले आहेत. शासनाची आकृतीबंधास मान्यता आल्यानंतर मा. व्यवस्थापनाचे निर्णयानंतर अर्जदार यांना वेतनश्रेणीमध्ये वेतन अदा करणेत आलेले आहे त्यानंतर प्रत्येक वर्षी अर्जदारांस वार्षिक वेतनवाढी अदा करणेत आलेल्या आहेत. आकृतीबंधास शासनाची मान्यता नसलेने अर्जदारांना सुरुवातीचे रुजू तारखेपासुन वेतनश्रेणीमध्ये वेतन देता येणार नाही अर्जदारांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय झालेला नाही अशाच प्रकारे डॉ. दादासाहेब लुमा कांबळे यांनी विनंती अर्ज व रिट पिटीशन नं. ८९११/२०१३ दाखल केले होते. मा. व्य. समितीने दि. ०३/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६५१ अन्वये त्यांची मागणी अमान्य करणेत आलेली आहे.

यावर मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९६८ खालीलप्रमाणे झाला आहे.

प्रस्तावात नमुद केलेल्या श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकडील ४ आरएमओ यांना त्यांचे हजर तारखेपासून वेतनश्रेणी लागू करणेत यावी असे ठरले.

तथापि, रुग्णालयाचे आकृतीबंधास शासनाची सन २००७ मध्ये मान्यता मिळालेली असतानासुद्धा उपरोक्त निर्णय झालेला आहे, असे दिसते.

समान मागण्या व समान मुद्दा असताना एका प्रकरणात विनंती अमान्य करण्यात आली तर दुस-या प्रकरणात विनंती मान्य करण्यात आलेली आहे. त्यामुळे डॉ. दादासाहेब लुमा कांबळे यांनी याकामी पुनःश्च मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर रिट पिटीशन क्र. १०७०८/२०१४ दाखल केलेले आहे. सदर पिटीशन मध्ये मा. न्यायालयासमोर मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०३.०८.२०१४ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ६५१ नुसार व्यवस्थापनाचे म्हणणे प्रतिज्ञापत्राद्वारे दाखल केलेले आहे. म्हणून दि.०६.११.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९६८ ची अंमलबजावणी स्थगित केलेली आहे.

त्यानंतर अर्जदार यांनी परत विनंती अर्ज सादर केल्याने याबाबत व्यवस्थापन समितिसमोर ठेवणेसाठी टिपणी सादर केली असता त्यावर तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी यांनी दि. १०/१२/२०१५ रोजी खालीलप्रमाणे निर्देश दिले होते.

"वेतनश्रेणी अस्तित्वात आल्यापासूनच सर्वांना लाभ लागू करण्यात आली आहे. अस्तित्वात नसलेली वेतनश्रेणी पुर्वलक्षी प्रभावाने लागु करण्याचा प्रश्न उद्भवत नाही अन्य डॉक्टरांना देखील याच नियमाने वेतनश्रेणी लागू करण्यात आली असल्याने यामध्ये कोणतीही विसंगती नाही. सदरची बाब न्यायालयाच्या सविनय निदर्शनास आणण्यात यावी व्य. समितीला सध्या तसदी देण्याची आवश्यकता नाही".

तथापि उपरोक्त निर्देशाप्रमाणे यानंतर कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसुन येते. सदरची बाब न्यायप्रविष्ट असल्याने संबंधित कागदपत्रे कामगार वशी ७ बी(श्री. धनेश्वर) यांचेकडे होती व त्यावर त्यांचे मार्फत कार्यवाही चालु होती.

त्यानंतर डॉ. सुभाष श्रीराम शामकुवर व डॉ. सुर्यकांत पाटील यांनी पुन्हा मा. अध्यक्ष साहेब श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे दि. १९/०६/२०१५रोजीचा विनंती अर्ज सादर करुन विषयांकित प्रकरणी निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत विनंती केलेली आहे. सदरच्या अर्जावर मा. अध्यक्ष साहेब यांनी "Medical Director put up in committee" असे निर्देश दिले होते.

उपरोक्त निर्देशास अनुसरुन मा. व्यवस्थापन समितीचे-दि. ०६/११/२०१४ रोजीचे सभेमध्ये झालेला निर्णय क्र. ९६८ निरस्त करणेबाबत दि. ११/१०/२०१५ व दि. १८/१२/२०१५ रोजी टिपणी सादर करणेत आली होती. त्यावर मात्र मा. उपकार्यकारी अधिकारी साहेब व मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी दि. ०५/११/२००५ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ६६७ ला अनुसरुन काढणेत आलेला आदेश क्र. जा.नं.एसएसएस/ वशी०१/७५/ २००५ दि. ०७/०१/२००६ ची अंमलबजावणी करणेबाबत समक्ष निर्देश दिले. निर्देशास अनुसरुन दि. ०६/०१/२०१६ रोजीचे मंजूर टिपणीनुसार दि. ०६/०१/२०१६ रोजी डॉ. शामकुवर व इतर ३ यांना हजर तारखेपासुन वेतनश्रेणी लागु करणेबाबतचा आदेश पारित करणेत आलेला आहे.

सबब, उपरोक्त नमुद केलेली सर्व वस्तुस्थिती विचारात घेता मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ६६७ ला अनुसरुन काढणेत आलेल्या जा.नं.एसएसएस/वशी०१/७५/२००५ दि. ०७/०१/२००६ चे आदेशानुसार डॉ. कांबळे यांनाही हजर तारखेपासुन वेतनश्रेणी लागु करावी किंवाकसे याबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.१६५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.दादासाहेब लु.कांबळे, वैद्यकीय अधिकारी (त्वचारोग) कामावर हजर झालेचे तारखेपासून वेतनश्रेणी देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय घेणेसाठी त्यांचेबाबतीत मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका काय होती व त्यावर मा.उच्च न्यायालयाने काय आदेश दिलेला आहे, यासह सविस्तर विषय सादर करावा, तोपर्यंत सदरहू प्रस्ताव स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

विषय नं.९१ **डॉ.शिल्पा सोनवणे, ज्यु पॅथालॉजीस्ट यांचे नाव संस्थान आस्थापनेवरुन कमी करणेबाबत.**

प्रस्ताव- दि.०९/०८/२०१५ रोजी झालेल्या मुलाखतीस अनुसरुन दि. २०/०८/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे निर्णय क्र.२८५ चे निर्णयानुसार डॉ. शिल्पा सोनवणे यांचा ज्यु. पॅथॅलॉजिस्ट या पदावर नेमणूक आदेश देण्यात आलेली असुन त्या दि. २५/०९/२०१५ रोजी कामावर हजर झालेल्या आहेत. दि.०१/१०/२०१५ चे अर्जान्वये त्यांनी डीएनबी (पॅथॉलॉजी) चे परिक्षेकामी दि. ०१/१०/२०१५ ते दि. २०/१२/२०१५ पर्यंत विनावेतन रजेची मागणी केलेली होती.

त्यानुसार एच आर विभाग रुग्णालये दि. ०३/१२/२०१५ रोजी टिपणी सादर करणेत आली होती त्यावर मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी "सेवा रजा विनीयम २०१३ तील तरतुदीस अनुसरुन नाही त्यामुळे एक रजा वर्षात ३० दिवसापर्यंतच विनावेतन रजा मंजूर करता येईल" असे निर्देश दिलेले होते.

त्यानुसार दि. ०१/१०/२०१५ ते दि. ३०/१०/२०१५ पर्यंत विनावेतन रजा मंजुर करता येईल. ऊर्वरित दिवस गैरहजेरी नोंदविता येईल.

परंतु, प्र.वैद्यकीय अधिक्षक यांनी दि. ०५/०१/२०१६ रोजीचे पत्राद्वारे "डॉ. शिल्पा सोनवणे या दि. २१/१२/२०१५ रोजी कामावर हजर होणे आवश्यक होते मात्र अद्यापपर्यंत या विभागाकडे कोणतीही पूर्वसुचना न देता रजा अर्ज न भरता विनापरवानगी कामावर गैरहजर आहेत" असे कळविले आहे.

प्र.वैद्यकीय अधिक्षक यांचे पत्र प्राप्त झालेनंतर डॉ. शिल्पा सोनवणे यांचे पती डॉ. नितीन आहेर यांना दुरध्वनीवरुन विचारणा केली असता, "डॉ. शिल्पा सोनवणे ह्या कामावर हजर होणार नाहीत" असे सांगितले.

डॉ. शिल्पा सोनवणे यांची ज्यु. पॅथॅलॉजिस्ट या पदावर नेमणूक करणेत आली होती त्यानंतर त्या दि. २५/०९/२०१५ रोजी कामावर हजर झालेनंतर लगेचच ०६ दिवसांनंतर म्हणजेच दि. ०१/१०/२०१५ पासून दि. २०/१२/२०१५ पर्यंत रजेवर व त्यानंतर दि. २१/१२/२०१५ पासून आजतागायत रजाअर्जाशिवाय, विनापरवानगी कामवर गैरहजर आहेत. तसेच त्या पुन्हा कामावर हजर होणार नसल्याने त्यांचे नाव संस्थानचे हजेरीपटावरुन कमी करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.१६६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेनुसार डॉ.शिल्पा सोनवणे, ज्यु पॅथालॉजीस्ट यांचे नाव संस्थान आस्थापनेवरुन कमी करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.९२ **११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणेत आलेल्या परिचारक/परिचारीका यांचे बाबत.**

प्रस्ताव- दि. २५/०६/२००८ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीस अनुसरुन आलेल्या पात्र अर्जदारांची मुलाखत घेऊन दि. १८/१०/२००८ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णयास अनुसरुन बिंदु नामावलीनुसार प्रवर्गातील पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्याने मुलाखतीत पात्र ठरलेल्या उमेदवारांना ११ महिने कालावधीसाठी तात्पुरते नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. तदनंतर वेळोवेळी मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णयानुसार त्यांना ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.

मा.त्रिसदस्यीय समितीचे दि. १६/०४/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १३३ नुसार खालील परिचारक/परिचारिका यांना पुढील ११ महिन्याचे कालावधीसाठी नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. त्यानुसार त्यांची ११ महिने कालावधीची तात्पुरती नेमणूक माहे फेब्रुवारी २०१६ ते माहे आक्टोबर २०१६ चे दरम्यान संपुष्टात येत आहे.

| अ.नं. | नाव | नेमणूक आदेश व दिनांक | हजर तारीख | ११ महिने संपुष्टात येत असलेची तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ०१. | श्री. विशाल निळकंठ कुलकर्णी | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ ५४/२०१५ दि.०९/०५/२०१५ | ०९/०३/२०१५ | ०८/०२/२०१६ |
| ०२. | कु. मनिषा स्टिफन आवारे | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ ५५/२०१५ दि.०९/०५/२०१५ | ११/०३/२०१५ | १०/०२/२०१६ |
| ०३. | कु.आशुमती संपत सदाफुले | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ ५६/२०१५ दि.०९/०५/२०१५ | १२/०३/२०१५ | ११/०२/२०१६ |
| ०४. | श्रीमती वैशाली भगवान महागडे | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ ५७/२०१५ दि.०९/०५/२०१५ | १३/०३/२०१५ | १२/०२/२०१६ |
| ०५. | कु.कांचन विनायक शिंदे | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ ५८/२०१५ दि.०९/०५/२०१५ | १६/०३/२०१५ | १५/०२/२०१६ |
| ०६. | श्री.आशिष शरद सुर्यवंशी | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ ५९/२०१५ दि.०९/०५/२०१५ | १७/०३/२०१५ | १६/०२/२०१६ |
| ०७. | सौ.आशा रमेश जगताप | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ ६०/२०१५ दि.०९/०५/२०१५ | १०/०४/२०१५ | ०९/०३/२०१६ |
| ०८. | कु.प्रतिमा रामचंद्र कोळगे | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ ६१/२०१५ दि.०९/०५/२०१५ | १२/०४/२०१५ | ११/०३/२०१६ |

| अ.नं. | नाव | नेमणूक आदेश व दिनांक | हजर तारीख | ११ महिने संपुष्टात येत असलेची तारीख |
|---|---|---|---|---|
| ०९. | श्री.राहुल प्रकाश ओहोळ | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/८६/२०१५ दि.१८/०५/२०१५ | २१/०४/२०१५ | २०/०३/२०१६ |
| १०. | कु.प्राजक्ता दिपक जाधव | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/११५/२०१५ दि.१२/०६/२०१५ | १४/०६/२०१५ | १३/०५/२०१६ |
| ११. | श्रीमती कावेरी सुदाम म्हस्के | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/१२२/२०१५ दि.१९/०६/२०१५ | २२/०६/२०१५ | २१/०५/२०१६ |
| १२. | सौ.रुथ निलेश श्रीवास्तव | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/१४३/२०१५ दि.२९/०६/२०१५ | ०३/०७/२०१५ | ०२/०६/२०१६ |
| १३. | कु.कविता योसेफ पंडीत | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/२४१/२०१५ दि.१६/०९/२०१५ | १३/०९/२०१५ | १२/०८/२०१६ |

प्र.वैद्यकीय अधिक्षक व प्र. वैद्यकीय संचालक यांनी उपरोक्त नमुद केलेले परिचारक/ परिचारिका यांचे काम समाधानकारक असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करतात. त्यांचेबाबत काहीही प्रकरण चालु अथवा प्रस्तावित नाही. त्यांना नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही" असा अहवाल दिलेला आहे.

उपरोक्त ११ महिने कालावधीसाठी कार्यरत असलेल्या परिचारक/ परिचारिका यांची मुदत उपरोक्त तक्त्यातील स्तंभ क्र. ५ मध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या तारखेस संपुष्टात येत आहे. मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या सिव्हील ॲप्लीकेशन नं. ९४१७/२०१३ मध्ये मा. न्यायालयाने दि.०२/०८/२०१३ रोजीच्या आदेशने कंत्राटी पद्धतीने परिचारक / परिचारिका नेमण्यास मान्यता दिलेली आहे. प्र. वैद्यकीय अधिक्षक व प्र. वैद्यकीय संचालक यांचे अहवालानुसार सध्या ११ महिने कालावधीसाठी कार्यरत असलेल्या परिचारक / परिचारिका यांना त्यांचा कंत्राटी नेमणूक कालावधी संपलेनंतर पुढील ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देता येईल.

तरी, उपरोक्त तक्त्यातील अ.नं. ०१ ते १३ परिचारक / परिचारिका यांना स्तंभ क्र. ०५ मध्ये दर्शविलेल्या तारखेनंतर पुढील ११ महिने कालावधीसाठी अथवा आरक्षित वर्गासाठी उमेदवार उपलब्ध होईपर्यंत जे अगोदर घडेल तोपर्यंत पूर्वीचे आदेशातील अटी-शर्तीवर तात्पुरत्या नेमणूका देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.१६७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील तक्त्यामध्ये नमुद अ.नं. ०१ ते १३ परिचारक / परिचारिका यांना स्तंभ क्र. ०५ मध्ये दर्शविलेल्या तारखेनंतर पुढील ११ महिने कालावधीसाठी अथवा आरक्षित वर्गासाठी उमेदवार उपलब्ध होईपर्यंत जे अगोदर घडेल तोपर्यंत पूर्वीचे आदेशातील अटी-शर्तीवर कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या नेमणूका देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.९३ **धर्मादाय रुग्णालयामध्ये धर्मादाय आरोग्य सहायक यांच्या नेमणुकीबाबत.**

प्रस्ताव- सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग, यांनी दि.५/१२/२०१५ रोजीचे पत्राने धर्मादाय रुग्णालयामध्ये धर्मादाय आरोग्य सहायक यांच्यानेमणुकी बाबत पत्र दिले आहे.

सदर पत्रात असे नमुद केले की, संदर्भ क्र. 2 चे निर्देशास अनुसरुन दि.७/११/२०१५ रोजी संपन्न झालेल्या विशेष सभेचे इतिवृत्ताची छायाप्रत यासोबत पाठविण्यात येत आहे. मा.धर्मादाय आयुक्त , महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे आदेशानुसार अहमदनगर जिल्हयातील सर्व धर्मादाय रुग्णांलयांना व धर्मादाय वैद्यकीय केंद्राना खालील प्रमाणे निर्देश देण्यात आले आहे.

1) मा. तदर्थ संयुक्त समितीच्या दि.२७/१०/२०१५ रोजीच्या बैठकीत राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटीने प्रत्येक धर्मादाय रुग्णालयात धर्मादाय आरोग्य सहायकाची नेमणुक करावी व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करावी असे निर्देश देण्यात आलेले आहेत,त्यानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५०, चे कलम ४१ एए व त्या अंतर्गत मा. उच्च न्यायालय,मुंबई यांनी मंजूर केलेल्या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी करीता (Faciliatator) म्हणुन राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी टप्याटप्याने धर्मादाय सहायकांची नेमणुक करेल.

2) धर्मादाय रुग्णालया विरुध्द् तक्रारी दिवसेंदिवस वाढत आहेत, त्या करीताची उपाय योजना आवश्यक आहे. रुग्णालयाकडील वैद्यकीय समाज सेवकांसोबत अथवा त्या ऐवजी धर्मादाय आरोग्य सहायक यांची सहायता अंतिमत गरजू रुग्णांना मिळेल व जास्तीत जास्त पात्र रुग्णांना योजने अंतर्गत वैद्यकीय उपचार मिळतील. धर्मादाय आरोग्य आरोग्य सहायक संबंधित रुग्णालयाकडुन योजनेची अमलबजावणी व्यवस्थीत होत आहे किंवा नाही या बाबतही देखरेख करु शकतील व तसा अहवाल धर्मादाय संघटनेच्या / जिल्हा कार्यालयास सादर करतील व त्या कार्यालयातील संबंधित अधिकारी त्यांची नोंद घेईल, आवश्यकता असल्यास धर्मादाय आयुक्त यांना अहवाल सादर करतील.

मुंबई ,पुणे व इतर कार्यालयांचा आरोग्य सहायकाशी नियमित संवाद राहील.

3) प्रत्येक धर्मादाय रुग्णालयाने प्रत्येक धर्मादाय आरोग्य सहायकास रुग्णालयाच्या दर्शनी भागात अ) आसनव्यवस्था ,ब) संगणक , क) नेट कनेक्टीव्हीटी या सुविधा करुन दाव्यात व सर्वतोपरी सहाय करावे.

4) धर्मादाय आरोग्य सहायकास प्रशिक्षण देण्यात येईल.

धर्मादाय आरोग्य सहायकांच्या कार्यासुचीबाबत तसेच पुढील सुचनांबाबत विस्तृतपणे कळविण्यात येईल.

**विभागाचा अभिप्राय:-**

१) राजीव गांधी जीवनदाची योजने अंतर्गत रुग्णांस, शस्त्रक्रियांसाठी आवश्यक असलेने इम्लांन्टस् व औषधे इ. सर्व बाबी मोफत पुरविणे बंधनकारक आहे, सध्या फक्त हृदय शस्त्रक्रिया / प्रोसिजर्ससाठी लागणारे इम्लांन्टस् उदाः वॉल्ह, स्टेंन्टस्,पेसमेकर्स् , डिव्हाईसेस् ,इ. पुरविण्यात येतात.

तथापी, ऑर्थो, न्युरो इ. शस्त्रक्रियांसाठी आवश्यक असलेले इम्लांन्टस् पुरविण्यात येत नसुन, असे इम्लांन्टस् लागणा-या रुग्णांच्या शस्त्रक्रिया करण्यात येत नाहीत.

२) राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत रुग्णांस आवश्यक असलेली औषधे अनेकदा उपलब्ध नसतात, ऐनवेळी, रुग्ण/ नातेवाईकांस औषधे बाहेरुन विकत घ्यावी लागतात, त्याबाबत, रुग्णाच्या नातेवाईकांकडुन, हॉस्पीटल विरुध्द् तक्रारी दाखल केल्या जावु शकतात किंवा धर्मदाय आरोग्य सहायक यांनी,त्यांच्या अहवालामध्ये सदर बाबी नमुद केल्यास, हॉस्पीटल विरुध्द् योजने अंतर्गत MOU Guidelines नुसार कारवाई केली जावु शकते.

तरी उपरोक्त बाबीं विषयी,कायम स्वरुपी उपाय योजना करण्यात यावी. जेणे करुन, रुग्ण / नातेवाईकांची गैरसोय होणार नाही, तसेच, हॉस्पिटल विरुध्द् तक्रारी दाखल होणार नाहीत, असे नम्र मत आहे.

सार्वननिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग, यांनी दि.५/१२/२०१५ रोजीचे पत्राने धर्मादाय रुग्णालयामध्ये धर्मादाय आरोग्य सहायक यांच्या नेमणुकी बाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१६८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सार्वनजिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग यांचेमार्फत धर्मादाय रुग्णालयामध्ये धर्मादाय आरोग्य सहाय्यकाची नेमणूक केल्यानंतर त्यांना रुग्णालयाच्या दर्शनी भागात आसनव्यवस्था, संगणक, व नेट कनेक्टीव्हीटी या सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसेच मागणीप्रमाणे सर्वतोपरी संस्थान सहकार्य करेल, अशा आशयाचे लेखी पत्र त्यांना देण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.९४ **श्री साईनाथ रुग्णालयातील ENT O.T. या विभागाकरीता Microdebrider Motor With Cable खरेदीबाबत.**

प्रस्ताव- श्री साईनाथ रुग्णालयातील ENT O. T. या विभागाने Microdebrider Motor with Cable ची मागणी केलेली आहे.

उपरोक्त Microdebrider Motor ही ENT O. T. विभागास कानाच्या शस्त्रक्रियेमध्ये Drill करणेकामी व हाड कापण्यासाठी वापरली जाते. सदर Microdebrider Motor ही Karl storz कंपनीची घ्यावी लागेल. कारण Microdebrider Machine ही Karl Storz या कंपनीचे आहे. सदर Microdebrider Motor, Unit पैकी Control Unit व Foot Swith इत्यादी उपलब्ध असून Micro moter ही खराब झालेली असून दुरुस्त होत नाही असे कंपनीने कळविले आहे. त्यामुळे ENT O. T. या विभागाने नवीन Karl Storz या कंपनीची Microdebrider Motor ची मागणी केलेली आहे.

उपरोक्त Microdebrider Motor खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. २,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७ - २(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) **शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र.८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि.३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३–** रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असले तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत –**

उपरोक्त Microdebrider Motor ही ENT O. T. विभागास कानाच्या शस्त्रक्रियेमध्ये Drill करणेकामी व हाड कापण्यासाठी वापरली जाते. सदर Microdebrider Motor ही Karl storz कंपनीची घ्यावी लागेल. कारण Microdebrider Machine ही Karl Storz या कंपनीचे आहे. सदर Microdebrider Motor, Unit पैकी

Control Unit व Foot Swith इत्यादी उपलब्ध असून Micro moter ही खराब झालेली असून दुरुस्त होत नाही असे कंपनीने कळविले आहे. त्यामुळे ENT O. T. या विभागाने नवीन Karl Storz या कंपनीची Microdebrider Motor ची मागणी केलेली आहे. सदर Microdebrider Motor बंद पडल्यास तेथील ऑपरेशन बंद पडू शकतात. त्यामुळे सदर Microdebrider Motor ही विहीत कोटेशन मागवून खरेदी करुन देता येईल.

शासनाचे नवीन खरेदी कार्यपध्दतीची नियमावलीनुसार उपरोक्त Microdebrider Motor विहीत पद्धतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु. २,००,०००/- मात्र खर्चाचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यास मान्यता असावी, ही विनंती.

निर्णय क्र.१६९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाचे नवीन खरेदी कार्यपध्दतीच्या नियमावलीनुसार प्रस्तावित Microdebrider Motor विहीत पद्धतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु. २,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.९५ **श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागाकरीता Urine Analyser Machine खरेदीबाबत.**

प्रस्ताव- श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोशाळा या विभागाने Urine Analyser Machine ची मागणी केलेली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागात Urine Analyser Machine चा उपयोग १) लघवीतील विविध घटक तपासणी करणेकरिता, २) Urine मधील Protein ची तपासणीकरिता, ३) Urine मधील Ketone, Sugar, Blood, Billurubin Crystal Cast इत्यादी तपासण्याकरिता, ४) Urine ची PH तपासणीकरिता, ५) Urine ची Specific gravity तपासणीसाठी तसेच आम्लता व इतर घटकांची तपासणी करण्यासाठी होतो. त्यांचेकडे असलेले Urine Analyser Machine हे सन २०१० मध्ये देणगी घेतलेले आहे. त्यांना आणखी एक Urine Analyser Machine ची Stand by म्हणून आवश्यकता आहे. त्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागाने मागणी केलेली आहे.

उपरोक्त Urine Analyser Machine खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ३०००००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असले तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु. ३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागात Urine Analyser Machine चा उपयोग १) लघवीतील विविध घटक तपासणी करणेकरिता, २) Urine मधील Protein ची तपासणीकरिता, ३) Urine मधील Ketone, Sugar, Blood, Billurubin Crystal Cast इत्यादी तपासण्याकरिता, ४) Urine ची PH तपासणीकरिता, ५) Urine ची Specific gravity तपासणीसाठी तसेच आम्लता व इतर घटकांची तपासणी करण्यासाठी होतो. त्यांचेकडे असलेले Urine Analyser Machine हे सन २०१० मध्ये देणगी घेतलेले आहे. त्यांना आणखी एक Urine Analyser Machine ची Stand by म्हणून आवश्यकता आहे. त्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागाने मागणी केलेली आहे. त्यामुळे नवीन Urine Analyser Machine कोटेशन मागवून खरेदी करता येईल.

उपरोक्त Urine Analyser Machine विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु. ३,००,०००/- मात्रचे खर्चाच्या प्रस्तावास मान्यता असावी.

निर्णय क्र.१७० **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता Urine Analyser Machine विहीत पद्धतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.९६ **श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरीता Deep Freezer खरेदीबाबत.**

प्रस्ताव- श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाने Deep Freezer ची दि. ०५/१०/२०१५ रोजीचे (औषध भांडार विभाग प्राप्त दि. १४/१०/२०१५) मागणीपत्रकान्वये मागणी केलेली आहे.

Blood Bank मध्ये FFP (Platelet) व इतर रक्ताचे घटक ठेवणेसाठी – 80°c Deep Freezer वापरला जातो. सध्या Blood Bank विभागात ०१ Deep Freezer असून, सदर Deep Freezer मध्ये FFP व इतर रक्ताचे

घटक ठेवणेसाठी जागा अपूरी पडते. तसेच उपरोक्त रक्त घटकांची दैनंदिन मागणी वाढल्यामुळे अतिरिक्त रक्त पिशव्या साठविण्यासाठी आणखी ०१ नग – 80°c चा Deep Freeze ची आवश्यकता आहे.

सदर ०१ नग Deep Freezer खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ४,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे-

| Sr. No. | Name of Item | Qty. | App. Rate per in Rs. | Total Amount in Rs. (Incl. of All Taxes) |
|---|---|---|---|---|
| 01. | Deep Freezer 80 °c, Volume – 350 – 400 Litre, Vertical with Stabilizer and Printer | 01 | 400000.00 | 400000.00 |
| | **Total Amt. in Rs. (Incl. of All Taxes)** | | | 400000.00 |

**मागणी –** श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाचे दि. ०५/१०/२०१५ रोजीचे मागणीपत्र. (औषध भांडार विभाग प्राप्त दि. १४/१०/२०१५)

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरिता सदर Deep Freezer ची आवश्यकता विहित पद्धतीने कोटेशन मागवून खरेदी करता येईल.

तरी उपरोक्त Deep Freezer हे विहीत पद्धतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु. ४,००,०००/- मात्र खर्चाचे प्रस्तावास मान्यता असावी.

निर्णय क्र.१७१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरीता ०१ नग Deep Freezer विहीत पद्धतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.४,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.९७ **श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरीता Hb Analyser by Strips Method/by Cartridge Method खरेदीबाबत.**

प्रस्ताव- श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाने Hb Analyser by Strips Method/ by Cartridge Method ची मागणी केलेली आहे.

सदर Hb Analyser by Strips Method/ by Cartridge Method हे साईनाथ रक्तपेढी या विभागाकरिता विविध ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन केलेले असते, त्याकरिता रक्तदात्यांची रक्तातील हिमोग्लोबीनची तपासणी करणेकरिता आवश्यकता असते. सध्या साईनाथ रक्तपेढी या विभागात Cell Counter व Manual Hb Meter उपलब्ध आहे. सदरचे Hb Analyser चा उपयोग रक्तपेढीमध्ये नियमित येणा-या रक्तदात्यांची हिमोग्लोबीनची तपासणीकरिता केला जातो. परंतु, रक्तदान शिबिराच्या ठिकाणी उपरोक्त Manual Hb Meter नेण्यास त्याचा वापर करण्यास अधिक वेळ लागतो व त्यांच्या Reading मध्ये अचूकता नसते त्यामुळे रक्तपेढी या विभागाने Hb Analyser मशीनचीमागणी केली आहे. सदर मशीनचे Cartridge किंवा Strips या Consumable प्रकारच्या असून त्याची किंमत प्रत्येकी रक्कम अंदाजे रु. ३०/- इतकी आहे व मशीनची किंमत रु. ३०,०००/- इतकी आहे. जर विविध कंपन्याकडूनदर मागवून Cartridge अथवा Strips चे दर व मासिक संख्या निश्चित केल्यास विविध पुरवठाधारक सदरचे मशीन मोफत देण्यास तयार असतात.

सदर Hb Analyser by Strips Method/ by Cartridge Method खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी रक्कम M/s. Fresenius Kabi India Pvt. Ltd., Pune यांचेकडून दूरध्वनीव्दारे दरपत्रक मागविण्यात आले होते. M/s. Fresenius Kabi India Pvt. Ltd., Pune यांनी त्यांचे खालील प्रमाणे दर कळविले आहे.

**त्यांचा तपशिल खालील प्रमाणे :-**

| Sr. No. | Name of Item | Qty | Rate per in Rs. | Total Amt in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Hb Analyser by Strips Method/ by Cartridge Method | 02 | 30000.00 | 60000.00 |
| | | | Total Amt in Rs. | 60000.00 |

उपरोक्त Hb Analyser by Strips Method / by Cartridge Method हे खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ६०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७ – २ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र. ८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असले तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु. ३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** सदर Cartridge / Strips ची मासिक संख्या निश्चित करुन मशीन मोफत घेता येईल असे मत आहे. तसेच Hb Analyser by Strips Method / by Cartridge Method हे विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करता येईल.

शासनाचे नवीन खरेदी कार्यपध्दतीची नियमावलीनुसार उपरोक्त Hb Analyser by Strips Method/ by Cartridge Method विहीत पद्धतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु. ६०,०००/- मात्र खर्चाचे प्रस्तावास मान्यता असावी.

निर्णय क्र.१७२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाचे नवीन खरेदी कार्यपध्दतीच्या नियमावलीनुसार श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरीता Hb Analyser by Strips Method / b Cartridge Method विहीत पद्धतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.९८ **श्रीसाईनाथ रक्तपेढी या विभागाकरीता Wireless central Temperature Monitoring System खरेदीबाबत.**

प्रस्ताव- श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाने Wireless Central Temperature Monitoring System ची दि. ०२/०७/२०१५ रोजीचे (औषध भांडार विभाग प्राप्त दि. १४/०७/२०१५) मागणीपत्रकान्वये मागणी केलेली आहे. सदर Wireless Central Temperature Monitoring System ही श्री साईनाथ रक्तपेढी या विभागात विविध प्रकारचे Blood bag Storage Freezer Deep Freezer हे नियमित वापरत आहे. Wireless Central Temperature Monitoring System ही सदरचे Blood Bank विभागातील सर्व फ्रिजचे Temperture Noting करुन त्यांचे Record FDA नियमानुसार व्यवस्थित ठेवणेसाठी अत्यंत आवश्यक असते.

सध्या त्यांचेकडे असलेले Wireless Central Temperature Monitoring System ही सन २००८ साली खरेदी केलेले असून सध्या ते व्यवस्थीत काम करत नाही. त्यामुळे त्यांनी त्यांचे मागणीपत्रकात जुने Wireless Central Temperature Monitoring System ही परत (Buyback) करुन नवीन Wireless Central Temperature Monitoring System ही खरेदी करणेबाबत कळविले आहे. सदर जुने Wireless Central Temperature Monitoring System ची घसारा किंमत वजा जाता येणारी किंमत रक्कम रु. २२,६९४/- इतकी आहे.

सदर Wireless Central Temperature Monitoring System खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. २,००,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

**त्याचा तपशिल खालील प्रमाणे -**

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate per in Rs. (Incl. of all taxes) | Total Amt in Rs. (Incl. of all taxes) |
|---|---|---|---|---|
| 01. | Wireless Central Temperature Monitoring System | 01 | 200000/- | 200000/- |
| | **Total Amt. in Rs. (Incl. of all taxes)** | | | 200000/- |

**मागणी:–** श्री साईनाथ रक्तपेढी विभाग यांचे दि. ०२/०७/२०१५ रोजीचे मागणीपत्र. (औषध भांडार विभाग प्राप्त दि. १४/०७/२०१५)

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:–** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:–** श्री साईनाथ रक्तपेढी या विभागात सध्या असलेली Wireless Central Temperature Monitoring System ही सन २००८ या वर्षात M/s. Udhyamshri Engineeres, Miraj यांचेकडून खरेदी करण्यात आली होती. सदर सिस्टीम व्यवस्थीत काम देत नसल्यामुळे, त्यामुळे सदर System ही Buyback करणेबाबत मागणीपत्रावर बायोमेडिकल विभागाचा अभिप्राय आहे. सध्या सदर Wireless Central Temperature Monitoring System ची घसारा किंमत वजा जाता येणारी किंमत रु. २२,६९४/- इतकी आहे.

सदर रक्कम ही रु. ५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनियम २००८ मधील कलम १७(४) अन्वये खरेदी करण्यापूर्वी शासनाची मान्यता घ्यावी लागणार नाही. त्यामुळे नवीन Wireless Central Temperature Monitoring System हे खरेदी करणेस व जुने Wireless Central Temperature Monitoring System परत (Buyback) करणेस हरकत नाही.

श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरिता सदर Wireless Central Temperature Monitoring System ही Buyback करुन विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करता येईल.

तरी उपरोक्त Wireless Central Temperature Monitoring System परत (Buyback) करुन, विहीत पद्धतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु. २,००,०००/- मात्र खर्चाचे प्रस्तावास मान्यता असावी.

निर्णय क्र.१७३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईनाथ रक्तपेढी या विभागाकडील Wireless Central Temperature Monitoring System परत (Buyback) करुन, नवीन खरेदी करणेकामी विहीत पद्धतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.९९ **श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागाकरीता Electrolyte Analyser Machine खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागाने ०१ नग Electrolyte Analyser Machine ची मागणी केलेली आहे.

सदर Electrolyte Analyser Machine चा उपयोग रक्तातील सोडियम आयर्न, क्लोराईड आयर्न, पोटॅशियम आयर्न, या घटकांची तपासणी करण्यासाठी होतो. परंतु, सदरचे Electrolyte Analyser Machine त्यांचेकडे उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी मागणी केलेली आहे. सदरचे Electrolyte Analyser Machine वर $Na^+$, $K^+$, $Cl^-$ या सर्व तपासण्या होतात. परंतु, पेशंटची वाढती संख्यामुळे त्यांना प्रत्येक टेस्ट करण्यासाठी Separate Electrolyte Analyser Machine ची आवश्यकता आहे.

सदरचे Electrolyte Analyser Machine औषध भांडार विभागात शिल्लक नसल्यामुळे ते मशीन खरेदी करावे लागणार आहे.

सदर Electrolyte Analyser Machine हे खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. २,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**<u>संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-</u>**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७ – २ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये - परिच्छेद ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असले तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु. ३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकाराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-</u>** श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागाने ०१ नग Electrolyte Analyser Machine ची मागणी केलेली आहे.

सदर Electrolyte Analyser Machine चा उपयोग रक्तातील सोडियम आयर्न, क्लोराईड आयर्न, पोटॅशियम आयर्न, या घटकांची तपासणी करण्यासाठी होतो. परंतु, सदरचे Electrolyte Analyser Machine त्यांचेकडे उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी मागणी केलेली आहे. सदरचे Electrolyte Analyser Machine वर $Na^+$, $K^+$, $Cl^-$ या सर्व तपासण्या होतात. परंतु, पेशंटची वाढती संख्यामुळे त्यांना प्रत्येक टेस्ट Separate करण्यासाठी Electrolyte Analyser Machine ची आवश्यकता आहे.

सदरचे Electrolyte Analyser Machine औषध भांडार विभागात शिल्लक नसल्यामुळे ते मशीन विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करता येईल.

शासनाचे नवीन खरेदी कार्यपध्दतीची नियमावली नुसार सदर Electrolyte Analyser Machine खरेदीकामी विहीत पद्धतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु. २,००,०००/- मात्र खर्चाचे प्रस्तावास मान्यता असावी.

निर्णय क्र.१७४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाचे नवीन खरेदी कार्यपध्दतीच्या नियमावलीनुसार श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागाकरीता Electrolyte Analyser Machine खरेदीकामी विहीत पद्धतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या रक्कम रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.१०० **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी.या विभागाकरीता Resecto scope Set खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ. टी. या विभागाने Resecto scope Set – ०१ ची मागणी केली आहे.

सदरचे Laproscope मधील एक Instrument असून पोटाच्या विविध सर्जरीमध्ये सदर Instrument चा वापर पोटातील बारीक – बारीक आतड्यांची तुकडे करण्यासाठी होतो. त्यामुळे सदर Resecto scope Set खरेदी करणे आवश्यक आहे. त्यांचेकडील असलेले Resectoscope Set हे खूप जूने झालेले असून ते सध्या दुरुस्त देखील होऊ शकत नाही. सदर Resectoscope Set हे औषध भांडार विभागात शिल्लक नसल्यामुळे सदर Instrument खरेदी करणे गरजेचे आहे.

सदर Resecto Scope Set खरेदीकामी अंदाजे रु. २,५०,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

**<u>संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:–</u>**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये - परिच्छेद ३.२.३ – रु.५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असले तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु. ३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत</u>**:– सदरचे Laproscope मधील एक Instrument असून पोटाच्या विविध सर्जरीमध्ये सदर Instrument चा वापर पोटातील बारीक – बारीक आतड्यांची तुकडे करण्यासाठी होतो. त्यामुळे सदर Resecto scope Set खरेदी करणे आवश्यक आहे. त्यांचेकडील असलेले Resectoscope Set हे खूप जूने झालेले असून ते सध्या दुरुस्त देखील होऊ शकत नाही. सदर Resectoscope Set हे औषध भांडार विभागात शिल्लक नसल्यामुळे सदर Instrument खरेदी करणे गरजेचे आहे.

श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ. टी. या विभागाने मागणी केलेले Resecto Scope Set ची खरेदी ही विहीत पद्धतीने कोटेशन मागवून करता येईल, असे मत आहे.

शासनाचे नवीन खरेदी कार्यपध्दतीची नियमावली नुसार सदर Resecto Scope Set खरेदीकामी विहीत पद्धतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु. २,५०,०००/- (अक्षरी रुपये – दोन लाख पन्नास हजार मात्र) खर्चाचे प्रस्तावास मान्यता असावी.

निर्णय क्र.१७५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाचे नवीन खरेदी कार्यपध्दतीच्या नियमावलीनुसार श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी.या विभागाकरीता Resecto scope Set खरेदीकामी विहीत पद्धतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या रक्कम रु.२,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.१०१ **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सि.व्ही.टी.एस.ओ.टी.२ या विभागाकरीता Sevonoflurane Vaporiser खरेदीबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस. ओ.टी नं. 2 मध्ये दि.१०/०४/२०१५ रोजी शॉर्ट सर्किटमुळे आग लागली होती, त्यामुळे ओ.टी. मधील मशिनरी / उपकरणे खराब-झालेले आहेत, त्यामुळे सि.व्ही.टी.एस.ओ.टी.२ या विभागाने दि.११/०५/२०१५ (औषध भांडार विभाग प्राप्त दि.१०/१०/२०१५) रोजीचे मागणी पत्रकान्वये Sevonoflurane Vaporiser ०१ नगाची मागणी केलेली आहे, सदरचे खरेदीकामी एकुण रक्कम रु.१,२०,०००/- इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Description | Qty. | App. Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | Sevonoflurane Vaporiser for Drager Machine | 01 | 1,20,000.00 | 1,20,000.00 |
| | | Total Amt.in Rs. | | 1,20,000.00 |

**मागणी** - श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सि.व्ही.टी.एस.ओ.टी.२ या विभागाने दि.११/०५/२०१५ (औषध भांडार विभाग प्राप्त दि.१०/१०/२०१५) रोजीचे मागणी पत्रकान्वये Sevonoflurane Vaporiser ०१ नगाची मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 मध्ये दि.१०/०४/२०१५ रोजी शॉर्ट सर्किटमुळे आग लागली होती, त्यामुळे ओ.टी. मधील ब-याच मशिनरी / उपकरणे खराब झालेल्या आहेत, तसेच जून्या खराब झालेल्या मशिनरी / उपकरणे यांची विमा पॉलीस काढण्यात आलेली होती, त्यामुळे नवीन मशिनरी / उपकरणे खरेदी केल्यानंतर त्याचे बील संस्थानला विमा पॉलीसी कडून परत मिळणार आहे, तेंव्हा श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 याविभागाने मागणी केलेले उपकरणे विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करुन देता येईल.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस ओ.टी. नं. 2 या विभागाकरीता Sevonoflurane Vaporiser ०१ नग विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे एकुण पुर्णांकित रक्कम रु.१,२०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.१७६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं. 2 या विभागाकरीता ०१ नग Sevonoflurane Vaporiser खरेदीकामी विहीत पद्धतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या रक्कम रु.१,२०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.१०२ **श्री साईबाबा रुग्णालयातील सि.व्ही.टी.एस.ओ.टी.२ करीता Syring Pumpe मंजूर दराने खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 मध्ये दि.११/०४/२०१५ रोजी शॉर्ट सर्किटमुळे आग लागली होती, त्यामुळे ओ.टी. मधील Syringe Pumps खराब झालेले आहे. त्यामुळे सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 विभागाने दि.११/०४/२०१५ (औषध भांडार विभाग प्राप्त दि.१२/०५/२०१५) चे मागणी पत्रकान्वये ५ नग Syringe Pumps ची मागणी केलेली आहे. सदर Syringe Pumps करीता प्रती नग अंदाजे रु. ५१,०००/- याप्रमाणे ५ नग Syringe Pumps खरेदीकामी एकूण रक्कम रु.२,५५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.२५/०९/२०१४ निर्णय क्र.८६९ अन्वये मा.त्रिसदस्य समिती सभेत श्री साईबाबा रुग्णालयात नवीन Surgical ICU या विभागाकरिता लागणारे Syringe Pump विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.९,१८,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली असून त्याकामी प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक सिलबंद निविदा उघडण्यात येऊन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. सदर खरेदीचे वेळेस अजुन एक ५ नग संख्या वाढवून घेऊन सदर Syringe Pumps खरेदी करता येईल. तसेच जून्या खराब झालेल्या Syringe Pumps ची विमा पॉलीसी काढण्यात आलेली होती त्यामुळे सदर Syringe Pumps खरेदी केल्यानंतर त्याचे बील संस्थानला विमा पॉलीसी कडून परत मिळेल.

श्री साईबाबा रुग्णालयात नवीन Surgical ICU या विभागाकरिता लागणारे Syringe Pump खरेदीचे वेळेस अजुन ५ नग संख्या वाढवून घेऊन सदर Syringe Pumps खरेदी करता येईल. तसेच जून्या खराब झालेल्या Syringe Pumps ची विमा पॉलीसी काढण्यात आलेली होती, त्यामुळे सदर Syringe Pumps खरेदी केल्यानंतर त्याचे बील संस्थानला विमा पॉलीसी कडून परत मिळेल. त्यामुळे Syringe Pumps नविन खरेदी करण्यास हरकत नाही.

सदरचे ०५ नग Syringe Pumps श्री साईबाबा रुग्णालयातील नवीन Surgical ICU या विभागाकरिता खरेदी करण्यात येत असलेल्या Syringe Pumps चे खरेदीचे वेळेस ०५ नग संख्या वाढवून घेण्यास तसेच याकामी येणा-या रु.२,५५,०००/- चे खर्चास मान्यता घेणेसाठीचा प्रस्ताव दि.२७/१०/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता त्यास निर्णय क्र.३९० अन्वये मान्यता मिळालेली आहे.

परंतु नवीन Surgical ICU या विभागाकरिता खरेदी करण्यात येत असलेल्या Syringe Pumps चे ई-निविदेची Digital Signature expired झाल्यामुळे सदरचे खरेदीकामी फेर ई-निविदा मागविण्यात येत आहे. परंतु सदरचे खरेदीकामी बराच कालावधी लागणार असल्यामुळे तसेच सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 या विभागास तातडीने आवश्यकता आहे. त्यामुळे सध्या दि.२७/१०/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्रमांक ३९६

श्री साईबाबा रुग्णालयातील CRU I या विभागाकरिता Syringe Pump M/s. Veda Lifesciences Pvt. Ltd., Pune यांचेकडून प्रती नग रु.२३,४९९/- या प्रमाणे १० नग रु.२,३४,९९०/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यास मान्यता मिळालेली असून त्यानुसार M/s. Veda Lifesciences Pvt. Ltd., Pune यांना पुरवठा आदेश देण्यात येत असून सदरचे मंजुर दराने सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 या विभागासाठी आवश्यक असणारे ५ नग Syringe Pump खरेदी करता येतील. M/s.Veda Lifesciences Pvt. Ltd., Pune यांचे मंजुर दरानुसार ५ नग Syringe Pump खरेदीकामी रक्कम रु.१,१७,४९५/- इतका खर्च येईल.

तरी सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 या विभागासाठी आवश्यक असणारे ५ नग Syringe Pump M/s. Veda Lifesciences Pvt. Ltd., Pune यांचे मंजुर दर प्रती नग रु.२३,४९९/- याप्रमाणे रु.१,१७,४९५/- (अक्षरी रु.- एक लाख सतरा हजार चारशे पंच्यान्नव मात्र) इतक्या रक्कमेत खरेदी करण्यास तसेच त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता असावी.

निर्णय क्र.१७७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 या विभागासाठी आवश्यक असणारे ५ नग Syringe Pump, M/s. Veda Lifesciences Pvt. Ltd., Pune यांचे मंजुर दर प्रती नग रु.२३,४९९/- याप्रमाणे रु.१,१७,४९५/- मात्र रकमेत खरेदी करणेस व याकामी त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.१०३ **Inj.Immunorel 5G/100 ML खरेदीस व खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पिटलमधील आय.सी.सी.यु. विभागात श्री.रविंद्र गोरखनाथ गायके हे कायम कर्मचारी अत्यवस्थ असल्याने दि.२४/०७/२०१५ ते दि.२७/०७/२०१५ या कालावधीत (IPD No.115225 OPD No.588553) रोजी डॉ.देसाई यांचे under उपचार घेत होते. उपचार घेत असताना त्यांना Inj. Immunorel हे इंजेक्शन वापरण्यात आले. औषध भांडार विभागात सदर Inj. Immunorel हे Nirlife या कंपनीचे उपलब्ध होते, परंतु डॉ. देसाई मॅडम यांनी उपरोक्त Nirlife या कंपनीचे इंजेक्शन मी वापरत नाही, मला Reliance कंपनीचेच इंजेक्शन उपलब्ध करुन मिळावे असे सांगितले म्हणून तत्कालीन प्र.स्टोअर मॅनेजर, सौ.चंदा मोहन वाघ यांनी परस्पर अपोलो मेडीकल मधून Reliance कंपनीचे इंजेक्शन उपलब्ध करुन दिलेले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name | Bill No | Date | Amt.in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | Apollo Pharmacy, Shirdi | DS0001326 | 25/07/2015 | 1,43,000.00 |
| | | | Total Amt.in Rs. | 1,43,000.00 |

वरीलप्रमाणे Reliance कंपनीचे Inj. Immunorel खरेदीकामी रक्कम रु.१,४३,०००/- इतका खर्च आलेला आहे. तरी सदर खरेदीस व खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.१७८ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानचे औषध भांडार विभागामध्ये Inj. Immunorel हे इंजेक्शन Nirlife या कंपनीचे उपलब्ध असताना देखील तत्कालीन प्र.स्टोअर मॅनेजर, सौ.चंदा मोहन वाघ यांनी परस्पर अपोलो मेडीकल मधून Reliance कंपनीचे इंजेक्शन जादा दराने उपलब्ध करुन दिल्यामुळे संस्थानचे आर्थिक नुकसान झालेले आहे. याकरिता तत्कालीन प्र.स्टोअर मॅनेजर, सौ.चंदा मोहन वाघ यांची खातेनिहाय चौकशी करण्यात येऊन, जबाबदारी निश्चित करण्यात यावी व जबाबदार असल्याचे आढळून आल्यास सदरहू औषधाची रक्कम संबंधीतांकडून वसूल करणेत यावी.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.१०४ **श्री साईबाबा हॉस्पिटल रुग्णालयातील जनरल ओ.टी.या विभागाकरीता Needle Holder (Size-6mm) कोटेशन मागवून खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ. टी. या विभागाने ०२ नग Needle Holder (Size- 6 mm) ची मागणी केलेली आहे.

सदर Needle Holder चा उपयोग Laproscope Surgery करतांना विविध प्रकारचे Long Instrument वापरले जातात. त्यापैकी Needle Holder हे एक आहे. सध्या त्यांचेकडे असलेले Needle Holder हे सन २००५ साली रक्कम रु. ६३,८२१/- इतक्या रक्कमेचे खरेदी केलेले असून सध्या ते व्यवस्थीत काम करत नाही. त्यामुळे त्यांनी त्यांचे मागणीपत्रकात जुने Needle Holder हे परत (Buyback) करुन नवीन Needle Holder हे खरेदी करणेबाबत कळविले आहे. सदर जुने Needle Holder ची घसारा किंमत वजा जाता येणारी किंमत रक्कम रु.४,७९२/- मात्र इतकी आहे.

उपरोक्त ०२ नग Needle Holder (Size- 6 mm) खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ९५,०००/- (अक्षरी रुपये - पंच्याण्णव हजार) इतका खर्च अपेक्षित आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) सदर Needle Holder ची घसारा किंमती वजा जाता दि. ३१/०३/२०१५ अखेर किंमत ४,७९२/- इतकी आहे. सदर रक्कम ही रु. ५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार नाही.

३) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र.८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३– रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असले तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु. ३

लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** सदर Needle Holder चा उपयोग Laproscope Surgery करतांना विविध प्रकारचे Long Instrument वापरले जातात. त्यापैकी Needle Holder हे एक आहे. सध्या त्यांचेकडे असलेले Needle Holder हे सन २००५ साली रक्कम रु. ६३,८२१/- इतक्या रक्कमेचे खरेदी केलेले असून सध्या ते व्यवस्थीत काम करत नाही. त्यामुळे त्यांनी त्यांचे मागणीपत्रकात जुने Needle Holder हे परत (Buyback) करुन नवीन Needle Holder हे खरेदी करणेबाबत कळविले आहे. सदर जुने Needle Holder ची घसारा किंमत वजा जाता येणारी किंमत रक्कम रु. ४,७९२/- मात्र इतकी आहे. त्यामुळे नवीन Needle Holder हे खरेदी करणेस व जुने Needle Holder परत (Buyback) करणेस हरकत नाही.

श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ. टी. या विभागाकरिता सदर नवीन Needle Holder हे Buyback करुन विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करता येईल.

शासनाचे नवीन खरेदी कार्यपध्दतीची नियमावली नुसार उपरोक्त जुने Needle Holder परत (Buyback) करुन, नवीन Needle Holder विहीत पद्धतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु. ९५,०००/- (अक्षरी रुपये - पंच्याणव हजार) मात्र खर्चाचे प्रस्तावास मान्यता असावी.

निर्णय क्र.१७९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाचे नवीन खरेदी कार्यपध्दतीच्या नियमावलीनुसार श्री साईबाबा हॉस्पिटल रुग्णालयातील जनरल ओ.टी. या विभागाकरीता Needle Holder (Size-6mm) खरेदीकामी विहीत पद्धतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या रक्कम रु.९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.१०५ **श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागात न होणा-या तपासण्याबाबत Outsourcing करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागात दैनंदिन रुग्णांच्या विविध प्रकारच्या रक्त व लघवीच्या तपासण्या केल्या जातात. परंतु, सर्वच्या– सर्व तपासण्या आपल्या लॅबमध्ये काही तांत्रिक कारणास्तव होऊ शकत नाहीत किंवा कोणत्याही एका लॅबमध्ये त्या होत नाहीत, त्यामुळे त्या बाहेरील लॅबमध्ये कराव्या लागतात. अशा तपासण्याचा खर्च जास्त असून त्याची क्वचित प्रमाणातच मागणी असते. त्यामुळे अशा टेस्ट येथे करणे आर्थिक व तांत्रिकदृष्टया करणे शक्य नसते. त्यामुळे त्या Test Outsource करणे आवश्यक आहे.

सध्या बाहेरील लॅबमध्ये करण्यात येणा-या तपासण्यामध्ये Quality Report तसेच दरामध्ये सवलत मिळणेकामी रुग्णालयाच्या जवळपास असणा-या Certified/ Accreditated प्राप्त लॅब धारकाचे दरांचे तसेच त्यांचे लॅबची सर्व माहिती मागवून प्राप्त दर व माहितीनुसार त्या लॅबची निवड करुन त्यांचेकडून रुग्णांच्या तपासण्या करण्यात येतील, त्यामुळे रुग्णांची होणारी गैरसोय टाळता येऊन त्यांना दरामध्ये सुध्दा सवलत मिळेल. सदर बाबींचा विचार करता आपण कायम कर्मचा-यांना वैद्यकीय बील परतावा देत असल्याने त्याकामी संस्थानचा फायदा होणार आहे तसेच ससून हॉस्पिटल पुणे यांचेशी संपर्क साधून त्याबाबत माहिती घेतली असता त्यांचेकडेही ज्या Test त्यांच्या हॉस्पिटलमध्ये होत नाही. त्याची जाहिरातीव्दारे कोटेशन मागवून निम्नतम दर धारकास पुरवठा आदेश देण्यात आले आहे.

तेंव्हा वरीलप्रमाणे शासन मान्यता प्राप्त लॅबधारकांचे दर व त्यांची सर्व माहिती मागविण्याचा प्रस्तावास मान्यता असावी.

निर्णय क्र.१८० **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागामध्ये ज्या तपासण्या होत नाहीत त्या तपासण्या Outsourcing पध्दतीने करणेकामी, शासन मान्यता प्राप्त लॅबधारकांचे दर व त्यांची सर्व माहिती मागविणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रकिया राबविण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.१०६ **तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणे बाबत. (माहे ऑक्टोबर-२०१५)**

प्रस्ताव- (१) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०३/०६/२००६ निर्णय क्रं.३४८ नुसार वैद्यकीय संचालक यांना दरमहा रु. १,००,०००/- पर्यत तातडीचे औषध खरेदी करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.

(२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १८/१०/२००८ निर्णय क्रं.७५९ (२८-८) अन्वये वैद्यकीय संचालक यांनी त्याचे अधिकारात तातडीचे खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे. त्यानुसार दरमहा तातडीने औषध / सर्जिकल साहित्य खरेदी करण्यात येते.

(३) मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२६/०३/२००९ निर्णय क्र. २५४ अन्वये वैद्यकीय संचालक यांना दरमहा रु. १,५०,०००/- पर्यत तातडीचे औषध खरेदी करुन बिले अदा करणेत यावी व रु. १,५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याचे खरेदी करुन बिले अदा करुन नोंद घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावे असे ठरले.

(४) मा. त्रिसदस्य समिती सभा दि. १७/०४/२०१३ निर्णय क्रं. ३४१ अन्वये राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत आंतररूग्ण विभागात उपचार घेणा-या रुग्णांसाठी उपलब्ध नसलेली औषधे संस्थान मार्फत स्थानिक विक्रेत्याकडून खरेदी करुन द्यावे असे ठरले आहे.

(५) मा.त्रिसदस्य समिती सभा दि. ०९/१२/२०१४ निर्णय क्र१०२१ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वैद्यकीय संचालक यांना असलेल्या दरमहा तातडीने औषध /सर्जिकल साहित्य खरेदीस रक्कम रु १,५०,०००/- मात्र ऐवजी रु.३,००,०००/- मात्र करणेस मान्यता देण्यात आली.

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभाग, प्रयोगशाळा विभाग इत्यादी विभागाकरीता सर्जिकल मटेरियल, औषधे, केमीकल्स इत्यादी तातडीने आवश्यकता होती. सदर मटेरियल मुंबई येथून खरेदी केलेली आहेत. सदर औषधे/केमिकल्स /सर्जिकल साहित्य आपणाकडे उपलब्ध नसल्यामुळे ती तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. त्यासाठी रु. २०,१६०/- मात्र खर्च आलेला आहे. सदरची खरेदी ही माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये करण्यात आलेली आहे. सदरची खरेदी ही वैद्यकीय संचालक यांना दरमहा रु. ३,००,०००/- मात्र इतक्या तरतुदी व्यतिरिक्त रक्कम रु. २०,१६०/- मात्र इतक्या रक्कमेची आता पर्यंत खरेदी झालेली आहे.

**मागणी:-**

| Sr. No. | Name of Party | Bill No. | Date | Amt. in Rs. | Remark |
|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Rahul Brothers, Mumbai | 481 | 24/09/2015 | 20160.00 | Cardiac Sub Store |
| | | | Total Amt. In Rs. | 20160.00 | |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी,शासन निर्देश,तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र.१७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे.त्यानुसार संस्थान तर्फे दोन धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत -** राजीव गांधी योजने अंतर्गत असलेल्या रुग्णांना लागणारी सर्व औषधे संस्थान रुग्णालयातून पुरवली जातात त्यांना बाहेरील औषध दुकानातून औषधे लिहून दिली जात नाही. तसेच तातडीच्या प्रसंगी उपलब्ध नसलेली औषधे देखील स्थनिक विक्रेत्याकडून खरेदी करावी लागतात. त्यानुसार सदर खरेदी कलेली असून बिले अदा करावयाची आहे.

उपरोक्त प्रस्तावात तातडीने केलेल्या खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर .

निर्णय क्र.१८१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे ऑक्टोबर-२०१५ मध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व त्याकामी आलेल्या खर्चाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.१०७ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे अत्याधुनिक संगणकीकृत करणेकामी साहित्य खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पिटल सन २००६ मध्ये कार्यान्वीत झाले. हॉस्पिटल कार्यान्वीत होण्यापुर्वी १११ संगणक संच खरेदी करण्यात आले होते. तदनंतर आवश्यकतेनुसार वेळोवेळी संगणक व संगणकीय साहित्य खरेदी करण्यात आले आहे. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना वैद्यकीय सेवा जलद गतीने मिळावी या करीता आवश्यक असणारे (HMIS) सॉफटवेअरकार्यान्वीत करणेत आले होते.

श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता शासनाची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना कार्यान्वीत झाली असून पंचक्रोशीतील रुग्ण याचा लाभ घेत आहे. दिवसोदिवस येथे रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे.त्याच बरोबर दैनंदिन कामकाजही वाढले आहे. यापुर्वी खरेदी करण्यात आलेलया संगणकीय साहित्यापैकी किमान ८० % संगणकीय साहित्य दुरुस्ती होण्याच्या मर्यादेच्या पलीकडे जावून पुर्णत: कालबाहय झालेले आहेत.

उपरोक्त कालावधीत संगणकाकरीता आवश्यक असणारी (HMIS) प्रणाली कार्यान्वीत करणेत आली होती. परंतु मायक्रोसॉफ्ट कंपनीने सदर प्रणालीला आवश्यक असणा-या VB6 चा सपोर्ट काढून घेण्यात आलेला असल्याने सदर साफ्टवेअरमध्ये काही तांत्रिक अडचणी आल्यास दुरुस्त होत नाही व दैनंदिन कामामध्ये अडचणी उद्भवतात. तसेच HMIS Software तयार करण्यात आलेल्या कंपनीने देखील सपोर्ट बंद केलेला आहे. सध्या JAWA,NET इ.सारख्या अत्याधुनिक (HMIS) प्रणाली मार्केटमध्ये उपलब्ध आहेत.

सध्या हॉस्पिटलमध्ये वापरात असणारे संगणक, पुर्णपणे बंद पडलेले संगणक व बंद पडणेच्या स्थितीत असणा-या संगणक व संगणकीय साहित्याचा तपशिलखालील प्रमाणे.

| तपशिल | एकुण संख्या | सध्या कार्यान्वीत | पुर्ण बंद पडलेले | बंद पडणेच्या स्थितीत |
|---|---|---|---|---|
| संगणक | १५१ | ७५ | ७६ | ४० |
| प्रिन्टर्स | १०३ | ५८ | ४५ | ३० |
| युपीएस | १३७ | ४० | ९७ | २० |
| स्विचेस | १८ | १६ | ०२ | १२ |
| सर्व्हर | ०४ | ०२ | ०२ | ०२ |
| लॅपटॉप | ०१ | ०१ | ०० | ०१ |

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे कामाकाज सुरळीतपणे चालणेच्या दृष्टीने नवीन संगणक, प्रिंटर्स, स्कॅनर्स, लॅपटॉप, टॅब, संगणकीय साहित्य, नेटवर्कींग, RF साहित्य, संगणकीय प्रणाली, पॅक्स, अॅन्टीव्हायरस इ. खरेदी करणे आवश्यक आहे. दोन्ही रुग्णालयाचे आवश्यकतेनुसार सध्या खालीलप्रमाणे संगणक, संगणकीय साहित्य व संगणकीय प्रणालीची आवश्यकता आहे.

परिशिष्ट " ब "

| तपशिल | संगणक | प्रिन्टर्स | युपीएस | स्विचेस | सर्व्हर | लॅपटॉप | टॅब |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | १६० | १४० | १८० | २० | ७ | १० | ०५ |

परिशिष्ट " क "

| तपशिल | |
|---|---|
| संगणकीय प्रणाली | श्री साईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयाकरिता अत्याधुनिक प्रणाली (HMIS), PACS System प्रणाली, Marathi Font प्रणाली व अॅन्टी व्हायरस व इतर सॉफ्टवेअर |

संदर्भ क्र नुसार यावर ०१.सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालये अत्याधुनिक संगण्कीकृत करणेकामी प्रस्तावात नमुद केलेले संगणकीय साहित्य खरेदी करावयाचे आहेपरंतु या . ची कशीसाहित्या, कोठे, किती व कशासाठी आवश्यकता आहे, याचा उल्लेख दिसुन येते नाहीकरीता या सर्व बाबी . .व फेरसादर करणेत यावाचा अभिप्रायासह सदरहु प्रस्तात व त्यांत याव्यात्रज्ञान विभागाकडुन तपासुन घेण्यामाहिती तं त्यानुसार संदर्भ क्र०२. चे माहिती तंत्रज्ञान विभागाचे दिनुसार श्री साईबाबा व श्र २०१५/१२/२३.ी साईनाथ रुग्णालये विभागात कार्यरत असलेल्या विभागांची विभागवार माहिती किमंतीसह कळविण्यास सांगितले असा अभिप्राय प्राप्त झाला त्याचा तपशिल खालील प्रमाणे-

| Sr.No | Department Name | Desk wise Location | Desktop | Printers | UPS | Licenses MS-Office (Standard/ Profession) | HMS | Anti virus | Marathi (Unicode) software |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **Shri Sainath Hospital (SSR)** | Medical Superintendent | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 |
| 2 | SSR | O.S.Office | 3 | 2 | 3 | 3 | 3 | 3 | 3 |
| 3 | SSR | Anudan | 3 | 2 | 3 | 3 | 3 | 3 | 3 |
| 4 | SSR | Matron | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| 5 | SSR | Matron Office | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| 6 | SSR | Social Worker | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| 7 | SSR | Reception | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 8 | SSR | Billing | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 1 |
| 9 | SSR | Casepaper | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | - |
| 10 | SSR | Medicin O.P.D | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 11 | SSR | Sub-Store | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | - |
| 12 | SSR | Histhopathlab | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 13 | SSR | Pathlab | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| 14 | SSR | Biochemistry | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 15 | SSR | Sonography | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 16 | SSR | Ortho O.P.D | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 17 | SSR | Physcian O.P.D | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 18 | SSR | Casualty Dr.Room | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 19 | SSR | General Surgeon O.P.D | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 20 | SSR | E.C.G O.P.D | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 21 | SSR | Injection O.P.D | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 22 | SSR | Diabetic O.P.D | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 23 | SSR | Gynaecology O.P.D | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 24 | SSR | Children's O.P.D | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 25 | SSR | Skin O.P.D | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 26 | SSR | Eye's O.P.D | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 27 | SSR | E.N.T. O.P.D | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 28 | SSR | Dental O.P.D | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 29 | SSR | Homeopathic O.P.D | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 30 | SSR | Physiotherapy O.P.D | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 31 | SSR | Ayurveda O.P.D | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 32 | SSR | X-Ray Reporting Room | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 33 | SSR | Gynaecology Ward | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 34 | SSR | Male Surgical Ward | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 35 | SSR | Female Surgical Ward | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 36 | SSR | I.C.C.U Ward | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 37 | SSR | Male Ortho Ward | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 38 | SSR | Surgical Ward 2 | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 39 | SSR | Female Medical Ward | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 40 | SSR | Male Medical Ward | 1 | - | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 41 | SSR | Eyes's Ward | 1 | - | 1 | 1 | | 1 | - |
| 42 | SSR | Children's Ward | 1 | - | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 43 | SSR | Special Room | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 44 | SSR | DOT Center | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 45 | SSR | I.C.T. Center | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 46 | SSR | Bio-Medical | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 47 | **Shri Saibaba Hospital (SSH)** | Medical Director | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| 48 | SSH | Medical Director P.A | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| 49 | SSH | Dy.Medical Director | 2 | 2 | 2 | 2 | 1 | 2 | 2 |
| 50 | SSH | Medical Administrator | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| 51 | SSH | Matron | 1 | | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| 52 | SSH | Matron Office | 1 | 1 | 1 | 1 | - | 1 | 1 |
| 53 | SSH | Sr.Patholgist | 1 | 1 | 1 | 1 | - | 1 | 1 |
| 54 | SSH | Jr.Pathlogist | 1 | 1 | 1 | 1 | - | 1 | 1 |
| 55 | SSH | Pathlab Reporting Room | 1 | 1 | 1 | 1 | - | 1 | 1 |
| 56 | SSH | Biochemistry | 1 | 1 | 1 | 1 | - | 1 | - |
| 57 | SSH | Microbiology | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 58 | SSH | Reception | 2 | - | 2 | 2 | - | 2 | - |
| 59 | SSH | C.T.Scan | 1 | - | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 60 | SSH | M.R.I | 1 | - | 1 | 1 | | 1 | - |
| 61 | SSH | C.T.Scan Reporting Room | 3 | 2 | 3 | 3 | 1 | 3 | 1 |
| 62 | SSH | X-Ray | 1 | - | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 63 | SSH | Billing | 5 | 7 | 5 | 5 | 7 | 5 | 1 |
| 64 | SSH | O.P.D. Casepaper | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 65 | SSH | Casualty Casepaper Billing | 2 | 3 | 2 | 2 | 3 | 2 | - |
| 66 | SSH | Casualty Dr. Room | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 67 | SSH | Dental | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 68 | SSH | Medical Store | 12 | 12 | 12 | 12 | 12 | 12 | 10 |
| 69 | SSH | Bio-Medical | 2 | 1 | 2 | 2 | 1 | 2 | 2 |
| 70 | SSH | Lenan | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| 71 | SSH | P.R.O | 15 | 15 | 15 | 15 | 15 | 15 | 8 |
| 72 | SSH | E.D.P | 2 | 1 | 2 | 2 | 1 | 2 | 2 |
| 73 | SSH | N.A.B.H | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 1 |
| 74 | SSH | M.R.D | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | - |
| 75 | SSH | Neuro O.T | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 76 | SSH | Ortho O.T | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 77 | SSH | General O.T | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 78 | SSH | Male Ward | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 79 | SSH | Sub- Store | 2 | 1 | 2 | 2 | 1 | 2 | 1 |
| 80 | SSH | Cathlab O.T | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 81 | SSH | C.R.U - 1 Ward | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 82 | SSH | C.R.U - 2 Ward | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 83 | SSH | C.R.U - 3 Ward | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 84 | SSH | C.R.U - 4 Ward | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 85 | SSH | G.I.C.C.U Ward | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 86 | SSH | I.C.C.U Ward | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 87 | SSH | Female Ward | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 88 | SSH | T.S.R. Ward | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 89 | SSH | Delux , S.P.R. Ward | 1 | - | 1 | 1 | - | 1 | - |
| 90 | SSH | Dialysis | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 91 | SSH | General Surgeon O.P.D | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 92 | SSH | Visitor Dr. O.P.D | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 93 | SSH | E.E.G&E.C.G O.P.D | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 94 | SSH | 2D-Echo Reporting Room | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| 95 | SSH | Dietitian O.P.D-4 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 96 | SSH | Ortho O.P.D-2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 97 | SSH | Neuro O.P.D-3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 98 | SSH | Cardiologist O.P.D -11 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 99 | SSH | Physician O.P.D-5 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 100 | SSH | Cardiologist O.P.D-10 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 101 | SSH | cardiac O.P.D-6 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 102 | SSH | cardiac O.P.D-7 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 103 | SSH | cardiac O.P.D-9 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 104 | SSH | Sonography OPD-8 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | - |
| 105 | SSH | Blood Bank | 2 | 1 | 2 | 2 | 1 | 2 | 1 |
| 106 | SSH | Finance | 11 | 9 | 11 | 11 | 7 | 11 | 7 |
| 107 | SSH | H.R | 7 | 4 | 7 | 7 | 3 | 7 | 7 |
| 108 | SSH | E.D.P | 5 | 3 | 5 | 5 | 2 | 5 | 2 |
| 109 | SSH | Electric Dept. | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| 110 | SSH | Biomedical West | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| | | **Total-** | **183** | **140** | **183** | **183** | **136** | **183** | **70** |

| Sr No. | Department Name | | Network Switches | Server |
|---|---|---|---|---|
| 1 | SSH | Main server Room | 2 | - |
| 2 | SSH | Administrative Office | 1 | - |
| 3 | SSH | Ground Floor Near by M.D Cabin | 1 | - |
| 4 | SSH | Ground Floor by Neruor O.T | 1 | - |
| 5 | SSH | Ground Floor by Casualty | 1 | - |
| 6 | SSH | Ground Floor by P.R.O. Office | 1 | - |
| 7 | SSH | 1st Floor Near by CRU-4 | 1 | - |
| 8 | SSH | 1st Floor Near by I.C.C.U | 1 | - |
| 9 | SSH | 1st Floor Near by T.S.R | 1 | - |
| 10 | SSH | 2 nd Floor Near by Cathlab | 1 | - |
| 11 | SSH | Blood Bank | 1 | - |
| 12 | SSH | Application Server | | |
| 13 | SSH | Database Server | - | 1 |
| 14 | SSH | Domain Server | - | 1 |
| 15 | SSH | Antivirus Server | - | 1 |
| 16 | SSH | PACS System Server | - | 2 |
| 17 | SSR | Application Server | - | 1 |
| 18 | SSR | Database Server | - | 1 |
| 19 | SSR | Shri Sainath Prasadalay 1 st Floor Server Room (DC) | 1 | - |
| 20 | SSR | Shri Sainath Hospital Prasadalay Ground Floor RGJAY | 1 | - |
| 21 | SSR | Case paper Counter | 1 | - |
| 22 | SSR | Bldg. No.1, 1st Floor Near Surgical Ward 1 | 1 | - |
| 23 | SSR | Bldg. No.1, 2nd Floor Near Ortho Ward | 1 | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 24 | **SSR** | Bldg. No.1, 1st Floor Near Ortho Ward | 1 | - |
| 25 | **SSR** | Bldg. No.2, Ground Floor Near Male Medicain Ward | 1 | - |
| 26 | **SSR** | Bldg. No2 Ground Floor Near Sub-Midical Store | 1 | - |
| | | **Total** | **20** | **7** |
| Laptops | | | | |
| Sr No. | **Department Name** | | Qty | |
| 1 | SSH | Medical Director | 1 | - |
| 2 | SSH | Dy.MD | 1 | - |
| 3 | SSH | AM | 1 | - |
| 4 | SSR | MS | 1 | - |
| 5 | SSH | BIOMEDICAL | 1 | - |
| 6 | SSH | Finance | 1 | - |
| 7 | SSH | Purchase | 1 | - |
| 8 | SSH | Store | 1 | - |
| 9 | SSH | EDP | 1 | - |
| 10 | SSH | HR | 1 | - |
| | | **Total** | **10** | |

तरी श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालावे याकरिता परिशिष्ट "ब" मध्ये नमुद केलेल्या अत्याधुनिक संगणक, हार्डवेअर साहित्य, नेटवर्कींग, RF साहीत्य, अत्याधुनिक संगणकीय साहीत्य तसेच परिशिष्ट "क" मध्ये नमुद केलेले अत्याधुनिक (HMIS), PACS System, ॲन्टीव्हायरस इ. प्रणाली, खरेदी करणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३.५ कोटी मात्रचे खर्चास ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव मा.त्रीसदस्य समितीचे सभेमध्ये चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सादर.

**निर्णय क्र.१८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालावे याकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अत्याधुनिक संगणक, हार्डवेअर साहित्य, नेटवर्कींग, RF साहीत्य, अत्याधुनिक संगणकीय साहित्य तसेच अत्याधुनिक (HMIS), PACS System, ॲन्टीव्हायरस प्रणाली इ. खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३,५०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच याकामी येणा-या खर्चास मान्यता घेणेसाठी संस्थान वकिलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये अर्ज दाखल करणेत यावा व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१०८** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय ऑनलाईन करीता संगणक व संगणकीय साहित्य खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शासनाचे चॅरिटी व मृत्युची माहीती ही ऑनलाईन झालेली आहे. सदरची माहीती ही दररोज ऑनलाईन भरावयाचे कळविले आहे. त्यासाठी दोन्ही हॉस्पिटलकरीता संगणक संच व संगणकीय साहित्य लागणार आहे.

सदर कामकाजासाठी संगणक व संगणकिय साहित्याचा तपशिल खालीलपमाणे-

| अन. | तपशिल | नग |
|---|---|---|
| 1. | I 5 processor,4 GB RAM, 500 GB Hard Disk,USB port Serial port, USB Keyboard,USB Optical Mouse, DVD Writer, 17'' LED Screen Monitor with Windows 8.1 Operating System License | 05 |
| 2. | Scanner printer | 05 |
| 3. | UPS | 05 |
| 4. | LAN Cable –Box | 02 |

सदर साहित्याकरीता अंदाजे एकुण रक्कम रु. २,८३,०००/- मात्र खर्च येणार आहे. तरी, साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुणालय या दोन्ही संस्थानचे रुणालये ऑनलाईन करणेकामी संगणक व संगणकीय साहित्य खरेदी करण्यास मान्यता असावी, ही विनंती.

तरी, दोन्हीं रुग्णालयाकरीता संस्थानचे विहित पध्दतीने निवीदा मागवुन खरेदी करणेस व याकामी येणा-या रु. २,८३,०००/- (अक्षरी दोन लाख त्र्यांशी हजार) मात्रचे अंदाजे इतक्या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सविनय सादर.

मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.१८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालये ऑनलाईन करणेकामी संगणक व संगणकीय साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२,८३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.१०९ **Fully Automated Bio-Chemistry Analyzer मशिनचे दुरुस्तीबाबत.**

प्रस्ताव- (अ) श्री साईनाथ रूग्णालयातील पॅथोलॉजी लॅब विभागाकरीता पुरवठा आदेश क्र. 2765/2011, दि. 09/09/2011 अन्वये एक Fully Automated Bio- Chemistry Analyzer (Model- ERBA/ EM200) मशिन मे. ट्रान्सासिया बायोमेडीकल्स लि.मुंबई यांचेकडुन एकुण रु.11,06,700/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदर मशिन दि. 13/03/2012 रोजी कार्यान्वीत करण्यात आले असुन कंपनीने दिलेला तीन वर्षाचा वॉरंटी कालावधी दि.12/03/2015 रोजी संपला आहे. मशीनचे नियमित दुरुस्ती व देखभालीकरीता कंपानीकडे दि. 01/04/2015 ते दि.31/03/2016 या कालावधीकरीता एकुण रू 78,219/- इतक्या रकमेत कॉम्प्रेहेसीव्ह वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले आहे. सदर कालावधीमध्ये दुरुस्ती व देखभालीकरीता लागणारे सर्व स्पेअर पार्ट कंपनी स्वखर्चाने बदलणार असुन कंझ्युमेबल स्पेअर पार्ट (P.M Kit, A.M. Kit, Lamp, Printer, Printer Head, Paper Roll, Optical Filters, Flowcell, Tubing Syringe, Electrodes, Cuvettes इ.) ची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सध्या उपरोक्त मशिन व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागाने कळविले आहे. त्यानुसार सदर कंपनी इंजिनीअर तातडीच्या भेटी करीता आले असता त्यांनी मशिनची तपासणी करून मशिनचे Na, K, CL व Reference Electrode हे कंझ्युमेबल पार्ट खराब झाल्यामुळे बदलण्याची आवश्यकता असल्याचे स्वर्हीस रिपोर्ट 534485, दि. 21/01/2016 अन्वये कळविले आहे. त्यासाठी कंपनीने त्याचे पत्र क्र.34035, दि.21/01/2016 अन्वये कझ्युमेबल पार्ट बदलणेकरीता सर्व करांसहीत एकुण रु.69,750/- (अक्षरी रु. एकोणसत्तर हजार सातशे पन्नास मात्र) इतका खर्च येणार आहे. सदर Electrode हे विशिष्ट रचना व स्पेसीफिकेशन असलेले असतात. सदर Electrode हे कोणत्याच प्रकारच्या वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टमध्ये कंपनी बदलुन देत नाही. तसेच मे.ट्रान्सासिया बायोमेडीकल्स लि.मुंबई यांचेकडेच सदर Fully Automated Bio- Chemistry Analyzer चे स्पेअर पार्ट उपलब्ध असतात. सदर Electrode करीता कंपनी सहा महिन्यांची वॉरंटी देत आहे.

तरी मे.ट्रान्सासिया बायोमेडीकल्स लि.मुंबई यांचेकडुन Fully Automated Bio-Chemistry Analyzer मशिनचे कझ्युमेबल पार्ट खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू.69,750/- च्या खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.१८४ **(अ) यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मे.ट्रान्सासिया बायोमेडीकल्स लि.मुंबई यांचेकडुन श्री साईनाथ रूग्णालयातील Fully Automated Bio-Chemistry Analyzer मशिनचे कझ्युमेबल पार्ट खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू.६९,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

(ब) श्री साईनाथ रूग्णालयातील पॅथोलॉजी लॅब विभागाकरीता पुरवठा आदेश क्र. 2765/2011, दि. 09/09/2011 अन्वये एक Fully Automated Bio- Chemistry Analyzer (Model- ERBA/ EM200) मशिन मे.ट्रान्सासिया बायोमेडीकल्स लि.मुंबई यांचेकडुन एकुण रु.11,06,700/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदर मशिन दि. 13/03/2012 रोजी कार्यान्वीत करण्यात आले असून कंपनीने दिलेला तीन वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 12/03/2015 रोजी संपला आहे. मशीनचे नियमीत दुरुस्ती व देखभालीकरीता कंपनीकडे दि. 01/04/2015 ते दि. 31/03/2016 या कालावधीकरीता एकुण रू 78,219/- इतक्या रकमेत कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले आहे. सदर कालावधीमध्ये दुरुस्ती व देखभालीकरीता लागणारे सर्व स्पेअर पार्ट कंपनी स्वखर्चाने बदलणार असुन कन्झ्युमेबल स्पेअर पार्ट (P.M Kit, A.M. Kit, Lamp, Printer, Printer Head, Paper Roll, Optical Filters, Flowcell, Tubing Syringe, Electrodes, Cuvettes इ.) ची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सध्या मशिन व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागाने कळविले आहे. त्यानुसार कंपनी इंजिनीअर तातडीच्या भेटी करीता आले असता त्यांनी मशिनची तपासणी करून Cuvettes हा पार्ट खराब झाल्यामुळे बदलणेची आवश्यकता असल्याचे त्यांचे सर्व्हीस रिपोर्ट क्र 629140,दि.06/08/2015 अन्वये कळविले आहे.सदर मशिन नियमीत वापरात असल्याने तातडीने दुरूस्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी कंपनीने त्याचे पत्र क्र. Pune/001/09/15-16, दि.01/09/2015 (रूग्णालये प्राप्त दि. 18/01/2016) अन्वये Cuvettes-35 Nos. हा कन्झ्युमेबल पार्ट बदलणेकरीता सर्व करांसहीत एकुण रु. 1,67,344/- (अक्षरी रु. एक लाख सदोसष्ट हजार तीनशे चव्वेचाळीस मात्र) इतका खर्च येणार असुन सदर रकमेची कंपनीने आगाउ मागणी केलेली आहे. परंतु कंपनी प्रतिनिधीशी झालेल्या चर्चेअंती वरील पार्ट बदललेनंतर सदर रक्कम अदा होणेस कंपनीने स्वीकृती दर्शविली आहे. सदर Cuvettes विशिष्ट रचना व स्पेसीफिकेशन असलेले असतात. सदर प्रकारचे Cuvettes हे एकुण 45 नग मशिनमध्ये असतात. त्यापैकी यापुर्वी तातडीची आवश्यकता असल्याने दि.11/01/16 रोजी व दि.19/01/16 रोजी असे एकुण 10 नग बदलणेत आले आहेत. मशिन खरेदी केले पासुन प्रथमत:च Cuvettes बदलणेत येत असुन ते कन्झ्युमेबल या प्रकारचे पार्टस आहेत. सदर Cuvettes हे कोणत्याच प्रकारच्या वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टमध्ये कंपनी बदलुन देत नाही. त्यामुळे मे.ट्रान्सासिया बायोमेडीकल्स लि.मुंबई यांचेकडे सदर Fully Automated Bio-Chemistry Analyzer चे स्पेअर पार्ट उपलब्ध असतात.

तरी मे.ट्रान्सासिया बायोमेडीकल्स लि.मुंबई यांचेकडुन Fully Automated Bio-Chemistry Analyzer मशिन करीता Cuvettes-35 नग खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू.1,67,344/- च्या खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.१८४ **(ब) यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मे.ट्रान्सासिया बायोमेडीकल्स लि.मुंबई यांचेकडुन श्री साईनाथ रूग्णालयातील Fully Automated Bio-Chemistry Analyzer मशिनकरीता 35 नग Cuvettes खरेदी करणेस त्यासाठी येणाऱ्या एकुण रू.१,६७,३४४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करणेत आली.**

आयत्या वेळेचा

विषय नं.०१ **श्री साईबाबा संस्थान शैक्षणिक संकुल व्दारा घनकचरा व्यवस्थापन शालेय पासबुक योजना राबविणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुदः-** क्र.१७ (१) व १७(२) (ध) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**प्रास्तविक** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी संचलित संस्थानचे शैक्षणिक संकुल- श्री साईबाबा औ. प्र.शिक्षण संस्था, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यायातून घनकचरा व्यवस्थापन शालेय पासबुक योजना राबविणेबाबत, मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा सदस्य, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी निर्देश दिलेले आहेत.त्यानुसार चारही शैक्षणिक संकुलात शालेय पासबुक योजना राबविणे आहे.

**मागणी:-** शैक्षणिक संकुलात शालेय पासबुक योजना राबविणेकामी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी लागणार आहे.त्यानुसार शैक्षणिक संकुलाकडील सन २०१५-१६ वार्षिक परीक्षा इ.१०वी दि.०१/०३/२०१६ पासून सुरु होत आहे. तसेच इ.१२वी च्या दि. १८/०२/२०१६पासून सुरु होणार आसल्याने त्यांची विद्यार्थी संख्या वजा जाता उपलब्ध संख्येचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | शाळेचे नाव | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिर्डी | ४१८ |
| ०२ | श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी | ९४६ |
| ०३ | श्री साईबाबा कन्या विद्या मंदीर, शिर्डी | ५७५ |
| ०४ | श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी | ७५३ |
| | **विद्यार्थी संख्या -** | **२६९२** |
| | **पुर्णांकित एकूण विद्यार्थी संख्या -** | **२७००** |

अ) वरील विद्यार्थी संख्या २७०० विचारात घेता या योजनेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी लागेल.

| अ.नं. | तपशिल | साईज | विद्यार्थी संख्ये -नुसार मागणी संख्या | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पास बुक ८ पानी चार रंगात प्रिटींग | ४ इंचx ६ इंच | २७०० नग | २०/- | ५४०००/- |
| ०२ | कापडी पिशवी | १४ "x १९ " | २७०० नग | १०/- | २७०००/- |
| ०३ | तिकीटे | १/२"x १/२" | ५०००० नग | ०.२० | १००००/- |
| ०४ | स्टिकर | साईज A 4 | २७०० नग | १०/- | २७०००/- |
| ०५ | रजिस्टर एक क्वायर | साईज A 4 | ८० नग | १५/- | १२००/- |
| ०६ | प्लॅस्टीक पिशवी मोठी (डस्टबीनसाठी) | ३ 'x ४' | २०० नग | १०/- | २,०००/- |
| ०७ | इतर साधन सामग्री खर्च अंदाजे | | | | ५०००/- |
| | **एकूण अपेक्षित खर्च रक्कम रुपये** | | | | **१२६२००/-** |

ब) या योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना बक्षीस दयावयाचे असल्याने बक्षीस वस्तुची खरेदीकामी येणा-या खर्च खालीलप्रमाणे.

| अ.नं. | बक्षिस तपशिल | तिकिट संख्या | प्रति नग अंदाजे खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | सायकल | १००० तिकिटे | ५०००/- |
| ०२ | स्पोर्ट शुज | ५०० तिकिटे | १२००/- |
| ०३ | स्कूल बॅग | २५० तिकिटे | ८००/- |
| ०४ | हॉली बॉल | १५० तिकिटे | ७००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ०५ | बॅट बॉल- | १४५ तिकिटे | ६००/- |
| ०६ | टी-शर्ट | १३५ तिकिटे | ५००/- |
| ०७ | टेबल स्टेनिस रॅकेट | १२५ तिकिटे | ५००/- |
| ०८ | बॅडिमंटन रॅकेट | ११५ तिकिटे | ५००/- |
| ०९ | कंपास पेटी | १०० तिकिटे | १५०/- |
| १० | टिफिन बॉक्स | ९५ तिकिटे | १२५/- |
| ११ | वॉटर कलर बॉक्स | ८५ तिकिटे | १००/- |
| १२ | पेन्सील कलर बॉक्स | ७५ तिकिटे | ७५/- |
| १३ | स्केच पेन | ६० तिकिटे | ५०/- |
| १४ | कॅप | ५० तिकिटे | ५०/- |
| १५ | बॉल पेन | ३५ तिकिटे | ४५/- |
| १६ | किचेन | २५ तिकिटे | ३०/- |
| १७ | पेन्सील | १० तिकिटे | १५/- |
| अंदाजे अपेक्षित खर्च रक्कम रुपये- | | | १०,४४०/- |

वरील 'अ' मध्ये नमुद केलेप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन शालेय पासबुक योजना या योजनेची कार्यवाही करणेकामी अंदाजे रुपये- १,२६,२००/- (अक्षरी रुपये- एक लाख, सहवीस हजार, दोनशे) मात्र खर्च अपेक्षित आहे.तसेच 'ब' मध्ये नमुद केलेल्या या योजनेतील विद्यार्थ्यांना द्यावयाच्या बक्षीस प्रति नग अंदाजे रुपये १०,४४०/- (अक्षरी रुपये-दहा हजार, चारशे) खर्च आवश्यक आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव या नुसार अनुमानः-** खर्चाचा विषय आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** १) प्रास्तविक घनकचरा व्यवस्थापन शालेय पासबुक योजना राबविणेकामी 'अ' मध्ये नमुद केलेप्रमाणे छपाई ही कोटेशन मागवून व 'ब' मध्ये नमुद केलेप्रमाणे साहित्य खरेदीकामी कोटेशन मागविणेस मान्यता असावी.

२) प्रास्तविक 'अ' मध्ये नमुद केलेप्रमाणे छपाईकरीता अंदाजे रुपये- १,२६,२००/- (अक्षरी रुपये- एक लाख,सहवीस हजार, दोनशे) मात्र खर्च अपेक्षित आहे.

३) 'ब' मध्ये नमुद केलेप्रमाणे प्रत्येक शाळेसाठी किमान ५ बक्षिस याप्रमाणे २० बक्षिसे साहित्य खरेदीकरीता अंदाजे रुपये- २,०८,८००/- (अक्षरी रुपये- दोन लाख, आठ हजार, आठशे) मात्र खर्च अपेक्षित आहे.

वरील प्रस्ताविक 'अ' व 'ब' मध्ये नमुद केलेप्रमाणे एकूण रु.३,३५,०००/- (अक्षरी रुपये- तीन लाख, पसतीस हजार) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान शैक्षणिक संकुल व्दारा घनकचरा व्यवस्थापन शालेय पासबुक योजना राबविणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.३,३५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

वरील निर्णय क्र.७६ ते १८४ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर रात्रौ ०७.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| (बाजीराव शिंदे) | (अनिल कवडे) | (श्रीकांत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी**